# “पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा चिकित्सक अभ्यास (१९०४ ते २००४)”

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला
**शोधप्रबंध**

संशोधक
श्री. लोखंडेनारायण सोपान

मार्गदर्शक
प्रा. डॉ. कदम विकास लक्ष्मण

डिसेंबर, २०२०

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. लोखंडे नारायण सोपान यांनी “पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा चिकित्सक अभ्यास (१९०४ ते २००४)” या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : पंढरपूर मार्गदर्शक

दिनांक :

(प्रा. डॉ. कदम विकास लक्ष्मण)

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, “पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा चिकित्सक अभ्यास (१९०४ ते २००४)” हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. कदम विकास लक्ष्मण यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पंढरपूर

संशोधक

दिनांक :

(श्री. लोखंडे नारायण सोपान)

# ऋणनिर्देश

"पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा चिकित्सक अभ्यास (१९०४ ते २००४)" या विषयावरील शोधनिबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. (इतिहास) पदवी परीक्षेसाठी सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. सदर प्रबंधाच्या कामात मला पंढरपूर तालुक्यतील अनेक मान्यवर व्यक्ती आणि संस्था यांनी मौलिक मदत केली आहे. या सर्वाच्या सहकार्यामुळे माझ्यासारख्या सामान्य विद्यार्थ्याला अवघड वाटणारे काम पूर्ण करता आले. इतिहास लेखनामध्ये कागदपत्रांचे महत्व अनन्य साधारण असे आहे. प्रस्तुत प्रबंधाचा विषय जेव्हा मी पीएच.डी.अभ्यासक्रमासाठी निवडला तेव्हा मला या विषयावरील साधने सहज उपलब्ध होतील असे वाटत होते. परंतु इ.स.१९९० ते २००४ या कालखंडात झालेल्या पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीच्या ऱ्हासाची माहिती मिळविणे अवघड होऊन बसले. अशा परिस्थितीत मला साधने व माहिती मिळवून देण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांचाही मी सदैव ऋणी आहे.

सदर अभ्यासासाठी माझे मार्गदर्शक प्रा.डॉ. व्ही. एल. कदम सरांनी मला इतिहासाकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याची शिकवण दिली. प्रेमाने व आग्रहाने मार्गदर्शन केले. तसेच या विषयावर मी काम करावे असे त्यांना वाटत होते. त्यातून मी हा विषय निवडला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे या विषयाची इतिहासाचा एक विद्यार्थी म्हणून तटस्थपणे मांडणी करू शकलो. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय प्रा. डॉ. बी. डी. कुलकर्णी (अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विभाग) यांनी माझ्या संशोधन कार्यात मोलाचे सहकार्य केले. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ.सौ.नलिनी वाघमारे व प्रा.डॉ.स्वराली कुलकर्णी यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. याबद्दल त्यांचा मी नेहमी ऋणी राहीन. याशिवाय विद्यापीठातील कार्यालयीन सेवकांनी मला केलेल्या मदतीबद्दल मी त्याचाही ऋणी आहे.

श्री. पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.सु.रा.परिचारक, उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.परिचारक, प्रा.डॉ.एस.पी.शिंदे, प्रा.डॉ.हनुमंतराव लोंढे, प्रा.डॉ.अशोक माने, प्रा.डॉ.तानाजी फुलारे, प्रा.डॉ.विकास येलमार, प्रा.एम.एस.पवार, प्रा.डॉ.डी.आर.बाड, प्रा.डॉ. गोविंद भोसले, उमा महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व कार्यालयीन सेवक यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. सदर प्रबंधाचे लेखन करण्यासाठी आवश्यक असणारे संदर्भ

साहित्य उपलब्ध करून देणारे विविध सहकारी संस्थांचे संस्थापक, कार्यकारी मंडळ व कर्मचारी वर्ग यांचाही मी ऋणी आहे. सदर प्रबंधाच्या टायपिंगचे काम जयराज जाधव व डॉ. दत्तात्रय कोरडे यांनी वेळेत पूर्ण करून दिले.

तसेच मला उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली ते माझे आई, वडील, भगिनी, माझी पत्नी, मुलगी कु.रोहिणी, मुलगा चि.रोहित. तसेच गाडे परिवार आष्टी व अनेक मित्रांनी मला सतत प्रोत्साहन दिले व मदत केली. वर उल्लेख केलेल्या संस्था व व्यक्तिनी मला दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

अभ्यासक

श्री.लोखंडे नारायण सोपान

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रतिज्ञापत्र | I |
| ● | प्रमाणपत्र(मराठी) | II |
| ● | प्रमाणपत्र(इंग्रजी) | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | प्रस्तावना | १ ते ६४ |
| २. | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | ६५ ते ११६ |
| ३. | पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा इतिहास व व्याप्ती | ११७ ते १५८ |
| ४. | पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला लाभलेले नेतृत्त्व | १५९ ते २२७ |
| ५. | सहकार चळवळीचा पंढरपूर तालुक्यातील आर्थिक व सामाजिक जीवनावर झालेला परिणाम | २२८ ते २५५ |
| ६ | सहकार चळवळीच्या विकासातील अडचणी किंवा उणिवा | २५६ ते ३०३ |
| ● | संदर्भ ग्रंथ सूची | ३०४ ते ३२५ |
| ● | परिशिष्टे | ३२६ ते ३५१ |
| ● | नकाशे | ३५२ ते ३५४ |
| ● | निष्कर्ष व शिफारशी | ३५५ ते ३५८ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.१सहकाराचा इतिहास –

सहकाराची कल्पना आणि सहकाराची प्रवृत्ती भारतात प्राचीन काळापासून चालू आहे. सहकाराचा संपन्न व वैभवशाली वारसा भारतास लाभलेला आहे. सहकार्य, नैतिकमूल्ये आणि एकोपा ही प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीची मानचिन्हे मानली गेली आहेत. सहकार हा मुळातच लोकशाही प्रधान असून, शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यांवर त्याचा भर आहे. दुसऱ्यांना आपल्यात सामावून घेणे व एकदिलाने एकत्र नांदणे हा सुरूवातीपासूनचा भारताचा इतिहास आहे. प्राचीन ऋषींनी जी प्रार्थना केली आहे तिच्यातच आपल्याला सहकार तत्त्वाचा उद्घोष दिसून येतो. प्राचीन काळापासून मानव समाजात प्रस्थापित झालेल्या अनेक महनीय मूल्यांपैकी सहकार हे एक महत्त्वाचे मूल्य आहे हे आपणास वेदातील–

"ॐ सहनाववतु । सह नौ भवन्तु
सह वीर्य करवा वहै । तेजास्विनावधि तमस्तु
मा विद्विषाव है।"

या शांतीमंत्रातून दिसून येतो. मानवी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सहकाराची अत्यंत आवश्यकता आहे. एखादे कार्य स्वतंत्रपणे अगर स्वत:पुरते करण्यापेक्षा त्यात मित्रांची अगर कुटुंबियांची मदत घेतल्यास ते अधिक चांगल्या प्रकारे आणि लवकर पूर्ण होते याची कल्पना मानवाला शिकारी अवस्थेत झाली आणि त्यामुळेच त्याच्या आर्थिक आणि सामाजिक आयुष्यात पुढे क्रांतिकारक बदल घडून आले.

### ➢ प्राचीन भारतातील सहकाराची पूर्वपिठीका –

आपले प्रश्न सोडविण्यासाठी अनेक व्यक्तींनी संघटित प्रयत्न करणे म्हणजे सहकार या दृष्टिकोनातून पाहता अगदी अनादीकाळापासून भारतीय समाजात सहकाराचा अवलंब केला जाता होता असे दिसून येते. सहकार ही एकत्र कार्य करण्याची अशी मानसिकता आहे की, ज्याच्या सहाय्याने आर्थिक, सुखसंपन्नता येऊ शकते. सहकारिता हे असे एक विशाल जनआंदोलन आहे. ज्यामध्ये आपल्या सदस्यांचा विकास तथा कल्याणाकरिता

झटण्याची भावना निर्माण होते. या दृष्टिकोनातून पाहता वैदिक काळापासून भारतीय समाजात सहकाराचा अवलंब केला जात होता असे दिसून येते.[१] सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक अशा विविध क्षेत्रात भारतीय समाज परस्पर सहकार्याने आपले समान प्रश्न सोडवित आलेला आहे. प्राचीन काळात कुल, जन, विश, ग्राम, श्रेणी आणि जाती या स्वरूपात सहकाराचा आविष्कार झालेला होता.[२]

प्राचीन भारतीय समाजात प्रारंभी कुल या स्वरुपाच्या सहकारी संघटना अस्तित्त्वात आल्या. कुल ही संघटना राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वरुपाची होती. त्यात जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी आपल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक हिताचे संवर्धन करण्यासाठी परस्पर सहकार्याने कार्ये करीत. नंतर भारतीय समाज सुस्थिर होऊन विस्तारत जात असता या सामाजिक, आर्थिक सहकाराचे स्वरूप संकुचित होत जाऊन ते अविभक्त कुटुंबपद्धतीपुरते मर्यादित झाले. ते मात्र आजतागायत टिकून आहे. कुल स्वरुपाचा सहकार भारतीय समाजात रुजल्यानंतर सहकाराची कक्षा ग्राम पातळीपर्यंत विस्तारली.[३]

खेड्याच्या पातळीवरील ग्रामसभा ही सहकारी संघटना खेड्याच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी विविध कामे हाती घेत असे. सामाईक जमीन लागवडीस आणणे, त्या जमिनीची निगा राखणे, सामूहिक उत्पादन घेणे, रस्ते, हमरस्ते, उद्याने, चराऊ कुरणे यांची देखभाल करणे इत्यादी विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या ग्रामसभा पार पाडीत असे ही कार्ये पार पाडली जात असताना, बी–बियाणे, खते अवजारे आणि अशा प्रकारच्या साहित्याची खरेदी–विक्री ग्रामसभेचे सभासद एकत्रितरित्या करीत असत. खेड्यातील कारागीर वर्गही या सहकारी संघटनेत समाविष्ट होई.[४]

वैदिक काळानंतर भारतीय समाजात श्रेणी हा सहकारी संघटनेचा प्रकार अस्तित्वात आला. औद्योगिक व हस्तोद्योग कामगार, कारागीर, व्यापारी बँका, बांधकाम कामगार आणि कंत्राटदार, व्यावसायिक, शेतकरी या लोकांची ही सहकारी आर्थिक संघटना होय.[५] ही संघटना बँक, व्यावसायिक व व्यापारी संघ म्हणून काम करीत असे. शिवाय धर्मादाय संस्था म्हणूनही ती कार्य करीत असे.[६]

भारतीय समाजातील जाती हा सहकाराचा प्रकार शिक्षण, परोपकार आणि सहाय्यक कार्ये या सामाजिक कारणांसाठी अस्तित्वात आला. तथापि पुढे विशिष्ट व्यवसाय हा विशिष्ट

जातीशी निगडीत झाला आणि सहकार हा समाजातील आर्थिक घडामोडींचा महत्त्वाचा भाग बनला.[७] उच्चनीचतेच्या भावनांमुळे जातीव्यवस्था सामाजिकदृष्ट्या हीन बनल्यामुळे ती आता मोडकळीस आलेली आहे. अलीकडील काळातील जमीन सुधारणा, आर्थिक विकासाचे विविध कार्यक्रम, लोकशाही मूल्यांचा अवलंब आणि आधुनिक व्यापक दृष्टिकोन या कारणांनीही जातीव्यवस्थेला आज स्थान उरलेले नाही.

सहकारी जीवन आणि कार्यप्रणाली भारतीय संस्कृतीत फार प्राचीन काळापासून चालू होती. आजच्या नवीन अर्थरचनेत व सामाजिक गरजांच्या संदर्भात संघटन आणि संस्था या दृष्टिने आकार–प्रकारापुरता फार तर फरक झाला, येवढेच म्हणता येईल. आपल्या जुन्या सामाजिक आणि धार्मिक संस्थांची आधारभूत कल्पना 'सहकार' हीच होती. आपल्याकडील एकत्र कुटुंब संस्था हीचे मूळ सहकारी उद्दिष्टांत सापडेल. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सहकाराविषयी अनेक उल्लेख सापडतात. प्राचीन कालखंडात सहकारी उद्योगामध्ये अनेक कारागीर एकत्र काम करत असताना त्यातील एखाद्या कारागिराने वेतन घेऊनही चांगल्या पद्धतीने काम केले नाही किंवा कामामध्ये हलगर्जीपणा दाखवला तर त्या कारागिराला बारा पण दंड केला जात होता किंवा कैदही केले जात असे. शेतीच्या कामामध्येही अनेक शेतकरी एकत्र येऊन काम करत असत.[८] कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात एका ठिकाणी असे म्हटले आहे की ''सहकारी कार्यवाहीपासून जो अलिप्त राहील त्याने आपले सेवक व बैल कार्य करण्यासाठी पाठविले पाहिजेत. त्याला खर्चात सहभागी व्हावे लागेल, नफ्यांत वाटा मिळणार नाही.'' यावरून असे म्हणावयास हरकत नाही की, सहकारी कार्यवाहित सहभागी होण्यासाठी, हे एक प्रकारे बंधनच समाजातील व्यक्तिंवर घालण्यात आले होते. भारतातील जुन्या व्यावसायिक संघटना (क्राफ्ट गिल्डस्) याही आधुनिक सहकारी संस्थांशी अंशत: जुळणाऱ्या होत्या. उदा. अडचणींच्या प्रसंगी मार्गदर्शन, समान प्रश्नांवर एकत्रित उपाययोजना. त्या जुन्या संस्थाची बरीच वैशिष्ट्ये आजही महत्त्वाची मानली जातात.[९]

पूर्वी दक्षिण भारतात पैसा उभारण्याचे चिट फंड, निधी, फड, गोंची आदी सहकाराचे प्रकार अस्तित्त्वात होते. त्यापैकी चिट फंड आणि निधी विदर्भ विभागात, फड पद्धती कोल्हापूर विभागात आणि गोंची पद्धती आंध्र विभागात प्रचलीत होती.[१०] चिट फंड पद्धतीत खेड्यातील लोक प्रवर्तकाच्या नेतृत्त्वाखाली एकत्र येऊन ठराविक काळाने विशिष्ट रक्कम जमा करीत.

रक्कम जमा करण्याच्या वेळी सभासदांच्या नावे लॉटस् टाकून यशस्वी सभासदाला ती रक्कम दिली जाई. नंतरच्या वेळी यशस्वी सभासदांची वर्गणी घेतली तरी लॉटसमध्ये त्याचे नाव वगळले जाई. अशा रीतीने जमा होणारी रक्कम क्रमाक्रमाने प्रत्येक सभासदाला मिळत असे.[११] निधी पद्धतीमध्ये सभासदांकडून प्रत्येक एक रुपया अथवा त्याच्या पटीत वर्गणी म्हणून प्रत्येक महिन्याला विशिष्ट रक्कम गोळा केली जात असे. एकूण ८४ महिने रक्कम गोळा केल्यानंतर जमलेल्या निधीतून सभासदांना विशिष्ट व्याज दराने रक्कम कर्जाऊ दिली जाई. त्यातून रक्कम उरलीच तर बिगर सभासदलाही त्यातून कर्ज मिळत असे.[१२]

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात फड पद्धती हा सहकाराचा प्रकार सुमारे एक हजार वर्षापासून चालत आलेला असून तो आजही काही ठिकाणी तुरळक प्रमाणात अस्तित्त्वात आहे. या पद्धतीत सभासदांकडून समान वर्गणी गोळा करून एक निधी तयार केला जातो. कसण्यासाठी सभासद आपली जमीन एकत्र करतात. प्रसंगी अन्य मजूर कामाला घेतात. लागवडीसाठी येणारा खर्च सामाईक निधीतून केला जातो. सभासदांनी केलेल्या कामासाठी त्यांना नियमितपणे मजुरी दिली जाते. शेतीतील निव्वळ उत्पादनाचे वाटप सभासदांमध्ये त्यांनी केलेल्या श्रमाच्या प्रमाणात केले जाते. या संघटनेचे सभासदत्त्व ऐच्छिक असल्याने सभासदाला संघटनेतून केव्हाही बाहेर पडण्याची मुभा असते.[१३] आंध्र प्रदेशातील गोंची पद्धती फड पद्धतीसारखीच असून तीत सलग जमिनीत विविध पिके घेण्यासाठी तिचे तुकडे पाडले जात. संयुक्त लागवड पद्धतीचा अवलंब करून येणाऱ्या उत्पादनाचे वाटप सभासदांनी केलेल्या श्रमाच्या प्रमाणात केले जात असे.[१४]

एकमेकास मदत करण्याची मानवी भावना हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. भारतीय प्राचीन विचारात बंधुभावाविषयी मोठ्या प्रमाणात लिखाण केलेले आढळते. ऋग्वेद, अथर्ववेद, उपनिषदे इत्यादींनी आपल्या दैनंदिन प्रार्थनेत सहकाराचे महत्त्व मांडलेले आढळते. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अध्यात्मिक साधना ही सहकाराच्या तत्त्वावर करण्याची एक आगळी वेगळी परंपरा आपल्याकडे रूजली. अध्यात्मिक साधना हा सहसा ज्याचा त्याचा वैयक्तिक मुद्दा मानला जातो. पण महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामुळे त्यास सामुदायिक स्वरूप प्राप्त झाले. ज्यांच्या विचार व शिकवणुकीवर उभा महाराष्ट्र पोसला गेला त्या वारकरी संतांनी ही 'एका करिता सर्व आणि सर्वांकरिता एक' या सहकारी भूमिकेला

पोषक वातावरण निर्माण करण्याचे महान कार्य केले. या प्रकाराचे समर्थन करताना तुकोबा म्हणतात– “एकलिया भावबळे कै सापडे ता काळे,

वैष्णवांच्या मेळे उभा ठाके हाकेसी ।”

ईश्वर एकट्याला सापडणार नाही असे नाही. परंतु त्यास खूप काळ लागेल. मात्र अनेक साधकांनी एकत्र येऊन त्याचा धावा केला तर त्याच्या प्राप्तीला वेळ लागत नाही. म्हणजेच हा परमार्थमधील सहकार झाला.‘एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ’ असा सहकाराचा मंत्र राष्ट्रसंत तुकोबांनी लिहिला. त्यामुळे भारतात सहकार चळवळीची नांदी प्रथम महाराष्ट्रानेच दिली. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने १३ व्या शतकापासून आजतागायत आध्यात्मिक सहकार रूजविण्याचा जो प्रयत्न केला त्या प्रयत्नातूनच पुढे सहकाराचे आधुनिक रूप कृषि, अर्थ, उद्योग, व्यापार, शिक्षण, राजकारण इत्यादी क्षेत्रात निर्माण झाले.[१५]

हजारो वर्षापासून भारतात सहकाराच्या माध्यमातून अभिनव जलसिंचन पद्धतीचा अवलंब केला जात आहे. शेतीसारख्या व्यवसायातून आध्यात्मिक मोक्ष साधनेसारख्या पारमार्थिक मार्गापर्यंतच्या अनेक बाबींचे नियमन नियंत्रण सामुदायिक आणि सहकारी पद्धतीने करायचे हे महाराष्ट्रात पूर्वापार चालत आलेले एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

खानदेशात तापी खोऱ्यात पांझरा–कान नद्यांवरील या अभिनव सिंचन पद्धतीत या नद्यांच्या पाण्यावर काढण्यात येणाऱ्या पिकांच्या पाणी पुरवठ्यांचे नियमन ‘फड’ पद्धतीनुसार करण्यात येत असे. ही पद्धत रामायण, मौर्य, सातवाहन, यादव, मोगल, मराठे व इंग्रज या शासकांच्या काळापासून आजतागायत चालत आहे. खानदेशाचा पहिला कलेक्टर जॉन ब्रिग्ज (इ.स.१८१८) याने आपल्या अहवालात १८६ बंधाऱ्याची यादी दिली आहे.[१६] ही पद्धत कोल्हापूर जिल्ह्यातही चालू आहे.

## ➢ भारतातील कल्याणकारी राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सहकार

भारताला प्राचीन काळापासून कल्याणकारी राज्याचा वारसा लाभलेला आहे. बुद्धकाळात जनपदाकडून लहान बालकांचे शिक्षण, सेवाभावी संस्थाकडून लोककल्याणासाठी मदत, सार्वजनिक विहिरी, पिण्याच्या पाण्याचे तलाव, वृक्षारोपण, व्यापारी वाहतुकीचे मार्ग, प्रजेच्या दु:खनिवारणासाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केल्याचे पुरावे सापडतात आणि या बाबींची पूर्तता करण्यासाठी सहकाराचा अवलंब झालेला होता.[१७]

कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात अनाथ वृद्ध, अपंग, गर्भवती स्त्रिया आणि राज्यातील सर्व प्रजेचे पालनपोषण करावे असे म्हटले आहे. सम्राट अशोकाने धम्मप्रसार आणि लोककल्याणासाठी 'धम्म महामात्र' या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती.[१८]

सम्राट अकबराने राज्यातील प्रजेसाठी अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सुविधा, धान्यवितरण व्यवस्था, सुंदर बागबगीचे, करमणुकीच्या सोयी केल्या होत्या. मध्ययुगात छत्रपती शिवाजी महाराजांनी आज्ञापत्राद्वारे अन्नधान्य, उत्पादनवाढ, शेतसारा माफी, वृक्षसंवर्धनासाठी उपाययोजना, विहिरी आणि तलावांची निर्मिती इत्यादी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करत असताना सहकाराचा अवलंब झालेला होता.[१९]

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची ओळख कल्याणकारी राजा अशी आहे. कोल्हापूर संस्थानातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी धरणे आणि तलावांची निर्मिती, दुष्काळातील लोकांसाठी रोजगार निर्मिती, अन्नधान्याचे स्वस्त किंमतीत वितरण, पिण्याचे पाणी, रस्ते, पुलांची निर्मिती, लहान बालकांसाठी आरोग्याच्या योजना, गरिबांसाठी आश्रम, दीनदुबळ्या लोकांसाठी शिधावाटप, विविध जाती धर्माच्या मुलांसाठी वसतिगृह, मोफत आणि सक्तीचे शिक्षण इत्यादी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली होती. छत्रपती शाहू महाराज आपल्या २ एप्रिल १८९४ रोजीच्या कल्याणकारी राज्याच्या जाहीरनाम्यात असे म्हणतात की, ''आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिच्या कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानाची हर एक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे.[२०] छ. शाहू महाराजांनी इ.स. १८९४ मध्ये अधिकार सूत्रे स्वीकारल्यानंतर आपल्या प्रजेचे औद्योगिक सर्व्हेक्षण तयार केले. आपल्या संस्थानाच्या औद्योगिक प्रगतीचे नियोजन केले व अकुशल मजूर, व्यापारी, सुशिक्षित बेकार यांच्या फायद्यासाठी व एकाधिकाराचे दोष टाळण्यासाठी त्यांनी सहकारी चळवळीस व संमिश्र उदयोगांना अधिक प्रोत्साहन दिले.[२१]

शाहू महाराजांच्या मते, आपला आर्थिक विकास आपल्याला साध्य करून घ्यावयाचा असेल तर शेतीच्या विकासाला अगक्रम द्यावयाला हवा. शेतकऱ्यांना पर्यायाने सहकारी चळवळीला भांडवल पुरवठा करण्यासाठी महाराजांनी संस्थांनातर्फे वेगवेगळ्या निधीमार्फत भांडवल पुरविण्याची व्यवस्था केली. यासाठी सहकारी पतपेढ्या काढण्याचा मंत्र लोकांना

दिला.[२२] महाराजांनी आपल्या संस्थानातील शेतीला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांत आधुनिक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले. संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटट्यूट' ही संस्था कोल्हापूर येथे इ.स. १९१२ मध्ये स्थापन केली. तसेच या संस्थेला जोडूनच 'लॉर्ड आयर्विन' 'ॲग्रिकल्चरल म्युझियमची' स्थापना करण्यात आली. शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, बी–बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. तसेच शेती व शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी त्यांनी सहकारी संस्थांच्या निर्मितीला चालना दिली.[२३] तसेचत्यांच्या मते हिंदुस्थानसारख्या दरिद्री व मागासलेल्या देशाची प्रगती होण्यासाठी सहकारी चळवळीची आवश्यकता असून ती महत्त्वपूर्ण कार्य करू शकते. सहकारी चळवळीमुळे लहान शेतकरी, कारागीर, उद्योजक यांना भांडवल मिळून शेती व उद्योग यांची भरभराट होऊ शकते, दलाल, सावकार यांच्या वर्चस्वातून शेतकरी व कारागीर मुक्त होतो आणि शेती उद्योगातून निर्माण होणाऱ्या मालाला योग्य भाव मिळून दलालाऐवजी गरिबांचा फायदा होतो असे त्यांना वाटत होते.[२४] शेतकरी व कामगारांना स्वत:ची प्रगती करून घ्यायची असेल तर त्यांनी नवीन गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत. ''शेतकऱ्यांनी पिढीजात व जुन्या शेती करण्याच्या पद्धती सोडल्या पाहिजेत व नवीन मार्गाचा अवलंब मोठ्या प्रमाणात केला पाहिजे. मजूर, कारागीर यांनी नवनवीन तांत्रिक ज्ञान व विज्ञान शिकण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे. कोल्हापूर संस्थान त्याकरिता सर्वप्रकारची मदत द्यायला तयार आहे.''[२५]

राजर्षी शाहू महाराज 'लोकांचे राजे' असल्याने जनतेचा सहभाग प्रमुख मानत आले होते. सध्या राजाश्रयापेक्षा लोकाश्रय विशेष श्रेयस्कर आहे. तसेच आता प्रत्येकाने निरनिराळे काम करण्याचे दिवस गेले. पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अक्कल, पैसा व अंग मेहनत एकत्र केली पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटुंब एका ठिकाणी काम करी व येणारा नफा त्या कुटुंबातील माणसांस उपयोगी पडे. आता ही आपली त्या कुटुंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहिजे. १०, २०, ५० कुटुंबे या उद्योग धंद्याकरिता एकत्र आली पाहिजेत व आपल्या सहकारी संस्था स्थापन केल्या पाहिजेत.[२६]

एकंदरीत प्राचीन कालखंडापासून आजतागायत भारतातील अनेक सत्ताधिशांनी कल्याणकारी राज्याची स्थापना करताना त्याच्या अंमलबजावणीसाठी सहकाराचा अवलंब केलेला दिसून येतो. त्याच्या स्वरूपात मात्र उत्तरोत्तर बदल होत गेलेला आहे.

## ➢ आधुनिक कालखंडातील सहकार

सहकार ही संकल्पना मानवी जीवनामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मानवी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सहकाराची अत्यंत आवश्यकता आहे. मानवी जीवनाचा विकास हा सहकारी प्रवृत्तीमधून झाला आहे. मानवी जीवनाच्या इतिहासावरती प्रकाश टाकला तर आपणास असे दिसून येते की, मानवी जीवन हे सहकारातून उत्क्रांत झालेले आहे. आधुनिक काळात जाणीवपूर्वक आर्थिक उपक्रमांची सुरूवात व संघटन करण्याचा प्रयत्न प्रथम सतराव्या शतकात झाला. पी. सी. प्लॉक नाये या इंग्लंडमध्ये वास्तव्य करून असलेल्या डच माणसाने इ.स. १६५९ मध्ये एक पुस्तिका लिहून त्यामध्ये शेतकरी आणि कारागीर यांचा उद्योगधंदा चालविण्यासाठी संघ स्थापण्याची कल्पना मांडली.[२७] औद्योगिक क्रांतिनंतर सहकार या संकल्पनेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतिमुळे समाजात भांडवलदार व मजूर असे वर्ग निर्माण झाले मात्र या दोन विरोधी गटांचे हितसंबंध नेहमी परस्परविरोधी राहिले. भांडवलदारांच्या हाती समाजाच्या आर्थिक नाडया आल्याने त्यांनी कामगारांची आणि पर्यायाने समाजाची आर्थिक पिळवणूक सुरू केली. यामुळे या दोन घटकांमधील वर्गकलहाला सुरूवात झाली. दुसऱ्या बाजूला मजूर वर्ग मात्र आर्थिकदृष्ट्या हेळसांड, दारिद्र्य, विषमता, निकृष्ट राहणीमान, कामाची सुरक्षितता या खाईत लोटला गेला होता. यामुळे या वर्गात असमाधान आणि असंतुष्टतेचे वातावरण होते. थोड्क्यात भांडवलशाही समाजरचनेला विटल्यामुळे तिला पर्याय म्हणून जे अनेक 'वाद' निर्माण झाले. त्यामध्ये सहकार वाद हा महत्त्वाचा वाद आहे व त्याची सुरूवात इ.स. १८४४ मध्ये रॉबर्ट ओवेन या परोपकारी सद्गृहस्थाने केली.[२८]

## ➢ सहकार म्हणजे काय?

'सहकार' (Co-operation) हा शब्द लॅटिन भाषेतीलCo-operariया शब्दापासून निर्माण झाला आहे. 'को' (Co) याचा अर्थ 'सह' (Operari) आणि ऑपररी याचा अर्थ 'काम करणे' असा आहे. दोन्ही शब्दांचा एकत्रितपणे विचार केल्यास एकत्रितपणे काम करणे अथवा

सहकार्याने काम करणे असा त्याचा अर्थ होतो.[२९] सहकार या संज्ञेचा शब्दश: अर्थ परस्पर साहाय्य करणे किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे असा होतो. समाजसुधारकांच्या दृष्टिने सहकार हे समाज परिवर्तनाचे एक साधन आहे. साम्यवादयांच्या मते सहकार हे समाजवाद प्रस्थापित करण्याचे साधन होय. धर्मवेत्यांच्या दृष्टिने सहकार हा मानव जातीची सेवा करणारा परोपकारी मार्ग होय. सहकार हा आर्थिक व्यवहाराचा व सामाजिक प्रगतीचा कणा आहे. अशाप्रकारे सहकाराच्या व्याख्येबाबत एकमत आढळत नाही तरीही सहकार म्हणजे काय हे समजण्यासाठी त्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**ॲरिस्टॉटल –**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. मानवी जीवनात स्पर्धेपेक्षा सहकारीवृत्ती ही नैसर्गिक असून दुर्बलांच्या प्रगतीचा एक मार्ग आहे.[३०]

**प्रा. सी. आर. फे –**

समाजातील दुर्बल घटकांनी निस्वार्धी भूमिकेतून चालविलेली आणि सभासदांनी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात त्यांना नफ्यात वाटा देणारी व एकत्र व्यवहार करण्यासाठी स्थापन झालेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.[३१]

**प्रा. पॉल लॅम्बर्ट –**

स्वत:च्या उपयोगासाठी व्यक्तिच्या समूहाने स्थापन केलेली आणि दिग्दर्शित केलेली लोकशाही नियमानुसार चालवलेली आणि सभासदांच्या व एकूण समाजाच्या सेवेसाठी स्थापन केलेली व्यवहार संस्था म्हणजे सहकार संस्था होय.[३२]

**एच. कॅलव्हर्ट –**

मानवी भूमिकेतून व्यक्तिने स्वइच्छेने एकत्र येऊन स्वत:च्या आर्थिक हितसंबंधाच्या संवर्धनासाठी समानतेच्या भूमिकेवर आधारित निर्माण केलेले संघटन म्हणजे सहकार होय.[३३]

**पी. एच. कॅसलमन –**

सामाजिक आशय असणारी अर्थपद्धत म्हणजे सहकाय होय.[३४]

**व्ही. एल. मेहता –**

समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तिंनी ऐच्छिकरित्या स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय.[३५]

**सर होरेस प्लेकेट –**

व्यक्तिच्या संघटनेतून परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे सहकारी चळवळ होय.[३६]

**वसंतदादा पाटील –**

दुर्लक्षित घटकांना आणि कमकुवत वर्गांना शक्ती देणारे सहकार हे एक प्रभावी माध्यम आहे.[३७]

**१९१२ च्या भारतीय सहकार कायद्याप्रमाणे केलेली व्याख्या –**

सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.[३८]

**को–ऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमेटी –**

'स्वत:च्या आर्थिक उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तिनी स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.'[३९]

**मॅकलेगन समिती –**

सहकाराचा सिद्धांत असे प्रतिपादन करतो की आर्थिकदृष्ट्या दुर्बल व एकाकी मनुष्य, दुसऱ्याच्या सोबतीने आणि नैतिक विकास व परस्पर सहकार्य यांच्या साहाय्याने श्रीमंत व समर्थ लोकांना मिळणारे भौतिक फायदे मिळवू शकतो आणि त्यायोगे तो त्याच्यातील नैसर्गिक व स्वाभाविक गुणांची पूर्ण वाढ घडवून आणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधू शकतो.[४०]

**स्वीस व्याख्या –**

सहकारी संस्था म्हणजे, 'भिन्न व्यक्तिनी संघटित होऊन नोंदलेली संस्था, जिच्या स्थापनेमागचा प्रमुख्य उद्देश म्हणजे संयुक्त कृतिद्वारे सभासदांच्या आर्थिक उन्नतीकरिता कार्य करणे हा आहे.'

**जपान कायदा –**

'मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तींनी स्वत:च्या व्यवसायकार्यात उपयोगी ठरावी, स्वत:च्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणावी म्हणून परस्पर मदतीच्या तत्त्वावर प्रस्थापित करून विकसित केलेली कायदेशीर अस्तित्व असलेला संघ वा संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.'

**जर्मन कायदा –**

सहकारी संस्था म्हणजे भिन्न संस्था असलेल्या पण समान प्रकारच्या आर्थिक अडचणींशी झगडणारा समान अधिकार व कर्तव्ये या तत्त्वावर स्वेच्छेने एकत्रित आलेला समूह होय. हा समूह स्वत:च्या आर्थिक गरजेप्रमाणे स्वत:ची एक वा अनेक आर्थिक कार्ये करण्याकरिता स्वत:च्या प्रयत्नांनी, स्वत:च्या जबाबदारीवर धोका पत्करून संघटना निर्माण करतो व त्यांच्या (संघटनेच्या) संयुक्त सहकारातून स्वत:चा आर्थिक व नैतिक फायदा करून घेतो.[४१]

वरील विविध देशांतील व्याख्यातून भिन्नता दिसून येते कारण जगातील विविध देशात सहकाराची चळवळ वेगवेगळ्या काळात सुरू झाली. त्यामुळे सहकार संज्ञेच्या मान्यवर व्यक्तिनी केलेल्या व्याख्येत एकमत व समानता आढळत नाही. तसेच काही देशातून सहकारी चळवळीच्या विकासासाठी सरकारने मदत केल्याचे पहावयास मिळते. तर काही देशात सहकारी चळवळीचे नियंत्रण सरकारकडे आहे. काही देशांतून आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहकारी चळवळीच्या विकासाला प्राधान्य दिल्याचे पाहावायास मिळते. आणि काही देशातील सहकारी संस्थांत सरकारने भागीदारी केल्याचे आढळते. त्यामुळे जगातील बहुतेक देशातील सहकारी संस्थांच्या स्वरूपात सारखेपणा नाही. त्यामुळे सहकारावरच्या विचारवंतानी आपापल्या देशातील सहकारी चळवळीच्या जन्माच्या वेळची परिस्थिती लक्षात घेऊन व्याख्या केल्या असल्यामुळे त्यांच्या व्याख्येत एकसारखेपणा पहावयास मिळत नाही. असे असूनसुद्धा बहुतेक सर्व व्याख्यांतून सहकाराच्या पुढील वैशिष्ट्यांवर भर दिलेला दिसून येतो.

१. सहकारी संस्था प्रचलित देशातील कायद्यातील तरतुदीप्रमाणे सरकारदरबारी नोंदवणे आवश्यक आहे.
२. सहकारी संस्थांची स्थापना सभासदांनी करावी.
३. सहकारी संस्थांनी मान्य अशा सहकारी तत्त्वावर कार्य करावे.
४. सभासदांनी संस्थेच्या यशाकरिता परस्परांच्या सहाय्याने कार्य करावे.
५. संस्थेच्या स्थापनेमागचा हेतू म्हणजे सभासदांचे आर्थिक व सामाजिक हितसंवर्धन करणे.

६. सहकारी संस्थेस कायदेशीर अस्तित्व असते.

७. सहकारी संस्थेतील सभासद स्वच्छेने एकत्रित येतात.

## ➢ सहकाराची तत्त्वे –

तत्त्व याचा अर्थ वागण्यासंबंधीचे नियम असा करता येईल. सहकाराची तत्त्वे म्हणजे सहकारी संस्थेतील कार्य आणि जीवनासंबंधी सांगितलेले काही नियम. सहकाराची तत्त्वे म्हणजे सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती होय. की ज्या तत्त्वांच्या आधारे सहकारी संस्था आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने कार्य करीत असतात. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेचे माजी संचालक डब्ल्यू. पी. वैयकिन्स यांच्या मते सहकाराची तत्त्वे म्हणजे सहकारातून अंगभूत असलेल्या कल्पना ज्यावरून कार्यपद्धती ठरते व सहकार म्हणजे काय समजून येते. जॉर्ज डेव्हिड यांच्या मते, 'सहकारी संघटनेचे अस्तित्व व कार्यपद्धती ठरविणाऱ्या नियमांचा संच म्हणजे सहकारी तत्त्वे होय.' प्रो. डी. जी. कर्वे यांच्यामते, 'सहकारी चळवळीच्या उद्देशाची पूर्ती करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सहकारी कार्याचे संघटन व नियमन केलेले नियम म्हणजे सहकारी तत्त्वे होय.'[४२]

## ➢ सहकारी तत्त्वांचा विकास –

जगामधील सहकारी चळवळीचा प्रारंभ हा इंग्लंडमधील रॉश्डेल या गावातून झालेला आहे. रॉश्डेलच्या २८ कामगारांनी एकत्र येऊन २१ डिसेंबर १८४४ मध्ये इक्विटेबल पायोनिअर्स को–ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना केली. त्यांनी स्वीकारलेली मूलतत्त्वे कित्येक वर्षे अनेक देशातल्या सहकारी चळवळीला मार्गदर्शक ठरली.[४३]

रॉश्डेल सहकारी पद्धतीची तत्त्वे जगभर सहकारी तत्त्वे म्हणून ओळखली जातात कारण त्यांनी सहकारी तत्त्वे स्पष्ट, काटेकोरपणे व सोप्या भाषेत मांडली आहेत. या तत्त्वात फारसा बदल न करता विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना ती लागू करता येतात. म्हणून रॉश्डेल तत्त्वांना जागतिक मान्यता प्राप्त झाली व ती संपूर्ण जगभर पसरली. एकंदरीतच सहकारी तत्त्वे म्हणजे रॉश्डेल तत्त्वे असे समीकरण तयार झाले आहे. रॉश्डेलची तत्त्वे प्रमाण मानून नंतरच्या काळात विविध देशात सहकाराचा उगम व प्रसार झाला. सहकारी चळवळ विविध स्वरूपात वाढली. बदलत्या परिस्थितीत ही तत्त्वे कितपत मार्गदर्शक ठरतील याचा विचार करून सहकारी तत्त्वाची पुनर्मांडणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने इ.स. १९३४

मध्ये एक समिती नेमली. या समितीने इ.स.१९३७ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये समितीने सहकार तत्त्वाची

अ) आवश्यक तत्त्वे

ब) अनावश्यक (कमी महत्त्वाची व सामान्य) तत्त्वे अशी विभागणी केली.

इ.स. १९३७ नंतर जागतिक परिस्थितीत फार मोठे बदल झाले. सन १९३९–४५ या कालावधीत दुसरे महायुद्ध घडून आले. या महायुद्धाचा जगातील सहकारी चळवळीवर आणि इतर अनेक गोष्टीवर फार मोठे परिणाम झाले. अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती बदलल्याने जगातील अनेक देशात योजनाबद्ध विकासासाठी विविध योजनांचा अवलंब केला गेला. कल्याणकारी राज्याची संकल्पना उदयास आली. शासनाच्या जबाबदाऱ्या वाढल्या व बदलत्या परिस्थितीत सहकारी तत्त्वाची पुनर्मांडणी करण्याची आवश्यकता भासू लागली. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकारी तत्त्वांची पुनर्रचना करण्यासाठी ऑक्टोंबर १९६४ मध्ये पुन्हा एका तज्ज्ञ समितीची नेमणूक केली. या समितीचे अध्यक्ष भारतातील अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. जी. कर्वे होते. या समितीत भांडवलदारी आणि सहकारवादी या विषयावरील तज्ज्ञांचा समावेश होता. या समितीने शिफारस केलेली सहकाराची तत्त्वे पुढीलप्रमाणे–

**ऐच्छिक व खुले सभासदत्त्व –**

सहकारी संस्थेचे प्रमुख तत्त्व म्हणून या तत्त्वाचा उल्लेख केला जातो. सहकारी संस्थेचे सभासदत्व कोणत्याही व्यक्तीला या तत्त्वानुसार लगेच प्राप्त होते. ऐच्छिक सभासदत्व याचा अर्थ सभासदत्व स्वीकारण्यासाठी किंवा सभासदत्व रद्द करण्यासाठी सक्ती अगर दडपणाचा वापर केला जाऊ नये. सहकारी संस्थेचे सभासदत्व मिळविण्याची ज्यांची पात्रता किंवा कुवत आहे अशा सर्वांना या सहकारी संस्थेचे सभासदत्व मिळणे म्हणजे खुले सभासदत्त्व होय. सहकारी संस्थेचे सभासदत्व कोणत्याही व्यक्तिला या तत्वानुसार लगेच प्राप्त होते. यात सभासदाची जात, धर्म, वंश, लिंग, वर्ण त्याची आर्थिक स्थिती, राजकीय मते, सामाजिक प्रतिष्ठा यासारख्या कोणत्याच बाबी आड येत नाहीत. तसेच कोणतीही सभासद व्यक्ती सहकारी संस्थेतील आपल्या सभासदत्वाचा त्याग कधीही करू शकते. अशी सहकारी संस्थांच्या नियमात तरतूद हवी. थोडक्यात सभासदाला संस्थेचे सभासदत्व स्वीकारण्याचे किंवा

नाकारण्याचे स्वातंत्र्य असावे. कोणतीही सहकारी संस्था स्थापन करीत असताना त्या संस्थेतील व्यक्ती स्वतःच्या इच्छेने एकत्रित आलेल्या असतात. सहकारी संस्थेमध्ये सक्तीने सभासद करून घेऊ नये. तसे केल्यास सहकारी संस्थेचा उद्देश सफल होणार नाही. ऐच्छिक व खुल्या सभासदत्वाचे महत्त्व सांगताना बॉनर असे म्हणतात की या तत्वाशिवाय सहकारी संस्था आपली सहकारी वैशिष्ट्ये गमावतील आणि त्यांचे रूपांतर नफा मिळविणाऱ्या संस्थेत होईल.[४४]

**लोकशाही कारभार व नियंत्रण –**

लोकशाहीची जी वैशिष्ट्ये आहेत ती वैशिष्ट्ये सहकारी संस्थांच्या कारभारात व नियंत्रणात दिसून यावीत कारण सहकारी संस्थाही अनेक व्यक्तिचे संघटन असलेली संस्था आहे. लोकशाहीत निवडणुकीत प्रत्येक व्यक्तीला एकच मत असते, दरडोई एक मत या तत्वाप्रमाणे मताचा अधिकार प्राप्त होतो. लोकशाहीत अंतिम अधिकार लोकांच्याकडे असतात. यासारख्या लोकशाही तत्वाचा अवलंब सहकारी संस्थेने आपल्या कारभारात करावा अशी अपेक्षा आहे.[४५]

लोकशाहीत ज्याप्रमाणे अंतिम सत्ता लोकांच्याकडे असते, त्याप्रमाणे सहकारी संस्थेची अंतिम सत्ता संस्थेच्या सभासदांच्याकडे असते. संस्थेच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयांना जास्तीत जास्त सभासदांची मान्यता असावी अशी तरतूद यासाठीच सहकारी कायद्यातून केली आहे. सहकारी संस्थेतसुद्धा खऱ्या अर्थाने लोकशाही राबविली जाते. ज्या देशात लोकशाही पद्धतीने राज्यकारभार चालतो त्या देशातील लोक राज्यकारभार चालविण्यासाठी आपले प्रतिनिधी निवडून देतात. त्याचप्रमाणे सहकारी संस्थेत सभासद आपले प्रतिनिधी निवडून देतात. सहकारी संस्थेतील कोणतीही सभासद व्यक्ती संचालक पदाच्या स्थानाकरिता निवडणुकीला उभी राहू शकते. त्याचप्रमाणे संस्थेच्या प्रत्येक सभासदाला फक्त एकच मत देण्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो. या दृष्टिने सहकारी संस्था हे व्यक्तिचे संघटन ठरते. भांडवलाचे संघटन नव्हे. सहकारी संस्थेत विविध सभासदांचे भांडवल कमी–अधिक प्रमाणात असते. मात्र प्रत्येक सभासदाला फक्त एकच मत देण्याचा अधिकार असतो. ज्याने जास्त भांडवल पुरविले त्याला जास्त मते हे तत्त्व सहकारी संस्थांना लागू पडत नाही. सहकारी संस्थेत सभासदाची जात,

वर्ण, लिंग धर्म, सामाजिक दर्जा, राजकीय मते, आर्थिक दर्जा विचारात घेतला जात नाही. एकंदरीत सर्व सभासदांच्या अधिकाराच्या दृष्टिने समता प्राप्त होते.

**भांडवलावर मर्यादित व्याज –**

भांडवलावर नियंत्रण न ठेवल्यास विषमता निर्माण होण्याची शक्यता असल्याने सहकारात भांडवल या घटकाला गौन स्थान दिले जाते. आपल्या देशात सहकारी संस्था भांडवलावर जो लाभांश जाहीर करतात त्यालाच सहकारी क्षेत्रात भांडवलावरील व्याज म्हणून ओळखतात. सभासदांनी सहकारी संस्थेत गुंतविलेल्या भांडवलावर मर्यादित दराने व्याज द्यावे. रॉश्डेलच्या प्रवर्तकांनी असे मत मांडले होते की सहकारी संस्थेत गुंतवलेल्या भांडवलावरील व्याज देवू नये परंतु प्रत्यक्षात बिनव्याजी भांडवल गोळा करणे सहकारी संस्थांना अशक्य आहे ही बाब लक्षात घेऊन भांडवलावर मर्यादित व्याज देण्यास प्रारंभ झाला. तसेच भांडवलावर मर्यादित व्याज देण्यामागील दुसरी महत्त्वाची भूमिका म्हणजे सहकारी संस्थांनी नफा प्राप्तीच्या मागे लागू नये आणि भांडवल या घटकाचे सहकारी संस्थांत वर्चस्व निर्माण होऊ नये.

आपल्या देशातील राज्य सरकारांनी भांडवलावरील व्याजाच्या दरासंबंधी तरतूद केलेली आहे. उदा. महाराष्ट्र सहकारी कायद्याप्रमाणे महाराष्ट्रातील सहकारी संस्था भांडवलावर जास्तीत जास्त ९% लाभांश व व्याज देऊ शकतात. भांडवलावरील व्याजाबाबत इ.स. १९६६ च्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने असे मत व्यक्त केले की, सहकारी संस्थांनी भांडवलावर व्याज दिलेच पाहिजे असा व्याजाच्या बाबतीत सहकारी तत्त्वाचा अर्थ नाही. जर भांडवलावर व्याज दिले असेल तर ते निश्चित आणि मर्यादित दराने दिले जावे असा या तत्वाचा अर्थ आहे.[४६]

**व्यवहाराच्या प्रमाणात नफ्याची वाटणी –**

सहकारी संस्थांनी प्रामुख्याने आपल्या सभासदांशी व्यवहार करावेत अशी अपेक्षा असते. त्यामुळे संस्थेला मोठ्या प्रमाणात नफा मिळविण्याचा प्रश्न निर्माण होत नाही आपल्या ग्राहकांना व सभासदांना किमान किंमतीत वस्तू पुरविल्या जातात असे असुनसुद्धा संस्थेला या व्यवहारात नफा मिळतो. मात्र सहकारी संस्थांनी याला ‘नफा’ न म्हणता वाढावा म्हणावा. सहकारी संस्थेतील लाभांशाचे वाटप सहकारी संस्थेच्या विकासासाठी, सभासदांना अधिक सेवा पुरविण्यासाठी आणि सभासदांना संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते.[४७]

**सहकारी शिक्षण –**

कोणतीही संस्था यशस्वी होण्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता असते. त्याप्रमाणेच सहकारी चळवळ प्रभावी होण्यासाठी सभासदांना, सहकारी कार्यकर्त्यांना, सहकारी संस्थेतील नोकर वर्गाला, अधिकारी वर्गाला आणि सर्वसामान्य जनतेला सहकारी शिक्षणाची व इतर सामान्य शिक्षणाची नितांत गरज असते. सहकारी प्रशिक्षण असेल तरच सहकारी संस्थांचा कारभार यशस्वीपणे चालू शकतो. म्हणूनच सहकारी चळवळीच्या प्रणेत्यांनी सहकारी शिक्षणाशिवाय सहकारी चळवळीचा योग्य प्रसार होणार नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

**सहकारांतर्गत सहकार –**

सहकारांतर्गत सहकार तत्वाप्रमाणे सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी सभासदांच्या हितासाठी आपल्या व्यवहारात परस्परांशी शक्य तितके सहकार्य करावे. सहकारांतर्गत सहकार हा स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील केला जावा अशी अपेक्षा या तत्वाद्वारे केली आहे. वेगवेगळ्या सहकारी संस्थांमध्ये अशा प्रकारचे सहकार्य निर्माण झाले तरच भांडवलदारांची मक्तेदारी संपुष्टात येईल व समाजातील वर्गसंघर्ष समाप्त करण्यासाठी मदत होईल म्हणून हे तत्व नैतिक तत्व नसून विकासाचे तत्व आहे. यामुळे सर्वच सहकारी संस्थांचा विकास होण्यास मदत होईल. एकंदरीत आधुनिक काळातील स्पर्धेत सहकारी चळवळीचे अस्तित्व टिकविण्यासाठी व सहकारी चळवळीचे महत्त्व वाढविण्यासाठी सहकारांतर्गत सहकार आवश्यक आहे.[४८]

## ➢ जगातील सहकारी चळवळ –

जागतिक सहकारी चळवळीची दिशा व रुपरेषा जाणून घेण्यासाठी इंग्लंड, जर्मनी, रशिया, डेन्मार्क, फ्रान्स, अमेरिका, इस्त्राइल, जपान, चीन व भारत या देशातील सहकार चळवळीचा तसेच आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये जी ऐतिहासिक, औद्योगिक क्रांती झाली तिच्या अनिष्ट परिणामातून सहकाराचा आधुनिक अर्थाने नवा जन्म झाला असे म्हणावे लागेल.

खंडप्राय प्रदेशांचा शोध जहाज वाहतुकीमुळे व माणसांच्या धाडस व जिद्दीमुळेच शक्य झाला. पण, या सर्व धाडस व जिद्दीला संघटनात्मक स्वरूप परस्पर सहकार्याच्या भावनेतून प्राप्त झाले. शिडांच्या जहाजामार्फत व्यापारासाठी फिरणाऱ्या खलाशांमध्ये त्यांच्यात व

व्यापाऱ्यांच्यात सहकार हा व्यवहाराचा मूळ आधार होता. मध्ययुगीन युरोपियन देशांमध्ये औद्योगिक संघटनासाठी सहकाराचे माध्यम वापरले जायचे. खरेतर, इ.स. १४९८ मध्येच ॲबरर्जन येथे पहिली सहकारी संस्था सुरू झाली होती.[४९] इ.स. १७६१ मध्ये स्कॉटलंडच्या फेनविक येथे सहकारी विणकर संस्था अस्तित्वात आली. बचत, धान्य, सभासद कर्जे, प्रवास व शिक्षण या बाबींसाठी ही संस्था काम करीत होती.[५०] इ.स. १७६९ मध्ये फन्विरू येथे ग्राहक सहकारी संस्था सुरू झाली. त्यातूनच पुढे हार्ट ऑफ इंग्लंड को–ऑपरेटिव्ह सोसायटी निर्माण झाली; त्याचेच रूपांतर नंतर द. को. ऑपरेटिव्ह ग्रुप या राष्ट्रव्यापी ग्राहक सहकारी संस्थेत झाले. रॉबर्ट ओवेन यांनी भांडवलशाही औद्योगिक व्यवस्थेत होणारे शोषण टाळण्यासाठी कामगारांच्यासाठी सहकारी संस्था सुरू केल्या. ओवेन यांच्या सहकारी संघटनांचे महत्त्व, गरज, तत्त्वे, व्यवहार इत्यादीविषयी मार्गदर्शन करण्यासाठी १ मे १९२८ रोजी डॉ. विल्यम किंग यांनी The co-operatorहे मासिक सुरू केले. नंतरच्या काळात इतर युरोपियन राष्ट्रांत जवळजवळ त्याच कारणासाठी ग्राहक, पत, प्रक्रिया व वितरण या क्षेत्रात लोकशाही पद्धतीने सभासदांनी चालविलेली एक आर्थिक कायदेशीर व्यक्ती अशा स्वरुपात सहकारी संस्था उभ्या राहिल्या.[५१]

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटनमध्ये जी ऐतिहासिक औद्योगिक क्रांती झाली. या औद्योगिक क्रांतिच्या काळात कामगारांचे स्वातंत्र्य कमी–कमी होत गेले आणि मजुरी घेऊन काम करणारे कामगार ह्यापलीकडे त्यांना कोणतेही महत्त्व उरले नाही. भांडवलाअभावी कामगारांना वैयक्तिक जबाबदारीवर उत्पादन सुरू करणे आणि त्यासाठी आवश्यक ती साधने जमा करणे शक्य होणारे नव्हते मात्र जर अनेक कामगारांनी आपली अतिशय छोट्या प्रमाणावरील बचत एकत्र केली आणि स्वत: श्रम करण्याची तयारी ठेवली तर भांडवल आणि श्रम जमा होऊन सर्वांच्या मालकीचा एखादा लहानसा कारखाना काढता येईल आणि मालक व कामगार ह्या दोन्ही भूमिका कराव्या लागल्यामुळे कामगारांना स्वातंत्र्य मिळविता येईल. अशा प्रकारची विचारसरणी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात प्रभावी ठरल्यामुळे उत्पादकांच्या सहकारी संस्था स्थापन होण्याच्या दृष्टिने पोषक अशी परिस्थिती निर्माण झाली. जे. एस. मिलसारख्या अर्थशास्त्रज्ञाने कामगारांनी अशा प्रकारच्या संस्था काढल्या पाहिजेत असे सांगितले. तसेच फ्रान्समध्ये फेरियर लुई ब्लॅक इत्यादींनी अशा प्रकारच्या संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिलेले होते.[५२]

रॉबर्ट ओवेन या उदारमतवादी कारखानदारास कामगारांची होणारी पिळवणूक लक्षात येत होती. म्हणून त्यांनी कामगारांना वाजवी किमतीस जीवनावश्यक वस्तू मिळाव्यात यासाठी श्रमिकांच्या सहकारातून ग्राहक भांडार चालविण्याचा प्रयत्न केला. औद्योगिक क्रांतिच्या यांत्रिकीकरणामुळे व शुद्ध नफेखोरीमुळे कामगार जीवनावर जे प्रतिकूल परिणाम झाले त्याची प्रतिक्रिया म्हणून सहकारी संघटन अधिक बळकट होत गेले. यंत्रवत बनविल्या गेलेल्या कामगारांचे नित्कृष्ट जीवन हे औद्योगिक क्रांतिनंतर जन्माला आलेल्या यंत्रप्रधान भांडवलशाहीचे सर्वात मोठे दूषण होते. मानवी श्रम संचित करता येत नाही. संघटनांच्या शक्तीची जाणीव त्या वेळी कामगार वर्गाला झालेली नव्हती. सरकार तटस्थ होते. यातून जी अगतिकता श्रमिकांत निर्माण झाली तिचा पुरेपूर फायदा कारखानदारीने त्या वेळी उठविला. औद्योगिक क्रांतिमुळे आर्थिक उत्पादनाला जी प्रचंड गती मिळाली तिच्या बरोबरीने आर्थिक विषमतेलाही मोठे खतपाणी मिळाले. राष्ट्रीय उत्पादन, आंतरराष्ट्रीय व्यापार, वाहतूक व साम्राज्य वाढत असताना हजारो कामगारांची कारखाने उदयोगातून अमानुष पिळवणूक होत होती. त्यांना कामाचे वय, तास, परिस्थिती, वेतन, संरक्षण कोणत्याच बाबतीत अधिकार सवलती नव्हत्या. कमी वेतन, नित्कृष्ट अन्न, दरिद्री राहणी यांचा अनुभव घेणाऱ्या कामगारवर्गातूनच असे दूरदर्शी गट निघाले की, ज्यांनी 'सहकाराची कास स्वेच्छेने, स्वावलंबनाने धरली आणि श्रमिकांना एक नवीन मार्ग दाखविला.[५३] कामगारांना मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पादनामुळे त्यांना चांगले जीवन जगणे शक्य नव्हते. त्यांनाही चांगले जीवन जगण्याचा हक्क आहे. ते कसे शक्य करता येईल याचा अनेकांनी अनेक पद्धतीने विचार केला. ओवेन नावाच्या व्यक्तिने यासंबंधी बरेच विचार मांडले. खऱ्या अर्थाने सहकाराची सुरूवात इ.स. १८४४ मध्ये रॉबर्ट ओवेन या परोपकारी सद्‌गृहस्थाने केली. म्हणून रॉबर्ट ओवेन हा सहकारी चळवळीचा जनक मानला जातो. सहकार हा शब्दप्रयोग ओवेनीच अगदी प्रथमतः उच्चारला जीवनकलहाच्या अनुभवातून निर्माण झालेली तत्त्वे, चिंतन व विचार यांना एकत्र आणून नफापिपासू बाजारपेठेतल्या प्रवृत्तीपासून संरक्षण देण्याच्या दृष्टिने इंग्लंडमधील रॉश्डेल खेड्यातील टोंडसेन गल्लीतील २८ विणकरांनी जीवनावश्यक वस्तु स्वस्त किंमतीला उपलब्ध व्हाव्यात म्हणून २१ डिसेंबर १८४४ मध्ये ''इक्विटेबल पायोनिअर्स को. ऑपरेटिव्ह सोसायटीची'' स्थापना केली.[५४] या संस्थेमुळे जगातील आधुनिक सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. व्यापारवादी अर्थव्यवस्था आणि औद्योगिक क्रांतिच्या

प्रतिकूल परिस्थितीचे बळी ठरलेले हातमाग कामगार हे खरे, पहिले सहकाराच्या निर्मितीचे जनक होत.

इ.स. १८४४ मध्ये रॉश्डेल येथील विणकर कामगारांनी सहकारी तत्त्वांच्या आधारे ग्राहक वस्तू मिळविणे व त्या वितरित करण्याच्या व्यवहारांना प्रारंभ केला. मर्यादित वेतनात स्वस्त दरात वस्तू मिळविणे या उद्देशाने त्यांनी या कार्याला प्रारंभ केला. इ.स.१८४४ मध्ये रॉश्डेल इक्विटेबल पायोनियर्स को–ऑपरेटिव्ह ही सोसायटी फ्रेंडली सोसायटीज या कायद्यान्वये नोंदविण्यात आली. २८ व्यक्तींनी दरवर्षी १ पौंड वाचविला. आटा, लोणी, साबण, मेणबत्या, चहा, साखर अशा दैनंदिन गरजेच्या वस्तू हे 'भांडार' सभासदांना रोखीने विकत असे. त्यावेळी त्यांची अवहेलना अन्य व्यापाऱ्यांकडून केली गेली; पण सभासदांनी एकजुटीने खंबीर राहून प्रगती दाखविण्यास सुरूवात केली. पहिल्या वर्षीच सभासदांची संख्या २८ वरून ७४ झाली. इ.स.१८५१ मध्ये पूर्णकाळ व्यवस्थापक त्यांनी नेमला. इ.स.१८८८ मध्ये या संस्थेचे ११२३ सभासद व ३.४ पौंड लक्ष एवढे भागभांडवल होते. आजही ही संस्था ब्रिटनमधील आघाडीची संस्था आहे.[५५]

सहकारी पतपुरवठ्याचा प्रारंभ जर्मनीत झाला. जर्मनीतील सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्राहकांच्या सहकारी संस्थांच्या रूपाने आढळत नाही. मर्यादित प्राप्ती असलेल्या ग्रामीण आणि नागरी लोकांसाठी पतपेढी स्थापन करण्याचा तो प्रयत्न होता. मोठ्या बँका अशा लोकांची दखल घेणे अशक्यच होते. म्हणून ग्रामीण जनतेच्या व नागरी जनतेच्या सहकारी तत्वावर येथे पतपेढ्या स्थापन झाल्या. त्याचे श्रेय अनुक्रमे हर रफायझन व शूल्झे यांच्याकडे जाते.[५६] हे दोघेही द्रष्टे व निष्ठावंत समाजसेवक होते. स्वयंसेवा व स्वावलंबन याला परस्पर सहकार्याची जोड देण्यानेच दुर्बलांचा प्रश्न सुटेल, हे त्यांना स्पष्ट दिसून आले. इ.स.१८५० मध्ये शूल्झे यांनी आपल्या गावात पहिली सहकारी संस्था स्थापन केली तर रफायझन याने इ.स.१८४९ पासून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या. इ.स.१८७७ मध्ये रफायझन युनियन स्थापन झाली. ही सहकारी पतसंस्थांची संघ संस्था होती.[५७] आर्थिक गरजांनी नडलेल्या ग्रामीण व नागरी वर्गांना सावकारांच्या तावडीतून सोडविण्याच्या हेतूनेच या संस्था तेथे स्थापन करण्यात आल्या.

कृषि क्षेत्रात सहकार चळवळ सुरू करण्याचा मान डेन्मार्कला जातो. तेथे इ.स.१८६९ मध्ये पहिली सहकारी शेती संस्था ''जी रॉयल'' स्थापली. सेंट सायमन, लुई ब्लॉक व फेरीयर या फ्रेंच विचारवंतांनी सहकारी तत्त्वज्ञान रुजवले. इ.स.१९१६ मध्ये अमेरिकेत को–ऑप लीग यु. एस. ए. या सहकारी महासंघाची स्थापना झाली. १९ व्या शतकाच्या मध्यापासून 'कोह' या सहकारी पतसंस्थेची स्थापना जपानमध्ये झाली. इ.स.१९१९ मध्ये चीनमध्ये शांघाय नॅशनल को–ऑफ सेव्हींग बँकेची स्थापना करण्यात आली.[५८]

इस्त्रायल या देशामध्ये इ.स.१९२० मध्ये ज्यू लोकांनी सहकारी श्रमिक संघाची स्थापना केली. इस्त्रायलमध्ये किबूज येथे राहणाऱ्या ज्यू लोकांनी सहकारी तत्त्वावर आधारीत जीवन जगण्याची पद्धत अत्यंत उत्तम प्रकारे आत्मसात केली. आजही ही पद्धत यशस्वीपणे सुरू आहे. किबूजमध्ये खाजगी संपत्ती या संकल्पनेला तिलांजली देण्यात आली आहे. तेथे शेती व इतर उत्पादने सामुदायिकरित्या करण्यात येतात. सर्व प्रौढ सदस्य एकत्रितरित्या कोणताही मोबदला न घेता काम करत असतात व त्या प्रौढांच्या सर्व गरजा तेथे पूर्ण होतात. इतकेच नव्हेतर लहान मुलांचे पालनपोषणाचे दायित्व आईवडिलांवर नसून त्यांच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी किबूज पार पाडते. सहकाराची ही पद्धत आजही जगासमोर एक आदर्श म्हणून उभी आहे.[५९]

ब्रिटन, जर्मनी, डेन्मार्क, रशिया, जपान आदी अनेक देशाबरोबरच विसाव्या शतकाच्या सुरूवातीला नॉर्वे, स्वीडन येथे मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्थांची उभारणी झाली व सहकाराची संकल्पना युरोपमधील सर्व देशांमध्ये पसरली. अनेक युरोपियन राष्ट्रात ग्राहक, पत, प्रक्रिया व वितरण या क्षेत्रात लोकशाही पद्धतीने सभासदांनी चालविलेली एक आर्थिक कायदेशीर व्यक्ती अशा स्वरूपात सहकारी संस्था उभ्या राहिल्या. वर्गसंघर्ष नाकारून, स्वेच्छापूर्वक सहकार्याच्या आधारावर ग्राहक, पत प्रक्रिया व वितरण अशा क्षेत्रात सहकारी आर्थिक संघटनाच्या या पद्धतीतून भांडवलशाहीतील आर्थिक अन्याय कमी करण्याचे आर्थिक समाजवादाचे एक प्रारुप तयार झाले.

## ➢ भारतातील सहकारी चळवळ –

भारताच्या सहकारी अर्थकारणाचा इतिहास लक्षात घेता, सावकारी पाशातून लहान, सीमान्त, निर्वाह शेतकऱ्याला मुक्त करण्यासाठी, दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार

देण्यासाठी सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला. १९ व्या शतकाच्या शेवटी भारतातील कृषि व्यवसाय व एकूण ग्रामीण आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. भारतातील वेगवेगळ्या भागामध्ये वारंवार दुष्काळ पडून लाखो लोक मरत होते. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी सावकारांकडून कर्ज घेण्याशिवाय पर्याय नव्हता. शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जापोटी सावकारांकडे शेती गहाण पडत होती. इ.स. १८८० पर्यंत सुमारे एक चतुर्थांश शेत जमिनी या सावकारांच्या घशात गेल्या होत्या. इ.स.१८७६–७८ या दोन वर्षात महाराष्ट्रामध्ये मोठा दुष्काळ पडला होता.[६०]

जगातील अन्य देशातील सहकारी चळवळीप्रमाणे भारतीय सहकारी चळवळीचा जन्मही दुर्बलांच्या एकजुटीतून झाला असे दिसते. सदैव नित्कृष्ट राहिलेली शेती व क्षीण होत चाललेले कुटीरोद्योग यामुळे ग्रामीण जनता कर्जाच्या खाईत बुडून गेली. स्वतःची जमीन सावकाराकडे घाण पडून शेतकरी मजूर म्हणून आपल्याच शेतावर राबत होता. असंघटित शेतकरी मजूर वर्ग शेती करून नामुष्कीचे जीवन जगत होता. सर डॅनीयल हॅमिल्टन यांनी म्हटल्याप्रमाणे शेतीप्रधान भारत हा 'महाजनांच्या विळख्यात' सापडला होता. घसरती शेती आणि वाढते दारिद्र्य यांचा मुकाबला करण्यासाठी काही मार्ग शोधणे जरूर होते.[६१]

इ.स.१८९९–१९०० च्या भयानक दुष्काळानंतर शासनाने चौकशीसाठी 'दुष्काळ समिती' नियुक्त केली होती. तिने आपल्या अहवालामध्ये शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाविषयी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केलेले दिसते. "मुंबई प्रांतातील १/४ शेतकऱ्यांना आपल्या जमीनी सोडाव्या लागल्या.१/५ पेक्षा कमी कर्जविरहित असून उरलेले शेतकरी कमीजास्त प्रमाणात कर्ज बाजारी आहेत." यासंदर्भात रॉयल कमीशन ॲग्रिकल्चरने लिहीले आहे की ,"शेतकरी हा कर्जात जन्माला येतो, कर्जात वाढतो आणि कर्जातच मरण पावतो. शेतकरी आणि कर्ज यांची सांगड ही जवळ जवळ शंभर वर्षपेक्षा जास्त आहे."[६२]

### ➢ सावकारशाहीचा प्रभाव –

एकोणिसाव्या शतकातील हिंदुस्थानचा विचार करता असे दिसते की, तत्कालीन ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण स्वरूपाची होती. तथापि त्याबरोबरच समाजजीवनात

सावकारशाहीचे प्राबल्यही होते. त्यावेळच्या खेडयापाडयातील शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेबद्दल दिनकरराव जवळकर यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया या संदर्भात महत्त्वाची आहे ते लिहितात.

"हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश असूनही शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय केविलवाणी होती. १०० हिंदी माणसांपैकी ७३ शेती व्यवसाय करणारे शेतकरी होते त्यापैकी ४६ लोक अर्धपोटी राहणारे व उरलेले २८ शेतकरी तोंड मिळवून आहेत. शेतकऱ्यांच्या या दयनीय अवस्थेला परकीय सरकार तर कारणीभूत आहेच. पण देशातील सावकारवर्ग कारण आहे. जळवेप्रमाणे कसलाही आवाज न करता शेतकऱ्यांचे रक्त शोषून काढणारा 'सावकार' हिंदी शेतकऱ्यांच्या मानगुटीवर जो केव्हा एकदा बसला जो अजूनही कायम आहे."[६३] सावकारशाहीची ही पद्धत जुनी असून ब्रिटिश राजवटीपूर्वीही ती अस्तित्त्वात होती, असे दिसून येते. शेतकरी, मजूर हे बहुतांशी सावकारशाहीखाली भरडले जात असत. कारण सावकारी करणारे लोक साक्षर होते. तर त्यांचे ऋणको म्हणजेच शेतकरी व मजूर पूर्णपणे निरक्षर होते. शिवाय सावकार आपणाला फसवणार नाही. असा भोळ्या–भाबडया शेतकऱ्यांना विश्वास वाटत असे.

### ➢ सावकारशाहीचे परिणाम –

त्याकाळी उत्तर हिंदुस्थानातील अनेक ठिकाणी व बंगाल प्रांतात जमिनदार वर्गाचा प्रभाव होता. हे जमिनदार समाजातील चालीरितीच्या नावाखाली कुळांना पिळून काढत. उदा.औंध प्रांतात जमीनदाराला मुलगा झाला तर कुळाला त्यास 'सेस' द्यावी लागे. त्याच्या मुलीच्या लग्नात शेतकऱ्याच्या खर्चाने नाचगाणे होई. दसरा, दिवाळी अशा विविध उत्सवाच्या प्रसंगी नजराणा द्यावे लागे. तसेच मुंबई प्रांतातही 'खोती पद्धती' अस्तित्त्वात होती. मुंबई प्रांतातील कोकणच्या खोताला मानवी सैतान म्हणत. हे खोत शेतकऱ्यांना फसवून अल्प दरात त्यांच्या जमिनी बळकावीत असत.[६४] शेतकऱ्यांना आपल्या गरजा भागविण्यासाठी भरमसाठ व्याजाने सावकाराकडून पैसे घ्यावे लागत. शिवाय सावकाराकडून घेतलेल्या पैशाचा हिशोब बरोबर ठेवला जाईलच, याचीही खात्री नसे. सरकारी गॅझेटमध्येही सावकारी अन्यायाबाबतचा उल्लेख पुढीलप्रमाणे करण्यात आलेला आहे.

"The Savkar usually charges a high rate of interest and often requires the agricultutists to execute bonds and Morages which are

charged with stamp duty. The agriculturist is seldom able to know if the savkar keeps a correct account."[65]

इतकेच नव्हे, तर जमीन–जुमल्याप्रमाणे स्वतःची मुलगीसुद्धा सावकाराकडे गहाण ठेवून, गरीब शेतकरी त्यांच्याकडून पैसे कर्जाऊ काढीत.[६६] इ.स.१८६६ मध्ये भीमथडी, इंदापूर या दोन तालुक्यातच कर्जाच्या संदर्भातील ७५२ दस्तखते नोंदली गेली होती. पण इ.स.१८७३ मध्ये अशा दस्तखतांची संख्या १४१४ पर्यंत गेलेली दिसते. यावरून सावकार शेतकऱ्यांना कसे लुबाडत होते हे स्पष्ट होते.[६७] वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकरी त्रस्त झालेला होता. परंतु सावकारांनी ही संधी साधून आपला जास्तीत जास्त फायदा करून घेतलेला होता. सावकाराच्या या निर्दयी धोरणामुळे शेतकरी संतप्त झाले. परिणामी त्यांनी त्यांच्याविरूद्ध आवाज उठवायला सुरूवात केली. ते उठाव पुढे 'शेतकऱ्यांचे बंडे' म्हणून ओळखले गेले. सावकारांच्या या कुटील नितीविषयी म.जोतीराव फुले यांनी आपले विचार व्यक्त केले होते. सावकार अज्ञानी शेतकऱ्यांच्याकडून कर्जाऊ दिलेल्या रकमेपेक्षा मोठया रकमेचे दस्तऐवज करून घेत असत. सावकारांच्या या फसवणुकीविरूद्ध फुलेंनी अनेकवेळा आवाज उठविला होता.[६८]

## ➢ ब्रिटिश शासनाचे धोरण व परिणाम –

कर्जबाजारीपणा दारिद्र्य यांचा उद्रेक होऊन इ.स.१८७५ मध्ये दख्खनच्या शेतकऱ्यांनी सावकारशाहीच्या विरोधात उठाव केला. राजकीय स्थैर्याच्या दृष्टिने ब्रिटीश सरकारला असे उठाव परवडण्यासारखे नव्हते. म्हणूनच या उठावाची सरकारने गंभीर दखल घेतली. यावर उपाय म्हणून भारतातील सहकार चळवळीचा जन्म झाला असे म्हणता येईल. सर डॅनियल हॅमिल्टन यांनीही शेतकऱ्यांसाठी कर्जपुरवठा करणारी चांगली शाश्वत यंत्रणा उभी करण्याची गरज प्रतिपादन केली.[६९] शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टिने इ.स.१८७९ साली 'डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट', इ.स.१८८३ मध्ये जमीन सुधारणा कर्ज कायदा (The Land Improvement Loans Act.1883) आणि शेतकऱ्यांसाठीचा कर्ज कायदा इ.स.१८८४ (The Agriculturists Loans Act.1884) हे कायदे लागू झाले.[७०] मात्र हे कायदे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास अपुरे पडले.

ग्रामीण कर्जपुरवठा व कर्जनिवारण करण्यासाठी भारतात प्रथमतःच सहकारी तत्वाचा अवलंब करण्यात आला. सहकारी पद्धतीने हा कर्जपुरवठयाचा प्रश्न प्रथम सोडवावा असे प्रथम हेन्री स्टॉर्क या गृहस्थाने इ.स.१८८३ मध्ये सरकारला सुचविले. पुढे सर रेमंड वेस्ट यांनी इ.स.१८८७ साली सहकारी पद्धतीने कर्जपुरवठयाचा प्रश्न सोडविण्यासाठी भारतात सहकारी चळवळ सुरू करावी असे मत मांडले. ग्रामीण कर्जविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी मद्रासमध्ये फ्रेड्रिक निकोल्सन या गृहस्थाची इ.स.१८९२ साली नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी यासाठी सहकारी चळवळ सुरू करावी असे मत मांडले.[७१]

रेफिसेन आणि शूल्झ डेलिटझ यांनी जर्मनीमध्ये कैसरच्या राजवटीत शेतीविषयक सहकाराच्या माध्यमातून सुरू केलेला कर्जपुरवठा हा पर्याय भारतामध्ये वापरण्याविषयी अभ्यास करण्यासाठी भारतातील अधिकारी पाठविण्यात आले. इ.स. १८९२ मध्ये सर फ्रेड्रिक निकोल्सन कमिटीने तयार केलेल्या अहवालाचा वापर इ.स. १८९५–१८९७ या कालावधीमध्ये मद्रास इलाख्यात करण्यात आला. तर उत्तर भारतामध्ये श्री.एच. डुपरनेक्स यांच्या प्रयोगातून शेतकऱ्यांची बँक स्थापन करण्याचा प्रयोग करण्यात आला. डुपरनेक्स यांनी त्यासाठी इटलीमधील मेन्टोन येथील पीपल्स बँकेचा अभ्यास केला होता. तसेच पंजाब प्रांतामध्ये सर एडवर्ड मॅक्लोगन आणि कॅप्टन क्रॉस्थवेट यांनी परस्पर सहाय्यता पतपुरवठा संघ इ.स.१८९० पासून स्थापन करण्याचा प्रयत्न केलेला होता.[७२]

इ.स.१९०० मध्ये हेन्री वूल्फ या इंग्लंडमधील तज्ज्ञाने जर्मनीतील रफायझन पद्धतीवर हिंदुस्थानात सहकारी पतपेढया स्थापन कराव्यात असे सांगितले. शेतकऱ्यांना सरकारने कर्जाच्या रूपात पैसा पुरवावा असे काही तज्ज्ञांनी सुचविले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी हिंदुस्थानात दुष्काळ पडला होता व त्याकरिता इ.स.१९०० साली नेमलेल्या दुष्काळ समितीनेही सहकारी तत्वावर जर परस्पर सहाय्यक पतपेढया या देशात सुरू केल्या तर त्याच्यापासून चिरकाल टिकणारी अशी कर्जपुरवठयाची व्यवस्था होऊ शकेल असा अभिप्राय व्यक्त केला.[७३] अशाप्रकारे विविध तज्ज्ञांच्या शिफारशींच्या आधारे ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून (इ.स.१९०३) तिच्याकडे सहकारी संस्था स्थापन करण्याविषयीचा कायदा कशा स्वरूपाचा असावा याबद्दल शिफारशी करण्याचे काम सोपविले. पुढे याच समितीच्या शिफारशीच्या अनुरोधाने सहकारी पतपेढयांचा

कायदा १९०४ सर्व ब्रिटीश भारतात लागू करण्यात आला.[७४] भारतातील सहकार कायद्याच्या सुरूवातीची वरील पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर असे म्हणता येईल की सहकार चळवळीची या देशातील मुहूर्तमेढ शासकीय पुढाकाराने रोवली गेली होती. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे जनतेच्या इच्छाशक्तीतून ही चळवळ देशात उगम पावली नाही, तर तिचे बीज शासकीय पुढाकारात होते. या देशातील सहकारी चळवळीचे हे वैशिष्टय आहे.

२५ मार्च १९०४ रोजी भारतात पहिला सहकारी पतसंस्थांचा कायदा पास झाला व सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. हा कायदा ब्रिटीश इंडियासाठी होता व त्याची अंमलबजावणी ११ जुलै १९०४ रोजी सुरू झाली.[७५] सावकाराच्या कर्जातून शेतकऱ्याची मुक्तता करावी यासाठी योग्य व्याजाने कर्जपुरवठा व्हावा तसेच स्वावलंबन, काटकसर, बचत इत्यादी सवयी त्याला लागाव्यात अशी प्रमुख उद्दिष्टे त्यामागे होती. या कायद्याच्या प्रस्तावनेत म्हटले होते की, शेतकरी, कारागीर आणि इतर गरीब व्यक्तिना बचत, आत्मनिर्भरता व सहकार्याची भावना शिकवून दारिद्र्यातून संपन्नतेकडे नेण्याचा प्रयत्न केला जाईल.[७६] इ.स.१९०४ च्या कायद्याखाली सर्वसाधारणपणे इ.स.१९०४ पासून ते इ.स.१९१२ पर्यत संबंध भारतात ८१७७ एवढया सहकारी संस्था नोंदवल्या गेल्या. त्यात साधारणपणे ४.३ लाख सभासद होते आणि त्याचे खेळते भांडवल साधारणपणे ३ कोटी ३५ लाखापर्यत होते. मात्र हा कायदा फक्त शेतीविषयक संस्थांच्याबद्दलच होता.[७७]

इ.स.१९०४ च्या सहकारी कायद्यानंतर, १९१२ चा सहकारी कायदा, मॅक्लेगन समिती, मुंबई सहकारी संस्थाचा कायदा १९२५, रॉयल कमिशन, जागतिक महामंदीच्या काळातील सहकारी चळवळ, इ.स.१९४४ मध्ये प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली समिती, श्री. आर. जी. सरैय्या समिती, गाडगीळ समिती, या स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध समित्या व कायदे यातून सहकारी चळवळीचा विकास होत गेला.[७८] स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी सहकाराला मोठा पाठिंबा दिला. इ.स. १९५४ मध्ये आखिल भारतीय पतपुरवठा सर्व्हेक्षण समितीने आपल्या अहवालात सरकारने सहकारी चळवळीत अधिक सहभागी व्हावे अशी शिफारस केल्यानंतर मात्र भारतातील सहकारी चळवळीने खऱ्या अर्थाने जलद प्रगती करण्यास सुरूवात केली.[७९]

इ.स.१९५४ चा “समाजवादी समाजरचना” स्थापन करण्याचा ठराव, इ.स.१९५८ चा राष्ट्रीय विकास मंडळाचा ठराव, इ.स.१९६० चा सहकारी शेतीसंबंधीचा ठराव, १९६४ चा शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे सर्व उद्योग सहकारी क्षेत्रातच काढण्यासंबंधीचा ठराव इत्यादी घटनामुळे सहकारी चळवळीचा वेग वाढण्यास मदत झाली.[८०] १९७१ साली बाबा समितीने आदिवासींच्या विकासासाठी बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापण्याची शिफारस केली. इ.स. १९७६ च्या कृषि आयोगानेही राष्ट्रीयीकृत बँकाच्या सयुंक्त विद्यमाने सहकारी संस्थांच्या स्थापनेची शिफारस केली. इ.स.१९८१ मध्ये नाबार्डची स्थापना झाली. देशाच्या इतिहासात प्रथमच कृषि व ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय पातळीवरील बँकेची स्थापना झाली. व सहकारी चळवळीला मोठी मदत झाली.[८१]

इ.स.१९९१ मध्ये भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले व खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली म्हणून पुन्हा एकदा भारतातील सहकारी चळवळीचा आढावा घेण्यासाठी देशपातळीवर विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने ब्रम्हप्रकाश चौधरी, जगदीश कपूर, विखे पाटील, व्ही.एस.व्यास यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समित्यांचा सहभाग आहे.[८२]

इ.स.१९१२ च्या सहकारी संस्थाच्या कायद्याद्वारे शेतकी कर्जपुरवठया व्यतिरिक्त अन्य उद्देशाच्या सहकारी संस्था स्थापन करण्याच्या तरतुदीमुळे विविध सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांची तरतूद करण्यात आली. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातही या चळवळीचा प्रसार विविध क्षेत्रात वाढला गेला. त्यात प्रामुख्याने नागरी सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था, शेतमाल प्रक्रिया, ग्राहक संस्था इत्यादी विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा समावेश होता.

### ➢ इ.स.१९९९–२००० मधील भारतातील सहकारी संस्था व त्यांचा तपशील

| अ.न. | सहकारी संस्थेचे नाव | तपशील |
|---|---|---|
| १. | सर्व प्रकारच्या सहकारी संस्था | ५२८२४७ |
| २. | राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्था | २१ |
| ३. | राज्य पातळीवरील सहकारी संस्था | ३५३ |
| ४. | जिल्हा पातळीवरील सहकारी संस्था | २५६५ |

| | | |
|---|---|---|
| ५. | सर्व संस्थांतील एकूण सभासद (दशलक्ष) | २००९ |
| ६. | खेळते भांडवल रूपये (दशलक्ष) | २८८६४३३.५ |
| ७. | भागभांडवल रूपये (दशलक्ष) | ७०९६३.४ |

**(संदर्भ ...** Dr. N.Mohan, 'Co-operatives and Rural Development', अवघडे भगवान(संपा.) 'शतकोत्तर सहकार', लोकायन सहकारी प्रकाशन संस्था मर्या.सातारा मे २००४, पृ.४५)

एकंदरीत भारतातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थाच्या स्थापनेमुळे ग्रामीण आणि नागरी भागाचा मोठया प्रमाणात विकास झाला. सहकारी कायद्यामुळे भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासाला नवे वळण लागले. भारतातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर व कारागीर इत्यादी लोकांच्यामध्ये काटकसर, परस्पर सहकार्य, सामुदायिक प्रगती यासारख्या प्रवृत्ती रूजल्या गेल्या.

## ➢ पंढरपूर तालुक्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी –

महाराष्ट्रातीलच नव्हे तर इतर राज्यामधूनही लाखो भाविक ज्या भक्तिभावाने ज्या तीर्थक्षेत्री येतात ज्या तीर्थक्षेत्राला संतांचे माहेरघर म्हटले जाते वारकरी संप्रदायाचे आद्यपीठ म्हणून ज्याचा गौरव केला जातो ज्या तीर्थक्षेत्राला दक्षिणकाशी, दक्षिणी द्वारका असे म्हटले जाते ते तीर्थक्षेत्र म्हणजे पंढरपूर होय. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक व आंध्रप्रदेशाच्या भक्तांना आध्यात्मिक प्रगल्भता देणारे तीर्थक्षेत्र म्हणजे पंढरपूर होय. महाराष्ट्राला भूगोलच नाही तर इतिहाससुद्धा आहे आणि या इतिहासामध्ये धार्मिक तीर्थक्षेत्राचे स्थान हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यापैकी पंढरपूर हे या तीर्थक्षेत्राशी तमाम महाराष्ट्रातील भक्ताचे नाते हे अतिशय दृढ व उंचीचे आहे आणि हे नाते उत्तरोत्तर अतिशय दृढ होत चालले असून आजही वारीसाठी वारकरी महाराष्ट्रातूनच नाहीतर भारताच्या बाहेरूनही या अद्भूत सोहळयाचा आनंद घेण्यासाठी पंढरपुरच्या विठ्ठलाची भेट घेण्यासाठी येतात.

समकालीन वारकऱ्यांच्या मनावर सर्वात जास्त भुरळ घालणाऱ्या तीर्थक्षेत्रामध्ये विठ्ठलाचे नाव एकमताने घेतले जाते. विठ्ठलाने निर्माण केलेला वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्याने संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाही. प्रतिकाचा दुराग्रह धरला नाही, पंढरीच्या या विठ्ठलाने महाराष्ट्रातील साधुसंतांना ग्रंथलेखनाची व कवित्वाची स्फूर्ती दिली आहे. लक्षावधी शूद्रातिशूद्रांना या दयाभाव दैवताने आत्मोद्धाराची प्रेरणा दिली बंधुभावाचे पाठ दिले.

हरी तुका म्हणे, अवघा एकला ।

परी हा धाकुला भक्तीसाठी।।

म्हणूनच उत्तरोत्तर विठ्ठलाच्या भक्ताच्या संख्येत लाखोंने वृद्धी होत आहे नैतिक मूल्यांच्याद्वारे समाजाचा उत्कर्ष करून जनमनात भक्तिची, नैतिकतेची ज्योत रूजवल्यामुळे विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी लाखोच्या संख्येंने वारकरी वर्षभर दर्शनासाठी पंढरपुरला जातात. महाराष्ट्रातील असंख्य तीर्थक्षेत्रामध्ये पंढरपूर या तीर्थक्षेत्राचे महत्त्व अधिक असून लिखित व अलिखित साधनावरूनच पंढरपुरचे प्राचीनत्व सिद्ध होते. त्याबरोबरच खऱ्या अर्थाने संतानी पंढरपूर या तीर्थक्षेत्राचे प्राचीनत्व सिद्ध केले म्हणूनच महाराष्ट्रातील संतानी पंढरपूर या तीर्थक्षेत्रास 'भूवैकुंठ' म्हणून संबोधले आहे.

मध्ययुगीन कालखंडातील मुस्लिम शासकांनी सुद्धा या तीर्थक्षेत्राचे आध्यात्मिक व नैतिक महत्त्व ओळखून भरपूर आर्थिक मदत दिली उदा.आदिलशाही सत्तेकडून महानैवद्यासाठी दरवर्षी ३५००/- रूपये मानधन मिळत असे इस्लामी शासकाकडून श्रीविठ्ठलाच्या नित्यनैवद्यासाठी दरवर्षी काही ठराविक रक्कम दिली जात असे. विठ्ठलाची यात्रा भरवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाई. अफजलखान व औरंगजेब यांच्या स्वाऱ्या वगळता इतर मुस्लिम राज्यकर्त्यांनी मंदिराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न केला. पुढे मराठा आणि पेशवा कालखंडामध्ये या तीर्थक्षेत्राबरोबरच आजूबाजूच्या परिसराचा विकास करण्याच्या धोरणामुळे विठ्ठलाच्या कीर्तीमध्ये वाढ झाली. पेशव्यांनी घाट बांधणे, मठांची निर्मिती करणे, वाडे बांधणे, धर्मशाळा बांधणे याबरोबरच विठ्ठलाच्या महापूजेसाठी महानैवद्यासाठी जमिनी इनाम दिल्या. मराठे आणि पेशव्यांनी मंदिराचे पावित्र्य जपण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. यात्रा भरवण्यास प्रोत्साहन देण्याबरोबरच विठ्ठलाच्या मंदिराची व परिक्षेत्राची व्याप्ती वाढविली. त्यामुळेच मध्ययुगीन धर्मसत्तेत विठ्ठलाच्या या पंढरपूर क्षेत्राचे आध्यात्मिक व नैतिक महत्त्व मोठया प्रमाणात विस्तारण्यास मदत झाली. इ.स.च्या १२ या शतकापासूनच संतांनी पंढरपूर आणि श्री. विठ्ठलाबद्दल धार्मिक व साहित्यिक या दोन्ही क्षेत्रात मोलाची भर घातली गेली हळूहळू पंढरपुरचा ऐतिहासिक विकास होत गेला.[८३]

पंढरपूर शहराच्या विकासामध्ये ब्रिटिश सत्तेचे खूप मोठे योगदान आहे. या कालखंडामध्ये दवाखाने, गटारे, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य यामध्ये मोठे योगदान दिले.

त्यामुळे पंढरपूर शहर विस्तारण्यास खूप मोलाची मदत झाली. स्वातंत्र्यानंतर नगरपालिका आरोग्य, शिक्षण, प्रशासन, सुरक्षितता याबरोबरच अन्य क्षेत्रामध्ये झालेल्या प्रगतीमुळे या शहर व परिसराचा मोठया प्रमाणात विकास झाला.[८४] खरी उन्नती ही आध्यात्मिक, नैतिक व समतामूलक असल्यामुळे उत्तरोत्तर हे तीर्थक्षेत्र जगाच्या नकाशावर आपली आध्यात्मिक अधिसत्ता निर्माण करून आपल्या आध्यात्मिक उंचीचा आलेख नेहमी उंचावताना दिसत आहे.

➢ **प्रादेशिक स्थान व क्षेत्रफळ –**

पंढरपूर हे महाराष्ट्रातील तालुक्याचे एक ठिकाण असून सोलापूर जिल्ह्यामध्ये आहे. सोलापूर हा जिल्हा दक्षिण महाराष्ट्रामध्ये येतो.[८५] पंढरपूर तालुका हा तीर्थक्षेत्र असल्यामुळे सर्वच तालुक्यांशी जोडले गेलेले आहे. राज्य मार्गाने जोडले गेल्यामुळे दळणवळण व रस्ते याबरोबरच लोहमार्गाचा विकास झाल्यामुळे हे तीर्थक्षेत्र वाहतुकीच्या सोईसुविधामुळे भक्तांचे वर्षभर आगमन या तीर्थस्थळी होत असते. त्यामुळे या भागामध्ये वसाहतीची संख्या उत्तरोत्तर वाढतांना दिसून येत आहे. पंढरपूर तालुक्याच्या सिमा या माढा, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला, माळशिरस या तालुक्यांना जाऊन भिडल्या आहेत. त्याबरोबरच लोकसंख्येमध्ये वृद्धीही दिसून येते. पंढरपूर नगरपालिकेचे इ.स.१९९९ पर्यंतचे क्षेत्रफळ १२.०४ चौरस कि.मी.होते. इ.स.२००० मध्ये इसबावी, टाकळी हा भाग नगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. नगरपालिकेच्या क्षेत्रफळात उत्तरोत्तर वृद्धी होताना दिसून येते. नगरपालिकेचा विस्तार हा पूर्वीच्या क्षेत्रविस्तारापेक्षा ५.२ चौरस कि.मी.नी वाढलेला दिसून येतो. या विस्ताराबरोबरच नगरपालिकेचे सध्याचे क्षेत्रफळ हे १७.२८ चौ.किलोमीटर एवढे झालेले आहे.[८६] या नदीचा आकार चंद्रकोराप्रमाणे असल्यामुळे तिला चंद्रभागा असेही म्हटले जाते. ही नदी पंढरपूर शहराच्या पूर्वेकडून वाहते.[८७]

➢ **भौगोलिक स्थान व हवामान –**

पंढरपूर शहर हे सोलापूर जिल्ह्यात असून भौगोलिक दृष्टया ते पश्चिम पट्टयात येते. हे शहर १७°४०′ उत्तर अक्षांश व ७५°२३′ पूर्व रेखांशावर वसलेले आहे. समुद्र सपाटीपासून ते ४५० मीटर उंच आहे. शहराला पश्चिमेकडून पूर्वेकडे सर्वसाधारणपणे उतार आहे. पंढरपुरचे हवामान हे सामान्यतः कोरडे असून ते उन्हाळयात मे महिन्यात ४१.०° सेल्सिअस कमाल व

हिवाळ्यात डिसेंबर महिन्यात १५.०$^{\circ}$ सेल्सिअस किमान असते. येथील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ६५७.५ मि.मि. आहे.[८८]

**भिमा नदी –**

भिमा नदी ही पंढरपुरच्या पूर्वेकडून वाहते. ही कृष्णा या नदीची उपनदी आहे. भिमा नदीची लांबी साधारणतः ८६७ कि.मी.असून सुमारे ७०,६१३ चौ.कि.मी. एवढे क्षेत्र ही नदी सिंचित करत असते. या नदीची इतर नावे अनुक्रमे 'भिमरथा', भिमरथी इत्यादी असून या नदीचा उगम हा पुणे जिल्ह्यात आहे. भिमाशंकर या ठिकाणी ही उगम पावते व आग्नेयेकडील खेड, पुणे, अहमदनगर येथून वाहत जाऊन कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील रायचूरच्या उत्तरेस कुरूगुड्डी येथे कृष्णा नदीस मिळते. भिमा नदीच्या उजव्या तीरावर पंढरपूर हे तीर्थक्षेत्र अस्तित्त्वात आहे. चंद्रभागेच्या वाळवंटात भजन किर्तनाला जागा असून तिथे असंख्य संताच्या समाध्या आहेत.[८९] सोलापूर जिल्ह्यातील कुरवली, पंढरपूर, ब्रम्हपुरी, खाडेश्वर, कुसूर, भंडारकोटे, सांधेपुरा, औंज, टाकळी, अशी नऊ तीर्थक्षेत्रे भीमा नदीच्या काठी वसलेली आहेत. भागा, इंद्रायणी, वेळा, मुळा, मुठा, घोड, नीरा, माण, मीना, कुकडी, पुष्पावती इ.तिच्या उपनद्या आहेत. धार्मिकदृष्टया भीमा नदीला महानदी असे म्हटले जाते. मत्स, ब्रम्ह, वामन इ.पुराणातून व महाभारतातून या नदीचा उल्लेख आढळतो. त्रिपुरासुराचा वध करून श्रमपरिहारार्थ भीमा शंकराजवळ आले असता तेथे अयोध्येचा भीमक नावाचा राजा तप करीत होता. तो शंकरास सामोरे गेला त्यावेळी शंकराने प्रसन्न होऊन भीमकास वर मागण्यास सांगितले. त्यावेळी त्याने शंकराला आलेल्या घामाच्या धारांनी पुण्यपावन नदी होवू दे. असा वर मागितला व त्याप्रमाणे या नदीचा उगम झाला. व भीमक राजाच्या नावावरून या नदीस भीमा नदी असे नाव पडले.[९०]

- **पंढरपूर शब्दाची उत्पत्ती –**

पंढरपुरास अगदी प्राचीन कालखंडापासून वेगवेगळया नावांनी संबोधले जाते. उदा. पंढरपूर, पंढरीपूर, पांडुरंगपूर, फागणीपूर, पौंडरिकक्षेत्र, पांडुरंगपल्ली, पंडरगे इत्यादी नावांनी वेगवेगळया कालखंडामध्ये ओळखले जात असे. अनेक संशोधकांनी पंढरपूर तीर्थक्षेत्राचा काळ निश्चित केला आहे. पुरातत्व संशोधक डॉ.एच.डी.सांकलिया यांनी भीमा नदीच्या काठाच्या

पाषाणाचे वय पाच हजार वर्षे असे सांगितले आहे.[११] सर्वश्रेष्ठ संत श्री नामदेवरायांनी पंढरपुरच्या प्राचीनत्वाबद्दल "जेव्हा नव्हते चराचर । तेंव्हा होते पंढरपूर"असे म्हटले आहे.

पंडरगे हे कानडी नाव आहे. याचे संस्कृत रूप पंडारिका असे होते आणि पंडरगे व पंडरिका यापासूनच पंडरी किंवा पंढरी हा शब्द बनला आणि त्यास पूर हा नगरवाचक शब्द लावून प्रत्यय लावून पंडरीपूर, पंढरपूर आणि पंढरपूर हे नाव तयार झाले.[१२]

प्र.न.जोशीकृत आदर्श शब्दकोश, वा.ना.आपटेकृत शब्द रत्नाकर याबरोबरच य.रा.दाते संपादित महाराष्ट्र शब्दकोश या ग्रंथामध्ये पांडू किंवा पांढर, पांडर या शब्दांचा शब्दशः अर्थ पांढरा किंवा फिका असा होतो. वरील ग्रंथकारांनी 'पांडु', पांडुर = पांढरा, फिका असाच अर्थ दिलेला असल्यामुळे पांडुरंग म्हणजे पांढऱ्या रंगाचा पांढरा यावरून सकृतदर्शनी पंढरपूर हे नाव प्रचलित झाले.[१३] फक्त महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतामध्ये पंढरी हा शब्द अत्यंत लोकप्रिय आहे. संत साहित्य परंपरेन तर या पंढरपूर नगरीला पृथ्वीवरील साक्षात भूवैकूंठ असे म्हटले आहे. तुकाराम महाराज म्हणतात की, "भिमातीरी एक वसविले नगर । त्याचे नाव पंढरपूर ।"

## ➢ प्राचीन पंढरपूर –

श्री संत नामदेव महाराज(इ.स.१२७० ते इ.स.१३५०) पंढरपुरचे माहात्म्य सांगताना म्हणतात. 'जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा होते पंढरपूर किंवा आधी रचिली पंढरी । मग वैकुंठनगरी' तसेच 'जेव्हा नव्हते चराचर तेव्हा होते पंढरपूर । जेव्हा नव्हते अलकापूर तेव्हा होते पंढरपूर ।। या विधानावरूनच पंढरपुरची ऐतिहासिकता वा प्राचीनता लक्षात येते. आज नव्हे, काल नव्हे, परवा नव्हे तर अठ्ठावीस युगे इथे पांडुरंग ठाकला आहे. ते सावळे ध्यान विटेवरी उभे आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम अशा ज्ञानी भगवद्भक्तांचा प्राण ज्याच्यासाठी कासावीस झाला. त्याच्या दर्शनाने या विरागी पुरूषांची हदये आनंदाच्या डोई बुडून गली. तो सर्व मांगल्याचा मंगल असा विठ्ठल इथे उभा आहे. आज शेकडो वर्षे सहस्त्रावधी भक्त जनांचा हा सखा मराठी जनमाणसात नांदतो आहे.[१४]पंढरपूर या तीर्थक्षेत्राला प्राचीन ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. अनेक संशोधकांनी, इतिहासकारांनी, लेखकांनी,भक्तांनी, आपापल्या ग्रंथामध्ये काव्यामध्ये लिखित अलिखित पंढरपुरच्या प्राचीनत्वाबद्दल माहिती शब्दबद्ध केलेली आहे. यामध्ये विविध मतप्रवाह देखील आहेत. काही

संशोधकांनी कागदपत्रे, सनदा, ताम्रपट, नाणी शिलालेख हया अस्सल साधनातून पंढरपूर आणि चंद्रभागेचे प्राचीनत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. याबरोबरच अनेक भक्ती संप्रदायाने सुद्धा पंढरपुरच्या प्राचीनत्वाबद्दल आपापल्या भक्तीग्रंथामध्ये वर्णने केली आहेत. "पंढरपूर येथील भिमा नदीचा उल्लेख श्रीमदभागवत आणि महाभारत या दोन्ही ग्रंथात आढळतो."[९५] यावरूनच चंद्रभागेचे प्राचीनत्व सिद्ध होते. महाभारताच्या नवव्या अध्यायात चंद्रभागेचा उल्लेख आढळतो –

"गोदावरी नर्मदा च बाहुदां च महानदीम ।
शत द्रुं चंद्रभागा च यमुनां च महानदीम ।।"

वरील दोन ग्रंथामधील उल्लेखावरून पंढरपूर क्षेत्र आणि भीमा नदी यांचे प्राचीनत्व स्पष्ट होते.[९६]

पंढरपुरचा प्रथम उल्लेख पौंडरिक क्षेत्र किंवा शिवक्षेत्र असा करण्यात आलेला आहे पद्मपुराणातील पांडुरंग महात्म्यामध्ये हा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामध्ये त्या काळात पंढरपूर हे गाव निर्माण होण्याअगोदर टेकडीवर काही वस्त्या होत्या. त्यामध्ये मल्लिकार्जुनचे शिवालय होते. ही वस्ती सध्याच्या महाद्वार भागात होती. याच टेकडीवर अमृतेश्वर पौडारिक व विठ्ठल ही शिवस्थाने असल्या कारणाने या सर्वांना मिळून महायोगपीठ संबोधले जात असे.[९७] यातूनच पंढरपुरचा पुढे विकास झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात पंढरपुरचा पांडुरंग अत्यंत प्रसिद्ध व पूज्य देवस्थान आहे. सर्व देवस्थानात हे प्राचीन देवस्थान आहे.[९८]

मालू तारण या ग्रंथाचे रचनाकार मालू सोनार यांनी आपल्या ३२ अध्यायाच्या ग्रंथामध्ये शालीवाहन राजाचा प्रधान रामचंद्र सदाशिव सोनार याने दिंडीरवन तोडून पंढरपुरची स्थापना केली असे लिहीले आहे. शालीवाहन राजाला या प्रदेशातील दरोडयांच्या लुटीच्या वृत्तांताच्या कथनाबरोबरच राजाने प्रधानाला दिलेले आदेश, प्रधानाच्या चार कोळी व त्याच्या शिलेदाराच्या मदतीने दरोडेखोरांचा केलेला बंदोबस्त आणि यात्रेकरूंना संरक्षण देऊन पंढरपूर या गावाची निर्मिती इ.स.८३ मध्ये केल्याचे वर्णन या ग्रंथात आढळते.[९९]

## ➢ पांडूरंगपल्ली ताम्रपट –

पंढरपुरच्या देवस्थानचे अस्तित्व दाखविणाऱ्या उपलब्ध लेखांपैकी सर्वात जुना लेख इ.स.१५१६ च्या ताम्रपटावरील आहे. याचा उल्लेख म्हैसूर सरकारच्या १९२९सालच्या आर्किऑलॉजी खात्याच्या अहवालात आहे. या ताम्रपटामध्ये राष्ट्रकूट अविधेय याने जयव्दिठ्ठ या नावाच्या ब्राम्हणास अनेवरी, चाळ कन्दक व दुद्दपल्ली या गावांसह पांडरंगपल्ली हे गाव दान केल्याचा उल्लेख आहे. ही गावे म्हणजे हल्लीची अनवली, चळे, कोंडरकी व पंढरपूर होत.[१००] यापैकी पांडरंगपल्ली म्हणजेच सध्याचे पंढरपूर होय. या ताम्रपटाच्या शेवटी लेखकाचा व लेखन केल्याच्या कालखंडाचा उल्लेख आहे. "लिखित चेदं राज्य करवरिषे शोडषे भाद्रपदे कार्तिकस्य बाहुलपंचम्यां राजानुज्ञातेन देवदत्तेन पंढरा द्रिसेन" या ताम्रपटावरून असे स्पष्ट होते की, अंग राजाचा पुत्र देवराज नावाप्रमाणे शूर व मोकळया अंतकरणाचा होता. याचा पुत्र अविधेय याने जयदठ्ठ या ब्राहमणास महादेवगिरीच्या पूर्वेस असणारी अनवली, चळे, कोंडरगी दुटूपल्ली व पांडुरंगपल्ली ही पाच गावे दान दिली. ताम्रपटात देवदत्त हा पंढरपुरचा अधिकारी असून दानाची मित्ती भाद्रपद वद्य पंचमी आहे. हे स्पष्ट होते.

डॉ.वा.वि.मिराशी यांनी सुद्धा इ.स.५१६ च्या अलिकडे हा काळ आणता येणार नाही. असा निर्वाळा दिला असून त्यांनी पांडूरंगपल्ली हे नाव पंढरपूर आहे असे मत व्यक्त केले आहे. डॉ.कृष्णा यांनी ५१६ हाच या ताम्रपटाचा काळ दिला आहे. तर डॉ.जी.ए.डलरी यांनी The Cult of Vithobaया आपल्या ग्रंथात पंढरपुरच्या अस्तित्वाच कालखंड हा इ.स.५१६ हाच दिलेला आहे. महाराष्ट्राबाहेरील आणखी एक महत्त्वाचा पुरावा केरळ येथे सापडतो. जे पंढरपुरचे प्राचीनत्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे. कालटी गावचे आद्य शंकराचार्य (इ.स.७३२–७८८) त्यांनी लिहिलेले 'पांडुरंगाष्टम' नावाचे आठ श्लोकाचे स्तुतीपरसंस्कृत काव्य जे पंढरपुरचा कालखंड ठरवण्यास खूप मोलाची मदत करते.[१०१]

राष्ट्रकूट राजा मानक याच्या क्षेत्रामध्ये पंढरपुरचा आंतर्भाव होता. राष्ट्रकूट राजा अविधेय याच्याकडे पंढरपुराचे नियंत्रण होते. त्यानंतर पंढरपूर चालुक्यांच्या नियंत्रणाखाली गेले. पुलकेशी या राजाने सातारा व पंढरपूर प्रदेशाची व्यवस्था आपल्या भावाकडे विष्णूवर्धन याच्याकडे सोपविली. इ.स.७५६ पर्यंत पंढरपूर हे चालुक्यांकडेच होते.[१०२] राष्ट्रकूट राजवट इ.स. ११८० मध्ये संपुष्टात आली आणि या कालखंडामध्ये पंढरपुरच्या विठ्ठलाची कीर्ती तिरूपतीपर्यंत

पोहचली. इ.स.च्या ६ व्या शतकापासून ते १३ व्या शतकापर्यत पंढरपूर क्षेत्र व विठ्ठलाच्या भक्तामध्ये वाढ होत गेली. डॉ.श.गो.तुळपुळे यांनी इ.स.च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस पंढरपूर या तीर्थक्षेत्राशी देवगिरीच्या यादव घराण्यांचा विठ्ठलाशी संबंध आलेला होता असे सांगितले आहे. डॉ.तुळपुळे यांना पंढरपूर संशोधन मंडळाने एक शिलालेख दिला होता. त्या शिलालेखामध्ये इ.स.११८९ मध्ये श्री विठ्ठलाचे मंदिर बांधल्याचा उल्लेख असून तो शिलालेख हा भिल्लम यादव राजाच्या राजवटीमधील आहे.[१०३] यावरून हे स्पष्ट होते की, दक्षिणेतील देवगिरीच्या यादवांच्या राजवटीखाली श्री.विठ्ठल तीर्थक्षेत्राचा विकास होतांना जाणवतो. त्याबरोबरच विठ्ठलाच्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा आपल्याला सापडतात.

कृष्णस्वामी समाधीवरील शिलालेख ८ शके ११७१ (इ.स.१२०९) हा पंढरपुरच्या विठ्ठलाची प्रसिद्धी दर्शविणारा आहे. तो आळंदी येथील हरिहरेंद्र स्वामीच्या मठात कृष्णस्वामींच्या समाधीवर आहे. हया शिलालेखावर श्री.विठ्ठल व रूक्मिणी मूर्ती कोरलेली आहे. हा शिलालेख श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माच्या ६० वर्षाअगोदरचा आहे. यावरून श्री ज्ञानेश्वराच्या जन्मापूर्वी विठ्ठलाच्या अस्तित्वाची कल्पना येते.[१०४] पद्मपुराणात ६ व्या अध्यायात पंढरपूर भेटीचा उल्लेख आहे. शिमोगा जिल्ह्यातील सोंगाने गावच्या शिवमंदिरत वीर बल्लाळ होयसळ याने आपल्या भागातील ग्रामदेवता विठ्ठलशास तीन निष्क भूमिदान केल्याचा उल्लेख आहे.[१०५]

डॉ.शोभना गोखले यांनी महाराष्ट्रातील सत्वधारा या ग्रंथामध्ये विठोबाच्या षोडशोपचार पूजेपैकी काही उपचारासाठी दान केल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यात पंढरपुरास पंडरगे(सस्कृत) व पडरगे किंवा पंडरंगे (कानडी भाग)या दोन प्रकारानी संबोधले आहे. त्याबरोबरच पुंडलिकाचा उल्लेख पुंडरीक मुनी असा करण्यात आलेला आहे. राजा सोमेश्वर(होयसळ राजा) याने विठ्ठलासाठी काही गावे दान देण्याबरोबरच त्याची व्यवस्था पंढरपुरच्या महाजन परिषदेकडे सोपविली असा उल्लेख तुळईवरील होयसळ शिलालेख शके ११५९, २५ डिसेंबर १२३६ मधील असून डॉ.शोभना गोखले यांनी वरील मत मांडले आहे.[१०६]पंढरपुरचे प्राचीनत्व या लेखात डॉ.सालेतुर यांनी वीर सोमेश्वरांना होयसळ राजा सोमेश्वर ठरवलेले असून तो देवगिरीच्या यादवांपैकीच एक असल्याचे मत मांडले. असून या मताची पुष्टी डॉ.अय्यंगार यांनी केली आहे. इ.स.१२ व्या शतकाच्या अखेरीस पंढरपूर या

विठ्ठलक्षेत्राशी देवगिरीच्या यादवांचा संबंध आलेला होता. तेथील विठ्ठलदेव हा एवढा लोकप्रिय होता की, महाराष्ट्रात व्यक्तिनामकरणासाठी त्याचे नाव श्रद्धेने वापरले जात होते.[१०७]

➢ **मध्ययुगीन पंढरपूर –**

देवगिरीच्या यादवांप्रमाणेच द्वारसमुद्राच्या होयसळ यांनाही विठ्ठलभक्तीची आस होती. मुस्लिमपूर्व कालखंडामध्ये वारी करण्याची प्रथा होती. ही वारी करण्याची प्रथा दाखविणारा एक शिलालेख धारवाड जवळच्या हेंब्वळीळ गावी जंबुकेश्वराच्या देवळासमोर सापडला असून हा कानडी भाषेत आहे. यात खालील तपशील आहे.

१) श्री.पंडरंगेय श्रीविठ्ठलदेवर वारिय श्रीहरिदि.

२) नंगम धर्म्मके कलुवर सिंगगावुंडनु कोट्ट वृत्ति बोंदु

याचा अर्थ पंढरपुरच्या वारीच्या दिनी करावयाच्या धर्मासाठी कलुवर सिंगगावुंड यांनी वृत्ती दिली. वृत्ती म्हणजेच चार पाच माणसाच्या कुटुंबाची वर्षभराच्या निर्वाहाची व्यवस्था होईल. एवढी मुख्यतः जमिनीच्या उत्पन्नातील व्हावयाची व्यवस्था यावरून असे स्पष्ट होते की इ.स. ११७० मध्ये ही पंढरपुरची वारी करण्याचा प्रघात होता. [१०८]

**बेंडिगिरी ताम्रपट –**

बेळगावापासून साधारणतः १० ते ११ कि.मी. अंतरावर असलेल्या या बेंडिगिरी गावी सापडलेल्या ताम्रपटावर पंढरपुरास पौंडरिक क्षेत्र व विठोबास विष्णू म्हटलेले आहे. हया ताम्रपटाचा कालखंड शके ११७१, सोम्य सवंत्सर(इ.स.१२४९) असा असून या ताम्रपटाची भाषा ही संस्कृत आहे. हा ताम्रपट डॉ.काशीनाथ बापूजी पाठक यांनी 'इंडियन अँटिक्वेरिमध्ये' प्रसिद्ध केला आहे.[१०९]

श्री.पांडुरगपुरात भीमरथीच्या तीरावर करण्यात आलेल्या अप्तोयार्म इष्टीची नोंद यादवाच्या राज्यकाळात ज्येष्ठ शुद्ध ।। रविवार शके ११९२ (इ.स.१२७०) चा शिलालेख जो यादव राजाच्या ब्राम्हणन सांमत घराण्यातील केशवपुत्र भानूच्या कार्याची नोंद असून याचे वाचन डॉ.शोभना गोखले यांनी केले. या लेखात हा पंढरपूर, विठ्ठल आणि यादवांच्या कुळाचा जिल्ह्याचा संबंध असल्याचे वर्णन करण्यात आलेले आहे.[११०]

## हेमाद्रीचा चतुर्वर्ग चिंतामणी ग्रंथ (इ.स.१२६० ते १३०९)

हेमाद्रीचा चतुर्वर्ग चिंतामणी ज्याचा कालखंड प्रा.शै.वा.दांडेकर यांनी (१२६० ते १३०९) असा केला असून त्या ग्रंथातील तीर्थखंड नावाच्या भागात पंढरपुरास पौण्डारीक व विठोबाला पांडुरंग असे म्हटले आहे.[१११]

१२ व्या शतकात तत्कालिक विठ्ठल मंदिराच्या आवारात यज्ञ केले जात होते. अशा नोंदी वैष्णवांच्या व्रतांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. 'महाद्वार चावडी' शिलालेखामध्ये पंढरपुरास पांडुरंगपूर असे म्हटले जातअसल्याचा पुरावा सापडतो. हा महाद्वार चावडी शिलालेख शके ११९२ इ.स.१२७० मधील असून यामध्ये पंढरपुरच्या बरोबरच एकादशीचे महत्त्व सांगितले आहे. हा देवनागरी लिपीत असून रामदेवरायाचा थोरला भाऊ महादेवराय विठ्ठलभक्त होता असे वर्णन आहे.[११२]

## चौऱ्याऐंशीच्या शिलालेख –

डॉ.श.गो.तुळपुळे यांच्या मते विठ्ठलाचे लहान देऊळ शके १०११ मध्ये बांधले गेले. त्यानंतर ८४ वर्षानी ही शिला कोरली गेली म्हणून हीला चौऱ्याऐंशी शिला असे नाव पडले. यावरील लेखाचे वाचन करून राजवाडे यांनी तो प्रथम ग्रंथमालेत प्रसिद्ध केला व त्यानंतर डॉ.श.गो.तुळपुळे यांनी पंढरपूर येथे येऊन पंढरपूर संशोधन मंडळाच्या सहाय्याने त्याचे ठसे घेऊन वाचन करून पुणे विद्यापीठ पत्रिका ज्ञानखंड वर्ष १ मध्ये प्रकाशित केले. यामध्ये श्री. विठ्ठलदेवास फुलेदांडे वाहणे, सूर्यचंद्र आहेत तोपर्यंत चालविण्यास निरनिराळया भक्तांनी दिलेल्या पैशाचा तपशिल आहे.[११३] या शिलालेखामध्ये पंढरपुरास फागिणपूर व विठोबास विठ्ठल किंवा विठल अशा दोन्ही नावांनी संबोधले आहे.

## चौंडरस कानडी कवीचे साहित्य(इ.स.१३०३)

'बाणासुरविजय', 'नळचंपु' व 'अभिनवदशकुमारचरिते' हे तीन ग्रंथ लिहिणारा चौंडरस नावाचा कानडी कवी आपल्या ग्रंथापैकी नळचंपू मध्ये पहिल्याच पद्यात श्री.विठ्ठलाचे 'मंगलमुर्तिय भंगविठ्ठल' असे वर्णन केले आहे. याबरोबरच 'अभिनवदशकुमार चरिते' या ग्रंथामध्ये सुरूवातीलाच चौंडरस याने प्रथम पंढरीराया अभंग विठ्ठलाची स्तुती केलेली आहे. नंतर लक्ष्मी व इतर देवतांची स्तुती केलेली आहे.[११४]

बिल्वमंगल किंवा लीलाशुकचे साहित्यामध्ये (इ.स.१३०३) संस्कृत ग्रंथकार बिल्वमंगल याने भिमेच्या काठी असलेला देव नागडा व सावळा आहे. त्याने आपले हात कमरेवर ठेवले आहेत. असे वर्णन आपल्या 'कृष्णकर्णामृतम' नावाच्या त्रिशतश्लोकात्मक व कृष्णस्तुतीपर ग्रंथात मांडले आहे.[११५]

**चोखामेळा शिलालेख शके १२३३(इ.स.१३११)–**

पंढरपुरमध्ये विठोबाच्या देवळाबाहेर चोखामेळाच्या समाधीजवळ हा शिलालेख होता. सध्या कोठे आहे हे ज्ञात नाही त्याचे वाचन वि.का.राजवाडे यांनी केलेले असून हा शिलालेख दानविषयक आहे त्यामध्ये पुंडलिकाच्या अवतरणची आख्यायिका चितारण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पंढरपुरास पंढरीपूर व विठ्ठलास विठोबा असे संबोधले असून हा लेख मराठी भाषेत आहे.[११६]

हरिश्चंद्रगडावरील शिलालेख जो अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील हरिश्चंद्र पर्वतामध्ये असलेल्या शिलालेखात चांगा मुधेश या संताचा पंढरपुरच्या विठ्ठल मूर्तीशी संबंध दर्शविलेला आहे. त्यात मुस्लिम स्वारीमुळे पंढरपूर उद्ध्वस्त झाल्याच्या नोंदी आहेत.[११७]

**दलपतिराज लिखीत नृसिंहप्रसाद ग्रंथ –**

दलपतिराज हा निजामशाहीत अर्थमंत्री होता. त्याने धर्मशास्त्रावर नृसिंहप्रसाद ग्रंथ लिहिला. त्यातील तीर्थसार नावाच्या भागामध्ये पुंडरिक क्षेत्राविषयी माहिती दिलेली आहे. तीर्थसारमध्ये पंढरपुरला पढरिक क्षेत्र आणि विठ्ठलाला हरी व पंढरगे अशी दोन नावे दिली असून यामध्ये पंढरपूर क्षेत्रातील पवित्र स्थाने, देवता, तीर्थे नद्या यांची नावे दिलेली आहेत.[११८]

पंढरपुरामध्ये आजही शंकराचे दर्शन घेतल्याशिवाय पांडुरंगाचे दर्शन घेतले जात नाही. त्याच्या आधारे डॉ.रा.गो.भांडारकर यांनी असा तर्क केला आहे की, पांडुरंगपूर हे मूळच्या शिवाच्या देवालयावरून पडले असावे. विठोबाचे महत्त्व वाढू लागले तेव्हा विठोबास पांडुरंग म्हणू लागले. ज्या शंकराचे दर्शन घेतल्याशिवाय विठोबाचे दर्शन घेत नाहीत. तो शंकर म्हणजे पुंडलिकाच्या समाधीवरील शिवलिंग होय.[११९]

संत ज्ञानेश्वर, नामदेव यांचा कालखंड तर विठ्ठलाच्या महिमेच्या सार्वत्रिकरणाचा कालखंड होता. अनेक मुस्लिम आक्रमकांनी महाराष्ट्रावर असंख्य हल्ले केले असले तरी सुद्धा पंढरपुरच्या यात्रांमध्ये किंवा भक्तांच्या संख्येमध्ये खंड पडलेला नाही. इ.स.१३१८ मध्ये

देवगिरीच्या यादवांचे राज्य संपले. देवगिरी कालखंडामध्ये महाराष्ट्रात विशेषतः पंढरपूर क्षेत्रामध्ये शांतता प्रस्थापित झाली होती. मात्र मुस्लिम शासकाच्या आक्रमणामुळे भाषा, रितीरिवाज, धर्म याची सक्ती होऊ लागल्यामुळे मराठी  भाषा, धर्म, संस्कृती यांच्यामध्ये द्वंदाची परिस्थिती उद्‌भवण्यास सुरूवात झाली. मराठी भाषेऐवजी उर्दू, फारशी भाषेचा वापर सुरू झाला. इस्लामी राजवट असल्यामुळे राजकीय, धर्मविषयक, न्यायविषयक सर्वच क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रामध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले. नवीन वर्ग जो परकीय होता. त्या वर्गाच्या उदयामुळे संघर्षाची ठिणगी पडली.

इ.स.१४७८ पर्यंत पंढरपुरच्या विठ्ठल मंदिराची सारी व्यवस्था बिदर दरबाराच्या निकालाप्रमाणे पाहिली जात असे. त्यानंतर कुंटे घराण्याचे शेवटचे पुरूष बाबाजी कुंटे निपुत्रिक मरण पावल्यामुळे मंदिराची व्यवस्था कन्हेरचे तानबा, तिमण्णा, मल्हारी व शामराज या चार भावंडाकडे देण्यात आली. त्यांच्या कालखंडात मंदिराच्या उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून येते.[१२०]

बिदरशाहीनंतर विजापुरच्या दरबाराने पंढरपुरच्या व्यवस्थापनाची संपूर्ण व्यवस्था केली. त्यासाठी खास व्यवस्थापन  तयार केले. सर्वांना आपापली कामे वाटून दिली. प्रत्येकाचे हक्क व अधिकार निश्चित करण्यात आले. सेवेकऱ्यांची कामे निश्चित केली गेली. विजापुरच्या आदिलशहाकडून सरकारी महापूजा, महानैवद्य इत्यादी खर्चासाठी प्रत्येकवर्षी रूपये ३५०० मिळत असत.[१२१]

विजयनगर दक्षिणेतील बलाढय साम्राज्य या साम्राज्यातील कर्ते पुरूष कृष्णदेवराय याने (इ.स.१५०९ ते इ.स.१५२९) पंढरीचे महात्म्य आपल्या विजयनगरला प्राप्त व्हावे या उद्देशाने विठ्ठलाची मूर्ती विजयनगरला नेवून ‘विजय विठ्ठल’ नावाचे मंदिर बांधून या मंदिरात विठ्ठल मूर्तीची प्रतिष्ठापना केली. नंतर या मूर्तीला पुन्हा पंढरीला आणण्याचे कार्य संत एकनाथाचे पणजोबा श्री.संत भानुदासाने अथक प्रयत्नानंतर पंढरपुरला आणिली.[१२२]

बंगालमधील प्रसिद्ध द्वेतवादी वैष्णव महासाधू चैतन्य अथवा गोरांगप्रभू याने इ.स.१५१० ते १५११ मध्ये दक्षिणेतील तीर्थयात्रा केल्या. त्याचे वर्णन इ.स. १५१७ ते १६१७ मध्ये होऊन गेलेल्या कृष्णराज कविराज नावाच्या भक्तकवीने आपल्या ‘चैतन्यचरितामृत’ ग्रंथात केले आहे. त्यात चैतन्याने पंढरपुरचे वर्णन खालीलप्रमाणे केलेले आहे–

तया होईते पाण्डपुर आईला गौरचंद्र । विठ्ठल ठाकुर देखी पाइल आनंद ।।

प्रेमावेशे केल प्रभु नर्तन कीर्तन । प्रभुप्रेमे देखि सवार चमत्कार मन ।।

याचा अर्थ असा की श्री तीर्थक्षेत्र पंढरपुरात विठ्ठलास पाहून चैतन्य आनंदला आणि प्रेमभराने विठ्ठलापुढे कीर्तन व नर्तन केले. तेथील प्रेम पाहून सर्व लोक चकीत झाले.[१२३]

श्री ज्ञानेश्वर, नामदेवापासून तुकोबा निळोबारायापर्यत पंढरपुरच्या पांडुरंगाची संतपरंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचा बहुमोल वारसा असून मराठी लोकांप्रमाणेच कानडी, तेलगू इत्यादी दाक्षिणात्य लोकांनी संत परंपरेच्या विठ्ठलाचा वसा आणि वारसा जपून ठेवलेला दिसून येतो.

## ➢ इस्लाम राजवटकालीन पंढरपूर –

अफजलखानाने विठ्ठलमूर्ती नामशेष करण्याचा डाव रचला व त्याने इ.स. १६५९ मध्ये पंढरपुरावर स्वारी केली. परंतु त्या कालखंडातील बडव्यांनी या स्वारीचा सुगावा लागताच विठ्ठलाची मूर्ती पंढरपुरापासून जवळच असलेल्या देगाव येथील पाटलाच्या विहिरीतील कोनाडयात लपवून ठेऊनतिचे संरक्षण केले व पुन्हा मंदिरामध्ये या मूर्तीची प्रतिष्ठापना केली.[१२४]

पंढरपुरच्या विठ्ठलाच्या पालखीचे उत्पन्न त्याबरोबरच पांडुरंगास जर कोणी घोडे वाहिले असतील तर त्यावर मालकी हक्क कुणाचा यावरून बडवे व बेणारे यांच्यातील तंटे व प्रत्येक वेळी साक्षीपुराव्याचा विचार करून निकाल बडव्यांच्याच बाजूने दिला गेला असे एक अस्सल पत्र उपलब्ध झालेले आहे. त्यामध्ये इ.स.१६४०, १६४६ व १६९३ च्या बडवे व बेणारे तंटयाचा अतिशय सारगर्भित उल्लेख आहे.[१२५]

श्री मा.बा.देशपांडे यांच्याकडे इ.स. १६८४ चे एक पत्र आहे. त्या पत्रामध्ये विठ्ठलाच्या कार्तिकी यात्रेविषयी माहिती मिळते. त्या कालखंडामध्ये कार्तिकी वारी भरण्याचे प्रमाण आषाढी वारीपेक्षाही जास्त होते. मात्र धूर्त अधिकारी व मुस्लिम सत्ता यांच्या अतिउग्रधोरणामुळे यात्रेवर व उत्पन्नावर मोठया प्रमाणात प्रतिकूल परिणाम घडून आल्याचे जाणवते. कारण सादिलवार पट्टी सव्वाचौदा आणे एवढीच जमली होती. तर याउलट इ.स.१६९३ मध्ये आषाढी यात्रेच्यावेळी पंधरा दिवसात सादिलवार पट्टी रूपये १०२२ जमली होती. त्यापैकी सरकारी तिजोरीत ५०० देऊन ५२२ एवढी शिल्लक विठ्ठलास देण्यात आली.[१२६] धूर्त अधिकारी व मुस्लिम स्वाऱ्यांचा

वाईट परिणाम यात्रांवर जरी झाला तरी विठ्ठल भक्तीची संख्या उत्तरोत्तर वृद्धिंगत होताना दिसते.

### ➢ शिवकालीन पंढरपूर –

स्वराज्य स्थापनेनंतर (इ.स.१६७४) छ.शिवाजी महाराजांनी विजापुरच्या मुलुखावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. धोरणामुळे कारण प्रत्यक्ष पंढरपूर विजापुरच्या क्षेत्रात येत होते तर भिमा नदीच्या पलीकडील प्रदेशावर मोगलांचे वर्चस्व होते. विजापूर व मोगलांनी शिवाजी महाराजांविरूद्ध ऐक्य संगठन करण्यासाठी १९ ऑक्टोबर १६७५ रोजी पंढरपूर येथे एकमेकांची भेट घेतली.[१२७]

विजापूर दरबारातील अफगाणी व दक्षिणी मुस्लिमात दुफळी माजली होती. त्यामुळे खवासखानाने अफगाणाचा बंदोबस्त करण्यासाठी बहादुरखानाची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. उभयपक्षी पंढरपूर येथे भेट घ्यावी असे ठरले.[१२८] १९ ऑक्टोबर १६७५ रोजी बहादुरखान हा नावेत बसून खवासखानाकडे आला कारण त्यावेळी भिमा नदीला पूर आलेला होता. त्यांची भेट पंढरपूर येथे एका भुईकोट किल्ल्यात झाली. मात्र हा किल्ला आता नाहीसा झाला आहे. न्यायमूर्ती म.गो.रानडे यांनी आपल्या 'मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात पंढरपूर येथे एक किल्ला होता आणि या किल्ल्यावर मुरारबाजी हा पंढरपुरचा किल्लेदार म्हणून नियुक्त केला गेला होता. असे म्हटले आहे.[१२९]

छ.शिवाजी महाराजांनी मोगलांशी पुरंदरचा तह हा २३ किल्ले देऊन केला मात्र शिवाजी महाराजांनी इ.स. १६७० मध्ये मुघलांना दिलेले किल्ले परत घेण्याची मोहिम सुरू केली व मोगलांनासुद्धा छ.शिवाजी महाराजांना आवरता आले नाही. याच कालखंडामध्ये पंढरपूर क्षेत्रावरून एक गृहस्थ छ.शिवाजी महाराजांच्या भेटीसाठी गेला. यामध्ये शके १५९२ म्हणजेच १६७० साली साधारण संवत्सरी 'सिवाजी भोसल्याचे भेटीस गेलो.' असा मजकूर आहे. त्याचा आशय एवढाच की विठ्ठलाची मूर्ती सुरक्षित राहण्यासाठी काहीतरी सहाय्य केले एवढे निष्पन्न होते. हा कागद पंढरपूर येथील शंकर रामचंद्र बडवे यांनी इतिहास संशोधक ग.ह.खरे यांना दिलेला असून छ.शिवाजी महाराजांच्या या उल्लेखाबद्दल इतिहास संशोधक कै.शेजवलकर यांनीही दुजोरा दिला आहे.[१३०]

विजापुरच्या आदिलशहाचा कारभारी मुरार जगदेव याला कुष्ठरोग झालेला होता. त्याने कुष्ठरोग निवारण निमित्त सूर्यग्रहणाचे तुलादान केले. त्याची तारीख २३ सप्टेंबर १६२३ अशी आहे. तुलादान केल्यामुळे या दिवशी मुरारजगदेवने १६ ब्राम्हणांना सर्वप्रकारे दानधर्म केला त्या १६ ब्राम्हणांची नावे शिवचरित्र पत्र सार संग्रहात आली आहेत. त्यात पंढरपुरचे पुंडलिक हरिदास यांचे नाव आलेले आहे. यावरून पंढरपूर या तीर्थक्षेपत्रामध्ये विद्वान व वेदमूर्ती असलेल्यांची ख्याती शहाजीराजे व मुरारजगदेव यांचेपर्यंत गेलेली होती असे दिसते.[१३१]

छत्रपती राजाराम महाराजांनी २३ एप्रिल १६९४ रोजी एक अभयपत्र व आज्ञापत्र काढून त्यात मुस्लिमांच्या ज्या स्वारीच्या वेळी पंढरपुरला त्रास होई तेव्हा विठ्ठलाची मूर्ती पंढरपुरच्या जवळ असलेले देगाव येथे लपवून ठेवली जाई त्या मूर्तीच्या सुरक्षिततेसाठीची पत्रे छत्रपती राजाराम महाराजांनी काढली होती. याशिवाय १६९५ साली सेनापती संताजी घोरपडे यांनी पंढरपुरला कोणताही उपद्रव न देण्याबद्दल व दिल्यास देणाऱ्याचे पारिपत्य करण्याबद्दल आपल्या सैनिकास आज्ञा केली होती.[१३२]

## ➢ मराठे शाहीची सनद –

१९ जानेवारी १७०९ रोजी छत्रपती शाहू महाराजांनी पंढरपूर विठ्ठलासाठी एक सनद दिली असून त्यामध्ये पुढील मजकूर दिला. छत्रपती राजारामने श्री.विठ्ठलाच्या अभिषेक, पूजा, नैवेद्य व दीपाराधाना यासाठी आणि श्रीगोपाळ विठ्ठल बडवे यांनी श्री विठ्ठलाची पूजा यथासांग चालावी म्हणून प्रत्येकी १८० पादशाही होनाचे वर्षासन दिले होते.[१३३]

२५ ऑक्टोबर १७११ चे एक पत्र उपलब्ध असून त्यावेळी पंढरपूर हे कासेगाव परगण्यात येत असे. तेथील देशमुख व देशपांडेनी विनंती केली की 'श्री' स सिंहासनी बसवावे पण पुन्हा १३ सप्टेंबर १७१५ रोजी पूर्वीप्रमाणे पंढरपुरच्या बडव्यांच्या विनंतीवरून पूर्वीप्रमाणे देव मंदिरात बसवून व देवाची सेवा करून सुखी असणे अशा आशयाचे पत्र पुन्हा दिले आहे.[१३४] यावरून असे स्पष्ट होते की मुस्लिम अधिकाऱ्यांच्या शब्दावर विश्वास ठेवणे शक्य नव्हते. त्यामुळे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर चार वर्षानी बडव्यांनी मूर्तीची प्रतिष्ठापना केली.

रामचंद्र अमात्याने ०५ ऑगस्ट १७१४ रोजी विठ्ठलाच्या नित्यनैवद्यासाठी मंटुर हे गाव प्रल्हाद बडवे यांना दिले. या त्या दोन पत्रांपैकी एका पत्रात 'प्रल्हाद स्वामी बहुत थोर जागृती स्थल' असे विठोबाचे वर्णन केलेले आहे.[१३५] पंढरपुरच्या विठ्ठलाच्या मूर्तीला मुस्लिम

राजवटीच्या काळी तोशीश लागू नये म्हणून सुरक्षिततेच्या कारणांवरून ही मूर्ती पंढरपुरच्या बाहेर नेऊन सुरक्षित ठेवल्याचे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रातून मिळतात. ग.ह.खरे यांनी श्री विठ्ठल आणि पंढरपूर' या ग्रंथात काही प्रसंग दिले आहेत.

१) २४ जून १६७२ देवास बाहेर काढून चिंचोली गावात ठेवले.

२) ०६ एप्रिल १६७५ रघोजीने देवाची चोरी केली.

३) १० ऑक्टोबर १६७५ पुन्हा देवास लपविले.

४) दिवाळीच्या सुमारास १६७५ मुघल सैन्यामुळे पुन्हा देवास लपविले.

५) १४ डिसेंबर १६९९ विठ्ठलाने पंढरपूर सोडले.

औरंगजेब जोपर्यंत दक्षिणेत होता (इ.स.१६८३-१७०७) तोपर्यंत औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत मुस्लिम स्वाऱ्याच्या त्रासापासून वाचण्यासाठी देवाला पंढरपूरचे बाहेर काढून सुरक्षित स्थळी नेण्यात येई.[१३६]

## ➢ पेशवेकालीन पंढरपूर -

१० जानेवारी १७४५ रोजी पेशव्यांनी पंढरपुरच्या रामचंद्र हरीस कळविले की चंद्रभागेचा घाट बांधणे उत्तम राहिल. यावरून डांगे बेणारे, यांच्याकडे जमा होणारी संपत्ती धर्मकार्यासाठी वापरण्याचे आवाहन केले होते.[१३७]. इ.स. १७५१ च्या मे मध्ये बडव्यांच्या आपापसातील भांडणामुळे महाराणी ताराबाईकडे धाव घेतली. महाराणी ताराबाईने विठ्ठल मंदिर व्यवस्थेसाठी स्वतःचे कारकून व हुजरे ठेवले. त्यामुळे दुसऱ्या पक्षाने पेशव्याकडे धाव घेतली. तेंव्हा जानोजी निंबाळकराकरवी ताराबाईच्या हुजऱ्यास हाकलून देऊन बडव्यांच्या अंमल पूर्ववत चालू ठेवला.[१३८] महाराष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने मराठी सत्तेच्या स्थापनेनंतर विठ्ठलाच्या वनवास संपला व पुनःस्थापना होऊन विठ्ठलाची पूजा अर्चा सुरू झाली आणि त्यानंतर मात्र विठ्ठलाची व्यवस्था करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात आले.

१४ सप्टेंबर १७५३ साली बाळाजी बाजीरावाने पंढरपुरचा कमाविसदार रामचंद्रकृष्ण यास पाठविलेले पत्र उपलब्ध झालेले असून बडव्याच्या उत्पन्नावर नियंत्रण टाकण्यात आले व सरकारी कारकून देवालयावर नेमण्यात आले व एकूण उत्पन्नाची नोंद करून त्यापैकी देवाचे कोणते आणि बडव्याचे कोणते हे ठरवून दिले. पुढे बडव्यांनी सरकारी नियमांप्रमाणे वागण्याचे

ठरवल्यामुळे सरकारी कारकून काढून टाकले व फक्त देखरेख करणारा कारकून ठेवला.. बडव्यांनी काही अटी मान्य केल्या त्या पुढीलप्रमाणे–

१) पाचशे रूपयापर्यंत येणारी रोख देवाचे उपचार करण्यासाठी वापरण्यात येईल व शिल्लक राहिलेली वाटून घेण्यात येईल.

२) पाचशे रूपयांपेक्षा जास्त रक्कम आल्यास देवाचे अलंकार व इतर साहित्यासाठी खर्च केली जाईल.

३) वस्त्रे येतील त्यापैकी उंची वस्त्रे देवाची व सामान्य वस्त्रे बडव्याची अलंकारापैकी देवास उपयोगी पडण्यासारखे असतील तर ते देवाचे.[१३९]

इ.स. १७६१ मध्ये पंढरपुरचा कमाविसदारास बाळाजी बाजीरावाने फर्मानाद्वारे पंढरपुरातील सरस्वतीबाई या गायिकेस पुण्यास पाठविण्याचे पत्र पाठविले. इ.स.१७६५ च्या पत्रांमध्ये खंडोबल्लाळ या सुभेदाराने सांगोला परगण्यातील मंगेवाडी गावातील पाव चावर जमीन विठ्ठलाच्या नित्य नैवेद्यासाठी रघुनाथ विठ्ठल बडवे यास दिली.[१४०] १२ नोव्हेंबर १७६९ रोजीचे थोरल्या माधवरावाच्या शिक्क्याचे एक पत्र उपलब्ध आहे. त्यात विठ्ठलाचे दर्शन व त्यांची पूजा करणे याविषयी चार कलमे दिली आहेत ती पुढीलप्रमाणे–

१) 'श्री'ची पूजा व अभिषेक ब्राह्मण व सेनवी यांनी करावा.

२) प्रभू, वैश्य, शुद्र यांनी पायास हात लावून नमस्कार करावा. पाणी घालणे पूजा ब्राम्हणाकडून करावी.

३) स्त्रियांनी देवाच्या डोक्यावर पाणी घालू नये. ब्राम्हण स्त्रियांनी पाणी घातले तर पायावर घालावे.

४) चांभार, परीट, तेली, बुरूड, महार, मुस्लिम इ.नी. नगारखान्याजवळ जाण्याचे टाळावे.

पेशवा थोरला माधवराव याने २९ ऑक्टोबर १७७० मध्ये पंढरपुरचे कमाविसदारास नारो महादेव, परशुराम रामचंद्र यास क्षेत्र मजकुरी शिल्लक असेल तर त्यामधून तीन ते चार हजार रूपये खर्च करून पंढरपुरास एक सरकारवाडा बांधावयास सांगितले.[१४१]

पंढरपूर या तीर्थस्थळी वर्षभर लोकांची गर्दी असते. यात्रेमध्ये चोरांचा उपद्रव होणे अगदी साहजिकच असल्यामुळे ५ सप्टेंबर १७७४ रोजी पेशव्यांनी तेथील कमाविसदारास चिंतोरामचंद्र यास २५ सनदी प्यादे ठेवण्याची आज्ञा केली होती.[१४२]

२४ जुलै १७८० रोजी बडवे व डांगे यांच्यातील देवाच्या दाराची किल्ली(चावी) कोणापासी असावी. यावरून वाद उद्‌भवला असता त्यांचा निकालही बडव्यांच्या बाजूने लागला. हा निकाल देताना प्रत्येकाने कोणते काम करावे हा याविषयी तपशिल दिला आहे. 'भक्त जे देईल त्यात संतोष वाटून द्यावे. देवाजवळ गलबत करू नये. असे सांगितले आहे.[१४३]

बडवे, पुजारी, बेणारे, डिंगरे, परिचारक, हरिदास, दिवटे यांचा तपशिल व कार्याचे विवेचन केलेले आहे. विशेषतः पेशवे कालखंडात स्वतः छत्रपती व पेशवे किंवा त्यांचे अनेक सरदार कित्येक वेळा पंढरपूर, तुळजापूर वगैरे क्षेत्राच्या यात्रेस गेले होते. शके १६६१ (इ.स.१७३९) मध्ये राजश्री स्वामी (बहुधा शाहू छत्रपती) मिरजेहून व राणाजी शिंदे चांभार गोंद्यावरुन प्रथम पंढरपुरच्या आषाढी यात्रेस आणि नंतर तुळजापुरास गेल्याचे नमूद आहे.[१४४]

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत (१ मे १७९८) पंढरपुरच्या बडव्यांनी तक्रार केली. श्राद्ध करण्याची रित बंद पाडू नये व ती पूर्वीप्रमाणे करण्याची मोकळीक मिळावी यावर दुसऱ्या बाजीरावांनी बडव्यांना अनुकूल असा निर्णय दिला.[१४५] पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दारूचा गुत्ता किंवा अशा प्रकारची दुकाने असणे हे पेशवाईमध्ये मानवणारे नव्हते. इ.स. १८१८ च्या हुकुमाद्वारे पंढरपूर या तीर्थस्थळी या प्रकारच्या दुकानावर बंदी घालण्यात आली.[१४६] ७ डिसेंबर १८३७ साली साताराचे महाराज प्रतापसिंह यांनी आदेश काढून बडवे व सेवाधारी यांच्यातील तंटयामध्ये सेवाधारींना अडथळा न आणण्याची ताकीद दिली. ७ मार्च १८३८ च्या प्रतापसिंह महाराजांच्या आज्ञापत्राद्वारे तंटयाच्या निमित्ताने मागील कागदपत्रे पाहून बडवे, पुजारी व सेवाधारी यांची कामे व मिळकती विषयी एक विस्तृत निर्णय देण्यात आला.[१४७]

पंढरपुरविषयी आणखी काही माहिती पुणे येथील एलिएनेशन ऑफिसमध्ये मिळते. त्यात संपूर्ण देवस्थानचा खर्च ६०४ रू.१२ आणे दाखविला असून कोणकोणत्या घटकासाठी किती खर्च करावा याचा विस्तृत तपशिल या एलीएनेशन ऑफिसमध्ये उपलब्ध आहे.

पेशवे कालखंडामध्ये पंढरपुरच्या विठोबाची व्यवस्था पाहण्याचे काम तासगाव व सांगलीच्या पटवर्धनांकडे होते. त्यांनी आपल्या वतीने कमाविसदार म्हणून रामचंद्र कृष्णाजी लिमये याची नेमणूक केली. यांच्या कालखंडामध्ये पंढरपूर शहराची वाढ होऊन गोविंदपुरच्या उत्तर भागात वस्ती होऊन पंढरपूर गावची मर्यादा वाढली. त्याबरोबरच या कालखंडात विठ्ठल मंदिरातील सोळाखांबी ओवऱ्या इमारतीचे बांधकामाबरोबरच गोपाळपुरचे गोपाळकृष्ण मंदिर

बांधले गेले व चंद्रभागेवर जागोजागी घाटही बांधण्यात आले. होळकर शिंदे जमखंडीकर, सांगलीकर इत्यादी संस्थानिकांनी वाडे व मंदिरे बांधली. पंढरपुरच्या विठोबास अहिल्याबाईंनी रत्नजडीत मुकुट चढविला त्याची कीर्ती सर्वत्र पसरली.[१४८] याशिवाय पंढरपुरच्या वैभवात या परिसरात छोटेमोठे कामे करून अनेक जणांनी भर घातली. त्यापैकी रखुमाजी पिंगळे, दौंडकर, निजामाचा दिवाण चंदुलाल, घाटगे, कटके, ग्वाल्हेरचे शिंदे, पेशवे, भाटे, वाखरे, कवडे, नरगुंदकर. भोरचे पंतसचिव. या भक्तांनी वेगेवेगळया ठिकाणी स्थळे उभारणीस हातभार लावला.[१४९]

पंढरपूर या तीर्थक्षेत्राची नासधूस जरी परकीयांनी केली तशी पेशवाईच्या कालखंडात मराठे सरदारांनीही केली. त्यापैकी धनाजी जाधवांचे नातू रामचंद्र जाधव निजामाला सामिल झाल्यानंतर २६ नोव्हेंबर १७६२ रोजी पंढरपूर येथे मुक्काम करून त्याने क्षेत्रास कहर केला.[१५०]"जाधवरावाने मोगलाई मांढली । हिंदू धर्म सोडून यवनाचा धर्म प्रारंभ मांडला."[१५१] "पंढरी क्षेत्रास चांडाळाने अरिष्ट केले मोघलापेक्षा अधिक जाहला काळजी पडली आहे."[१५२] पटवर्धनाच्या ताब्यात पंढरपूर असताना गोविंद हरी याने ही पत्रे लिहिलेली आहेत. जाधवरावाने पंढरपूर क्षेत्र लुटले. याबद्दल सर्वांपेक्षा गोविंद हरी जास्त क्रोधीत होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे त्याचे उपास्यदैवत पांडुरंग होते.[१५३] अशा अनेक छोटया मोठया स्वाऱ्यांचे वर्णने अधूनमधून येतात.

➢ **पंढरपूर करार –**

ब्रिटिशांनी पेशव्याची सत्ता कमकुवत करण्यासाठी तैनाती फौजेसारख्या धोरणांचा अवलंब केला व दक्षिणेतील मराठी सत्तेना प्रबळ इंग्रज सरकारच्या अधिपत्याखाली आणण्यासाठी कट कारस्थानच्या माध्यमातून वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. उदा.वसईचा करार मराठयांच्या छोटया–मोठया हालचालीवर नियंत्रण ठेऊनब्रिटिशांनी संरजामदार वर्गाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करावयास सुरूवात केली. पुढे एल्फिन्स्टन सारख्या रेसिंडेंटने पेशव्यांना विरोध करणाऱ्यांना एकत्र करून पेशव्यांना एकटे पाडले. यावेळी ब्रिटिशांशी मुकाबला करण्याची ताकद पेशव्यांमध्ये नसल्यामुळे जुलै १८१२ मध्ये बाजीराव पेशव्यांनी या कराराला मान्यता दिली. यालाच पंढरपूर करार म्हणतात.[१५४]

बाजीराव पेशव्याला पेशवेपद मिळाल्यापासून तो वरचेवर देवदर्शनासाठी वेळ घालवू लागला. पंढरपुरच्या देवदर्शनासाठी जास्तीत जास्त वेळा येऊन राहणारा हाच एकमेव पेशवा होय. इ.स. १८०४–०५ च्या कार्तिक महिन्यात तो देवदर्शनासाठी आला.[१५५] बाजीराव पेशव्यांने एकूण २१७ दिवस पंढरपूर येथे मुक्काम केला व ११ हजार पाचशेपेक्षा जास्त मोहरा या कालावधीत विठ्ठल रूक्मिणी पुढे ठेवल्या. हा एकमेव पेशवा असेल की ज्याने बडव्यांना व पुजाऱ्यांना आपल्या वास्तव्यात नित्य सुवर्ण मोहरा दिल्या. बाजीराव पेशवा सर्व संताचे पालखीबरोबर पायी चालत वाखरी ते पंढरपूर पर्यत आल्याची नोंद इतिहासामध्ये आहे.[१५६]

पेशवाई काळात सरदाराबरोबर व मुत्सद्दी यांचेसोबत वाखरी ते पंढरपूर व तुकोबाराय यांच्या पालखीसोबत पायी प्रवास करणारा हा एकमेव पेशवा होय. बाजीराव पेशव्याबाबत पंढरपूर क्षेत्रवासियांना बरीच आत्मियता होती हेही लक्षात येते. सर्वच पेशव्यांनी राज्यकारभाराच्या धकाधकीच्या जीवनात विठ्ठल दर्शन व चंद्रभागा स्नान यांचा लाभ घेतला आहे हे इतिहासातील घटनांवरून दिसून येते.[१५७]

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाली आणि १८४८ नंतर पंढरपुरवर ब्रिटिशांचे नियंत्रण प्रस्थापित झाले आणि वैद्यकिय सुविधा, इंग्रजी शाळा, ग्रंथालये, दळणवळण विकास इ.लोकोपयोगी योजनांच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली.

- **समकालीन पंढरपूर –**

पंढरपूर शहराभोवती एक भिंत असल्याचे पुरावे सापडले असून पूर्वेकडील दरवाजास महाद्वार वेस तर दक्षिणेकडील दरवाजास हरिदास वेस म्हणून ओळखले जात असे. जुन्या शहरामध्ये विठ्ठलाचे मंदिर हे बरोबर मध्यवर्ती ठिकाणी असल्याचे दिसून येते. मात्र उत्तरोत्तर होणाऱ्या विस्तारीकरणामुळे पंढरपूर शहराची झपाटयाने वाढ झाली. विशेषतः पंढरपूर शहराचा विस्तार हा पश्चिमेकडे मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

१) उत्तर पूर्वेला महादेव मंदिर इ.स. १७३७ मध्ये बांधले गेले.

२) उत्तरेला गोपाळकृष्णाचे मंदिर इ.स. १७४४ मध्ये बांधले गेले.

३) पश्चिमेकडील पद्मावती मंदिर इ.स. १७७८ मध्ये पूर्ण केले गेले.

४) पूर्वेला महाद्वार घाटाचे बांधकाम इ.स. १७८५ मध्ये झाले.[१५८]

इ.स.१७४० ते १८५५ या कालखंडामध्ये पंढरपूर तीर्थक्षेत्र व शहराचा हळूहळू विकास होत गेला. उदा.कोळी गल्ली हरिदास वेसेच्या बाहेरील बाजूस पुंडलिक व विठ्ठलाच्या पुजाऱ्यांची घरे. पुढे जाऊन दिंडीरवनापर्यंत विस्तार पावल्याचे दिसून येतात. तो भाग गोविंदपूर म्हणून ओळखला जात आहे. जवळच राममंदिराची उभारणी ही मारवाडी लोकांनी केलेली असून त्या भागास रामबाग विभाग म्हणून ओळखले जाते. पूर्वेकडे महाद्वार वेसीच्या बाहेर प्रसिद्ध असे होळकर(इंदोर), शिंदे (ग्वाल्हेर) यांचे भव्य वाडे दिसून येतात. त्यामध्ये राममंदिर, कृष्णमंदिरे निर्माण केलेली आहेत. कृष्णाचे मंदिर हा द्वारकाधिश वाडा म्हणून ओळखला जातो.[१५९]

साधारणतः पंढरपूर शहराच्या दक्षिणपूर्व बाजूचा विकास हा इ.स. १७८७ नंतर झालेला दिसून येतो. त्यात १) भुलेश्वर महादेव मंदिर इ.स.१७३७ मध्ये बांधले. या ठिकाणी मुस्लिम समुदाय मोठया प्रमाणात स्थिरावलेला आहे. पंढरपूर या शहराच्या उत्तरेकडील बाजूचा विस्तार हा आजही मोठया प्रमाणात होताना दिसून येत आहे. गोपाळकृष्णाचे मंदिर जे इ.स.१७४४ मध्ये बांधले गेले. त्याठिकाणी चंद्रभागेचा आणि एका छोटया प्रवाहाचा संगम होतो. त्यास 'पुष्पावती' असे म्हटले जाते. शहराच्या दक्षिण पश्चिमेस काळा मारूती असून त्याचे बांधकाम इ.स.१७९९ मध्ये झाले. येथे माळी व सुतार लोकांची घरे पाहावयास मिळतात. पुढे यालाच संत पेठ असे म्हणण्याचा प्रघात पडला. शहराच्या पश्चिम भागात सध्याचे रेल्वेस्थानक असून येथे इ.स. १७७८ मध्ये पद्मावती मंदिर बांधले गेले आहे. उत्तरोत्तर शहरामध्ये वाढ होताना दिसून येत आहे. खऱ्या अर्थाने पंढरपूर हे इ.स.१८८५ मध्ये शहरात रूपांतरित झाले. इ.स.१९५१ मध्ये या शहराची व्याप्ती ही १०.५७५ चौ.कि.मी.होती. जी इ.स. १९६१ मध्ये शहराच्या व्यासांमध्ये १२.०७ चौरसकिलोमीटरने वाढ झाली. १९१५ या वर्षापासून बार्शी लाईट रेल्वे सुरू झाल्यामुळे रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील बाजूस वसाहती वाढून विस्तारीकरणामधे भर पडली.[१६०]

विठ्ठलमंदिरापासून रेल्वे स्टेशनपर्यंत एक मोठा रस्ता असून या रस्त्याच्या कडेला अनेक धर्मशाळा, हॉटेल, सरकारी कार्यालये आहेत. कृषि उत्पन्न बाजार समिती ही रेल्वे स्थानकाच्या विरूद्ध बाजूस असून या बाजूस कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय आहे. याही परिसरात अनेक धर्मशाळा सरकारी इमारतीबरोबराच इतर सुखसुविधा देणाऱ्या वास्तूंची उभारणी करण्यात आलेली आहे. इसबावी हा भाग पंढरपूर–अकलूज रोड वरती असून इ.स.२००० पासून नगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेला आहे. लक्ष्मी टाकळी पासून ते

रेल्वे स्थानकादरम्यान परदेशीनगर, पुंडलिकनगर, गणेशनगर हा भाग मोठया प्रमाणात हौसिंग सोसायटीने व्यापलेला आहे. याही भागात मोठया प्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागाची शासकीय कार्यालये, प्रशासकीय विभाग, पोस्ट ऑफिस, एल.आय.सी., आयकर विभाग, कोर्ट, उपविभागीय कार्यालय महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यासारख्या कार्यालयाने व्यापलेला आहे. या भागास नवीन पंढरपूर शहर असे म्हटले जाते.[१६१]

➢ **नाणी आणि पंढरपूर**

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण भारतामधून लोक या क्षेत्राला भेट देण्यासाठी व विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत असत. लोक आपल्याकडील नाणी अतिशय श्रद्धेने भिमा नदीच्या प्रवाहात टाकत असत. त्यामुळे ज्या ज्या वेगवेगळया प्रदेशात वेगवेगळया राजांची सत्ता होती. त्यातील बहुतांशी राजवटीची नाणी आपल्याला पंढरपुरातील अनिल बडवे आणि संतोष मुकुंद बहिरट यांच्याकडे पाहावयास मिळतात. यांच्या संग्रहातील नाणी अभ्यासासाठी घेऊन त्याचे दोन्ही बाजूंचे ठसे घेतले आहेत. सदरच्या नाण्यामध्ये इंग्रज, पोर्तुगीज, मोगल, शिवकालीन व पेशवेकाळातील शिंदे यांची नाणी आहेत.[१६२] या सर्व नाण्यांचा विचार केल्यानंतर पंढरपूर येथे मिळालेली नाणी मोगल, शिवशाही, पेशवाई, ईस्ट इंडिया कंपनी व इतर काळातील आहेत. हे लक्षात येते. मोगल कालखंडातील नाण्यावर फारशी किंवा अरबी नाण्यांचा वापर करण्यात आला आहे. प्राचीन काळातील बहुतांशी नाण्यांवर फक्त चिन्हेच दाखविलेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील होन ही सोन्याची तर शिवराई ही तांब्याची नाणी मिळालेली आहेत. पेशवे कालखंडातील नाणीही मोठया संख्येने मिळालेली आहेत. पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने पंढरपूर बाबत सनदा, तगम्रपट, शिलालेख, नाणी व साहित्य या माध्यमातून पंढरपुरचे महत्त्व वाढविल्याचे दिसून येते. चंद्रभागा नदीच्या पात्रात भाविकांनी टाकलेले नाणे हे वाहत जाऊन २०० ते ३०० फूट लांब असणाऱ्या विष्णुपद मंदिरापर्यंत वाहत गेली आहेत. झारकरी लोक त्यापैकी काही नाणी शोधून सोनार लोकांना आजही विकतांना दिसून येतात.[१६३] पंढरपूर येथे आढळून येणाऱ्या नाण्यावर संशोधन करून पंढरपुरच्या प्राचीनत्वाचा इतिहास उजेडात आणणे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

## ➢ वारकरी संप्रदाय आणि पंढरपूर –

वारकरी संप्रदायाची सुरूवात ही पुंडलीकापासून मानली जाते. वारकरी संप्रदायाच्या कार्याचे साधारणतः पाच कालखंड मानले जातात. ते मुख्यतः खालीलप्रमाणे आहेत.

१. पुंडलिक ते ज्ञानेश्वरापर्यंतचा काळ

२. संत ज्ञानदेव ते संत नामदेव काळ

३. भानुदास व एकनाथ महाराजांचा काळ

४. तुकाराम महाराजांचा काळ

५. तुकाराम महाराजानंतरचा कालखंड असे ढोबळमानाने वरील कालखंड पाडले गेले आहेत. ज्यामुळे संत साहित्याच्या अभ्यासाला एका गतिसुत्रात बांधता येते. श्री. पांडुरंग हे वारकरी या संप्रदायाचे प्रमख दैवत आहे. या पांडुरंगाच्या दर्शनास जे नियमाने जातात त्यांना वारकरी असे म्हटले जाते.[१६४]

वारकरी हा शब्द 'वारकरी' या शब्दाचा अपभ्रंश असावा. प्राचीन वाङ्मयामध्ये 'वारी' हा शब्द 'येरझारा' या अर्थाने वापरलेला आढळून येतो. इतिहासकार वि.का.राजवाडे यांनी वारी शब्दाची व्युत्पत्ती खालीलप्रमाणे दिली आहे. "वारी –री(प्रवाशांची टोळी) = वारी. पंढरपुरची वारी म्हणजे पंढरपुरला जाणाऱ्या प्रवाशाची टोळी म्हणून वारकरी म्हणजे वारीला जाणारा प्रवासी."[१६५]

मोल्सवर्थच्या शब्दकोशामध्ये वारीचा अर्थ खालीलप्रमाणे दिलेला आहे. "The practice of proceeding regularly at recurring at monthly or annual periods of pilgrimage to any sacred place" रा.चि.ढेरे यांनी आपल्या 'श्री विठ्ठल एक महासमन्वय' या संशोधन ग्रंथामध्ये पंढरपूर श्री. विठ्ठल व वारीचा अतिशय सयतबद्ध आढावा घेतलेला आहे. त्याबरोबरच एक महान इतिहास संशोधक खरे ग.ह. यांनी आपल्या 'महाराष्ट्राची चार दैवते' या ग्रंथात पंढरपुरच्या विठ्ठलाची परंपरा, इतिहास यावर व श्री.विठ्ठल आणि वारकरी यावर विपुल प्रमाणात लेखन केले आहे. 'अमरकोशात वार' या शब्दाचा अर्थ 'समुदाय' अगर संघात असा दिला आहे. या अर्थानुसार वारकरी याचा अर्थ समुदाय करणारा

असा होईल. शिवाय ज्ञानेश्वरीमध्ये वारी हा शब्द वेगवेगळया ठिकाणी मोठया प्रमाणात आलेला आहे. त्यानुसार खेपा करणे किंवा प्रवास करणे असा होतो. त्याचबरोबरच वारी या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमीत फेरी, वृत्त, 'येरझारा' असा दिसून येतो. म्हणजेच 'उपास्य' देवतांच्या यात्रेला जो नियमितपणे जातो तो वारकरी म्हणून ओळखला जातो.[१६६] वारकरी संप्रदाय हा पंढरपुरच्या विठ्ठलाशी संबंधित असलेला संप्रदाय असून जो नियमितपणे वर्षातून एकदा आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस गळयात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरास जातो. तो पंढरपुरचा वारकरी म्हटला जातो. या उपासना करणाऱ्या लोकांच्या जथ्यास वारकरी असे म्हटले जाते–

"काया वाचा मनें जीवें सर्वस्वे उदार ।
बापरखुमादेवीवरू विठ्ठलाचा वारीकर ।।
पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ।।
होय होय वारकरी । पाप पाहे रे पंढरी।।"[१६७]

रा.चि.ढेरे यांनी आपल्या 'श्रीविठ्ठल एक महासमन्वय' या संशोधन ग्रंथामध्ये 'श्री विठ्ठलाच्या निर्मितीची सुत्रबद्ध माहिती दिलेली असून ती 'लिळाचरीत्रातून' घेतलेली आहे. त्यात त्यांनी महानुभव पंथ व वारकरी पंथ यातील मतभेदावर प्रकाश टाकून शेवटी श्रीविठ्ठल हा गो चोर नसून तो गोरक्षक होता. कोणत्यातरी संघर्षात तो धारातीर्थी पडला असावा व त्याचे स्मारक उभारले असावे. त्यातून पुढे विठ्ठल पूजा सुरू झाली. हे विधान मांडले कारण ढेरे म्हणतात की, चोराची कधी कोणी स्मारक बांधते काय? या विठ्ठलाची कोणत्यातरी संघर्षामध्ये कर्नाटकातून ही मूर्ती पंढरपुरला आणली गेली असावी. पंढरपुरचे पूर्वीचे नाव दिंडीरवन असे होते. कारण तिथे जंगलाचा प्रदेश होता. अशी ही शक्यता ढेरेनी वर्तविली आहे.[१६८] पांडुरंग नावाच्या व्यक्तीने त्या मूर्तीची तिथे प्रतिष्ठापणा केली. म्हणून त्या जागेला पंढरपूर असे म्हणण्यात येवू लागले. अशीही एक शक्यता वर्तविली जाते. संशोधक पांडुरंग पंढरपुरला कसे आले. वैकुंठातून, गोकुळातून का द्वारकेहून आले ते रूक्मिणीसह आले? गाईगोपाळ घेवून आले का एकटेच आले? यात मतभेद जरी असले तरी सर्व संशोधकांनी व संतानी पुंडलिक किंवा पांडुरंग पंढरपुरास आले ही गोष्ट मान्य केलेली आहे.

प्रा.डॉ.विकास कदम यांनी आपला ग्रंथ वारकरी संप्रदायाचा इतिहास आणि पंढरपुरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य या आपल्या शोधप्रबंधामध्ये श्री.विठ्ठलाच्या वारीबद्दल, वारकरी संप्रदायाच्या उदय व आरंभाबद्दल, श्री.पांडुरंग मूर्तीच्या काळाबद्दल सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यांनी तर श्री पांडुरंग मूर्तीच्या कालखंडासाठी उपलब्ध पुराव्याची अभ्यासाच्या सोईसाठी चार गटामध्ये विभागणी केलेली आहे. त्यानुसार

१. पुराणात मुर्तीचे आलेले संदर्भ

२. वारकरी संतांच्या अंभगातील माहिती

३. उपलब्ध शिलालेख

४. इतर साधनातील माहिती

या सर्वांचे यथायोग्य विश्लेषण केल्यानंतर असे लक्षात येते की ही १) श्री पुंडलिकाचा कालखंड २) श्री क्षेत्र पंढरपुरचा प्राचीन इतिहास ३) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान ४) वारकरी संप्रदायाची ग्रंथसंपदा याची क्रमबद्ध मांडणी करता येते. पुंडलिकाच्या काळापासूनच महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदायाचा मोठया प्रमाणात विकास झाला आणि त्यामध्ये उत्तरोत्तर वाढ होत गेली. आणि खऱ्या अर्थाने ज्ञानेश्वराच्या कालखंडामध्ये हा वारकरी संप्रदाय लोकप्रियतेच्या कळसावर पोहचला–

“ज्ञानदेवे रचिला पाया ।

तुका झालासे कळस।।”

याचाच अर्थ ज्ञानेश्वरांच्या कालखंडापासून वारकरी संप्रदायाची महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही भरभराट व्हायला लागली आणि कानडू विठ्ठल कर्नाटकाचा न राहता महाराष्ट्राचे अराध्य दैवत बनला. सबंध दक्षिणेमध्ये वारकरी संप्रदाय इतका लोकप्रिय होण्याची कारणे खालीलप्रमाणे

१) वारकरी संप्रदायाने जातीव्यवस्थेला व विषमतेला मुठ माती दिली.

२) स्त्री आणि शुद्र यांना वारकरी संप्रदायाने समतेचे व मानाचे स्थान दिले. उदा.गोरा कुंभार चोखा मेळा, नरहरी सोनार, सावता माळी या व यासारख्या अनेक कनिष्ठ जातीतील व्यक्तींना ज्या हिंदु धर्माने नाकारले होते अशा वंचित शुद्र, दुर्बल व स्त्रियांना वारकरी संप्रदायाने आपल्या उदरात घेतले त्यामुळेच वारकरी संप्रदायाची पताका दलित, वंचित व दुर्लक्षित घटकांनी

खांदयावर घेतली परिणामतः जातीयतेच्या विषमतेच्या भिंती गळून पडल्या व महाराष्ट्राच्याच नव्हेतर दक्षिण भारतातील घराघरामध्ये श्री विठ्ठल व त्याची महिमा अतिशय भक्तीभावाने गायली जावू लागली यातूनच वारकरी संप्रदायाला गतिशिलता प्राप्त झाली.

व्यक्तीचे मोठेपण हे त्याच्या जातीवर अवलंबून नसून त्याच्या गुणावर अवलंबून असते हा संदेश वारकरी संप्रदायाने दिला.[१६९] आणि सबंध महाराष्ट्राने हा संदेश उचलून धरला म्हणूनच ज्ञानेश्वर ब्राम्हण, नामदेव शिंपी, व्यवसायाने वाणी कुणबी असणारा तुकाराम या महान विभूती बनल्या त्या फक्त वारी संप्रदायातील समतामुलक तत्वज्ञानाने श्री विठ्ठलाच्या भक्तीला जातीचा अडसर नसल्यामुळे स्त्री किंवा शुद्रत्वाचा अडसर नसल्यामुळे किंवा कर्मकांड यांचा देखील अडसर नसल्यामुळे भक्त श्री. विठ्ठलाच्या भक्तीत रंगून जात असत. अगदी आपल्या मळयामध्ये भाजीची देखरेख करताना किंवा ती विकताना संत सावता माळी श्री विठ्ठलाची भक्ती करताना दिसतात. 'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी' अशा सर्वसामान्यांना श्री विठ्ठलाने व त्याच्या वारकरी संप्रदायाने एकात्म करून टाकले होते. या वारकरी संप्रदायाने तत्कालीक समाजातील सर्व घटकांनाच आपलेसे करून टाकले होते. सर्वच घटकाना विठ्ठल आपलाच आराध्य आहे या भावनेने झपाटून टाकले होते. त्यामुळेच मध्ययुगात हा वारकरी संप्रदाय अतिशय लोकप्रिय ठरला. खेडोपाडी गावोगावी वाडया वस्त्यावर वारकऱ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढू लागली होती. त्यातूनच वारकरी आणि माळकरी वर्ग तयार झाला. वारकरी म्हणजे पंढरीची वारी करणारा आणि माळकरी म्हणजे गळयात माळ धारण करणारा ही प्रथा आजही चालू आहे. या वारकरी संप्रदायाने ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यासारखे श्रेष्ठ संत महाराष्ट्राला दिले. या संतानी अतिशय श्रेष्ठ साहित्य निर्माण करून मराठी भाषेच्या व मराठी साहित्याच्या विकासामध्ये अतिशय मोलाची भर घातली. उदा. एकनाथाचे भारूड विंचू चावला संबंध महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध आहे. प्रतिकात्मक स्वरूपाचा दृष्ट प्रवृत्तीचा विंचू चावल्यावर कशी अवस्था होते हे त्यांनी आपल्या भारूडातून सांगितले आहे.

याबरोबरच ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी भाषेचा अस्मिता त्याबरोबरच भगवद्गीता शिवाय संत तुकारामाचे अंभग यांनी मराठी मनावर फार अधिराज्य गाजवले. हा सर्व ठेवा वारकरी तत्वज्ञानातूनच उदयाला आला आहे.[१७०] खऱ्या अर्थाने अजूनही वारकरी संप्रदायाच्या उदयाचा निश्चित असा कालखंड सांगता येत नाही. परंतु भक्तिची परंपरा लाभलेला हा संप्रदाय खूपच

प्राचीन असल्याचे विविध साहित्यकृतीतून जाणवते. अनुभव हेच वारकरी संप्रदायाच्या तत्वज्ञानचे अंतिम प्रमाण आहे. 'चिद्विलासवाद' म्हणजेच वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान होय.[१७१]

वारकरी संप्रदायाचा उगम पुंडलिक या महान भक्तापासून झाला. विठ्ठलाची भक्ती व उपासना तेथून सुरू झाली आणि या भक्तीस तात्विक जोड ज्ञानेश्वरापासून पुढील संतानी दिली. त्यासाठी प्राकृत भाषेत ग्रंथ रचना केली. त्यामुळे ज्ञानदेवाची 'ज्ञानेश्वरी' एकनाथाचे 'एकनाथी भागवत' शिवाय 'तुकारामांची गाथा' हया कृती म्हणजे वारकरी तत्वज्ञानाच्या रत्नाच्या खाणी आहेत. विशेष म्हणजे वारकरी संप्रदायाचा विशेष भर भक्तीवरच आहे. खरी भक्ती अद्वैतातच आहे ही शिकवण हा वारकरी संप्रदाय देतो. यातील कुठल्याही संतानी संन्यास वृत्तीचा उपदेश केला नाही हा संप्रदाय सगुण उपासक असून परमात्मा व्यापकण निर्गुण, निराकार आहे हे ही मान्य तसेच तो सगुन साकार आहे हे सुद्धा या संप्रदायास मान्य आहे.

त्यामुळेच खऱ्या अर्थाने मध्ययुगीन कालखंडात भक्ती संप्रदायाने महत्त्वाची भूमिका बजावली. जस्टीस रानडे यांनी Rise of the Maratha Powerया ग्रंथामध्ये मराठा राज्याच्या निर्मितीसाठी संतानी आवश्यक पार्श्वभूमी तयार केली. सामाजिक मंथन वारकरी संप्रदायाने घडवून आणले. लोकांना एकत्रित केले. त्यातूनच पुढे छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीची सुरूवात केली. महाराष्ट्राच्या इतिहासाला वारकरी संप्रदायाने सांस्कृतिक प्रगल्भता प्रदान केला.[१७२]

श्री विठ्ठल तीर्थक्षेत्र पंढरपुरचे प्राचीनत्व प्राचीन शिलालेख, ताम्रपट, नाणी याबरोबरच विविध राज्यकर्त्यांनी आपापल्या कालखंडामध्ये या तीथक्षेत्रास दिलेल्या देणग्या याबरोबरच या क्षेत्राची भौगोलिक परिस्थिती यावरून पंढरपूरचे प्राचीनत्व सिद्ध होते. पंढरपूरने महाराष्ट्रालाच नव्हेतर भारताला आध्यात्मिक वसा आणि वारसा दिलेला आहे. त्यामुळे अत्यंत धकाधकीच्या कालखंडातसुद्धा भक्तांनी व संरक्षण कर्त्यांनी या तीर्थक्षेत्राचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुस्लिम कालखंडामध्ये विशेषतः मोघल औरंगजेब यांच्या कालावधीमध्ये तर विठ्ठलाची विशेष काळजी घेण्याबरोबरच बडवे, पुजारी यांच्यातील संघर्ष अशा अनेक संकटामधून विठ्ठलाला मार्गाक्रमण करावे लागलेले आहे. पेशव्यानंतरच्या ब्रिटिश कालखंडामध्ये झालेल्या दळणवळण किंवा इतर भौतिक सुधारणांमुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी तर जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक येतांना दिसून येतात.

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे या तीर्थक्षत्राबाबत तत्कालीन राजवटीमधील राजांनी पंढरपुराबाबत सनदा ताम्रपट शिलालेख, कागदपत्रे, नाणी, साहित्य यांच्या माध्यमातून पंढरपुरचे महत्त्व वाढविण्याबरोबरच पंढरपूर या तीर्थक्षेत्राचे अस्तित्व प्रमाणित केले. फक्त पंढरपुरच नाहीतर भारतातील विविध प्रदेशातील शिलालेख, ताम्रपट, सनदा, देणग्या, पत्रे यांनी या तीर्थक्षेत्राचे अस्तित्व आणि महिमा सर्वदूर पसरविला. उदा.विदर्भातील माहूरझरी, पौनी, वाशी, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर सातारा, वजीरखेड(नाशिक), कोकणातील वसई, अंधेरी यासारखे, मराठवाडयातील गणेशवाडी, धर्मापुरी इत्यादी विभिन्न गावात मिळालेले लेख व ताम्रपट हे विठ्ठलावर, विठ्ठल मंदिरावर याबरोबरच तत्कालीन आर्थिक, सामाजिक, राजकीय सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश टाकतात. ज्यामधून विठ्ठलाच्या अस्तित्वाबरोबरच उत्तर– दक्षिण पूर्व पश्चिम विस्ताराची कल्पना येते. विठ्ठलाच्या प्राचीन अस्तित्वापासूनच्या पाऊलखुणा आपण लिखित अलिखित साधनाबरोबरच अन्य म्हणजेच मौखिक इतिहासाच्या माध्यमातून घेऊ शकतो. याबरोबर नाणकशास्त्र(Numismatics)च्या माध्यमातून विठ्ठलाच्या सर्वव्यापी अस्तित्वावर प्रकाश टाकण्याची संधी संशोधकांना मोठया प्रमाणात उपलब्ध असल्याचे जाणवते.

एंकदरीत या प्रकरणात सहकाराचा इतिहास, व्याख्या, तत्त्वे, जग आणि भारतातील सहकारी चळवळ पंढरपूर तालुक्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## संदर्भ –


१)Buch Maganlal A; Economic Life in Ancient India, R.S. Publishing House, Allahabad1979, P.361

२) झा डी.एन.; प्राचीन भारत एक रूपरेखा, अनुवादक– कन्हैया, मनोहर पब्लिशर्स एंड डिस्ट्रिब्युटर्स, नई दिल्ली, २० वी आवृत्ती २०१०, पृ.२२

३) शर्मा रामशरण; प्राचीन भारताचा परिचय, परांजपे बिंदा (अनुवादक), ओरिएन्ट लाँगमन प्रायव्हेट लिमिटेड, मुबंई २००७ पृ.१११

४) थापर रोमिला; भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन नई दिल्ली, २५ वी आवृत्ती, २०१२, पृ.४८

५) कित्ता, पृ.९९

६) शिंदे आर.के.; भारतातील सहकारी चळवळ, राविल पब्लिकेशन, सातारा, १९८० पृ.४

७) महाजन विद्याधर; प्राचीन भारत का इतिहास, एस चन्द एण्ड कंपनी, दिल्ली, प्रथमावृत्ती, १९६२ पृ.१४०

८) इन्द्र एम.ए.(अनुवादक), कौटिल्य अर्थशास्त्र, राजपाल अॅण्ड सन्स, कश्मीरी गेट, दिल्ली, १९७६, पृ.६५

९) Buch Maganlal A; Economic Life in Ancient India, Op. cit., P.362 to 366

१०) शिंदे आर.के.; उपरोक्त,पृ.४

११) कित्ता

१२) कित्ता, पृ.५

१३) Report of the committee on co-operation in Kolhapur, 1945, p.48

१४) शिंदे आर.के.; उपरोक्त,पृ.५

१५) भामरे (डॉ) सर्जेराव, प्रभाकर गद्रे (डॉ) (संपा); संशोधक त्रैमासिक, इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधक मंडळ, धुळे, डिसेंबर २०११

१६) कित्ता

१७) Kosambi D.D., The Culture And Civilization Of Ancient India In Historical outline, Vikas Publication, Dehli, P.113

१८) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा); मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुबंई, खंड १२, १९८५, पृ १७९

१९) रोडे सोमनाथ; राजर्षी शाहू व्याख्यानमाला २२ जून २०११, दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, दि.२४ जून २०११

२०) साळुंखे पी.बी.(संपा); राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण व सेवा योजना विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुबंई १९८८, पृ. २९

२१) पळसापुरे पी.झेड; श्री.छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य, मंगुडकर मा.प.(संपा), महाराष्ट्रातील समाजप्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७५, पृ. ७४

२२) पवार (डॉ.)जयसिंगराव; राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जानेवारी २००१, पृ.२०८

२३) Sabnis R.V.; Notes on Kolhapur, The Times Press, Bombay,1928,P.29

२४) घुगे (डॉ.) वि.बा.; छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण एक चिकित्सक अभ्यास, दि कोल्हापूर रायटर्स को.ऑपरेटिव्ह सोसायटी लि.कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९७५, पृ.१५०

२५) जाधव भ.बा.(संपा.); राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, १९७१, पृ.११६

२६) भोसले(डॉ.) एस.एस.(संपा.); क्रांतिसूक्ते :राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्कृती मंडळ, मुंबई, नोव्हेंबर १९९१, पृ.११७

२७) जुगळे वसंत, योजना जुगळे(संपा.); महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : दिशा आणि दशा, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, १९९६, पृ.१४

२८) कर्वे चिंतामण गणेश, जोगळेकर सदाशिव आत्माराम, जोशी यशवंत(संपा.); महाराष्ट्र परिचय– संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५४, पृ.६३९

२९) चौगुले व्ही.टी., पठाण के.जी.; सहकाराची मूलतत्त्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९, पृ.३

३०) जोशी सी.जे.; सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २००५, पृ.२

३१)Hajela T.N.; Principles, Problems and practice of co-operation, Shiva Lal Agarwala and company, Dehli, 1983, P.5

३२) Mathur B.S.; Co-operation in India, Sahitya Bhavwan, Agra, 1980, P.9

३३) Hajela T.N.; Op.Cit. P.4

३४) Mathur B.S.;Op.Cit. P.8

३५) Talmaki S.S.; Co-operationa at Home and Abroad, Vol.I;: Besal Mission Press, Mangalor, 1931, P.14

३६) कामत(डॉ.) गो.स.; सहकार : तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन् श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, ऑगस्ट १९७९, पृ.२२

३७) शहा (डॉ.) रूपा, बी.एच.दामजी(डॉ.), सहकार, मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे, पृ.९

३८) Mathur B.S., Op.Cit. P.11

३९) जोशी सी.जे.; सहकाराचा विकास तत्त्व व व्यवहार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९१, पृ.४

४०) अग्रवाल एन.एल.; भारतीय कृषि का अर्थतंत्र, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९८३, पृ.४८१

४१) शहा (डॉ.) रूपा, बी.एच.दामजी(डॉ.), उपरोक्त,पृ.९

४२) कित्ता

४३) जुगळे वसंत, योजना जुगळे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : दिशा आणि दशा,उपरोक्त,पृ.१५

४४) कामत (डॉ.) गो.स., सहकार : तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, समाज प्रबोधन संस्था, पुणे, १९६४, पृ.३१

४५) चौगुले व्ही.टी., के.जी.पठाण, सहकाराची मूलतत्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ३

४६) सराफ मोहन, रमेश दापके, सहकार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९२, पृ.५

४७) कित्ता, पृ.६

४८) कित्ता, पृ.८

४९) नलावडे प्रमोद त्र्यं.(संपा.); मासिक लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, सप्टेंबर २०१२, पृ.१९

५०) पाटील (डॉ) जे.एफ.; सहकाराची उत्क्रांती–एक टिप्पण, पाटील (डॉ.) जे.एफ. व भालबा विभुते(डॉ.)(संपा.); महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१२, पृ.७

५१) मासिक लोकराज्य, सप्टेंबर २०१२, उपरोक्त, पृ.१९

५२) गोखले रामचंद्र महादेव; आर्थिक इतिहास, (इंग्लंड–जर्मनी–रशिया–अमेरिका), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, मे १९७१, पृ.२३५

५३) कामत (डॉ.) गो.स.; सहकारः तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्रीविद्या प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती, ऑगस्ट १९७९, पृ.१९

५४) जुगळे वसंत,योजना जुगळे; उपरोक्त, पृ..१५

५५) कामत (डॉ.) गो.स.; सहकारः तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, उपरोक्त, पृ.२६८

५६) कामत (डॉ.) गो.स.; सहकारः तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, उपरोक्त, पृ.७

५७) कित्ता, पृ.३२१, ३२२

५८) भामरे (डॉ.)सर्जेराव, प्रभाकर गद्रे(डॉ.)(संपा.), संशोधक त्रैमासिक, उपरोक्त, पृ.३

५९) सरंगी उमेशचंद्र; सहकारी चळवळ–उगम, विकास आणि जागतिकीकरणामधील दिशा, अवघडे भगवान(संपा.); शतकोत्तर सहकार, (संपादित लेखांचा ग्रंथ), लोकायन सहकारी प्रकाशन संस्था मर्या.सातारा, प्रथमावृत्ती, मे.२००४, पृ.२

६०) ग्रोवर(डॉ.)बी.एल., बेल्हेकर(डॉ.)एन.के.; आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी, प्रा.लि.नवी दिल्ली, २०१४, पृ.४२२

६१) कामत (डॉ.) गो.स.; सहकारः तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्रीविद्या प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती, ऑगस्ट १९७९, पृ.७६

६२) मोहिते प्रेमलता माधव; कोल्हापुरातील सहकारी पतपेढी व्यवहार १९१३–१९४९ : एक ऐतिहासिक अभ्यास, श्रीहरी प्रकाशन, कोल्हापूर, २५ नोव्हेंबर १९९५, पृ.१६

६३) फडके (डॉ.) य.दि.(संपा.); दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय, महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे, १९८४, पृ.३१७

६४) कित्ता, पृ.३२५

६५) Government Gazetteer, Pune, January, 1905, P.1

६६) मोहिते प्रेमलता माधव; उपरोक्त, पृ.१२

६७) Bombay Gazetteer Vol. 18, Part- II, Pune, 1885, P.120-121

६८) कीर धनंजय; महात्मा जोतीराव फुले(आमच्या समाजक्रांतिचे जनक), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७३, पृ.१७३–१७४

६९) पेंडसे अरूणा; शेतीच्या दुरावस्थेची कारणमीमांसाः गणेश व्यंकटेश जोशी, व्होरा राजेंद्र(संपा.), आधुनिकता आणि परंपरा एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रा.य.दि.फडके गौरव ग्रंथ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २८ नोव्हेंबर २०००, पृ.३०६

७०) सूर्यवंशी एन.डी.; सहकारी पेढया, प्रकाशन–सौ.शांताबाई सूर्यवंशी, कोल्हापूर, १९५१, पृ.१

७१) बर्वे रा.का.; भारताच्या आर्थिक समस्या, विशाखा प्रकाशन, पुणे, १९६२, पर.१००

७२) गायकवाड रत्नाकर; भारतातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे योगदान, अवघडे भगवान, उपरोक्त, पृ.१०

७३) बर्वे रा.का.; उपरोक्त, पृ. १०१

७४) देसाई (डॉ.) स.श्री.मु., जोशी श.शं., भारतीय अर्थव्यवस्था भाग १, गो.य.राणे प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७६, पृ.२९७

७५) नाटेकर अ.वि., सहकार कायद्याची शतकोत्तर वाटचाल, फाले कृ.ल. व किशोर (डॉ.) फाले(संपा.), सहकार चळवळ, १९०४–२००४, शतक लेखसंग्रह, निर्माण प्रकाशन, वर्धा, २००५, पृ.२६८

७६) पंडित पलांडे; कृषि सहकार नवा दृष्टिकोन हवा, फाले कृ.ल. व किशोर(डॉ.) फाले (संपा.), उपरोक्त, पृ.२६९

७७) चौधरी व्ही.के.; १०० वर्षातील सहकार कायद्याचे स्वरुप व शतकोत्तर अपेक्षित बदल, अवघडे भगवान (संपा.), उपरोक्त, पृ.६४

७८) चौगुले व्ही.टी., के.जी.पठाण, भारतीय सहकारी चळवळ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०, पृ. २ ते १०

७९) देसाई(डॉ.)स.श्री.मु ,जोशी श.शं ; भारतीय अर्थव्यवस्था भाग १, उपरोक्त, पृ.२९८

८०) कुलकर्णी सु.के.; जगाचे आर्थिक सर्वेक्षण, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, नागपूर, १९७५, पृ.४४०

८१) बवले कैलास; सहकारी चळवळ ऐतिहासिक आढावा एक मूल्यमापन, पाटील (डॉ.) जे.एफ.,भालबा(डॉ.)विभुते(संपा.), महाराष्ट्रतील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन,उपरोक्त, पृ.३२

८२) दुभाषी (डॉ.)पद्माकर, भारतीय सहकारी चळवळीच्या १०० वर्षाचे सिंहावलोकन, फाले कृ.ल. व फाले किशोर(डॉ.), उपरोक्त, पृ.३६ ते ४०

८३) भिंगारकर कृ.ज्ञा., श्री विठ्ठल महात्म्य, पुणे, १९९६, पृ.१६

८४) चौधरी (डॉ.) दत्ता., पंढरपूर नगरीचा इतिहास(प्राचीन ते इसवी. १९९०), मुक्ता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर प्रथमावृत्ती, फेब्रु.२०१५, पृ.२२, २३

८५) खतीब के.ए., महाराष्ट्राचा भूगोल एक भौगोलिक व आनुषांगिक परामर्श, के.सागर पब्लिकेशन, २०१३, पृ.२५३

८६)Gazetteer of the Bombay Presidence, Solapur District, P.४००

८७) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९६३

८८) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.१०

८९) जोशी तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड १२ वा, महाराष्ट्र राज्य आणि मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८५, पृ.५२९

९०) रणनवरे (डॉ.) जयश्री ज्ञानदेव, पंढरपूरचे सांस्कृतिक वैभव, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, २००६, पृ.४

९१) कित्ता पृ.६

९२) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ. ११

९३) सांवजी अ.व्यं., श्री विठ्ठल स्थापनेची मीमांसा, नागपूर, १९४८, पृ.१७

९४) माटे (डॉ.) म.श्री., पंढरपूर दर्शन, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९४, पृ.३

९५) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ. १९

९६) कित्ता

९७) कित्ता

९८) देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास(इ.स.१६०० ते १८५०), मराठा कालखंड: भाग –१, रेवू प्रकाशन, पंढरपूर, प्रथमावृत्ती, फेब्रु.२००९, पृ. ४९४

९९) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.१२

१००) बहिरट भा.प., प्र.ज्ञा.भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती जुलै १९८८, पृ.१४

१०१) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.१२

१०२) बहिरट भा.प., प्र.ज्ञा.भालेराव, उपरोक्त, पृ.१८

१०३) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ. २५

१०४) कित्ता

१०५) कित्ता, पृ.२६

१०६) गोखले (डॉ.) शोभना, पंढरपूर आणि श्रीविठ्ठल, कुलकर्णी गो.म., वि. त्र्यं.शेटे(संपा.), महाराष्ट्राची सत्वधारा, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १८ ऑक्टोबर १९८१, पृ.७६

१०७)रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ.२७

१०८) कित्ता, पृ.२८

१०९) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.४०

११०) Benare Gopal; Lord Vitthal and Pandharpur, Pune, 2000, P.19

१११) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ.२८

११२) कित्ता

११३) कित्ता, पृ.३१

११४) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.३७

११५) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ.३४

११६) ढेरे रा.चि., श्रीविठ्ठल एक महासमन्वय, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रु.१९८४, पृ.४०९

११७) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ.३६

११८) कित्ता, पृ.३७

११९) कित्ता, पृ.३८

१२०) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.१६

१२१) भिंगारकर कृ.ज्ञा., श्री विठ्ठल महात्म्य, पुणे, १९९६, पृ.१६

१२२) कित्ता, पृ.३५

१२३) नलवडे प्रताप, चंद्रभागा आहे साक्षीला, बार्शी २०००, पृ.३०

१२४) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.१६, १७

१२५) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.१८

१२६) नलवडे प्रताप, उपरोक्त, पृ.२८

१२७) पगडी सेतूमाधवराव, शिवचरित्र एक अभ्यास, प्रकाशक, डॉ.उषा इथापे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९७१, पृ.२२३, २२४

१२८) पगडी सेतूमाधवराव(संपा), मोगल आणि मराठे, (तारीखे दिल्कुशा), सेतूमाधवराव पगडी, ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९६३, पृ.५८

१२९) देशमुख गोपाळ, उपरोक्त, पृ.४९५

१३०) शेजवलकर त्र्यं.शं., श्री शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ.५०६

१३१) शिवचरित्र पत्र सारसंग्रह खंड–१, शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, पृ.८१

१३२) देशमुख गोपाळ, उपरोक्त, पृ.५०३

१३३) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ.३८

१३४) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.१८

१३५) कित्ता

१३६) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.१९

१३७) कित्ता, पृ.२३

१३८) बेणारे गोपाळ, राणा पंढरीचा, पंढरपूर, १९९३, पृ. ९

१३९) बहिरट भा.प., प्र.ज्ञा.भालेराव, उपरोक्त, पृ.४४

१४०) बेणारे गोपाळ, उपरोक्त, पृ.८

१४१) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.२५, २८

१४२) कित्ता, पृ.३८

१४३) कित्ता, पृ.४०

१४४) ढेरे रा.चि., श्रीविठ्ठल एक महासमन्वय, उपरोक्त, पृ. १७, १८

१४५) कित्ता

१४६) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.१९

१४७) कित्ता, पृ.२०

१४८) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, उपरोक्त, पृ.१२

१४९) देशमुख गोपाळ, उपरोक्त, पृ.४९९, ५००

१५०) खरे वा.वा., ऐतिहासिक लेख संग्रह खंड– १, मिरज, लेखांक– १२३

१५१) कित्ता, लेखांक– १२२

१५२) कित्ता, लेखांक– १२३

१५३) कित्ता, लेखांक– १२४

१५४) खरे ग.ह., अ.रा.कुलकर्णी (संपा.), मराठयांचा इतिहास खंड ३ रा, मराठी सत्तेचा उत्तरार्ध, (१७६१ ते १८४८), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. २०६

१५५) देशमुख गोपाळ, उपरोक्त, पृ.५११

१५६) खरे य.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड १५, मिरज, पृ.३५६

१५७) देशमुख गोपाळ, उपरोक्त, पृ.५१३

१५८) Navale A.M., Pandharpur A Study in Pilgrimage Tourism, unpublished Ph.D. Thesis submitted to Shivaji University Kolhapur, 1996, P.73

१५९) Ibid, P.74

१६०) चौधरी (डॉ.) दत्ता., उपरोक्त, पृ.२४

१६१) कित्ता

१६२) रणनवरे(डॉ.) जयश्री ज्ञानदेव, उपरोक्त, पृ.४०

१६३) कित्ता

१६४) भुतकर(डॉ) शुभांगी शशिकांत ; संत निळोबा जीवन व कार्य (वारकरी संप्रादायाचे नंदादीप), नंदादीप प्रकाशन, सातारा, १९ डिसेंबर २००२, पृ.८

१६५) कदम (डॉ) विकास ; वारकरी संप्रदायाचा इतिहास आणि पंढरपुरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य, अरूणा प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २२ सप्टेंबर २०१४, पृ.२१

१६६) कित्ता

१६७) देगलूरकर श्रीधुंडामहाराज, वैदिक परंपरा आणि वारकरी संप्रदाय,कुलकर्णी गो.म, वि.त्र्यं.शेटे (संपा.) ; महाराष्ट्राची सत्त्वधारा, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १८ आक्टोबर १९८१, पृ.११८

१६८) ढेरे.रा.चि ; श्री विठ्ठल : एक महासमन्वय, उपरोक्त पृ.४३

१६९) कदम (डॉ) विकास ; उपरोक्त, पृ.४६,४७

१७०) सरदार गंगाधर बाळकृष्ण., संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, १९५०, पृ.३२,३३

१७१) कदम (डॉ) विकास ; उपरोक्त, पृ.२७

१७२) रानडे महादेव गोंविद ; मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष, अनुवादक–फाटक नरहर रघुनाथ, मराठी साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६४, पृ.७५ ते ८९

# प्रकरण दुसरे

# महाराष्ट्रातील सहकार चळवळ

## ➢ प्रास्ताविक :–

'सहकार' हा हल्ली महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा परवलीचा शब्द झालेला आहे. महाराष्ट्राचे जीवन सहकारमय झालेले असून मानवी जीवनाची बहुतेक अंगे सहकारी चळवळीने व्यापली आहेत. दिवसेंदिवस ती वेगवेगळ्या क्षेत्रात प्रवेश करीत नवी क्षितीजे उजाळीत आहे. तिच्या द्वारे महाराष्ट्राच्या सुखीसंपन्न जीवनाच्या आशा आकांक्षा पल्लवीत होत आहेत. महाराष्ट्रातील ही चळवळ संपूर्ण भारतात अग्रेसर असून इतर राज्यांना आदर्श व मार्गदर्शक ठरत आहे. राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भूमिका उल्लेखनीय नव्हे तर नेत्रदीपक आहे. ग्रामीण पुनर्रचनेचे प्रमुख साधन असलेल्या सहकारी चळवळीने ग्रामीण भागात चैतन्य निर्माण करून खेडयातील ओसाड व रूक्ष जीवनाचे आशादायी नंदनवनात रूपातर करण्याची किमया सुरू झालेली आहे. तर नागरी भागात परस्पर प्रेम, सहानुभूती आत्मियतेचा ओलावा निर्माण करून जीवन अधिक सुसह्य केले आहे. खऱ्या अर्थाने सहकार हाच आर्थिक लोकशाहीचा मानदंड आहे. 'सहकार' हा आर्थिक विकासाचा व सामाजिक परिवर्तनाचा लोकशाही व आदर्श असा उत्कृष्ट मार्ग आहे. सहकाराद्वारे शोषणरहित समाजव्यवथा प्रस्थापित करणे शक्य आहे. महाराष्ट्रात सहकारी शेती, पतपुरवठा, साखर कारखाने, शेती मालावर प्रक्रिया करणारे कारखाने, सूत गिरण्या, शेती मालाची खरेदी विक्री, गृहबांधणी, दुग्धव्यवसाय इत्यादींची संख्यात्मक वाढ प्रचंड झाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्याच्या आर्थिक विकासासाठी सहकाराचा आधार घेण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सहकारी चळवळीला दिलेल्या प्रोत्साहनामुळे विशेषतः कृषि औद्योगिक संस्थांचा घातलेला पाया यामुळे सहकारी चळवळीची प्रचंड वाढ झाली आहे. सहकारातून समाजाच्या सर्वांगीण सक्षमीकरणाचा क्रांतिकारक प्रयोग महाराष्ट्रात यशस्वी झाला. ग्रामीण विकासात शासनाच्या योजनांपेक्षाही प्रभावी काम लोक सहभागातून सहकाराने केले आहे. सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात लोकसहभाग दिला, राजकारणासाठी अनेक नेते दिले, ग्रामीण शिक्षणाची केंद्रे विकसित करून राज्याच्या मनुष्यबळ विकासात योगदान दिले

मात्र असे असलेतरी इ.स.१९९१ नंतरचे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण विचारात घेता सहकारी चळवळीसमोर अनेक आव्हाने उभी राहत आहेत. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्यात इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा संमत करण्यात आला. त्यानंतर सहकारी संस्थाविषयक तपशीलवार नियम करण्याच्या दृष्टिने इ.स.१९६१ हा अधिनियम पास करण्यात आला. गेल्या ५८ वर्षातील राज्याच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान खूप मोठे आहे

मराठी सत्तेच्या अस्तानंतर मराठी रियासतीत आर्थिक शोषणास प्रारंभ झाला. इतर अनेक कारणाबरोबरच आर्थिक शोषणाचा परिणाम म्हणून इ.स. १८५७ चा पहिला स्वातंत्र्य लढा झाला. या लढ्याचा उलटा परिणाम म्हणून ब्रिटीश कंपन्या भारतात स्थिरस्थावर झाल्या. 'ब्रिटीशराज' च्या स्थापनेसाठी हा लढा अनुकूल ठरला. इ.स. १८५७ नंतर देखील जनतेचे आर्थिक शोषण चालूच राहिले.[१] इ.स.१८७० नंतर सतत पडणाऱ्या दुष्काळ, रोगराई यामुळे दख्खनची जनता हैराण झाली होती. सततचा दुष्काळ व साथीचे रोग यामुळे दख्खनच्या जनतेचे नितीधैर्य खचले होते. सावकारांच्या अव्यवहार्य व्याजदराच्या आकारणीमुळे सामान्य शेतकऱ्यांच्या पुढील पिढीला सुद्धा कर्जाची परतफेड करता येणार नव्हती, या परिस्थितीमुळे मुंबई प्रांतातील सुमारे ९/१० शेतकरी कर्जबाजारी होते. यातील सुमारे एक चतुर्थांश शेतकऱ्यांनी जमिनी विकून टाकलेल्या होत्या. लोक सावकारांविरूद्ध चिडून होते. शेवटी ही चीड शेतकऱ्यांच्या बंडामध्ये रूपांतरीत झाली. हे बंड 'शेतकऱ्यांचे बंड' म्हणून ओळखले गेले. इतिहासात व सरकारी अहवालातून 'दख्खनचे दंगे' (Deccan Riots) म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. पुणे, अहमदनगर, सातारा, सोलापूर या भागात हे दंगे झाले. या दंग्याची सुरूवात पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील करडे या खेडेगावी झाली. तेथील काळूराम नावाच्या सावकाराने कर्जवसुलीसाठी बाबाराव देशमुख या शेतकऱ्यावर खटला भरला. त्या खटल्याचा निकाल सावकारासारखा लागला. बाबारावची जमीन विकूनही व्याजासह कर्ज वसूल होत नव्हते. म्हणून काळूरामने देशमुखाच्या मालकीच्या विठ्ठल मंदिरातील देवाचे दागिने व भांडीकुंडी जप्त केली व त्याचे घर पाडून टाकले या प्रकारामुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी सावकारावर

बहिष्कार घालून त्याला त्रास देण्यास सुरूवात केली. यामुळे सावकाराने तत्कालीन सरकारकडून संरक्षण मिळवले. यातून सावकारशाहीच्या जुलूम, अन्यायाला वाचा फुटली[२] मे १८७५ मध्ये पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या सूपा या खेड्यात शेतकऱ्यांनी बंड केले. या बंडात शेतकऱ्यांनी गहाण कागदपत्रे नष्ट करणे, आपापल्या गहाण वस्तू परत मिळविणे असे प्रकार केले. याला प्रतिकार करण्याची ताकद सावकारांकडे नव्हती. कारण हे जनआंदोलन होते. महाराष्ट्रातील दौंड, मोरगाव, पिंपळगाव, अलिगाव, गहू, आंबे इत्यादी पंचवीस खेड्यात सावकारांची घरे जाळण्यात आली. या दंग्याचे लोण सातारा, अहमदनगर येथे पोहचून तेथेही कर्जरोखे फाडणे, जाळणे इत्यादी घटना घडल्या. या उठावाला 'रोखेफाडीची चळवळ' असे म्हटले जाते.[३] ही रोखेफाडीची चळवळ पुढे संपूर्ण दक्षिणेत व उत्तरेकडे फैलावण्याची चिन्हे दिसू लागली म्हणून सरकारने 'डेक्कन रॉयट' कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनने केलेल्या पाहणीनुसार बंडाचे मुख्य कारण म्हणजे दुष्काळी स्थितीमुळे वाढलेला कर्जबाजारीपणा हे होते.[४] या कमिशनने सावकारांच्या गैरकृत्यांना आळा घालण्यासाठी उपाय योजावेत आणि सावकारांना शह देण्यासाठी पतपुरवठा संस्था ग्रामीण भागात स्थापाव्यात अशा शिफारशी केल्या. पहिल्या शिफारशीची दखल घेऊन सरकारने 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलिफ ॲक्ट' १८७९ साली मंजूर केला.[५]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला प्रदीर्घ इतिहास आहे. सहकारी चळवळ आपल्या देशात सावकार शाहीखाली जे लोक भरडले जात होते. त्यांच्या उद्धारासाठी मूलत: निर्माण झाली आणि ती सर्वप्रथम महाराष्ट्रात निर्माण झाली. ऐतिहासिकदृष्ट्या सहकारी चळवळीचा उगम दक्षिणेतील १८७५ सालच्या 'रोखे फाडीच्या दंगलीतून' झाला असे म्हणता येईल. ही दंगल सावकारांविरूद्ध होती या दंगलीबाबत नेमलेल्या सरकारी मंडळाने आपल्या अहवालात दोन मुख्य सूचना केल्या. १) सावकारीवर नियंत्रण ठेवणे आणि २) तिला तुल्यबळ अशी संघटित संस्था निर्माण करणे. इथेच भारतातील सहकारी चळवळीची कल्पना जन्माला आली.[६]

भारतामध्ये सहकारी संस्थांची स्थापना होण्यापूर्वीच १८८२ साली न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व सर विल्यम वेडरबर्न यांनी महाराष्ट्रातील पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्यासाठी एक सहकारी बँक स्थापण्याचा प्रयत्न केला होता. या बँकेचा मुख्य हेतू जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी कर्ज पुरवणे असा होता. या योजनेला त्यांनी मुंबई व भारत

सरकारची मान्यता मिळविली. पण त्यावेळचे भारतद्वेष्टे भारतमंत्री लॉर्ड किंबर्ले यांनी त्यात खोडा घातला आणि १८८२ साली योजलेल्या पहिल्या सहकारी शेतकरी बँकेचा प्रयत्न अयशस्वी झाला.[७] पुढे सहकारी कायदा अस्तित्त्वात येण्याआधी इ.स. १८८९ मध्ये बडोदा येथे २३ लोकांचा सहभाग असलेली 'अन्योन्य सहकारी मंडळी' ही सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर हे या संस्थेचे प्रवर्तक होते. कर्जाची नड भागवावयाची असेल तर ती परस्पर सहकाराने भागविली गेली पाहिजे म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. एकंदरीत सहकारी संस्थांचे भारतातील जनकत्व महाराष्ट्रीय व्यक्तीकडे जाते.[८]

सन १९०४ चा सहकारी कायदा पास झाल्यानंतर त्यावेळच्या बॉम्बे प्रांतात सर्वप्रथम सहकारी संस्था स्थापन करण्यासंबंधी पुढाकार घेण्यात आला. ग्रामीण भागातील पहिली पतपुरवठा संस्था जून १९०५ मध्ये धारवाड जिल्ह्यात कंगीनहाल येथे तर शहरी भागात मुंबईतील शामराव विठ्ठल नागरी पतपुरवठा संस्था आणि पुण्यातील कॉसमॉस नागरी पतपुरवठा संस्था सन १९०६ मध्ये स्थापन झाल्या.[९] १९११ साली मुंबई प्रांतातील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को. ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना ही होय. सर लल्युभाई सामळदास, श्री. आर. जी. सरैया, सर जनार्दन मदन आणि पुढे भारतीय सहकारी चळवळीचे सर्वश्रेष्ठ नेते म्हणून ओळखले गेलेले श्री. वैकुंठभाई मेहता इत्यादी पुढाऱ्यांच्या प्रयत्नाने सन १९१८ मध्ये बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटची स्थापना झाली. या दोन्ही संस्थांनी प्रांतात बँकिंग आणि सहकारी शिक्षण क्षेत्रात फार मोलाची कामगिरी बजावली आहे.[१०]

मॅक्लगन कमिटीच्या अहवालानुसार प्रत्येक प्रांतात एक याप्रमाणे सहकारी बँका स्थापन करण्यास सुरूवात झाली. सन १९१९ च्या मॉटेग्यू–चेम्सफर्ड कायद्यामुळे प्रांतिक सरकारांना स्वायत्तता मिळाली. या कायद्यानुसार द्विदल राज्यपद्धती अस्तित्त्वात आणण्यात आली आणि या पद्धतीनुसार सहकार हा विषय प्रांताच्या अधिकारकक्षेतील आहे असे ठरविण्यात आले. त्यामुळे प्रत्येक प्रांताला स्वत:च्या इच्छेनुसार व सोयीनुसार आवश्यक ते कायदे करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. त्याचा उपयोग करून निरनिराळ्या प्रांतानी आपल्या प्रांतापुरते सहकारविषयक निरनिराळे कायदे पास केले.[११] त्यावेळच्या मुंबई प्रांतिक सरकारने याबाबत आघाडी घेतली आणि ४ डिसेंबर १९२५ रोजी स्वत:चा मुंबई सहकारी सोसायट्यांचा कायदा

लागू केला. अशा प्रकारचा कायदा त्याआधी हिंदुस्थानातील कोणत्याही प्रांतिक कायदेमंडळाने संमत केलेला नव्हता. या कायद्याचा मूळ मसुदा रॉथफेल्डने तयार केला होता.[१२] इ.स. १९३२ मध्ये मद्रास प्रांताने या बाबतीत नवीन कायदे पास केले. त्यानंतर त्याच धर्तीचे प्रांतभिन्नत्वानुसार थोडाफार फरक असलेले कायदे देशातील सर्वच प्रांतातून करण्यात आले. या सर्व कायद्यांचा मुख्य उद्देश सहकारी चळवळीला व संस्थांना उत्तेजन देणे हाच होता. त्यामुळे त्यानंतर बिहार, बंगाल, ओरिसा इत्यादी प्रांतातून नवनवीन सहकारी संस्था अस्तित्त्वात येऊ लागल्या.[१३]

महाराष्ट्रात सहकारी चळवळीला दिशा देणारे अनेक विचारवंत व राजकीय नेतृत्त्व तसेच कृतिशील कार्यकर्ते निर्माण झाले. बॅ. धनंजयराव गाडगीळ श्री. वैकुंठभाई मेहता यांनी सहकाराला वैचारिक बैठक दिली. इ.स. १९३० ते इ.स. १९५० च्या दरम्यान भारतातील सहकारी चळवळीचे संबंधात विशेष उल्लेखनीय असे काही घडले नाही. त्यावेळी देशात स्वातंत्र्य चळवळ व जगात आर्थिक मंदी चालू होती. सहकारी संस्थांच्या सहाय्याने या आर्थिक अरिष्टाचा मुकाबला करण्याचे प्रयत्न त्यावेळी झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या आर्थिक विकासाची चर्चा सुरू झाली तेव्हा सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकासाच्या शक्यता अभ्यासण्यासाठी ऑल इंडिया क्रेडिट सर्व्हे नावाची समिती स्थापन करण्यात आली. सन १९५४ मध्ये या समितीने आपल्या अहवालात Co-operation has failed, but co operation must succeedअसे म्हटले आहे. खेड्यापाड्यातील सामान्य माणसांना विकास प्रक्रियेत सहभागी करून विकास साध्य करण्यासाठी सहकारी संस्थांना चालना देण्याची आवश्यकता सांगितली.[१४]

इ.स. १९५७ मध्ये केंद्र सरकारने के.टी. राज यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व सहकाराविषयी काही आदर्श नियम तयार करण्यात आले. भारतातील सर्व राज्यांनी आपल्या राज्यातील सहकारी कायदा १९५७ च्या कायद्यास धरून करावा अशी अपेक्षा होती मात्र महाराष्ट्र राज्याने स्वतंत्र सहकारी कायदा करण्याकरीता एक स्वतंत्र समिती जी. एम. लाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली व १९६० साली महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० हा मंजूर करण्यात आला. हा कायदा करताना लाड समिती व राज समिती यांच्या शिफारशी विचारात घेण्यात आल्या होत्या.[१५]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनांद्वारे राष्ट्रोद्धार हे धोरण देशाने अवलंबले आणि त्यात सहकाराला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा प्रत्यक्षात २६ जाने. १९६२ राजी अंमलात आला तेव्हापासून आजतागायत अनेक वेळा त्यातील निरनिराळ्या कलमात आवश्यकतेनुसार बदल केले गेले.[१६] या कायद्याच्या प्रस्तावनेत भारतीय राज्यघटनेतील देशाच्या कारभारासाठी जी मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. त्यानुसार राज्याच्या सहकारी चळवळीचा समतोल विकास व्हावा. म्हणून हा कायदा पास करण्यात येत आहे असे म्हटले आहे.[१७] हा कायदा लागू झाल्यानंतर महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विकासास मोठी गती प्राप्त झाली. इ.स. १९६० ते इ.स. १९८० या काळात महाराष्ट्रात सहकार सर्वत्र बहरला या काळास सहकाराचे सुवर्णयुग म्हणता येईल कारण याच कालखंडात महाराष्ट्रात सहकारी चळवळीची विविधांगी प्रगती झाली.[१८]

## ➢ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विस्तार

१ मे १९६० रोजी नव्या मराठी भाषिक राज्याची–महाराष्ट्राची निर्मिती झाली. स्वतंत्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्याचा विविधांगी विकास करण्याच्या दृष्टिकोनातून सहकारी चळवळीचा आधार घेण्यात आला व तिचा विस्तार झपाट्याने झाला आणि अनेक क्षेत्रांमध्ये सहकारी संस्था पोहोचल्या. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाने कल्याणकारी राज्याची संकल्पना अंमलात आणली. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून दुर्बल घटकांच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी सहकारी संस्थांना अर्थसाहाय्य देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. पुढे हेच धोरण महाराष्ट्र राज्यानेही स्वीकारले. आज महाराष्ट्रातील सहकारी चळवळ भारत देशात अग्रेसर, श्रेष्ठ व सामर्थ्यशाली आहे. मानवी जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करीत गतिमान झालेली आहे. आज अनेक क्षेत्रात सहकारी संस्था पोहोचल्या आहेत. उदा. कृषिपतपुरवठा, शेती आदिवासी कुक्कुटपालन, वराहपालन, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, ग्राहक भांडारे इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये सहकारी संस्थांचे जाळ पसरलेले आहे. राज्यामध्ये इ.स. २०१२ पर्यंत सुमारे सव्वा दोन लाखांहून अधिक सहकारी संस्था असून त्याचं सभासदत्त्व साडेपाच कोटींपेक्षा अधिक होते.[१९]

पणनसंस्था, ग्राहक भांडारे राज्यातील कानाकोपऱ्यात ग्राहकांच्या गरजा पुरवीत असतात. धान्य, कापड, औषधे, रॉकेल, बालकांसाठी अन्न अशा रोजच्या गरजेच्या वस्तू

वितरीत करण्याचे काम या सहकारी संस्था करीत असतात. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांसाठी खते, कीटकनाशके, यांत्रिक उपकरणे या उपयुक्त वस्तुंचे वितरणही सहकारी संस्था करत असतात. राज्यातील नागरीकरणाच्या विकासात सहकारी घरबांधणी संस्थांचे योगदान मोठे आहे. देशातील ४० महिला सहकारी बँकापैकी २२ बँका महाराष्ट्रात आहेत. विदर्भ विणकर सहकारी संस्थेने सुरू केलेल्या दुकानांचे जाळे महाराष्ट्रभर पसरलेले आहे.[२०] तर राज्यातील पहिली सहकारी सूतगिरणी 'कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकर सहकारी संस्था' इचलकरंजी येथे सुरू झाली. देशातील सर्वात मोठी सहकारी औद्योगिक वसाहत इचलकरंजी येथेच आहे.[२१] दूध पुरवठा करणाऱ्या अनेक संस्था राज्यात कार्यरत असून दूध आणि दुधापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांच्या विक्रीचा आकडा दोन हजार कोटी रूपयांहून अधिक असतो. सैनिकांनी सैनिकांसाठी चालविलेली एकमेव सहकारी बँक साताऱ्यात आहे. महिला गृहोद्योग सहकारी संस्था लिज्जत पापड, मसाले, उदबत्त्या, कपडे धुण्याची पावडर अशा जीवनावश्यक वस्तुंचे उत्पादन करते. राज्यात मार्च २००५ अखेर ६४००० प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. या संस्थांनी राज्याच्या नागरीकरणास मोठीच चालना दिली.[२२] आज भारतातील सर्व राज्यात सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचे स्थान अग्रेसर आहे. सहकाराच्या माध्यमाने महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा जो काही विकास झाला आहे. त्यामध्ये सहकारी चळवळीचा हिस्सा मोलाचा आहे.

## ➢ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आणि कृषि विकास

सहकारी चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासास मदत झाली आहे. शेतीसाठी पतपुरवठा करण्याच्या दृष्टिकोनातून सहकारी चळवळीची सुरुवात झाली आहे. सहकारी कृषिपतपुरवठ्याची संरचना त्रिस्तरीय आहे. राज्य पातळीवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्राथमिक पातळीवर २० हजारांचे वर शेती पुरवठा संस्था कार्यरत आहेत. या त्रिस्तरीय रचनेमार्फत शेतकऱ्यांना शेतीसाठी अल्प, मध्यम मुदतीची कर्जे दिली जातात. शेतमाल प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांना ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यात त्या साहाय्यभूत ठरलेल्या आहेत. ग्रामीण भागात हे उद्योग अनेक शेतकऱ्यांना पूर्णवेळ वा अर्धवेळ रोजगार उपलब्ध करून देतात. कापूस एकाधिकार खरेदी योजना राज्यातील अग्रगण्य सहकारी संस्था,

'महाराष्ट्र राज्य को-ऑप मार्केटिंग फेडरेशन' तर्फे राबविली जाते. मूळ १९७१ साली सुरू झालेली ही योजना सुधारित स्वरुपात डिसेंबर १९७८ मध्ये अंमलात आली. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.[२३]

महाराष्ट्रात इ.स. २०१० पर्यंत २,१८,३२० सहकारी संस्था असून त्यापैकी २५,३९२ प्राथमिक शेती सहकारी पतपुरवठा संस्था आहेत. बिगरकृषि सहकारी पतसंस्थांची संख्या २३,८३९ असून पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था ७,२७६ एवढ्या आहेत. सहकारी पतव्यवस्था ही साधारणपणे खालील घटकांशी संबंधित असून त्यात अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. नाबार्ड किंवा राज्य सहकारी शेती विकास बँका या अप्रत्यक्ष कर्जपुरवठा करतात.

अ) प्राथमिक शेती सहकारी पतपुरवठा संस्था

ब) बिगरकृषि सहकारी पतपुरवठा संस्था

क) नागरी सहकारी बँका

ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

इ) इतर पतपुरवठा संस्था

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा कणा म्हणून या विकास संस्थांकडे पाहिले जाते. इ.स.१९६० ते १९९० पर्यंत सहकारी पतपुरवठा चळवळीने महाराष्ट्रात साम्राज्य निर्माण केले आहे. शासनानेही ग्रामीण भागातील विकासावर नियोजनाद्वारे आपले लक्ष केंद्रित करून सहकारी चळवळ भरभराटीला आणण्याचा प्रयत्न केला आहे.[२४]

## ➢ सहकारी पतपुरवठा संस्था-

सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्र सुरूवातीपासूनच अग्रेसर राहिला आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी पतपुरवठा चळवळ इ.स. १९०४ च्या कायद्यापासून सुरू झाली. इ.स.१९२३ मध्ये बॉम्बे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापन झाली[२५]. सध्या ती बँक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित मुंबई या नावाने ओळखली जाते. महाराष्ट्रामध्ये सहकारी पतपुरवठयाची चळवळ त्रिस्तरीय स्वरूपाची आहे. त्यामध्ये शिखर स्थानावर राज्य सहकारी बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि ग्रामीण पातळीवर प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था अशी आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासात भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव

विखे पाटील, वैकुंठभाई मेहता, डी.आर.गाडगीळ, वसंतदादा पाटील, रत्नाप्पाण्णा कुंभार, तात्यासाहेब कोरे, शंकरराव मोहिते पाटील, गणपतराव देशमुख,औदुंबर पाटील, सुधाकरपंत परिचारक, यशवंतराव मोहिते यासारख्या व्यक्तींनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

भारताच्या सहकारी चळवळीमध्ये शेती सहकारी पतपुरवठा संस्थांचा हिस्सा मोठा आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी तेथील शेतीचा विकास महत्त्वाचा आहे. तो शेती सहकारी पतपुरवठा संस्थामुळे झाला. ग्रामीण भागातील लोकांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी या चळवळीचे महत्त्वाचे योगदान आहे. महाराष्ट्रामध्ये शेती क्षेत्राला सहकारी पतपुरवठा करण्यासाठी पिरॅमिडच्या आकाराची 'त्रिस्तरीय रचना' निर्माण केली आहे. त्यामुळे गावपातळीवर प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक अशी रचना आहे.

**प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था–**

या संस्था गावपातळीवर काम करतात. खेडे लहान असेल तर २ ते ३ खेडयाची मिळून एक संस्था असते. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने अल्पमुदतीचा पतपुरवठा करतात याला पीक कर्ज असे म्हणतात. पतपुरवठयातून बि–बियाणे, रासायनिक खते, वेतन, खुरपणी, किटकनाशके यावर खर्च केला जातो. तसेच त्यातील काही रक्कम उपभोगासाठीही वापरली जाते. या संस्था पतपुरवठयाच्या कार्याबरोबर अनुषंगिक सेवा पुरविण्याचे काम करतात. त्यामध्ये खते, बि बियाणे, कीटकनाशके, अन्नधान्य यासारख्या वस्तू पुरवितात. सभासदांना भागभांडवल विक्री करून सभासद फी, नफ्यातून काढलेला राखीव निधी, ठेवी या मार्गाने भांडवल उभे करतात. या संस्थाचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालते. सभासदत्व खुले व ऐच्छिक असते.

**कोष्टक क्र.१**

**महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थाची प्रगती(रू.लाखात)**

| **वर्ष** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|
| **संस्था** | १८९९८ | २००१४ | १८३८९ | १९४९१ | २०५२४ |
| सभासद(हजारात) | १८२७ | ३१३६ | ५३९१ | ७५०७ | १०१२१ |
| भागभांडवल | १२१२ | ५२३१ | १०६९१ | ३०७१९ | ९६०१९ |
| स्वनिधी | १५१९ | ६२७७ | १३३८६ | ३७९१४ | १२२४१४ |
| ठेवी | ९९ | ४०५ | १०३५ | २१५७ | ८७९२ |
| देय कर्ज | ३६८१ | १४३०२ | ३५९४३ | १२३८३१ | ५१६७९० |
| खेळते भांडवल | ५६६८ | २०९८४ | ५२६९५ | १७८३९९ | ६९८७६८ |
| कर्ज वाटप | ४०३६ | ११४९३ | २४९९३ | ७६८५५ | ३७३४१२ |
| थकित कर्ज | ८६५ | ६१८४ | १४९६५ | ४९२७६ | १६४४९८ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात, २०१४ पृ.१२,१३)

वरील कोष्टकामध्ये महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती दर्शविली आहे. सन १९६१ मध्ये या संस्थांची संख्या १८,९९८ होती. त्यात वाढहोऊन इ.स. २००१ मध्ये २०,५२४ झाली. सभासद संख्या या कालावधीत १,८२७ हजारा वरून वाढून १०,१२१ हजाराएवढी झाली. भागभांडवल १,२१२ लाखावरून ९६,०१९ लाख रूपयेपर्यंत वाढले. स्वनिधीमध्ये १,५१९ लाखावरून १,२२,४१४ लाख पर्यंत वाढ झाली. इ.स. १,९६१ मध्ये ठेवी ९९ लाख रूपये होत्या. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये ८,७९२ लाख रूपये झाले. या कालावधीत खेळते भांडवल ५,६६८ लाख रूपयावरून ६,९८,७६८ लाख रूपयेपर्यंत वाढले. या संस्थानी इ.स. १९६१ मध्ये ४,०३६ लाख रूपयांचे कर्ज वाटप केले होते. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये ३,७३,४१२ लाख रूपये झाले. ज्याप्रमाणे कर्जाच्या वाटपाचे प्रमाण वाढले त्याचप्रमाणे थकीत कर्जाचे प्रमाणही वाढले आहे. ते ८६५ लाख रूपयावरून इ.स. २००१ मध्ये १,६४,४९८ लाख रूपये झाले.[२६] महाराष्ट्रामध्ये प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांची संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात झाली आहे मात्र त्याप्रमाणे गुणात्मक वाढ झालेली नाही.

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

या बँकांचे कार्यक्षेत्र सामान्यपणे एका जिल्ह्यापुरते मर्यादित असते. राज्य सहकारी बँक आणि प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था यामध्ये दुवा साधण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँक करते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना पतपुरवठा, देखरेख, नियंत्रण, तपासणी इत्यादी कामे करते या बँका कामकाज पाहण्याकरिता लागणारा निधी, भागाची विक्री, न वाटलेला नफा, सभासद फी, राखीव निधी, ठेवी, राज्य सहकारी बँकेकडून घेतलेले कर्ज या मार्गाने उभा करते. यामध्ये सर्वात महत्त्वाचे राज्य सहकारी बँकेकडून घेतलेले कर्ज असते.

**कोष्टक क्र. २**

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती**

| **वर्ष** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|
| **बँक संख्या** | ३५ | ३५ | २६ | ३० | ३० |
| **शाखा** | – | ८६७ | १७०३ | ३१४७ | ३७१८ |
| सभासद | ५७ | ५५ | ६२ | ८४ | १४४ |
| भागभांडवल | ६५३ | २५१५ | ४५६३ | १८८९६ | ६८३१५ |
| स्वनिधी | ८२० | ३४७४ | १०२०६ | ३७५८९ | २४०९९९ |
| ठेवी | २६४७ | ११३२३ | ५८८१४ | ३१९९४० | १७८६२८५ |
| देय कर्ज | २४६५ | ८०५५ | ९३५५ | ९११०७ | २४४५७४ |
| खेळते भांडवल | ६०९३ | २३६३७ | ८३५२६ | ४८३४९२ | २४२७८४२ |
| कर्ज वाटप | ५१२५ | १२०८४ | २७८७० | ११९१९६ | २०२०८३० |
| थकबाकी | ४६० | ४४५२ | १४४५२ | ५६१५१ | २०१६१३ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात, २०१४ पृ.९)

वरील कोष्टकात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती दर्शविली आहे. इ.स.१९६१ मध्ये या संस्थांची संख्या ३५ होती २००१ मध्ये त्यात घट झाली. ती ३० झाली. या संस्थांची संख्या कमी होण्याचे कारण एका जिल्ह्यासाठी एक बँक हा निर्णय घेतल्यामुळे बँकांची संख्या कमी झाली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या शाखांची संख्या इ.स. १९७१ मध्ये ८६७ होती. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये ३,७१८ इतकी झाली. सन १९६१ मध्ये या बँकांची सभासद संख्या ५७ होती. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये १४४ इतकी झाली. या कालावधीत या बँकांचे भागभांडवल ६५३ लाख रूपयांवरून वाढून २००१ मध्ये ६८,३१५ लाख रूपये झाले. याच कालावधीत ८२० लाख असणारा स्वनिधी वाढून २,४०,९९९ लाख रूपये झाला. २,६४७ लाख रूपयावरून १७,८६,२८५ लाख रूपयेपर्यत ठेवी वाढल्या. ६,०९३

लाख रूपयांवरून २४,२७,८४२ लाख रूपये खेळते भांडवल वाढले. इ.स.१९६१ मध्ये या बँकांनी ५,१२५ लाख रूपये कर्जाचे वाटप केले.त्यात वाढ करून २००१ मध्ये २०,२०,८३० लाख रूपये वाटप केले. याच कालावधीमध्ये ४६० रूपये असणारी थकबाकी २,०१,६१३ लाख रूपयेपर्यंत वाढली.[२७]

**राज्य सहकारी बँक–**

राज्य सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र सामान्यपणे एका राज्यापुरते मर्यादित असते. ती बँक सहकारी पतपुरवठयामध्ये सर्वोच्च स्थानावर असते, म्हणून तिला शिखर बँक संस्था म्हणून ओळखतात. राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व या बँकेकडे असते. नाबार्ड मार्फत राज्य सहकारी बँकेला पतपुरवठा केला जातो. तो पतपुरवठा राज्य सहकारी बँक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना करते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि नाणेबाजार यामध्ये दुवा साधण्याचे काम राज्य सहकारी बँक करते. राज्य सहकारी बँक राज्यामधील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून भागभांडवल, जिल्हा बँकांकडे अतिरिक्त असलेला निधी, ठेवी, भारतीय स्टेट बँक, नाबार्ड आणि इतर बँकांकडून कर्ज घेऊन व्यवहारासाठी लागणारा पैसा उभा केला जातो.

**कोष्टक क्र. ३**

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्रगती**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| शाखा | २० | २४ | ४४ | ४३ | ५३ |
| सभासद | ११ | १६ | १६ | २६ | ३३ |
| भागभांडवल | ३२६ | ८२६ | ११०३ | २८१६ | ९५८६ |
| स्वनिधी | ४२५ | १८८५ | ८२५४ | २८९२२ | ९७५५५ |
| ठेवी | २१५३ | ९३३२ | ४२९९४ | २०९३६२ | ९१३५८२ |
| देय कर्ज | २२८६ | ६८९४ | ८८० | ६१६३६ | २०४६२४ |
| खेळते भांडवल | ५२५४ | १८७४१ | ५४४८३ | ३१०१२५ | १३१४६९८ |
| गुंतवणूक | – | – | – | ४८८६३ | २९९०४९ |
| कर्ज वाटप | ७७८५ | ३३२३३ | १२५१०४ | २१३०१६ | ८४६६४९ |
| थकबाकी | ८४ | २०७ | २२४६ | ६१७१ | ६७८८८ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात, २०१४ पृ.८)

वरील कोष्टकात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्रगती दर्शविली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची सन १९६१ मध्ये शाखांची संख्या २० होती ती वाढून इ.स. २००१ मध्ये ती ५३ झाली या कालावधीत सभासद संख्या ११ वरून ३३ एवढी झाली. तर भागभांडवल ३२६ लाख रूपयांवरून ९५८६ लाख रूपये झाले. स्वनिधी ४२५ लाख रूपयांवरून वाढून ९७५५५ लाख रूपये झाला. इ.स.१९६१ मध्ये या बँकेच्या ठेवी २१५३ लाख रूपये होत्या. त्यात वाढहोऊन ९,१३,५८२ लाख रूपये झाल्या. या कालावधीमध्ये ५,२५४ लाख रू असणारे खेळते भांडवल १३,१४,६९८ लाख रूपये झाले. सन १९९१ मध्ये या बँकेने ४८,८६३ लाख रूपयांची गुंतवणूक केली होती.त्यात वाढहोऊन इ.स. २००१ मध्ये २९९०४९ लाख रूपये झाले. इ.स.१९६१ मध्ये या बँकेने ७७८५ लाख रूपयांचे कर्ज वाटप केले होते. त्यात वाढ करून २००१ मध्ये ८,४६,६४९ लाख रूपये केले. याच कालावधीमध्ये थकबाकी ८४,००० लाख रूपयावरून ६७,८०८ रूपयापर्यंत वाढली.[२८] या बँकांच्या बाबतीतदेखील थकबाकीचे प्रमाण सातत्याने व वेगाने वाढत आहे. गेल्या काही वर्षामध्ये वाढती थकबाकी ही चिंता वाढविणारी समस्या आहे. सहकारी चळवळीच्या विकासामध्ये थकबाकीच्या स्वरूपात मोठा अडसर निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम गरीब शेतकऱ्यांच्या कर्जावर होत आहे.

**नागरी सहकारी बँक**

आपल्या देशातील नागरी भागातील कनिष्ठ आणि मध्यम वर्गातील व्यक्तिना एकत्र करून त्यांच्यात काटकसरीची सवय लावून बचत करायला लावणे आणि त्यांनी स्वयंपूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न करणे हा हेतू ठेऊननागरी सहकारी बँकांची स्थापना झाली. शहरातील मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ वर्गातील लोकांना जास्तीत जास्त कर्जपुरवठा करणे हे नागरी सहकारी बँकाचे महत्त्वाचे कार्य आहे. या बँकावर राज्य सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक या दोन्ही संस्थांचे नियंत्रण असते. महाराष्ट्रातील नागरी सहकारी पतसंस्थांची प्रगती पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

**कोष्टक क्र. ४**

**महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची प्रगती (रू.लाखात)**

| वर्ष | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|
| संस्था | ४९४ | ९५२ | ४७८४ | १४२७७ |
| सभासद(हजारात) | १३१ | ३१६ | २११७ | ६४३३ |
| भागभांडवल | १०७ | ५०६ | ४९४५ | ८६९१६ |
| स्वनिधी | १४१ | ६६८ | ६५०४ | ११५८६९ |
| ठेवी | ७८ | ६१२ | १२८९० | ३९९१२८ |
| खेळते भांडवल | ३०४ | १४७७ | २६१६४ | ५८७५०६ |
| कर्ज वाटप | २९१ | १०२७ | १६६६४ | ३५१७६४ |
| थकित कर्ज | २० | ७८ | २३९९ | ५०७०५ |
| नफ्यातील संस्था | ३७२ | ६२१ | ३०१४ | १०२९१ |
| तोटयातील संस्था | ४२ | २०८ | ११०३ | ३१३८ |

(संदर्भ– कुलकर्णी (डॉ) पी.बी ; महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची बदलती दशा आणि दिशा, पाटील(डॉ)जे.एफ (संपा.), सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर लिमिटेड, पुणे, प्रथमावृत्ती मे २०१० पृ.१२९)

वरील कोष्टकामध्ये महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची प्रगती दर्शविली आहे. इ.स.१९७१ मध्ये या संस्थांची संख्या ४९४ होती त्यात वाढहोऊन ती २००१ मध्ये १४,२७७ झाली याच कालावधीत सभासद संख्या १३१ हजारावरून ६,४३३ हजार झाली. तर भागभांडवल १०७ लाख रूपयावरून वाढून ८६,९१६ लाख रूपयापर्यत वाढले. स्वनिधी १४१ लाख रूपयावरून १,१५,८६९ लाख रूपये झाला. ठेवी ७८ लाख रूपयांवरून ३,९९,१२८ लाख रूपये झाल्या याच कालावधीमध्ये खेळते भांडवल ३०४ लाख रूपयांवरून ५,८७,५०६ लाख रूपये झाले. इ.स.१९७१ ला या संस्थांनी २९१ लाख रूपयाचे कर्जवाटप केले होते. त्यावर्षी २० लाख रूपये कर्ज थकीत होते. तर इ.स. २००१ मध्ये ३,५१,३६४लाख रूपये कर्ज वाटप केले होते. त्यावर्षी ५०,७०५ लाख रूपये थकित कर्ज होते. म्हणजे कर्जवाटपाचे प्रमाण जसे वाढले आहे. तसेच थकीत कर्जाचे प्रमाणही वाढले आहे. इ.स.१९७१ मध्ये ३७२ संस्था नफ्यामध्ये होत्या. तर इ.स. २००१ मध्ये १०,२९१ संस्था नफ्यात होत्या. याच कालावधीत तोटयातील संस्थांची संख्या ४२ वरून ३१३८ पर्यंत वाढली. नफ्यातील संस्थांची संख्या वाढीच्या तुलनेत तोटयातील संस्थाच्या संख्यावाढीचा दर जास्त आहे.[२९]

**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि आणि ग्रामीण विकास बँक–**

भारतामध्ये शेतीला वित्तपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेमध्ये अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा राज्य सहकारी बँक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, आणि प्राथमिक सहकारी कृषि पतपुरवठा संस्था करतात आणि दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करण्यासाठी कृषि आणि ग्रामीण विकास बँक कार्य करते. या बँकेचे नाव पूर्वी भूतारण बँक आणि भूविकास बँक होते. ही बँक शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा. जमिनीचे सपाटीकरण, बांधबंधिस्ती, विहीर खोदणे, पाईप लाइन करणे, साठवण व्यवस्था करणे यासारख्या कार्याला दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करते. या बँकेची रचना दोन प्रकारची आहे. काही राज्यात राज्यपातळीवर बँक स्थापन केली जाते. आणि त्यांच्या शाखा काढल्या जातात. काही राज्यात राज्यपातळीवर मध्यवर्ती बँक स्थापन केली जाते आणि राज्यात प्राथमिक संस्था स्थापन केल्या जातात. महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि आणि ग्रामीण विकास बँकेची प्रगती पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

**कोष्टक क्र. ५**

**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि आणि ग्रामीण विकास बँक प्रगती**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद | ८ | ५५ | ७२४ | १०२१ | ११८० |
| भागभांडवल | ५१ | ८८७ | ३२६४ | ५४३६ | ८९९३ |
| स्वनिधी | ५३ | १०५१ | ४६३१ | १४१०९ | ७१६६३ |
| खेळते भांडवल | ७४६ | १५७५२ | ३२६५० | ८३७१० | १३६३६८ |
| कर्ज वाटप | २१५ | १८८० | ५४१७ | १२४३८ | ९४८ |
| थकबाकी | २३ | ६८६ | ३२७१ | ७१७४ | २३६३५ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात, २०१४ पृ.१०)

इ.स.१९६१ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि आणि ग्रामीण विकास बँकेची सभासद संख्या ८ होती. त्यात वाढ होऊन २००१ मध्ये ११८० झाली. भागभांडवल ५१ लाख रूपये होते. त्यात वाढ होऊन ८,९९३ लाख रूपये झाले. स्वनिधी ५३ लाख रूपये होता. त्यात वाढहोऊन इ.स. २००१ मध्ये ७१,६६३ लाख रूपये झाला. या बँकेचे इ.स.१,९६१ ला २१५ लाख रूपये कर्ज वाटप होते त्यात वाढ होऊन इ.स.१९९१ ला १२,४३८ लाख रूपये झाले

परंतु २००१ ला ९४८ पर्यंत घटले. याच कालावधीत या बँकेची थकबाकी २३ लाख रूपये होती ती वाढून २३,६३५ इतकी झाली.[३०] या बँकेपुढे अनेक वेगवेगळया समस्या आहेत त्यामध्ये वाढती थकबाकी, कर्जावरील व्याजाचा जास्त दर, कर्जाचे सदोष वाटप, अपुरे भांडवल, सदोष व्यवस्थापन इ.

**सहकारी विपणन संस्था –**

जागतिकीकरणाच्या युगात सर्वच क्षेत्रात गुणवत्ता हा एकच निकष लावला जातो. या गुणवत्तेच्या कसोटीस आंतरराष्ट्रीय स्तरावर उतरणे हे कृषि क्षेत्रापुढील मोठे आव्हान आहे. कारण शेतकरी शेतात राब राब राबून कर्ज काढून शेतमालाचे उत्पादन करत असतो. मात्र उत्पादीत केलेल्या शेत मालाला आजही चांगली विपणन पद्धती नाही. ज्या काही विपणन संस्था आहेत. त्या शेतकऱ्यांना माहित नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागात मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे शेतीतील उत्पन्नासाठी आजही विपणनाला महत्त्वाचे स्थान आहे. उदारीकरणाच्या या गतिमान स्थितीत बाजारपेठेला महत्त्वाचे स्थान आहे. औद्योगिक क्षेत्रात उत्पादन झालेला माल जसा बाजारपेठेत विकला जातो. त्याचप्रमाणे शेतात तयार झालेला माल पण बाजारपेठेतच विकला जातो. शेतात तयार झालेल्या मालावर विक्रीपर्यंत व्यापाऱ्याकडून आणि शेतकऱ्यांकडून मोठया प्रमाणात प्रक्रिया केल्या जातात. त्या शेतमाल विपणनाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना शेतमालाची मिळणारी किंमत व ग्राहकांकडून दिलेली किंमत यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत असते. शेतमाल विपणन व्यवस्थेत अनेक मध्यस्थ असतात. त्यांच्याकडून शेतकऱ्यांची लूट केली जाते. यावर मात करण्यासाठी सहकारी विपणन संस्थांची स्थापना केली जाते.

सहकारी खरेदी विक्री म्हणजे अशी पद्धती आहे की, ज्यामुळे शेतकरी एकत्र येतात आणि शेतमालाच्या उत्पादनापासून उपभोक्त्यापर्यंत पोहचण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व विपणन क्रिया करतात. त्यामध्ये शेतमालाचे एकत्रिकरण, प्रतवारी, साठा, प्रक्रिया पॅकिंग आणि विक्री या क्रिया करतात. सहकारी खरेदी विक्री संस्था स्थापन करण्याची गरज मुख्यत्वे शेतकऱ्यांची फसवणूक होवू नये. शेतमाल साठवणुकीच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात. शेतकऱ्यांची सौदा शक्ती वाढावी. शेत मालाच्या विपणनातील मध्यस्थ कमी व्हावेत. विपणन खर्चात बचत

व्हावी. शेत मालाला योग्य किंमत मिळावी. विपणनात योग्य व प्रमाणित वजन मापाचा वापर व्हावा. बिलातून अनावश्यक वजावटी कमी करणे/बंद करणे. कृत्रिम टंचाई रोखण्यासाठी आहे.

भारतामध्ये सहकारी विपणन संस्थांची रचना चारस्तरीय आहे. त्यामध्ये ग्रामीण किंवा तालुका पातळीवरील 'प्राथमिक सहकारी खरेदी विक्री संस्था' , जिल्हा पातळीवरील 'जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ, राज्य पातळीवरील 'राज्य सहकारी खरेदी विक्री संघ' आणि राष्ट्रीय पातळीवर 'राष्ट्रीय शेती सहकारी खरेदी विक्री महासंघ' यालाच आपण नाफेड म्हणतो.[३१]

**कोष्टक क्र. ६**

**महाराष्ट्र राज्यातील खरेदी विक्री संस्थांची प्रगती(रूपये लाखात)**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद(००) | ७ | ८ | १२ | ३७ | ९ |
| भागभांडवल | १३ | १५५ | १७१ | १४९७ | १२९६ |
| स्वनिधी | १४ | ४ | १६१८ | ३६२६ | ४६३५ |
| खेळते भांडवल | ७४ | १७४१ | ९५५३ | १३५६६ | ३४७६ |
| विक्री | – | – | – | – | ४४९९८ |
| नफा | – | २४ | ११२ | १०३ | ३५ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात, २०१४ पृ.२२)

वरील कोष्टकात महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघाची प्रगती दर्शविली आहे. इ.स.१९६१मध्ये या महासंघाची सभासद संख्या ७०० होती. त्यात वाढ होऊन इ.स. १९९१ ला ३७०० झाली. परंतु इ.स.२००१ मध्ये घट होऊन ९०० झाली. महासंघाचे भागभांडवल १३ लाख रूपये होते. त्यात वाढहोऊन इ.स. २००१ ला १२९६ लाख रूपये झाले. याच कालावधीमध्ये स्वनिधीमध्ये १४ लाख रूपयांवरून ४६३५ लाख रूपये वाढ झाली. खेळत्या भांडवलात ७४ लाख रूपयांवरून ३४७६ लाख रूपयांपर्यत वाढ झाली. या महासंघाचा नफा १९७१ ला २४ लाख रूपये होता. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये ३५ लाख रूपये एवढा झाला.[३२]

**कोष्टक क्र.७**

**जिल्हा सहकारी विपणन संघाची प्रगती**(रूपये लाखात)

| **वर्ष** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|
| संस्था | १६ | २५ | २६ | २६ | २४ |
| सभासद संख्या(००) | २३६ | ५०६ | ७९७ | ७०५ | ५२७ |
| भागभांडवल | ३६ | १४१ | १९२ | ३९४ | ३५४ |
| स्वनिधी | ७७ | ३९२ | ११४२ | २१७९ | १००७ |
| खेळते भांडवल | २८३ | २३१० | ३४६५ | ६११२ | ३६०९ |
| शेत मालाची विक्री | २२५ | १२१२ | १११० | ९२२६ | १४९६१ |
| शेती उपयोगी मालाची विक्री | २९२ | १७६३ | ६५४८ | ७३६४ | २९४० |
| नफ्यातील संस्था | १३ | २० | २० | १२ | १५ |
| तोटयातील संस्था | ३ | ४ | ४ | १३ | ९ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात, २०१४ पृ.२७)

वरील कोष्टकामध्ये महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी विपणन संघाची प्रगती दर्शविली आहे. इ.स.१९६१ मध्ये जिल्हा सहकारी विपणन संघाची संख्या १६ होती. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये २४ इतकी झाली. या जिल्हा विपणन संघाची सभासद संख्या इ.स. १९६१ ला २३,६०० होती. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ ला ५२,७०० एवढी झाली. याच कालावधीत भागभांडवल ३६ लाख रूपये होते. तर इ.स. २००१ मध्ये त्यात वाढहोऊन ३५४ लाख रूपये झाले. तर संघाचे खेळते भांडवल २८३ लाख रूपये होते. त्यात वाढहोऊन इ.स. २००१ ला ३,६०९ लाख रूपये झाले. या संघाची इ.स. १९६१ ला शेतमालाची विक्री २२५ लाख रूपये होती त्यात वाढहोऊन ती इ.स. २००१ ला १४,९६१ लाख रूपये झाली. याच कालावधीत शेती उपयोगी मालाची विक्री २९२ लाखावरून २,९४० लाख रूपये झाली. या संघातील नफ्याच्या संघाच्या तुलनेत तोटयातील संघाच्या संख्या वाढत आहे.[३३]

**कोष्टक क्र. ८**

**प्राथमिक सहकारी विपणन संस्थाची प्रगती**(रूपये लाखात)

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था | ३२७ | ३८४ | ३९१ | ९०१ | १०८८ |
| सभासद संख्या(००) | ११७४ | २३०५ | ३९०४ | ६७०४ | ७८५९ |
| भागभांडवल | ९५ | ४९९ | ६८६ | २२१८ | ८५३६ |
| खेळते भांडवल | ५६१ | ३२८५ | ६८०३ | १३०९८ | २८६०६ |
| शेत मालाची विक्री किंमत | १५१७ | ५०२९ | ९६६३ | १२२४६ | ३३७९१ |
| शेती उपयोगी मालाची विक्री किंमत | ७४४ | ३०८६ | ११६९५ | १६८५९ | ४०२४९ |
| नफ्यातील संस्था | १९७ | २३१ | २६५ | ४१७ | ४८५ |
| तोटयातील संस्था | ७० | १२९ | ८६ | ३३९ | ५५६ |

(संदर्भ–सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात, २०१४ पृ.३०)

वरील कोष्टकात महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी विपणन संस्थाची प्रगती दर्शविली आहे. इ.स.१९६१ मध्ये महाराष्ट्रामध्ये प्राथमिक सहकारी विपणन संस्थांची संख्या ३२७ होती. त्यामध्ये वाढ होऊन ती इ.स. २००१ मध्ये १०८८ एवढी झाली. याच कालावधीत सभासद संख्या १,१७,४०० वरून ७,८५,९०० एवढी झाली. इ.स.१९६१ मध्ये या संस्थांचे भागभांडवल ९५ लाख रूपये होते. त्यात वाढ होऊन इ.स. २००१ मध्ये ८,५३६ लाख रूपये झाले. याच कालावधीत खेळते भांडवल ५६१ लाख रूपयावरून २८,६०६ लाख रूपये एवढे झाले. या संस्थांनी इ.स.१९६१ मध्ये १,५१७ लाख रूपयेच्या शेतमालाची विक्री केली. त्यात इ.स. २००१ मध्ये ३३,७९१ लाख रूपयापर्यत वाढ झाली. तर शेती उपयोगी मालाची विक्री इ.स.१९६१ ला ७४४ लाख रूपये केली होती. त्यात २००१ मध्ये ४०,२४९ लाख रूपयापर्यत वाढ झाली. महाराष्ट्रातील प्राथमिक विपणन संस्थामध्ये नफ्यातील संस्थांच्या तुलनेत तोटयातील संस्थांची संख्या वाढत आहे ही चिंताजनक गोष्ट आहे.[३४]

## ➢ साखर उद्योगआणि सहकारी चळवळ–

भारतात प्राचीन काळापासून ऊसाची लागवड केली जाते. या पिकाचा प्रसार जगभर भारतातूनच झाला आहे. याविषयीचे इतिहासात अनेक पुरावे सापडतात. भारतात ऊसाच्या पिकाची जरी प्राचीन काळापासून माहिती असली तरी साखर उद्योग ाची सुरूवात मात्र इ.स.

१७८४ मध्ये झाली आहे.[३५] जगातील ९४ देश ऊसापासून साखर तयार करतात. त्यात प्रामुख्याने थायलंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, हवाई, मेक्सिको, कोलंबिया, ब्राझील, क्युबा, चीन, भारत इ. देशांचा समावेश होतो. या सर्व देशात साखर उत्पादना बाबत भारत अग्रेसर आहे. साखर तयार करणाऱ्या देशांपैकी भारतात साखर कारखान्याची संख्या सर्वात जास्त आहे.[३६]

ऊस उत्पादनाबाबत भारताचा जगात द्वितीय क्रमांक आहे. जगात ब्राझील ऑस्ट्रेलिया, क्युबा, मेक्सिको या देशांमध्ये प्रामुख्याने ऊस उत्पादन जास्त प्रमाणात घेतले जाते. उत्तर भारतामध्ये मुख्यत्वे करून उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाणा, राजस्थान, मध्यप्रदेश, प.बंगाल आणि आसाम या राज्यांमध्ये ऊसाचे उत्पादन घेतले जाते. देशातील सुमारे ७० टक्के उत्पादन उत्तर भारतामध्ये तयार होते. उत्तर भारतामध्ये उत्पादन जरी जास्त असले तरी ऊस वाढीस हवामान प्रतिकूल असल्याने ऊसाचे व साखरेचे उत्पादन दक्षिण भारतातील राज्यापेक्षा कमी आहे. दक्षिण भारतामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, ओरिसा व केरळ ही राज्ये ऊस उत्पादनात अग्रेसर आहेत. या राज्यांपैकी महाराष्ट्रात सर्वात जास्त उत्पादन होते. मात्र ज्या काळात सहकारी साखर कारखान्यांची उभारणी झाली त्यावेळची परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती. बागायती क्षेत्र कमी होते आणि बारमाही पाण्याची व्यवस्था असणारे व प्रामुख्याने नदीकाठचे किंवा धरणक्षेत्रातील शेतकरीच ऊस पिकवत असत, पण तो देखील गूळ निर्मितीसाठी. गुळाला चांगला भाव क्वचितच मिळत असे. व्यापारी ठरवतील त्या दरात शेतकऱ्यांना तो विकावा लागे सुरूवातीला काही खासगी साखर कारखाने होते, पण ऊस उत्पादकांना ते रास्त भाव देत नसत त्यामुळे पारंपारिक पद्धतीने गूळ निर्मिती करणे हाच शेतकऱ्यांपुढे पर्याय असे.[३७]

प्रवरा नदीवरील धरणाच्या पाण्याचा लाभ घेण्यासाठी इ.स.१९२६ ला ब्रॅडी नावाच्या परदेशी कंपनीने हरेगाव ता.श्रीरामपूर येथे पहिला खासगी साखर कारखाना उभारला. या कारखान्याला नियमित ऊसपुरवठा होण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन काढून कारखान्याला ऊस लागवडीसाठी कायमची देऊन टाकली. शेतकऱ्यांची परवानगी, भरपाई, विस्थापितांचे पुनर्वसन असल्या  फंदात न पडता शेतकऱ्यांना उघडयावर टाकल ब्रॅडी कंपनीच यश आणि तिला मिळालेलं बागायती जमिनीचे आयत घबाड हे पाहून अनेक देशी

भांडवलदार गोदावरी, प्रवरा व नीरा खोऱ्यात एकवटले. इ.स. १९३० पासून पुढील २० वर्षात कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील ८५ हजार एकर जमीन पाटपाण्याच्या हक्कासह या उद्योगांच्या हवाली केली आणि हजारो शेतकऱ्यांना देशोधडीला लावले.[३८]

साखर उद्योगात शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाच पक्क्या मालात रूपांतर होणे हे विखे पाटलांना सुचिन्ह वाटत होते. परंतु हा उद्योग शेतकऱ्यांच्या मालकीचा असावा. शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेण्याऐवजी त्यांच्याकरवी ऊस उत्पादन करवून त्यांना योग्य मोबदला द्यावा. यासाठी ते धडपडत होते. इ.स.१९४५ मध्ये डॉ.ध.रा.गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बेलापूरच्या बागायतदार परिषदेत विखे पाटलांनी आपली ही मागणी ठामपणे मांडली. १) साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा असावा. २) साखर उद्योगासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढून न घेता त्यांच्याकडूनच ऊस उत्पादन करवून घ्यावे. विखे पाटलांचा हा विचार गाडगीळांना इतका पसंत पडला की, शेतकऱ्यांचे भागभांडवल जमवण्याची जबाबदारी त्यांनी विखे पाटलांवर टाकली. विखे पाटलांनी दोन लाख रूपये भाग भांडवल उभं करून १९५० साली देशातील पहिला शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना उभा केला. त्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांचा मोठा हिस्सा होता.[३९] केवळ भारतातच नव्हे तर आशिया खंडातील पहिला साखर कारखाना विठ्ठलराव विखे–पाटील यांनी इ.स. १९५० मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्रवरानगर (लोणी) येथे स्थापन केला त्यामुळे दुष्काळग्रस्त असणाऱ्या अहमदनगर जिल्ह्याच्या विकासास एक वेगळी दिशा मिळाली. त्यानंतर या साखर कारखान्याचा आदर्श डोळयापुढे ठेऊन शासनाने साखर कारखान्याचे जाळे देशभर पसरवले. त्यामुळे महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या ग्रामीण विकासाला एक नवीन दिशा मिळाली. हजारो लोकांना साखर उद्योगात रोजगार मिळाला.[४०]

### महाराष्ट्रातील साखर उदयोगाचा इतिहास –

वास्तविक भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना विठ्ठलराव विखे–पाटील व डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात नगर जिल्ह्यात उभा राहिला होता व तो यशस्वी होण्याची खात्री निर्माण झाल्यानंतर चारच वर्षानी इ.स.१९५५–५६ मध्ये कोपरगाव जवळ कोळपेवाडी येथे गणपतराव औताडे यांनी दुसरा सहकारी साखर कारखाना उभा केला.

महाराष्ट्रात सन १९५५ मध्ये एकूण १५ साखर कारखाने साखर उत्पादन करीत होते. त्यापैकी सहकारी क्षेत्रामध्ये दोन साखर कारखाने कार्यरत होते.[४१] या दोन्ही कारखान्यांचे यश पाहून इ.स.१९५९-६० मध्ये राज्यात आणखी दहा-बारा साखर कारखाने उभे राहिले तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीस प्रोत्साहन तर दिलेच, पण शासनाकडून शक्य तेवढे आर्थिक सहकार्यही देण्याचा प्रयत्न केला, असेच सरकारचे सहकार्य सहकार चळवळीला पुढेही मिळत गेले परिणामी इ.स.१९८० पर्यंत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांची संख्या शंभरावर जाऊन पोहोचली आणि साखर निर्मितीच्या बाबतीत इ.स.१९८८मध्ये उत्तर प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक पटकावला. याच काळात शेती तज्ज्ञांच्या मदतीने राज्यातील शेतकऱ्यांनी नवनवे प्रयोग करून ऊसाचे एकरी सरासरी उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला.उत्पादन क्षमता वाढवत ठेऊन साखर निर्मितीतही महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी खासगी साखर कारखान्यावर मात केली. साखर उद्योगाच्या दृष्टिने ही विशेष उल्लेखनीय बाब ठरली.[४२]

महाराष्ट्रातील उत्पादक सहकारी संस्थांत सहकारी साखर उद्योगांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. परवानापद्धतीत सहकारी साखर कारखान्यांना प्राधान्य दिल्याने अशा संस्थांची झपाटयाने वाढ झाली. ग्रामीण भागात औद्योगिकरणाचे फायदे पोहचविण्याचे कार्य सहकारी साखर कारखानदारीने केले आहे. सहकारी क्षेत्राने साखर उत्पादनातील आपला वाटा ६०% पर्यंत वाढविला असून खााजगी क्षेत्राशी तुलना करता सभासद शेतकऱ्यांना सहकारी साखर कारखान्यांनी ऊसाकरीता अधिक दर दिला आहे. प्रत्येक सहकारी साखर कारखान्याने थोडया फार फरकाने आपल्या कार्यक्षेत्रात विकास कामे केली असून त्याची ग्रामीण जीवनस्तर उंचावण्यास मदत झाली आहे.[४३]

महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीमध्ये साखर कारखान्यांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. सहकारी साखर उद्योग हा शेतीवर आधारित एक महत्त्वाचा प्रक्रिया उद्योग म्हणून विकसित झाला आहे. महाराष्ट्रातील साखर उदयोगाने ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत केली आहे. या साखर कारखान्यांमुळे हजारो गरीब शेतकऱ्यांच्या प्रगतीस चालना मिळाली. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना लोणी जि. अहमदनगर येथे प्रवरा सहकारी साखर कारखाना या नावानेइ.स. १९४८ मध्ये स्थापन झाला

व त्याचा पहिला गळीत हंगाम इ.स. १९५० मध्ये सुरू झाला.[४४] प्रा. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे–पाटील, तत्कालीन वित्तमंत्री वैकुंठलाल मेहता यांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना एकत्र आणले आणि सहकारी साखर कारखाना स्थापन करून वर्षानुवर्षे साखर कारखानदाराच्या कचाट्यात सापडलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या दुर्धर आयुष्यात चैतन्य फुलविले. अल्पावधीतच भरभराटीस आलेल्या प्रवरा कारखान्याचे प्रतिमान पश्चिम महाराष्ट्रात तात्काळ स्वीकारले गेले आणि सहकारी क्षेत्रात नव्या युगाचा उदय झाला. १९६० साली राज्यात १३ सहकारी साखर कारखाने होते.[४५] तर इ.स.२००९–१० मध्ये राज्यात एकूण २०१साखर कारखाने होते. त्यापैकी १७२ सहकारी क्षेत्रात आणि २९ खाजगी क्षेत्रात आहेत.[४६]

सहकारी साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी केलेले कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात जवळजवळ ९०% साखर कारखाने हे सहकारी क्षेत्रात असून कोकण वगळता संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने अस्तित्त्वात आहेत. जवळजवळ संपूर्ण राज्यभर व्याप्ती असणारा महाराष्ट्रातील हा एकमेव उद्योग म्हणावा लागेल. म्हणूनच या सहकारी साखर कारखान्यांना ग्रामीण विकासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. आर्थिक विकास हा इतर सर्व विकासांचा पाया आहे. आणि सहकारी साखर कारखान्यांनी हे कार्य सर्वप्रथम केले आहे. महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांनी स्वतःच्या पैशातून कोट्यवधी रूपयांच्या उपसा जलसिंचन योजना राबविलेल्या आहेत. नदयावरील बंधारे, पाझर तलाव, रस्ते यावर खर्च केला आहे. त्यामुळे हजारो एकर शेती पाण्याखाली आली आहे. उत्कृष्ट बियाण्यासाठी प्लॉट तयार करणे, कंपोस्ट खत तयार करणे, गोबर गॅस प्लॅट तयार करणे, माती प्रशिक्षण, प्रयोगशाळा काढून मोफत माती परीक्षण करणे, खते, कीटकनाशक पुरविणे, शास्त्रीय शेतीसाठी व जमीन सुधारणेसाठी साहाय्य करणे इत्यादी विविध योजनाच्या माध्यमातूनसहकारी साखर कारखान्यांनी ऊस शेतीच्या प्रगतीला महत्त्वाचे योगदान दिले आहे. अनेक साखर कारखान्यांनी टाकाऊपासून टिकाऊ पदार्थांची निर्मिती केली आहेत्यामध्येमद्यार्क निर्मिती, स्पेट वॉशपासून पोटॅश, स्पिरिट, ग्लिसरीन, ॲसिड, कागद, पार्टिकल बोर्ड, मिथेनॉल प्रकल्प, जनावरांचे खाद्य, वीजनिर्मिती इत्यादीचा समावेश होतो.[४७]

साखर कारखान्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील जनतेत व सहकारी कार्यकर्त्यांमध्ये नवा जोम व आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांनी जणू सहकाराचा नवा मंत्रच आत्मसात केला.

त्यामुळे सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरात इतर सहकारी संस्थांचे जाळे निर्माण झाले. सहकारी सूतगिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी दूध उत्पादन संस्था, शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या इतर सहकारी संस्था, सहकारी खरेदी–विक्री संघ असे अनेक उद्योग उभे राहिले. या उदयोगामुळे सहकारी पतपेढ्या व जिल्हा सहकारी बँका आर्थिकदृष्ट्या सुदृढ झाल्या. साखर कारखाने, इतर प्रक्रिया संस्था व पूरक उदयोगांमुळे ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी आली, ती सर्वांगीण विकासाला उपयुक्त ठरली. त्यामुळे ग्रामीण भागात विद्यार्थी वसतिगृहे, शाळा व कॉलेज्स मोठ्या प्रमाणात निघू लागली. आरोग्यकेंद्रे दवाखाने व तत्सम सेवा उपलब्ध झाल्या.[४८]

सहकारी साखर कारखाने ही महाराष्ट्राची अभिमानास्पद कमाई आहे. सहकारी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना स्थापन करण्याचे श्रेय महाराष्ट्राने घेतले आहे. राज्यातील साखर कारखान्यांचे १३ लाख सभासद आहेत. त्यापैकी १२ लाख ऊस उत्पादक शेतकरी सभासद आहेत. राज्यात साखर कारखान्यामध्ये एकूण अंदाजे रू. ३००० कोटींची गुंतवणूक आहे व त्यांची उलाढाल अंदाजे रू. ५००० कोटी आहे. दर कारखान्यामागे सरासरी सुमारे १६,००० सभासद आहेत. त्यापैकी ९३% लघु वा सीमांत शेतकरी आहेत. गाळप हंगामात दर कारखान्यामागे सुमारे ५००० व्यक्तींना रोजगार मिळतो. देशातील १/३ साखर उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होते.[४९]

साखर कारखानदारीमुळे महाराष्ट्राचा मोठा विकास झाला असला तरी इ.स. १९८० नंतरच्या कालखंडात साखर कारखाने आजारी पडू लागले. कारखान्याचे व्यवस्थापन आणि ऊस व्यवस्थापन यासंबंधी अनेक क्लीष्ट प्रश्न निर्माण झाले. मुक्त भांडवली आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे सहकारी साखर कारखानदारीच्या अस्तित्त्वाबाबत शंका निर्माण झाली. मुक्त भांडवली आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून या उदयोगाशी संबंधित असे दोन कार्यक्रम सातत्याने पुढे येऊ लागले. १) परवाना मुक्तीकरण २) साखर उदयोगाचे विनियंत्रण सुरूवातीच्या काळात ऊस पिकविल्या जाणाऱ्या कार्यक्षेत्राचा अग्रक्रमाने विचार करून साखर कारखान्यांचे परवानगे दिले गेले. कारखान्यांचा विस्तार आणि जलसिंचन योजनांचा धडक कार्यक्रम यामुळे ऊसक्षेत्र वाढत गेले आणि साखर कारखानदारी निर्भयपणे उभी राहू लागली. सोयीस्कर पण चुकीच्या परवानाधोरणामुळे कारखान्यांचे कार्यक्षेत्र निर्माण होत गेले. पण

कार्यक्षेत्राच्या सावळ्या गोंधळातून ऊसाची पळवापळवी सुरू झाली. झोनबंदीची संकल्पना त्यातूनच निघाली. गेल्या तीस वर्षात साखर कारखाने आणि ऊसपुरवठा यांचे गणित कधी जमले नाही. कारण कारखान्यांची उभारणीच अर्थशास्त्रीय पायावर झाली नाही. मुक्त भांडवली आर्थिक धोरणामुळे साखर कारखान्यांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव पुढे येत आहे. मात्र खाजगीकरणामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक अटळ आहे.[५०]

व्यवस्थापन शास्त्राच्या तत्त्वाप्रमाणे साखर कारखाने चालविण्यापेक्षा सामाजिक व राजकीय हिताची जोपासना यामुळे साखर कारखानदारी व्यावसायिक पार्श्वभुमीवर कमकुवत ठरली आहे. कारखान्यांच्या गैर केंद्रीकरण आणि गैर व्यवस्थापनामुळे साखर कारखानदारीचा आजारीपणा दिवसेंदिवस वाढत आहे. एकूणच अलिकडच्या कालखंडात विविध कारणांमुळे साखर कारखानदारीचे बिघडलेले नियोजन त्यात झालेला विकृत राजकीय हस्तक्षेप हाच त्याच्या आजारपणाचा प्रमुख आधार आहे.[५१] इ.स. १९८० नंतरच्या कालखंडात साखर कारखाने कर्जबाजारी होऊ लागल्यानंतर १९८३ साली नियोजन मंडळच्या एका कार्यगटाने साखर कारखानदारी संबंधी काही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने कारखान्याच्या कमाल उत्पादन क्षमता, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण, कारखान्याचे राखीव कार्यक्षेत्र, ऊस दर इत्यादीचा समावेश आहे. नवीन परवाना नितीच्या संदर्भात असा नियम केला की ज्या परिसरात ऊस क्षेत्र भरपूर आहे त्याच परिसरात कारखान्यांना परवानगी द्यावी. तसेच त्या कारखान्याचे कार्यक्षेत्र ठरवून घ्यावे. साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्राचा प्रश्न अत्यंत गंभीर आणि वादाचा मुद्दा झाला. त्यावेळी कारखान्यांचे कार्यक्षेत्र ३० कि.मी. वरून ४० कि.मी. च्या परिघात असावे असा निर्णय केला. परंतु कालांतराने त्यामध्ये बदल होऊन साखर कारखान्यांच्या मागणीनुसार व गरजेनुसार कार्यक्षेत्र २५ कि.मी. परिघाचे निश्चित करण्यात आले. गरज पडल्यास हे कार्यक्षेत्र काही विशिष्ट साखर कारखान्यांसाठी १५ कि.मी. पर्यंत कमी करण्यात येईल असेही घोषित केले गेले.[५२]

२० ऑगस्ट १९९८ रोजी साखर उद्योग परवाना मुक्त म्हणून घोषित केल्यानंतर या क्षेत्रात खाजगी क्षेत्राची वाढ होऊ लागली. इ.स.२००८–०९ मध्ये खाजगी साखर कारखान्यांची संख्या २८ होती खाजगी साखर कारखान्यांची संख्या उत्तरोत्तरसातत्याने वाढत आहे. खाजगी

साखर कारखाने ऊस उत्पादनातून फायदयाचे प्रमाण वाढवत असून त्यांची स्पर्धा सहकारी क्षेत्राला अल्पकाळात अडचणीची ठरणार आहे.[५३]

खाजगी साखर कारखान्यांच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी आत्मपरीक्षण करून सेवकवर्गात बचत, व्याजाने घेतलेल्या पैशाचा काटेकोरपणे वापर, अनाठायी भांडवली व इतर खर्चावर अंकुश, स्टोअर्स स्टॉक किमान पातळीवर ठेवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न. कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादकांना सभासद करून घेणे या गोष्टी केल्यावरच कारखान्याची आर्थिक स्थिती मजबूत राहील. तसेच खुल्या स्पर्धेच्या काळात सहकारी साखर कारखान्यांना साखरेची गुणवत्ता आणखी सुधारावी लागणार आहे व आधुनिक व्यवस्थापनाच्या पद्धतीचा अवलंब करावा लागणार आहे. कारखान्याच्या उत्पादनावर व कारखाना चालवताना होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. अनेक कारखान्यांच्या व्यवस्थापनात बेहिशेबीपणा व त्यातून होणारी भ्रष्टाचाराची प्रकरणे यासारख्या गोष्टींवर योग्य ती कारवाई होत नाही. तसेच नोकरभरतीत व कारखान्याच्या महत्त्वाच्या भागावर कार्यक्षमता किंवा आवश्यक ते निपुणता नसलेले स्वत:च्या मर्जीतील व्यक्ती नेमण्याच्या पद्धतीमुळे कारखान्याची कार्यक्षमता ढासळते व आपल्या नेतृत्त्वाची बदनामी हाते ती टाळण्याचे व आधुनिक प्रशासन व्यवस्था प्रस्थापित करण्यावर भर दिला तरच पुढच्या काळात सहकारी साखर कारखान्यांचा टिकाव लागणार आहे.[५४]

सहकारी साखर कारखाना हा एक आर्थिक व्यवसाय आहे. तो त्या निकषावरच चालला पाहिजे. परंतु सहकारी साखर कारखान्यांचे राजकीयकरण झाले. सहकारी साखर कारखान्यांकडे राजकीय प्रभुत्त्वाचे साधन म्हणून पाहिले जाऊ लागले. प्रवरा कारखाना सुरू झाला. तो ऊस पिकविण्यासाठी पाणी उपलब्ध होते म्हणून परंतु नंतर राजकीय नेते आपला प्रभाव पाडण्यासाठी पाणी उपलब्ध असो वा नसो आपल्या प्रदेशात आपल्या अध्यक्षतेखाली साखर कारखाना सुरू केलाच पाहिजे म्हणून प्रयत्नशील झाले. सरकारवर राजकीय दबाव आणून लायसेन्स व आर्थिक साहाय्य मिळविण्यात यशस्वी झाले. राजकारण, सरकारी हस्तक्षेप आणि घराणेशाही याचा सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनावर अनिष्ट परिणाम झाला. असे असले तरीही साखर उत्पादनामुळे होणारी कोट्यावधी रूपयांची उलाढाल, त्यातून निर्माण होणारा रोजगार, कारखान्यांशी संलग्न विविध व्यवसाय यामुळे महाराष्ट्राचा आर्थिक व

सामाजिक चेहरामोहरा बदललेला आहे. समाजातील दुर्बल घटकांना मिळालेला आधार हे या सर्वांगीण विकासाचे दृश्यफलित आहे यात शंका नाही.

**कोष्टक क्र. ६**

**महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा विकास**

| वर्ष | सहकारी साखर कारखाने | खाजगी साखर कारखाने | एकूण साखर कारखाने |
|---|---|---|---|
| १९५१ | १ | १२ | १३ |
| १९६१ | २० | १२ | ३२ |
| १९७१ | ४८ | ११ | ५९ |
| १९८१ | ७१ | ११ | ८२ |
| १९९१ | ९३ | ८ | १०१ |
| २००१ | १७० | ६ | १७६ |

(संदर्भ : तुपे(डॉ), सु.दा., महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीची वाटचाल, पाटील (डॉ.) जे.एफ., भालबा(डॉ) विभुते(संपा.), महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, नोव्हेंबर, २०११, पृ.२१३)

एकंदरीत महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी शेतकरी, कष्टकरी व शेतमजुरांच्याजीवनात आमुलाग्र परिवर्तन केले. शेतकऱ्यांना प्रथमच आपण शेतकरी असण्याचा अभिमान वाटू लागला. या उद्योगाने ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी मोठया प्रमाणावर मदत केली आहे. मात्र आज या उद्योगाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. साखर कारखान्यांच्या संख्येमध्ये जरी भर पडत असली तरी कारखान्यांचे आजारी पडण्याचे प्रमाणही वाढत आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे ऊस लागवडीखालील क्षेत्र कमी होत आहे. परिणामी साखर उत्पादनाच्या वृद्धी दरामध्ये मागील काही वर्षामध्ये घट झाल्याचे दिसून येते. यावर दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता आहे.

## ➢ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आणि दूग्ध व्यवसाय–

इ.स.१८८२ मध्ये जगातील पहिली सहकारी दूग्ध विकास संस्था डेन्मार्क या देशात जेडींग येथे सुरू झाली. डेन्मार्क या देशाने दूग्धव्यवसायाच्या सहाय्याने आपल्या देशाची मोठया प्रमाणात प्रगती केली. महाराष्ट्रातील तीन जिल्ह्याएवढे क्षेत्रफळ असणारा डेन्मार्क देश संपूर्ण युरोपला दुधाची निर्यात करतो. त्यातून त्याने आपल्या देशाचा आर्थिक विकास केला भारतामध्ये इ.स १९१३ मध्ये उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे पहिली दूग्ध सहकारी संस्था

स्थापन करण्यात आली त्यानंतर बडोदा, बेळगाव, धुळे, भागलपूर, हुबळी, बागलकोट, कलकत्ता, या दूग्ध संस्था स्थापन झाल्या.[५५]

महाराष्ट्राचे प्रशासकीयदृष्टया मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र असे चार विभाग आहेत. दूग्ध व्यवसायाच्या दृष्टिकोनातून पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर कोकण आणि मुंबई असे सात विभाग आहेत. महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये दूग्ध व्यवसायाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. मुंबई शहराला स्वस्त दरात दुध मिळावे या उद्देशाने नागरी पुरवठा विकास प्रशासनाच्या नियंत्रणाखाली मुंबई दूध योजनेची स्थापना इ.स.१९४७ मध्ये झाली. तर इ.स.१९५० मध्ये दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी 'आरे' गवळी वाडयाची स्थापना केली. इ.स.१९५०–५१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने पुणे येथे पहिली सहकारी तत्त्वावरील दूध संस्था स्थापन केली. त्याचवेळी पुणे येथे दूध संकलन, शीतकरण, प्रक्रिया व वितरण करणारा प्रकल्प सुरू झाला. परिणामी येथील लोकांना दुधाचा पुरवठा नियमितपणे सुरू झाला, तसेच महाराष्ट्राच्या इतर भागातील दुधाची गरज भागविण्यासाठी दुग्धविषयक धोरणात बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली यासाठी इ.स.१९५८ मध्ये राज्यात स्वतंत्र दुग्धव्यवसाय खाते निर्माण करण्यात आले आणि या खात्याकडे सहकारी दूध संस्थांची नोंदणी करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे अशा प्रकारचे अधिकार देण्यात आले. इ.स.१९६४ पर्यत महाराष्ट्र राज्यातील दूध व्यवसायावर पूर्णपणे सरकारचे नियंत्रण होते इ.स.१९६४ नंतर मात्र या व्यवसायात सहकाराने प्रवेश केला. ९ जून १९६७ मध्ये महराष्ट्र राज्य सहकारी दूध संघाची स्थापना झाली. राज्यात इ.स.१९७०–७१ मध्ये दूध महापूर योजनेचा पहिला टप्पा सुरू झाला. डिसेंबर १९७१ मध्ये राज्यात सहकारी तत्वावरील पहिली दुधावर प्रक्रिया करणारी दूध शाळा कात्रज पुणे येथे सुरू झाली. राज्यामध्ये सहकारी तत्त्वावरील दूध व्यवसायाचा विकास करण्यासाठी सहकार खाते आणि दूध व्यवसाय खाते निर्माण करण्यात आले.[५६]

**महाराष्ट्रातील सहकारी खाते आणि सहकारी दूध संस्थांची रचना –**

राज्यात दूध व्यवसायाच्या निकोप आणि जलद वाढीसाठी दूध व्यवसाय खाते आणि सहकार खाते यामध्ये समन्वय साधण्याची गरज भासू लागली. महाराष्ट्र शासनाने सहकारी खात्यातील काही अधिकारी व कर्मचारी यांना इ.स.१९७८–७९ मध्ये दुग्धव्यवसाय खात्याकडे वर्ग करण्यात आले. राज्य पातळीवर सहनिबंधक सहकारी संस्था (दूध) व आयुक्त दूध

विकास खाते, विभागीय पातळीवर उपनिबंधक सहकारी संस्था आणि दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, जिल्हा पातळीवर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था आणि जिल्हा दूग्ध व्यवसाय विकास अधिकारी अशी पदे निर्माण केली. परिणामी दूग्ध व्यवसाय खाते व सहकारी खाते यांच्यात दूग्ध व्यवसायाच्या विकासासाठी समन्वय साधला गेला.

राज्यातील दूग्ध व्यवसायाचा विकास होण्यासाठी इ.स.१९५१ मध्ये आरे दुग्धशाळा, इ.स.१९६१ मध्ये वरळी, इ.स.१९७५ मध्ये कुर्ला, इ.स.१९८१ मध्ये गोरेगाव या ठिकाणी दूग्ध प्रक्रिया शाळांची उभारणी करण्यात आली. दुधावर प्रक्रीया करून, होमोजिनाइजर व पाश्चराईजड दुधाच्या शिलबंद पिशव्या तयार करून ते दूध मुंबई व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विकले जाऊ लागले तसेच जादा दुधाचे दुग्धजन्य पदार्थ उदा.पेढा, चीज, तूप, पनीर, श्रीखंड, आम्रखंड, आईस्क्रीम, बटर, मसाला दूध, दही, ताक, लस्सी इत्यादी पदार्थ तयार करून विक्री केली जाऊ लागली, यामुळे दूध उत्पादकांना दूध खरेदीची निश्चित हमी मिळू लागली. परिणामी महाराष्ट्रातील दुधाचे उत्पादन वाढले शासनाने दूग्ध व्यवसायाच्या विकासासाठी राज्यात पुणे, अहमदनगर, धुळे, औरंगाबाद, जळगाव, उदगीर, भूम, उस्मानाबाद, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी दुग्धशाळा उभारल्या, दूध पावडर कारखाने उभारले त्यामुळे दुधाला कायमची बाजारपेठ मिळाली.[५७]

गेल्या पाच दशकांच्या काळात महाराष्ट्र शासनाच्या प्रोत्साहनपर पुढाकाराने दुग्धव्यवसायाच्या क्षेत्रातही सहकारी तत्त्वांचा अवलंब मोठया प्रमाणात होऊ लागला. गाव पातळीपासून तालुका व जिल्हा स्तरापर्यंत दूध उत्पादकांच्या सहकारी संस्था व त्यांचे संघ स्थापन करण्यास महाराष्ट्र शासनाने जाणीवपूर्वक उत्तेजन दिले. त्यासाठी अनेक प्रकारच्या योजना आखल्या कर्जपुरवठा, सबसिडी, कमिशन, दूध खरेदीच्या दरांची निश्चिती, संकलित दुधाची किंमत विनाविलंब चुकती करण्याची व्यवस्था, शास्त्रीय दृष्टिकोनातून दुग्धोत्पादन, दूध उत्पादक सभासदांची संख्या वाढविणे अशा अनेक प्रकारांनी महाराष्ट्र शासनाने सहकारी दूग्ध व्यवसायाच्या विकासाला हातभार लावण्याचे धोरण जाणीवपूर्वक अवलंबिले. त्याच्या जोडीला दूध महापूर योजनेचा पुरस्कार आणि राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये दूध महापूर योजना कार्यान्वित होऊ शकली अगर झाली नाही अशा जिल्ह्यांतून राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या आर्थिक सहकार्याच्या योजनेची अंमलबजावणी हया उपायांचा अवलंब करून

राज्यातील सहकारी दूध व्यवसायाच्या विकासाला महाराष्ट्र शासनाच्या दुग्धव्यवसाय विकास विभागाने मोठीच चालना देण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रातील दूध व्यवसायाची सहकारी तत्त्वावर संघटित स्वरूपात आखणी करण्याचा पहिला प्रयत्न इ.स.१९५१ मध्ये पुणे जिल्ह्याच्या काहीतालुक्यात करण्यात आला. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर इ.स.१९५८ मध्ये महाराष्ट्र शासनाने आपल्या दुग्धव्यवसाय विकास विषयक धोरणात सहकारी तत्त्वाचा खास अंगीकार केला. त्यानुसार महाराष्ट्रातील खेडयापाडयातून प्राथमिक सहकारी दूध उत्पादकसंस्थांची निर्मिती करण्यास सुरूवात झाली. हया संस्थांच्या स्थापनेमागे प्रामुख्याने ग्रामीण भागातील दूध उत्पादकांना वाजवी भाव मिळवून देणे, त्यांच्या दुधाला शाश्वत खरेदीची हमी देणे आणि संकलित दुधाला शहरी भागात योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा उद्देश होता. कालांतराने प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्थांच्या तालुका आणि जिल्हा पातळीवर प्रातिनिधिक संस्था म्हणजे संघ स्थापन करण्यात येऊन त्या संघाकडे संकलित दुधाची साठवणूक, वाहतूक आणि संकलित दुधाचे वितरण अशी कामे सोपविण्यात आली. हया व्यवसायाला पश्चिम महाराष्ट्रामध्ये विशेष अनुकुलता लाभल्यामुळे तेथे त्याची वाढ झपाटयाने झाली तर राज्याचे विदर्भ, मराठवाडा आणि कोकण हे विभाग त्यामानाने भौगोलिक तसेच साधनसंपत्तीच्या उपलब्धतेच्या दृष्टिने तेवढेसे अनुकूल न ठरल्यामुळे तेथील प्रगतीचा वेग काहीसा  मंद राहिला.[५८] महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय हा जरी शेती हा असला तरी त्याला जोडव्यवसाय म्हणून प्राधान्याने जो व्यवसाय सुचविला जातो तो दुग्धव्यवसाय होय.

ग्रामीण भागातील लहान शेतकरी, भूमिहीन मजूर यांना उदरनिर्वाहाचे साधन पुरविण्याचे कार्य या व्यवसायाने केले आहे. महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या दूध उत्पादन संस्थांचे वर्गीकरण दोन भागात केले जाते. एक म्हणजे ग्रामीण किंवा तालुक्याच्या पातळीवर काम करणाऱ्या दूध उत्पादन सहकारी संस्था आणि दुसरे म्हणजे जिल्हा पातळीवर कार्यरत असणारे दूध उत्पादक संघ सन १९६५ पासून महाराष्ट्रात ग्रामीण पातळीवरील सहकारी दूध संस्थांचा विकास सातत्याने होत आहे. महाराष्ट्रातील जिल्हा दूध संघाची संख्या इ.स. १९६१ ते इ.स. २००१ या काळात १९ वरून ३५ पर्यंत वाढली.[५९]

सध्या भारतात सुमारे १.२५ लाख सहकारी दूध संस्था असून त्यापैकी २५००० सहकारी संस्था महाराष्ट्रात (२०%) आहेत. देशात २२ राज्य सहकारी दूध संघ असून महाराष्ट्रातही एक संघ कार्यान्वित असून दररोज आपल्या राज्यात ३० लाख लिटरपेक्षा जास्त दुधाची हाताळणी सहकारात होत आहे. तेवढ्याच दूधाचे संकलन, प्रक्रिया व विक्री खाजगी डेअरीमार्फत होत आहे. दुग्धव्यवसायाच्या विकासात महाराष्ट्र हे पुढारलेले राज्य आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर आदी ३६ ठिकाणी दूध योजना राबविली जाते. त्यापैकी आठ ठिकाणी सहकारी दुग्धयोजना आहेत. राज्यात १२२ शीतकरण केंद्रे आहेत. दूधापासुन दूधभुकटी, लोणी, चीज, तूप तयार करून त्या पदार्थांची विक्री केली जाते. मिरज, उदगीर, अकोला येथे दुधाची पावडरकरणारे कारखाने आहेत. दुग्धव्यवसाय प्रकल्प 'ऑपरेशन फ्लड' खाली इ.स. १९७१ नंतर विशेषत्वाने राबविला गेला. दुधाचे उत्पादन वाढावे, भाकड जनावरांची संख्या कमी करून अधिक दूध देणाऱ्या जनावरांची पैदास व्हावी, जनावरांना सकस आहार मिळावा, गरीब शेतकऱ्यांचा व्यवसायात सहभाग असावा यासाठी विशेष प्रयत्न झाले. इ.स. १९८३ पर्यंत राज्यात बाहेरून दूध आणले जाई मात्र सध्या देशातील विविध राज्यांमध्ये रोज दूध पाठविले जात आहे. दूधाच्या महापूर योजनेमुळे १४ लाख शेतकऱ्यांना जोडधंदा मिळाला आहे. त्यापैकी ७०% शेतकरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल, हरिजन, गिरीजन असे आहेत.[६०]

दुग्धव्यवसाय हा शेतकरी कुटुंबाचा एक महत्त्वाचा जोडव्यवसाय आहे. विशेषत: त्यात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय आहे. भूमिहीनही हा व्यवसाय उपजिविकेचे साधन म्हणून करू शकतात. दुग्धव्यवसायामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी व्हायला मदत झाली आहे. फूड ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाच्या अहवालानुसार शेतकऱ्यांकडे एक गाय असेल तर १६% आणि एक म्हैस असेल तर २४% दारिद्र्य कमी होते. सहकाराच्या माध्यमातून झालेल्या धवल क्रांतिचे फायदे संपूर्ण महाराष्ट्राला मिळाले आहेत.[६१] सध्या महाराष्ट्रात गोकुळ, वारणा, गोविंद, कोयना, शिवामृत, लोकमंगल, दूध पंढरी, कृष्णा, कोयना यासारख्या दूध संघांनी आम्रखंड, श्रीखंड, लस्सी, पेढे यासारख्या उपपदार्थाचीनिर्मिती सुरू केली आहे. परिणामी ग्रामीण व शहरी भागातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.[६२]

दूग्ध व्यवसायाच्या विकासाच्या संदर्भातील महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष व जाणीवपुर्वक प्रयत्नांमुळे आणि राज्यातील सहकारी संस्थांनी त्या प्रयत्नांना दिलेल्या मनमोकळ्या

प्रतिसादामुळे आज महाराष्ट्रातील दूध उत्पादनात लक्षणीय वाढ झालेली आहे. भारतातील अन्य कोणत्याही राज्यापेक्षा मोठ्या प्रमाणात सहकारी चळवळीचा अवलंब महाराष्ट्रात करण्यात आला आहे. आजमितीस महाराष्ट्रात ग्रामपातळीवरील प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्था, तालुका, जिल्हा दूध संघ आणि राज्याच्या शिखर पातळीवरील महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ अशी त्रिस्तरीय सहकारी यंत्रणा कार्यरत आहे.[६३]

**कोष्टक क्र. १०**

**महाराष्ट्रातील सहकारी दूध उत्पादक संस्थांची प्रगती (रूपये लाखात)**

| बाब | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| संस्थांची संख्या | ४३१ | २०२१ | ७८१९ | १४२८४ | २२४६६ |
| सभासद संख्या | १५५ | १२६३ | ७०३० | १३१०१ | १५१८२ |
| भाग भांडवल | ९ | ६२ | २८८ | ३१३१ | ६५९४ |
| पैकी शासनाचे | N.A | २ | २ | ८ | ७ |
| नफ्यातील संस्था | १५६ | ८३३ | ४०९१ | ६७६२ | १२२६७ |
| नफा | २ | १३ | १९७ | ८९५ | १०७५ |
| तोट्यातील संस्था | १३३ | ६९१ | २०२३ | ३११४ | ९६३४ |
| तोटा | ० | ५ | २६ | २५० | ६५४२ |

(संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ–एका दृष्टिक्षेपात २०१५ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. पृ.३०)

वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, सन १९६१ पासून महाराष्ट्रातील सहकारी दूध संस्थांचा विकास सातत्याने होत आहे. एकूण दूध उत्पादक संस्थांची संख्या इ.स. १९६१ ते इ.स. २००१ या काळात ५२ पटीने वाढली आहे. तर त्यांची सभासद संख्या १००० पटीने वाढली आहे. वरील कोष्टकावरून एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, नफ्यातील संस्थाचे प्रमाण जरी वाढत असले तरी तोट्यातील संस्थांचे प्रमाण त्यापेक्षा अधिक वेगाने वाढत आहे. सहकारी संस्थांची वाढती अकार्यक्षमता आणि खाजगी दूध उत्पादक संस्थांची वाढती स्पर्धा या कारणामुळे सहकारी दूध व्यवसायासमोर मोठे प्रश्न उभे राहिल्याचे दिसून येते. शेतीपूरक असणारा हा दूग्ध व्यवसाय जर पूर्णपणे भांडवलदारांच्या हातात गेला तर शेती व दूग्ध व्यवसाय हे दोन्हीही नेस्तनाबूत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील दूग्ध व्यवसायास चालना देण्यासाठी सहकार चळवळ प्रभावशाली करण्याची नितांत आवश्यकता आहे.

भारत सरकारचे यशस्वी धोरणापैकी दुग्धव्यवसाय विकास ही अत्यंत यशस्वी ठरलेली एक योजना आहे. कारण सहकारी, खासगी दूध व्यवसायाचे माध्यमातून शेतकऱ्याने घरी खावयास ठेऊन विक्री केलेले दूध शहरातील ग्राहकास मिळते आणि शहरातील पैसा खेड्यात येतो. यामुळे खेडे आणि शहर यात संपर्क राहून दळण वळण वाढले. महत्त्वाचे म्हणजे दूध महापूर या सुसूत्र शास्त्रीय पायावर आधारित योजनेमुळे ५०% महिलांना समान हक्काचा दर्जा लाभला आहे. किंबहुना महिलांनीच दुध व्यवसायास चालना दिली आहे. म्हणून गेल्या ५० वर्षात दूग्ध व्यवसायातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा सामाजिक, आर्थिक विकास साधला आहे.

गाव आणि तालुक्याच्या पातळीवर काम करण्याऱ्या दूग्ध उत्पादक संस्था जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या जिल्हा दूध सहकारी संघाशी सलग्नित असतात. जिल्हा संघ सलग्नित संस्थाचे दूध संकलित करून विक्री करण्याचे काम करतो. या संघामार्फत ग्रामीण शेतकरी हा शहरी ग्राहकाशी जोडण्याचा प्रयत्न करतात या संघाकडे दूध खराब होऊ नये म्हणून शीतगृहाची सोय केली जाते. त्यांची प्रगती पुढील कोष्टकामध्ये दर्शविली आहे.

**कोष्टक क्र.११**

**महराष्ट्रातील जिल्हा सहकारी दूध संघांची प्रगती**

| **वर्ष** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|
| संघाची संख्या | १९ | ४६ | ९० | ७१ | ६५ |
| सभासद | २० | ९६ | १६१ | २४३ | ४६८३५ |
| भागभांडवल | १ | ५५ | ३९१ | ११६६ | ४७२५ |
| पैकी शासनाचे | – | ८ | ४२ | १५९ | ५९ |
| स्वनिधी | १ | १२३ | ११५० | ४२७२ | १२९९८० |
| देय कर्ज | ७ | १२१ | १००७ | ३८६८ | २२७०९ |
| खेळते भांडवल | १० | ३४५ | २१०३ | २२६६३ | १०२८५१४ |
| दूध संकलन किमंत | ७ | ७८४ | ८५४१ | २०१७५ | १२८५७८ |
| दूध व दूग्ध पदार्थ विक्री किंमत | ८ | ९०४ | ८८३१ | ३५१४३ | १३१११० |
| नफ्यातील संस्था | ६ | २३ | ५१ | ३६ | ४२ |
| नफा | ० | १२ | २९ | १४८ | १३०१९ |
| तोटयातील संस्था | ९ | २० | ३० | २२ | २२ |
| तोटा | ० | ८ | ५२ | २५८ | ७६४२ |

(**संदर्भ** : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ–एका दृष्टिक्षेपात २०१५ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. पृ.२७)

वरील कोष्टकात महाराष्ट्रातील जिल्हा दूग्ध सहकारी संघाची संख्या इ.स.१९६१ ला १९ होती. त्यात वाढहोऊन इ.स. २००१ ला ती ६५ झाली आहे. याच कालावधीत सभासद संख्या २००० होती. त्यात वाढहोऊन २००१ मध्ये ४६,८३५ झाली. भागभांडवल १ लाखावरून ४,७२५ लाख रूपये झाले. दूध संकलनाची किंमत ७ लाख रूपयावरून इ.स. २००१ मध्ये १,२८,५७८ लाख रूपये झाली. या संघानी दूध व दूग्धजन्य पदार्थाची विक्री इ.स. १९६१ मध्ये ८ लाख केली होती. त्यात वाढ होऊन इ.स.२००१ मध्ये १,३१,११० लाख रूपये झाली. येथे एक बाब निदर्शनास येते की, ग्रामीण व तालुका पातळीवर सहकारी दूग्ध उत्पादन संस्थाप्रमाणेच जिल्हा पातळीवरील दूध संघांच्या तोटयाचे प्रमाण ५० टक्केच्या जवळ आहे. ही गोष्ट विचार करायला लावणारी आहे.

## ➢ महाराष्ट्रातील शिक्षणाचा विकास आणि सहकारी चळवळ –

ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा विकास करण्यात सहकारी चळवळीचा कार्यभाग मोठा आहे, यात शंका नाही. अनेक सहकारी साखर कारखान्यांनी व इतर सहकारी संस्थांनी आपापल्या परिसरात शाळा, महाविद्यालये चालवून ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रसार केला आहे. ही महाविद्यालये या सहकारी कारखान्यांनी चालू केली नसती तर बहुसंख्य ग्रामीण युवक–युवती शिक्षणापासून वंचित राहिली असती.[६४] इ.स. १९८० नंतरच्या कालखंडात व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणावर भर देणारे शिक्षण आले. अशा संस्थांच्या उभारणीत वर्कशॉपव प्रगत तंत्रज्ञान लागत असल्यामुळे अनुदानास पैसे अपुरे पडू लागले. त्यातच शैक्षणिक संस्थांच्या विस्ताराची प्रादेशिक मागणी समतेच्या दृष्टिने आवश्यक होती. यातून एक चांगला मार्ग निघाला तो म्हणजे सहकारी संस्थांना शिक्षण संस्था काढण्यास प्रोत्साहन मिळाले व अनेक सहकारी संस्थांनी महाराष्ट्राच्या विविध भागात शैक्षणिक संस्था काढून महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती साधली .[६५]

## ➢ महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरण्या –

महाराष्ट्रात पूर्वीपासूनच वस्त्रोद्योगाचा विकास झालेला आहे. भारतात सन २००९ अखेर एकूण १,६५३ सूतगिरण्या तामिळनाडूराज्यात आहेत तरत्याखालोखाल १२८ सूतगिरण्या महाराष्ट्रात आहेत. एकूण देशातील सूतगिरण्यांपैकी १,४३९ सूतगिरण्या खाजगी क्षेत्रात असून

सहकार क्षेत्रातील सूतगिरण्यांची संख्या १४५ इतकी आहे. यापैकी बहुसंख्य सूतगिरण्या महाराष्ट्रात आहेत.[६६]

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात झाले असले तरी कृषिप्रधानता कायम आहे. कापूस हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे पीक आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे सहकारी साखर कारखाने ऊस शेतकऱ्यांचे हित साधू शकेल त्याचप्रमाणे सहकारी सूतगिरण्या कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना लाभदायक ठरू शकतात. अशा कल्पनेतून महाराष्ट्रात सहकारी सूतगिरण्या सुरू झाल्या. त्यातल्या बहुसंख्य कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या आहेत. विदर्भामध्ये कापूस उत्पादन अधिक होत असले तरी सूतगिरण्या मात्र पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्थापन झाल्या आहेत. मुबलक कापूस उत्पादनामुळे राज्यात सूतगिरणी व्यवसाय स्थिर झालेला आहे. विशेष म्हणजे इतर राज्यांमध्ये सूतगिरण्या खाजगी क्षेत्रात अधिक प्रमाणात आहेत. स्थानिक पातळीवर कच्चा माल (कापूस) मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे सूतगिरण्यांच्या स्थापनेला चालना मिळाली. देशाच्या एकूण स्थापित क्षमतेपैकी १०% चात्या सहकारी क्षेत्रात असून यातील ३५% चात्या एकट्या महाराष्ट्रात आहेत[६७]

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात आयको, नवमहाराष्ट्र, डेक्कन अशा नामवंत सहकारी सूतगिरण्यांच्या पाठोपाठ गणेश, दत्त, गडहिंग्लज, इंदिरा महिला तर सोलापूर जिल्हयात शेतकरी सहकारी सूतगिरणी सांगोला अशा अनेक सहकारी सूतगिरण्या अस्तित्त्वात आल्या. इचलकरंजीला महाराष्टातले मँचेस्टर म्हणून ओळखले जाऊ लागले. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या सूतगिरण्यांना मदत करावयाच्या सरकारी धोरणामुळे आणि एनसीटीसीच्या मदतीमुळे सहकारी सूत गिरण्यांच्या स्थापनेला उत्तेजन मिळाले. स्वातंत्र्योत्तर काळात वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देण्याबरोबर ग्रामीण परिसराच्या सामाजिक–आर्थिक विकासाच्या हेतूने सहकार क्षेत्रात सूतगिरण्यांच्या स्थापनेला चालना देण्यात आली. रोजगार निर्मिती, राज्यातील कापूस शेतीला प्रोत्साहन, ग्रामीण भागांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये (रस्ते, पाणी आरोग्य इ.) वाढ, सहकार तत्त्वप्रणाली तळागाळात रूजविण्याचा प्रयत्न याबाबत सहकारी सूतगिरण्यांचे कार्य मोलाचे ठरले आहे.[६८]

सध्याच्या काळात सहकारी सूतगिरण्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. महाराष्ट्रातील बहुतेक सूतगिरण्यांमध्ये जुनी यंत्रसामग्री प्रस्थापित करण्यात आली आहे.

आधुनिकीकरणाची मंदगती हे एक प्रमुख कारण सूतगिरण्यांना अडसर ठरत आहे. कच्च्या मालाच्या किंमतीतील वाढ हेही एक महत्त्वाचे कारण आहे. सहकारी सूतगिरण्यांना लागणारा कापूस गरजेनुसार सभासद असलेल्या शेतकऱ्यांनी पिकवावा हे सहकारी व्यवस्थेनुसार योग्य व्यवस्थापन आहे. परंतु सरकारच्या ''मोनोपोली प्रोक्युरमेंट'' योजनेनुसार कापूस पणन महासंघाकडून कापूस खरेदी करावी असे बंधन घालण्यात आले. पणन संघाने बाजारभावापेक्षा अधिक दराने कापूस उपलब्ध केल्याने सूतगिरण्यांच्या अर्थशास्त्रावर प्रतिकूल परिणाम झाला. बाजारात होणारे सूतभावातील चढउतारही या व्यवसायात अस्थिरता निर्माण करत आहेत.[६९] विद्युत सेवेचा खर्च, विक्रीकर, व्याजदर, मूल्यवृद्धी उत्पादनाकडे दुर्लक्ष, वित्तीय समस्या, चढ वेतनदर व मजूर टंचाई, राजकीय प्रभाव, काल विसंगत सहकारी धोरणे, जागतिकीकरणाचे आव्हान या सर्व कारणामुळे नफ्यात चाललेल्या कारखान्यात घट झाली. राज्यातील बंद पडलेल्या व आजारी सूतगिरण्यांची संख्या लक्षात घेता सहकारी सूतगिरणी व्यवसाय अनेक अडचणींना सामोरे जात आहे असे दिसते.[७०]

राज्यातील अनेक सूतगिरण्या या प्रभावी व्यवस्थापनाच्या अभावी बंद पडत आहेत. उदा. इचलकरंजीला ''मॅचेस्टर'' चा दर्जा मिळवून देणारी, दोन हजार कामगारांना रोजी रोटी देणारी ८५ हजार चात्यांची महाकाय डेक्कन सहकारी सूतगिरणी ही भारतातील सहकारी तत्त्वानुसार चालणारी पहिली सूतगिरणी या गिरणीच्या गौरवशाली इतिहासाला आता पूर्णविराम मिळाला आहे. १७ जानेवारी २००६ ही या गिरणीच्या आयुष्यातील शेवटची तारीख ठरली कारण त्या दिवशी पुणे येथे ही सहकारी गिरणी लिलावात मुंबईच्या के.एस.एल. इंडस्ट्रीज या खासगी कंपनीला ३६ कोटी रूपयाला विकली गेली. कॉंग्रेसचे खासदार आबासाहेब कुलकर्णी यांनी इ.स. १९६४ मध्ये या गिरणीचा पाया घातला. देश, विदेशात दर्जेदार सूत निर्यात करणारी ती प्रमुख गिरणी होती. स्वातंत्र्यानंतर पहिली २५ वर्षे ग्रामीण भागात सहकारी चळवळीने नवचैतन्य निर्माण केले. परंतु इ.स. १९८० च्या दशकात राजकारणाची दुसरी पिढी अवतरली आणि सहकाराचे स्वाहाकारात रूपांतर होण्याची प्रक्रिया सुरू झाली. याचाच फटका डेक्कन व इतर अनेक सहकारी सूतगिरण्यांना बसलेला आहे.[७१]

महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरण्यांची सद्यस्थिती पाहता राज्याच्या ग्रामीण विकासाला पूरक ठरलेला व सामाजिक-आर्थिक विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका असलेला व्यवसाय अनेक

समस्यांनी घेरलेला आहे. जागतिकीकरण व उदारीकरणामुळे देशी तसेच विदेशी बाजारपेठेतील आव्हाने पेलण्यासाठी यशस्वीपणे स्पर्धा करता यावी यासाठी व्यवस्थापन, आधुनिकीकरणाच्या दृष्टिने विविध उपायांची तातडीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

### ➢ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आणि ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय –

सहकारी चळवळीच्या यशाचा आणखी एक महत्त्वाचा मानबिंदू म्हणजे ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय आणि विकास सहकारी चळवळीच्या अनुभवामुळेच अनेक ग्रामीण सहकारी नेते व कार्यकर्ते आज राज्यातही अनेक क्षेत्रात आपल्या अनुभवी नेतृत्त्वाची साक्ष पटवून देत आहेत. पंचायत राज्य आणि सहकारी संस्था याच भारतीय लोकशाहीच्या पायाभूत संस्था आहेत. शेतीउद्योग, कर्जव्यवहार इत्यादी विषयात पुढाकार घेऊन गावाचा आर्थिक व सामाजिक कारभार चालविणारी सहकारी संस्थांच असल्यामुळे या चळवळीचे विशेष असे स्थान आहे.

इ.स. १९५० नंतरचा कृषि–औद्योगिक समाज हा एका नव्या आर्थिक रचनेत बांधला गेला. सहकार चळवळीने या समाजास साखर कारखाने, सहकारी बँका, सूतगिरण्या, ग्राहक भांडारे यांचे सदस्य करून घेतले भागधारक या नात्याने तो सहभागी झाला. तसा तो कच्च्या मालाचा पुरवठादार म्हणून पुढे आला. याच व्यवस्थेला लागणारे मनुष्यबळ ग्रामीण भागातून पुरविले गेले. याच व्यवस्थेतील निवडणुकात हा समाजकार्यकर्ता म्हणून कामे करू लागला त्यामुळे त्याचे बरे–वाईट राजकीय शिक्षणही याच व्यवस्थेने केले. अशा विविध अंगानी कृषि औद्योगिक समाज घडविण्याचे काम सहकार चळवळीने केले. इ.स. १९५० नंतरचे महाराष्ट्रातील राजकारण आणि यातील प्रक्रिया प्रवाह विचारात घेतले तर सहकार चळवळीचा मोठा प्रभाव जाणवतो. या चळवळीने महाराष्ट्राला राजकीय नेतृत्त्व दिले. ग्रामीण भागातील राजकीय जागृतीची सुरूवात याच चळवळीतून झाली.[७२]

महाराष्ट्राच्या इ.स. १९६० नंतरच्या राजकारणावर बहुजनवादाचा प्रभाव वाढला. याचे कारण म्हणजे प्रस्थापित झालेली सहकार चळवळ आणि या चळवळीतून आर्थिक, सामाजिक, राजकीय हितसंबंध सांभाळणारी राजकीयकरणाची प्रक्रिया होय. या राजकीय प्रक्रियेने ग्रामीण नेतृत्त्वाला बलाढ्य सत्तेची आसने प्राप्त करून दिली. राजकीयदृष्ट्या शेतकरी, शेतमजूर, अल्पभूधारक, जिराईत शेतकरी यांच्यात राजकीय जागृती घडविली. आजही ही राजकीय जागृती राज्यस्तरावरील कोणताही राजकीय बदल घडवून आणू शकते. महाराष्ट्राच्या

राजकारणात ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय आणि विकास करण्यास सर्वात मोठा हातभार सहकार चळवळीने आणि यातील राजकीयकरणाने लावला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर ग्रामीण नेतृत्त्वास मोकळीक मिळाली. यशवंतराव चव्हाण व त्यांच्यानंतर सत्तेवर आलेले बहुतांशी मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील महत्त्वाचे मंत्री हे ग्रामीण विभागातील होते. महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी चळवळ ही बहुजनवादाची कार्यशाळाच ठरली. सहकारी चळवळीत काम केलेले अनेक नेते पुढे राजकीयकरणाच्या प्रक्रियेमुळे राजकारणात आले. नेतृत्त्वगुणांचे प्रशिक्षण, प्रश्नांची जाण जनसामान्यांच्या मानसिकतेचा अभ्यास, व्यवहारातील सूक्ष्म बारकावे इत्यादी गुणांची उजळणी अनेक सहकार नेत्यांनी सहकार चळवळीत करून घेतली होती. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विखे–पाटील, यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, रत्नाप्पाण्णा कुंभार, शरद पवार, सुधाकरपंत परिचारक, गणपतराव देशमुख इत्यादी नेते ग्रामीण भागातून पुढे आले.[७३]

## ➢ सहकार आणि महाराष्ट्राचे राजकारण –

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी चळवळीने मोलाची कामगिरी बजावलेली आहे. ग्रामीण भागातील सत्तेची विविध केंद्रे आपल्या ताब्यात ठेवण्यात सहकारी संस्थाचे पुढारी यशस्वी झालेले आहेत म्हणून ग्रामीण सहकारी संस्था या राजकीय सत्तेच्या शक्तिस्त्रोत समजल्या जातात. सहकारी चळवळ राजकीय कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त अशी चळवळ आहे. कारण या संस्थांच्या साहयाने राजकीय कार्यकर्ते ग्रामीण भागात आपले प्रभाव क्षेत्र निर्माण करू शकतात.आपल्या पाठीराख्यांचे व समर्थकांचे एक जाळे ते निर्माण करू शकत होते. त्यासाठी ते या समर्थकांमध्ये सत्ता व साधने यांचे वितरण करीत होते. शिवाय सहकारी संस्थांच्या जवळ जी साधनसामुग्री असते त्या साधनांचा ते निवडणुकीत वापर करू शकत होते. सर्व सहकारी संस्थांत सहकारी साखर कारखान्याजवळसाधनांची विपुलता होती. त्यामुळे बहुतेक राजकीय पुढाऱ्यांना सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात जास्त रस होता. राजकारणाच्या दृष्टिने विचार केला तर सहकारी साखर कारखाने आणि जिल्हा मध्यवर्ती बँका महत्त्वाच्या आहेतमहाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणारे अनेक राजकीय पुढारी या बँकातून पुढे आलेले आहेत. सहकारी चळवळीचा वापर राजकारणासाठी केला जातो. सहकारी संस्था हे राजकीय सत्ता प्राप्तीचे एक साधन आहे. असेच सर्वसाधारण चित्र निर्माण झाले आहे. मोठे

आर्थिक व्यवहार करणारी सहकारी संस्था ही प्रचंड आर्थिक व सामाजिक शक्तीची गरज असते, हे उमजून सहकारी चळवळ आणि राजकारण यांच्यात एक अतूट सांधा घातला गेला. सर्वसाधारणपणे प्रत्येक राजकीय कार्यकर्ता आपल्या प्रभावाखाली किती सहकारी संस्था आहेत. यावरून आपल्या राजकीय शक्तिचे गणित मांडतो. महाराष्ट्राच्या राजकारणात झालेली प्रमुख स्थित्यंतरे तपासून पाहिल्यास त्यामध्ये सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी बँका आणि खरेदी विक्री संघ या संस्थांतील प्रमुख व्यक्तिची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खेळी दिसू शकते.[७४]

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील राजकारणाचा राज्य पातळीवरील राजकारणाशी व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राजकारणाशी जवळचा संबंध आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सहकारी संस्थांवर सरकारचे नियंत्रण असते. निवडणुका, अध्यक्षपदाची मुदत याबाबतचे कायदे करण्याचा राज्यसरकारला अधिकार असतो. शिवाय राज्य पातळीवर सत्तेत वाटा मिळण्याची सर्वच राजकीय पुढाऱ्यांची इच्छा असते. कारण राज्य सरकारजवळ साधन सामुग्रीचे वाटप करण्यासाठीची साधने जास्त मोठया प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी राजकीय क्षेत्रात भाग घ्यावयास सुरूवात केली.[७५]

महाराष्ट्राच्या राजकारणात इ.स. १९६५–६६ नंतर काही बदल झाले १९६७ साली वसंतराव नाईक हे दुसऱ्यांदामहाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. यावेळी विनायकराव पाटील हे सहकारमंत्री झाले. साखर कारखान्यांमध्ये स्वतःचा पैसा न घालता समाजच्या पैशाचा गैरवापर करणारे साखरसम्राट निर्माण होत आहेत हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर काही नियंत्रणे आणण्याचा त्यांचा विचार होता. परंतु लवकरच त्यांचे निधन झाले पुढे साखर कारखान्याचे हितसंबंध राखण्याच्या हेतूने साखर कारखानदार वसंतदादा पाटील यांचे नेतृत्त्व मानू लागले. वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण यांच्यातील संघर्षावरून साखर कारखान्यांना काही प्रमाणात फटके बसले. शंकरराव चव्हाण इ.स.१९८६ मध्ये दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर सहकारी साखर कारखानदारांचे पंख कापावयास सुरूवात केली. सहकारी साखर कारखानदारांनी लोकांना गुलाम केले आहे. असे त्यांचे मत होते. शंकररावांच्या धोरणामुळे आपली लॉबी कमजोर होते वसंतदादांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शरद पवार यांच्याशी

हातमिळवणी केली. पुढे शरद पवार यांनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर सहकारी साखर कारखाने आपल्या मागे उभे करण्यास सुरूवात केली.[७६]

एंकदरीत महाराष्ट्राच्या राजकारणावर अशाप्रकारे सहकारी क्षेत्रातील बँकांचे व विशेषतः साखर कारखान्यांचे वर्चस्व आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागापर्यंत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच पोहचलेले आहेत. त्यामुळे त्यांचा पाठिंबा या लॉबीला हवा असतो. महाराष्ट्रात साखर कारखानदारांची लॉबी पुनः पुन्हा राज्याच्या राजकारणावर आपला प्रभाव टाकू शकते. कारण प्रभावशाली पक्ष, प्रभावशाली वर्ग व प्रभावशाली जात यांनी या लॉबीला पाठिंबा दिलेला आहे. या कारखानदारांची लॉबी राज्याच्या राजकारणात दबावगट म्हणून काम करते. त्यामुळे राजकारणाशी तिचे जवळचे संबंध आहेत. सहकारी चळवळ ही राजकारणाशी जोडलेली आहे. आणि अंतिमतः सहकारी संस्था या सर्व राजकीय पुढाऱ्यांना राजकीय स्वार्थसंवर्धनासाठीच हव्या आहेत. या सहकारी संस्थांचे नेते आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी व डावपेचासाठी संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध होणारा पैसा, भौतिक साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांचा सरसकट वापर करतात. बऱ्याच सहकारी संस्थांमध्ये आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. की सहकारी संस्था आणि सहकारी संस्थेच्या सभासदांचे कल्याण हे उद्दिष्ट दुय्यम होऊन सहकारी संस्थेच्या नेतृत्त्वाची सत्ता संपादनाची महत्त्वाकांक्षा, पूर्ण करणे हेच उद्दिष्ट प्रधान झाले आहे.

## ➢ यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळ –

स्वातंत्र्यानंतरच्या महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणावर ज्या व्यक्तींनी प्रभाव पाडला त्यात यशवंतराव चव्हाण हे एक प्रमुख व्यक्तिमत्व होते. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांचा सार्थ गौरव केला जातो. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री आणि नंतर महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांनी महाराष्ट्रामध्ये कृषि औद्योगिक समाजरचनेचा पाया घातला, सहकारी चळवळीला चालना दिली. शेती सुधारणेसाठी प्रयत्न केले. अनेक नवनवीन योजना व प्रकल्प राबविले व ग्रामीण भागाचा विकास केला.

शेतकरी हा महाराष्ट्राचा प्राण आहे असे यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणत असले तरी केवळ शेतीवर अर्थव्यवस्था उभी राहू शकत नाही हे त्यांना माहीत होते. शेती ही मान्सूनवर अवलंबून असल्याने आणि तीही तुकडयातुकडयांची असल्याने त्यांनी कृषि औद्योगिक

समाजरचनेची कल्पना मांडली आणि कार्यवाहीत आणली. शेतीला पूरक उद्योग उभारून ग्रामीण औद्योगिकरणाचा पाया घातला. शेती, उद्योग आणि सहकार यांची सांधेजोड करताना त्यांनी आर.जी.सरय्या, वैकुंठभाई मेहता, डॉ.धनंजयराव गाडगीळ यांचे सहकार्य घेतले.[७७]

महाराष्ट्रातील शेतीला चालना देण्यासाठी व तिच्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी त्यांनी सहकाराचा आधार घेतला. सहकारी क्षेत्र विस्तृत करून ग्रामीण जीवनातील आर्थिक स्थितीवर योग्य परिणाम घडविण्यासाठी सहकाराला चालना दिली. सहकारातून समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. ऑगस्ट १९५७ मध्ये त्यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारने १८ सहकारी साखर कारखान्यांची नोंद करून देशामध्ये अग्रक्रम प्राप्त केला.[७८] इ.स.१९५७ नंतर यशवंतरावांनी ग्रामीण विकास व शेतकऱ्यांचे हितरक्षण या हेतूंनी विविध प्रकारच्या सहकारी संस्थाना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. सहकारी साखर कारखान्याशिवाय विविध क्षेत्रांतील सहकारी संस्थांचे जाळे त्यांच्या प्रोत्साहनामुळे अल्पावधीत उभे राहिले. सहकारी संस्थामुळे सत्तेची स्थानिक शासनबाहय केंद्रे अस्तित्वात आली.[७९]

इ.स.१९६० मध्ये सहकारी चळवळीला कलाटणी देणारे एक विधेयक यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांनी नागपुरच्या विधानसभेच्या अधिवेशनात मांडले आणि ते संमतही करून घेतले. त्यांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीने नेत्रदिपक प्रगती केली. यशवंतरावांचे सहकारी चळवळीतील योगदान अत्यंत भरीव स्वरूपाचे, दीर्घकालीन परिणाम घडवून आणणारे, ग्रामीण विकासाला चालना देणारे, औद्योगिकरणाद्वारे अर्थव्यवस्था मजबूत करणारे, रोजगाराभिमुख आणि मानवी संसाधनांचा विकास घडविणारे होते. ग्रामीण विकासाचा पाया बळकट करणारी यंत्रणा म्हणून त्यांनी प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांची पाठराखण केली. ग्रामीण भागाचा विकास हा शेती उत्पादनाबरोबर प्रक्रिया संस्थावर असतो. हे त्यांनी सहकारी साखर कारखानदारीतून दाखवून दिले. त्यांनी फक्त सहकारी साखर कारखानेच नव्हेततर प्रक्रिया संघ, दूध संघ, खरेदी विक्री संघ, ग्राहकांचे संघ तसेच प्राथमिक सहकारी संस्था व सहकारी बँकांची स्थापना व्हावी यासाठी प्रयत्न केले. यशवंतरावांनी फक्त शहरी भागातच विकास केंद्रीभूत होऊ नये यासाठी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कारखानदारी वाढावी असे धोरण ठेवले. यशवंतरावांनी सहकारी चळवळीच्या विकासाला चालना दिली परंतु

सहकारातील चुकांवर ते तेवढयाच अधिकारवाणीने भाष्य करावयाचे. त्यामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीवर आणि सहकारी नेतृत्त्वावर त्यांचा नैतिक वचक होता. हेच सिद्ध होते.[८०]

सहकाराचा विचार मांडताना यशवंतराव सांगतात सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे. तात्विक दृष्टया सहकारी चळवळ ही मूलतः लोकशाहीची चळवळ आहे हे आपण विसरता कामा नये. सामान्य व शोषित समाजाच्या उपयोगी पडणे हा तर या चळवळीचा प्राणच आहे. पण खऱ्या अर्थाने आपल्याला ही चळवळ चालवावयाची असेल तर तिच्याकडे आपण लोकशाहीच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.[८१]

एकंदरीत सहकारातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडविण्याचा त्यांचा प्रयत्न म्हणजे कृषिऔद्योगिक क्रांतीचाच भाग होता. शेतमालाला योग्य बाजारभाव मिळावा याकरिता जिल्हा आणि तालुकास्तरावर कृषि उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्यास त्यांनी उत्तेजन दिले. तसेच शेती उत्पादने वाजवी दरात मिळावीत यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर सहकारी खरेदी विक्री संघाची निर्मिती करण्यास प्रोत्साहन दिले. परिणामी सहकारक्षेत्रात नवनवीन कार्यकर्ते तयार होऊ लागले. कॉंग्रेस पक्षाचे मजबूत संघटन झाले, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलण्यास चालना मिळाली.

## ➢ महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे सुवर्णयुग

इ.स. १९६० ते इ.स. १९८० या कालखंडात महाराष्ट्रात सहकार सर्वत्र बहरला. याच कालखंडात सहकाराचे सुवर्णयुग म्हणता येईल अशी नेत्रदिपक प्रगती पहायला मिळाली. इ.स. १९६० ते इ.स. १९९० हा कालखंड महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा तेजीचा कालखंड मानला जातो. या कालखंडातील सहकारी चळवळीची प्रगती पाहिली तर नियोजनाद्वारे समाजवादी समाजरचनेचा पायंडा पडलेला दिसतो. या काळात शेतीला अधिकाधिक भांडवल वसूल करून दिले गेले.[८२]

इ.स. १९६१ तेइ.स. १९८१ या कालखंडातील महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या जवळजवळ दुप्पट झाली. तर सभासद संख्या चार पटींनी वाढली. या कालखंडात सहकारी क्षेत्राला लाभलेल्या नेतृत्त्वानी आपापल्या भागातील सहकारी संस्था स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या बलवान बनविल्या. नगर जिल्ह्यातील प्रवरानगर व कोपरगाव साखर कारखान्यांनी १२ वर्षे मुदतीचे भांडवली कर्ज ८ वर्षात फेडले सरकारचे सर्व भागभांडवल परत करून कारखाने

पूर्णपणे शेतकऱ्यांच्या मालकीचे केले. आपल्या भागाचा सर्वांगिण विकास घडवून आणला व ग्रामीण भागाचा कायापालट केला. इतर अनेक जिल्ह्यातही अशीच प्रगती घडून आली. म्हणजे याच काळात सहकाराच्या माध्यमातून प्रवरानगर, वारणानगर, कराड, कोपरगाव, सांगली, कोल्हापूर, अकलूज, पंढरपूर इत्यादी ठिकाणी शेती, शिक्षण, आरोग्य, उद्योगधंदे या विविध क्षेत्रात प्रचंड विकास झाला. असे ते सुवर्णयुग इ.स. १९६० तेइ.स.  १९८० अशी दोन दशके चालले.[८३]

**कोष्टक क्र.११**

**महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीची प्रगती (सभासद लाखात)**

| अ.नं. | तपशील | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण सहकारी संस्था | ३१,५६५ | ४२,६०३ | ६०,७४७ | १०,४६२० | १५८०१६ |
| २. | सभासद | ४२ | ८६ | १४८ | २७० | ४३० |

(संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ–एका दृष्टिक्षेपात २०१५ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. पृ.५)

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीचा अभ्यास केल्यानंतर १९६१ साली राज्यातील एकूण सहकारी संस्था ३१,५६५ होत्या. तर २००१ साली १,५८,०१६ एवढ्या झाल्या. सभासद संख्या १९६१ साली ४२ लाख होती तर २००१ मध्ये ती ४ कोटी ३० लाख एवढी झालेली आहे. वरील तक्त्याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, इ.स. १९८१ पासून सहकारी संस्था आणि त्यांचे सभासद यांची संख्यात्मक वाढ मोठ्या प्रमाणावर झालेली आहे.

सहकारी चळवळीच्या या धावत्या आढाव्यावरून काही गोष्टी स्पष्ट होतात. गेल्या ३५–४० वर्षात महाराष्ट्रात सहकारी चळवळीची निःसंशय वाढ झाली असून तिचे लोण खेडोपाडी पसरले आहे. सहकाराने नवनवीन क्षेत्रात प्रवेश केला असून त्याच्या कक्षा रूंदावल्या आहेत यातवाद नाही. या वाढीस पोषक सरकारी धोरण व साह्य याप्रमाणेच त्या क्षेत्रात निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांचे कष्ट दोन्ही कारणीभूत आहेत. या चळवळीचा दुसऱ्या बाजूने विचार केल्यास असे म्हणता येईल की, गेल्या पन्नास वर्षात या चळवळीने संख्यात्मक मजल मोठी मारली यात शंका नाही. पण गुणात्मकदृष्ट्या ती कमजोर ठरली गेली हेही वास्तव नाकारून चालणार नाही. ज्याच्या हातात या चळवळीची सूत्रे होती त्यांनी ती सचोटीने न हाताळल्याने

अंमलबजावणीत अनेक त्रुटी तयार झालेल्या आहे. ज्या सर्वसामान्य माणसांच्या विकासाचे स्वप्न घेऊन ही चळवळ जन्माला आली ती सर्वसामान्य माणसेच सहकारातून बाहेर फेकली जाताना दिसत आहेत. साखर कारखाने, सूतगिरण्या, बँका, यासारख्या क्षेत्रांना सरकारने आधार दिला तो शेतकऱ्याच्या जगण्याला संपन्नतेची झालर आणावी म्हणून. आज ग्रामीण भागात दिसणारे चित्र विचित्र आहे. खेडोपाडी 'सहकार सम्राट' निर्माण झाले. सहकारी संस्था नवी सत्ताकेंद्रे म्हणून मिरवू लागल्या आहेत. 'विना सहकार नही उद्धार' हे ब्रीद थोडेसे बदलून 'विना सहकार नाही स्व उद्धार' केव्हा झाले हे कुणाला कळलेही नाही! सहकारात राजकारण आणि राजकारणात सहकार असा शाप महाराष्ट्राच्या या चळवळीला लागू लागला आहे. आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार, कर्जबाजारीपणा, प्रचंड कामगार कपात यामुळे सहकारी क्षेत्र पुरते पोखरले गेले आहे. साखर कारखाने, सूतगिरण्या बंद पडत चालल्या आहेत. तसेच स्वयंस्फूर्तीचा अभाव, सहकाराच्या तत्त्वाची अनभिज्ञता, असमानता, निधीचा अभाव, सहकारातील सत्ताकारण, सदोष व भ्रष्ट नेतृत्त्व आणि व्यवस्थापन सभासदांची उदासिनता, अकार्यक्षम संस्थांचा प्रचंड फुगवटा, शासनाचा सदोष दृष्टिकोन, खाऊगिरीसाठीच संस्था काढायचा दृष्टिकोन आदी अनेक कारणांमुळे या चळवळीस अपयश येताना दिसत आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. श्रीनिवास खांदेवाले यांनी एका लेखात म्हटले आहे की, ''अनेक क्षेत्रात सहकाराच्या यशामागे न दिसणारे अपयशाचे वलयही असते. उदा. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या रूपात राजकारणी पक्षांनी एकीकडे लाभार्थींना मतदार म्हणून बांधून ठेवले आहे. मंत्रिपदापर्यंत चढण्यासाठी सहकाराचे नेतृत्त्व ही एक आवश्यक पायरी बनली आहे. तर दुसरीकडे शासनाच्या अनुदानांचा मोठा भाग सहकारी संस्थांच्या सदस्यांकडे वळविला जातो तो पैसा इतरांनी दिलेल्या करांचा एक भाग असल्यामुळे त्याग कुठे आणि लाभ कुठे हे ध्यानात येते.''[८४]

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या पूर्वीपासूनच विविध सहकारी संस्था महाराष्ट्रात होत्या. महाराष्ट्रातील तत्कालीन शासनाने सहकारी चळवळीचा पाठपुरावा केला. त्यामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ फार मोठ्या प्रमाणावर विकसित झाली आहे. महाराष्ट्रातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी ज्या योजना हाती घेण्यात आल्या त्या राबविण्यासाठी सहकारी चळवळीला अगदी सुरुवातीपासूनच उमेद, तडफदार व तळमळीचे नेतृत्त्व लाभले होते. त्यांनी सहकार

चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात पसरवून ती वाढविण्याचे मोलाचे कार्य केले. शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या जीवनात परिवर्तन घडविले. सहकारी तत्त्वावरच्या साखर कारखान्यांनी महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास घडविला आहे अनेक बेकार मजुरांना फार मोठा आधार आणि दिलासा देणारी ही सहकारी चळवळ कामधेनू ठरली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरही सहकारी चळवळीबद्दल शासनाने प्रथमपासूनच सहकार्याचे आणि उदारतेचे धोरण स्वीकारलेले आहे. सहकार चळवळीने शिक्षण, खरेदी–विक्री, पतसंस्था, दुग्धव्यवसाय, कारखानदारी, नोकर पतसंस्था इत्यादी क्षेत्रात कार्य करून महाराष्ट्राचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून कृषि विकासाशी संबंधित कृषि पतपुरवठा शेती, पणनप्रक्रिया सूतगिरण्या, साखर कारखाने, दूग्ध व्यवसाय, रेशीम उदयोग, कुक्कटपालन इत्यादी क्षेत्रात वित्तपुरवठ्यात मक्तेदारी निर्माण केलेली आहे. शेतीच्या विकासात सहकारी चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे. एकंदरीत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमुळे महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झालेला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यात या चळवळीचे योगदान महत्त्वाचे आहे. तसेच या चळवळीमुळेच येथील समाजामध्ये एकात्मता, बंधुता व मेहनतीची जाणीव निर्माण झालेली आहे. सहकारी चळवळीचे बिगर सरकारीकरण, सहकारी संघराज्य निर्मिती, सहकारी माध्यमातून कृषि औद्योगिक समाजरचना, सहकारी क्षेत्राद्वारे ग्रामीण नेतृत्त्वबांधणी, सहकारी चळवळ अधिकाधिक लोकाभिमुख होणे, सहकारी संस्थांतून लोकशाही, काटकसर या सहकारी तत्वांचे काटेकोरपणे पालन होणे, सहकारी चळवळ ही समाजाच्या तळागळातील लोकांची आधार ठरणे इत्यादी बाबी सहकाराद्वारे महाराष्ट्रात साकार झालेल्या आहेत.

## संदर्भ –


१) जुगळे (डॉ) वसंतराव, योजना जुगळे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ दिशा आणि दशा, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, १९९६, पृ. १५.

२) Bombay Gazetteer Vol. 18, Part- II, Pune, 1885, P.119-120.

३) मोहिते (डॉ.) प्रेमलता माधव, कोल्हापुरातील सहकारी पतपेढी व्यवहार १९१३–१९४९ : एक ऐतिहासिक अभ्यास, श्रीहरी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २५ नोव्हेंबर १९९५, पृ. १३.

४) जुगळे(डॉ.) वसंतराव, योजना जुगळे,उपरोक्त, पृ. १७.

५) कर्णिक मधु मंगेश (संपा.), सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१०, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २०११, पृ. ५००.

६) कामत गो. स, सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन,श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्विितीयावृत्ती, ऑगस्ट १९७९, पृ. १०९.

७) कर्वे चिंतामण गणेश, सदाशिव आत्माराम जोगळेकर, जोशी यशवंत (संपा.) महाराष्ट्र परिचय–संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५४, पृ. ६४८.

८) महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव नोंदी, महाराष्ट्र विधानमंडळ, अमृत महोत्सव समिती, विधानभवन, मुंबई, १८ ऑक्टोबर२०११, पृ. १६९.

९) मदाने मा. वि., सामान्याला मानाचे स्थान देणाऱ्या सहकारी चळवळीची शताब्दी, फाले कृ. ल.,किशोर फाले (संपा.), सहकार चळवळ १९०४–२००४ शतक लेखसंग्रह, निर्माण प्रकाशन, वर्धा, २००५, पृ. ४९.

१०) कित्ता

११) Kaji H. L., Co-operation in India, All India co-operative institutes association, Bombay,1932, P. 20.

१२) बर्वे रा. का, भारताच्या आर्थिक समस्या, विशाखा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर १९६२, पृ. १०५.

१३) वर्तक विनायक, महाराष्ट्र राज्यातील सहकार कायद्याची शतकी वाटचाल (१९०४–२००४) धावता दृष्टीक्षेप, फाले कृ. ल., किशोर फाले (संपा.), उपरोक्त, पृ. ३००.

१४) कित्ता, पृ. ३०३

१५) शिंदे वसंतराव, सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे, २००४, पृ. ४.

१६) वर्तक विनायक ग., महाराष्ट्र राज्यातील सहकार कायद्याची शतकी वाटचाल, फाले कृ. ल.,किशोर फाले (संपा.) उपरोक्त, पृ. ३०४.

१७) देशमुख एम. ए., सहकारी कायद्याची शतकी वाटचाल, फाले कृ. ल., किशोर फाले (संपा.), उपरोक्त, पृ. ७४.

१८) बावीसकर बी. एस; महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळ, भोळे भा. ल. किशोर बेडकिहाळ (संपा.) बदलता महाराष्ट्र (डॉ.एन.डी.पाटील गौरव ग्रंथ), डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, प्रथमावृत्ती १६ जुलै २००३, पृ. ७९.

१९) नलावडे प्रमोद त्र्यं.(संपा.) ; मासिक लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, सप्टेंबर २०१२, पृ.१२

२०) कर्णिक मधु मंगेश (संपा.) सांस्कृतिक महाराष्ट्र, १९६० ते २०१०, भाग १, उपरोक्त, पृ. ५०२.

२१) येलमार विकास सुदाम; कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा एक चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जून २०१५, पृ.४०

२२) कर्णिक मधु मंगेश (संपा.), सांस्कृतिक महाराष्ट्र, १९६० ते २०१०, भाग १, उपरोक्त, पृ. ५०२.

२३) कित्ता, पृ. ५०४.

२४) कुलकर्णी (डॉ.) पी. बी., महाराष्ट्रातील सहकार पतव्यवस्था, पाटील (डॉ.) जे. एफ, विभुते (डॉ.) भालबा (संपा.), महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, नोव्हेंबर २०११ पृ. ३७.

२५) कुलकर्णी (डॉ.) पी. बी., महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची बदलती दशा आणि दिशा, पाटील (डॉ) जे.एफ. (संपा.), सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राची बदली अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, प्रथमावृत्ती, मे २०१०, पृ.१२९

२६) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात–२०१४, पृ.१२,१३

२७) कित्ता पृ.९

२८) कित्ता पृ.८

२९) कुलकर्णी (डॉ.) पी. बी., महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची बदलती दशा आणि दिशा, पाटील (डॉ) जे.एफ. (संपा.), उपरोक्त पृ.१४४

३०) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात–२०१४, पृ.१०

३१) जोशी श्रीनिवास वि ; सहकारी विपणन केंद्राचे योगदान, मुखर्जी मोनीदीपा (संपा.) मासिक योजना, खंडXXIXक्रमांक VIII, मुंबई, मार्च २००२, पृ.२४

३२) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात–२०१४, पृ.२२

३३) कित्ता पृ.२७

३४) कित्ता पृ.३०

३५)Noel Deen, History of sugar, vol-I, chapman and Hall Ltd. London, 1949,p.41

३६) तुपे सुखदेव दामोदर, महाराष्ट्रातील साखर उद्योग : स्थिती आणि समस्या, पुजारी आ.गो, रा.बा. भांडवलकर, (संपा), अर्थविचार, खंड–२, तेजस प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ५ फेब्रुवारी २०१७ पृ.६६

३७) पारेकर दशरथ; सहकारी साखर उद्योग उत्कर्ष आणि वाताहत, तेजस पब्लिकेशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१५, पृ.१५
३८) साधू अरूण, सहकारधुरीण (विठ्ठलराव विखे पाटील, यांच समग्र चरित्र), रोहन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ११ जानेवारी २०१४, पृ. ३
३९) कित्ता, पृ.४
४०) सूर्यवंशी नागेश मोहनराव; महाराष्ट्रातील साखर उद्योग: समस्या व उपाय, निकम अविनाश रामलाल (संपा.) अर्थसंवाद त्रैमासिक, ऑक्टोंबर डिसेबर २०१३, खंड ३७, अंक ३, पृ.२०४
४१) पारेकर दशरथ,उपरोक्त, पृ. १६
४२)कित्ता पृ.१७
४३) पाटील (डॉ) जे. एफ, ककडे (डॉ) व्ही.बी, व्ही.आर खानाज, डॉ.वसंत जुगळे, सहकारी क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन, प्रबोधन प्रकाशन समाजवादी प्रबोधिनी, इंचलकरजी, १९९६, पृ.१३
४४) तुपे (डॉ.) सु. दा. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीची वाटचाल, पाटील (डॉ.) जे. एफ व भालबा विभुते (डॉ.) उपरोक्त, पृ. २१२.
४५) कर्णिक मधु मंगेश (संपा.), उपरोक्त, पृ. ५०६.
४६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, इ.स.२०१०–११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.११५
४७) नवभारत, मे–जून, २०१०, पृ. ३४.
४८) बावीसकर बी. एस., महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळ, भोळे भा. ल., किशोर बेडकिहाळ (संपा.), बदलता महाराष्ट्र,उपरोक्त, पृ.७८
४९) कारेकर (डॉ.) शोभा, शरद घोडके, (डॉ.), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर, प्रथमावृत्ती, जून २००८, पृ. २५३.
५०) जुगळे (डॉ.) वसंत, साखर कारखानदारी उदारीकरणाच्या भोवऱ्यात, पोतदार बाळ (संपा), किसानशक्ती मासिक प्रारंभ खास अंक, १ डिसेंबर १९९७, कोल्हापूर, पृ. ८.
५१) कित्ता, पृ. १०.

५२)  ककडे (डॉ.) विजय, सहकारी साखर उद्योग : प्रश्न व पर्याय, पाटील (डॉ.) जे. एफ व भालबा (डॉ.) विभुते, महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, उपरोक्त, पृ. २२८.

५३) पाटील (डॉ) जे.एफ ;महाराष्ट्रातीलकृषि माल प्रक्रिया उद्योग–सहकारी साखर उद्योगाची फेररचना, पानसरे गोंविद (संपा.), सहकार अयशस्वी झाला आहे, पण तो यशस्वी झालाच पाहिजे, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २७ जानेवारी २०१५, पृ.७

५४) पाटील शिवाजीराव, महाराष्ट्रातील साखर उद्योग : काल, आज आणि उदया, फरास गणी (संपा.), भारत : स्वातंत्र्य आणि विकास, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ६ जाने. १९९८, पृ. १८२.

५५)वावरे (डॉ) अनिल कृष्णराव, महाराष्ट्रातील सहकारी दूग्ध व्यवसाय  वास्तव व भवितव्य, पाटील (डॉ) जे.एफ,भालबा (डॉ) विभुते (संपा),महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, उपरोक्त, पृ.१५५

५६) निकम तानाजीराव ; दूग्ध व्यवसाय विस्तार, अजिंक्यतारा पब्लिकेशन, मुंबई,२००२, पृ.२६

५७) भुसारे विनायकराव, के.एम. काळे (संपा) दूग्ध व्यवसायाची दिशा, जागरूक मतदार पब्लिकेशन, कुलाबा मुंबई, पृ.३७

५८) वाबगावकर रमेश (संपा), महाराष्ट्र दुग्धव्यवसाय अंतरंग १९९२, डेअरी पब्लिकेशन्स, महाराष्ट्र मुंबई, द्वितीयावृत्ती नोव्हेंबर १९९३, पृ.३०.

५९) पाटील शिवाजीराव, महाराष्ट्रातील साखर उद्योग : काल, आज आणि उदया, फरास गणी (संपा.), उपरोक्त, पृ. १८२

६०)  कर्णिक मधु मंगेश (संपा.), उपरोक्त,पृ. ४९५.

६१) येलमार विकास सुदाम; उपरोक्त, पृ.१८६

६२) मुलाखत. सुधाकर रामचंद्र परिचारक, पंढरपूर, दि. १० मे २०१५.

६३) नरके अरुण, दुग्धव्यवसाय–ग्रामीण आर्थिक परिवर्तनाचे एक साधन, भारदे बाळासाहेब, जयराम देसाई (संपा.) सहकारी चळवळ विचार मंथन, रौप्य महोत्सव गौरव ग्रंथ १९९९, प्रकाशन सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे, जाने. १९९९, पृ. ८९.

६४) बावीसकर बी. एस., महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळ, भोळे भा. ल., किशोर बेडकिहाळ (संपा.), बदलता महाराष्ट्र,उपरोक्त, पृ. ७८.

६५) कुलकर्णी (डॉ.) पी. बी., महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची बदलती दशा आणि दिशा, पाटील (डॉ.) जे. एफ., सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था,उपरोक्त, पृ. १६१.

६६) खानाज विरुपाक्ष; सहकारी सूतगिरण्या, पाटील (डॉ.) जे. एफ., भालबा विभुते (संपा.)महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, उपरोक्त, पृ. २३१.

६७) दुभाषी (डॉ.) मेघा, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ,नवभारत, मे–जून २०१०, पृ. ३८

६८) मुलाखत ; प्रकाश बापूराव पाटील, पंढरपूर, दिनांक ८ जून २०१७

६९) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर आवृत्ती, दि. ६ ऑगस्ट २००३, पृ. ६.

७०) खानाज विरूपाक्ष, सहकारी सूतगिरण्या, पाटील (डॉ.) जे. एफ., भालबा विभुते (संपा.) महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, उपरोक्त, पृ. २४५, २४६.

७१) दैनिक लोकसत्ता, २० जानेवारी २००६, पृ. ६.

७२) रत्नपारखी संजय भीमाशंकर, सहकार चळवळ : राजकीयकरणाचे मूल्यमापन, फाले कृ. ल, किशोर फाले (संपा.) उपरोक्त, पृ. १७७.

७३) देसाई जयराम, महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे शिल्पकार, भारदे बाळासाहेब, जयराम देसाई (संपा.) उपरोक्त, पृ. ६४, ६५.

७४)पाटील ज.फा., सहकारी अर्थकारण मागोवा आणि भविष्याचा वेध, देशपांडे विनायक श्रीधर (संपा.) अर्थसंवाद त्रैमासिक, ऑक्टोबर ते डिसेबर, २००४

७५) मुलाखत ; प्रकाश बापूराव पाटील, पंढरपूर, दिनांक ८ जून २०१७

७६) चौसाळकर अशोक; सहकार आणि महाराष्ट्राचे राजकारण, समाज प्रबोधन पत्रिका, त्रैमासिककोल्हापूर, जुलै–सप्टेंबर १९९२, पृ. १२०, १२१

७७) साने रविकिरण, नीलिमा साने, महाराष्ट्राचे शासन व राजकारण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर २००९, पृ.३२

७८) पाटील वि.वि.,यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व, साकेत प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४, पृ.१०६

७९) पळशीकर सुहास, नितीन बिरमल(संपा.), महाराष्ट्राचे राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती मार्च २००९, पृ.३७

८०) कुलकर्णी(डॉ) पी.बी., स्व.यशवंतरावजी चव्हाण आणि सहकाराचे अर्थकारण, पाटील (डॉ) जे.एफ.(संपा.), सहयाद्रीचा सूर्य, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१३, पृ. ३८२, ३८३

८१) यशवंतराव चव्हाण, युगांतर निवडक भाषणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. १४०, १४१,

८२) कुलकर्णी (डॉ.) पी. बी., महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची बदलती दशा आणि दिशा, पाटील (डॉ.) जे. एफ., सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, उपरोक्त, पृ. १३१.

८३) बावीसकर बी. एस., महाराष्ट्रातील साठोत्तरी सहकारी चळवळ,भोळे भा. ल., किशोर बेडकिहाळ (संपा.), बदलता महाराष्ट्र,उपरोक्त, पृ. ७९.

८४) सुराणा पन्नालाल, लिगाडे नानासाहेब (संपा.), झेपावणारा ग्रामीण महाराष्ट्र, भाई जगन्नाथराव लिगाडे चॅरिटेबल ट्रस्ट, अकोला, ता. सांगोला, जि. सोलापूर, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००८, पृ. ९२.

# प्रकरण तिसरे

# पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा इतिहास व व्याप्ती

## ➢ प्रास्ताविक –

सोलापूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे औद्योगिक शहर असून या जिल्ह्यामध्ये वेगवेगळे उद्योग अस्तित्त्वात आहेत मात्र दिनांक ८ मार्च १८१८ रोजी स्थापन झालेल्या 'सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.सोलापूर या बँकेमुळे सोलापूर जिल्हातील सहकारी संस्थांच्या विकासाची व चळवळीची खऱ्या अर्थाने सुरूवात झाली आणि हळूहळू ग्रामीण भागामध्ये या चळवळीचे अस्तित्त्व निर्माण होऊ लागले त्याचबरोबर जिल्ह्यातील सक्षम नेतृत्त्वामुळे सहकारी संस्थांचे जाळे निर्माण होण्यास मदत झाली. सोलापूर जिल्ह्यामध्ये इ.स. १९०४ ते इ.स.१९१८ या कालावधीत साधारणत: १०० पतपेढया वेगवेगळया तालुक्यामध्ये निर्माण झाल्या. ग्रामीण व शहरी भागातील कर्तृत्त्ववान नेतृत्त्वाने या सहकार क्षेत्राच्या उभारणीमध्ये सिंहाचा वाटा उचलला.

पंढरपूर तालुक्याने स्वांतत्र्योत्तर कालखंडामध्ये सहकारी क्षेत्रात मोठी प्रगती केली. सहकाराच्या माध्यमातून तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणला. वेगवेगळया सहकारी संस्थांच्या माध्यमातून गावागावामध्ये पद्धतशीररित्या सहकाराच्या इमारतीची खंबीर पायाभरणी केली उदा. दि पंढरपूर अर्बन को–ऑप. बँक लि.पंढरपूर या सहकारी संस्थेने पंढरपुरातील सर्वसामान्य जनतेची सावकाराच्या पाशातून सुटका करून जनमानसामध्ये 'विना सहकार नही उद्धार' या तत्त्वाची भावना रूजविली. पंढरपुरच्या अर्थविकासाचे अधिष्ठान म्हणून ही पतपेढी नावारूपाला आली आणि अर्थकारणातून समाजसेवा ही नवीन पद्धती पंढरपूर तालुक्याने जिल्ह्याला दाखवून दिली. विस्ताराच्या नवनव्या योजना आखून इ.स.१९२९ च्या जागतिक महामंदीच्या महाभयंकर आर्थिक संकटातूनही आपल्या तालुक्यातील सहकाराला वाचवण्याचे कार्य केले. सहकाराचा विकास व वृद्धीसाठी वेगवेगळया योजनांची अंमलबजावणी केली त्यामुळेच ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालणाऱ्या सहकारामध्ये खूप मोठया प्रमाणात फायदा व सहकाराला उत्तरोत्तर बँकीगचे स्वरूप प्राप्त होत गेले. करोडो रूपयांच्या उलाढाली, नफा, खेळते भांडवल इत्यादीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली. पंढरपूर तालुक्यात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना झाली असून विशेषत:

सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संस्था, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, वि.का.सेवा.संस्था इत्यादी संस्थांच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्याचा विविधांगी विकास झालेला आहे.

## ➢ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ

सहकारी चळवळ ही केवळ शेतकऱ्यांच्या कर्ज पुरवठयाचे एक साधन म्हणून जरी सुरू झाली असली तरी आज तिने जीवनाच्या सर्व अंगात प्रवेश केलेला आहे. सोलापूर जिल्ह्यातही सहकारी चळवळीचा मोठया प्रमाणात विकास झालेला आहे. या चळवळीचा या जिल्ह्याच्या दृष्टिने विचार केला असता असे दिसून येईल की, सहकारी सोसायटयांच्या अस्तित्वाचा कायदा १९०४ साली करण्यात आला व त्यानंतर एकाच वर्षात या जिल्ह्यात सहकारी चळवळीचे बीजारोपण झाले. १९०५ साली बार्शी तालुक्यात 'तडवळे' या गावी पहिली सहकारी सोसायटी स्थापन झाली . नंतर १९०६ साली बार्शी सेंट्रल को.बँक लि. ही मध्यवर्ती संस्था रामचंद्र मोरेश्वर साने यांच्या प्रयत्नाने स्थापन झाली.[१] अशा तऱ्हेने जिल्ह्यातील सहकारी चळवळीस प्रारंभ झाला.

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा विस्तार पंचवार्षिक योजनेच्या काळात मोठया प्रमाणावर झाला. पहिली पंचवार्षिक योजना सुरू होण्याच्या पूर्वी या जिल्ह्यात ४७१ सहकारी सोसायटया होत्या आणि त्यांच्या सभासदाची संख्या ८३,७०० होती व खेळते भांडवल अडीच कोटी रूपयांचे होते.[२]इ.स.१९५९– ६० अखेर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची संख्या १,२९४ झाली. तसेच या सोसायटयांचे खेळते भांडवल रू. ६.९१ कोटीचे होते.[३]

**कोष्टक क्र.१**

**निरनिराळ्या प्रकारच्या सोसायट्या संबंधीचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.नं. | संस्थेचा प्रकार | संख्या | सभासद | खेळते भांडवल |
|---|---|---|---|---|
| १. | मध्यवर्ती सहकारी बँक | १ | ४९२० | २२,७५,८६,४४० |
| २. | औद्योगिक सहकारी बँक | १ | ९२४ | २१,९९,८६९ |
| ३. | सेवा सोसायटया | ७०१ | ६७५५८ | १,३३,६५,४९५ |
| ४. | वि.का. सोसायटया | ७६ | ७२५४ | २६,६१,२०२ |
| ५. | अर्बन सोसायटया | ७१ | २९५५३ | ८७,६०,२१० |
| ६. | अर्बन बँका | ४ | ५६८६ | ५४,८२,२६६ |
| ७. | फॉर्मिंग सोसायटया | ५५ | ११२५ | ८,४७,०४३ |
| ८. | हौसिंग सोसायटया | ५३ | २४१३ | १३,९६,१२९ |
| ९. | भू तारण बँक | १ | १३४३ | १४,४६,०४३ |
| १०. | धान्य कोठार सोसायटया | १३ | ९७१ | ३७,४५४ |
| ११. | खरेदी विक्री संघ | ११ | २३०७ | १०,१७,२८७ |
| १२. | दूध सोसायटया | १५ | ३७७ | १२,११६ |
| १३. | पाणी पुरवठा सोसायटया | ६ | ४८५ | १०,६१,५८३ |
| १४. | साखर कारखाना | १ | १८०२ | १४,३५,३५० |
| १५. | इतर सोसायटया | ५० | १७५२३ | ७,२६,५६१ |
| १६. | ग्राहक सोसायटया | ५० | ३६१७ | ५,७३,४५४ |
| १७. | विणकर सोसायटया | ५५ | ८६४८ | ४०,०३,४२४ |
| १८. | इतर औद्योगिक सोसायटया | ११६ | २९८१ | ८,५४,३४६ |
| १९. | देखरेख मंडळे | १० | ७८९ | -- |
| २० | संघ संस्था | ३ | ९२ | ५,११,४९२ |
| २१ | सहकारी बोर्ड | १ | ३६२ | ८,९८,६९८ |
| | एकूण | १२९४ | १६०७३० | ६,९१,४९,९७० |

(संदर्भ–महाराष्ट्राचे जिल्हे– सोलापूर, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई, १९६०, पृ.४८,४९)

वरील कोष्टकाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की सोलापूर जिल्ह्यात सहकारी संस्थांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे कार्य मोठया जोमाने सुरू होते. यावेळी जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ९३४ खेडयापैकी ९२५ खेडयात सहकारी चळवळीने प्रवेश केला होता तसेच जिल्ह्यातील ५६ % लोकसंख्या सहकारी चळवळीखाली आली होती.

सोलापूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे औद्योगिक शहर आहे. जिल्ह्यात हातमाग हा महत्त्वाचा उपउद्योग असून त्या शिवाय तेलघाणा, कातडी कमावणे व चामडयापासून वस्तू तयार करणे इत्यादी प्रमुख उद्योग आहेत. जिल्ह्यातील निरनिराळ्या औद्योगिक सोसायटयांचीइ.स.१९५९–६० पर्यंतचीसंख्या खालीलप्रमाणे होती.

**कोष्टक क्रं.२**

**जिल्ह्यातील निरनिराळ्या औद्योगिक सोसायटयांची संख्या –**

| अ.नं. | सोसायटयांचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १. | हातमाग सोसायटया | ४७ |
| २. | लोकर विणकर सोसायटया | ६ |
| ३. | तेलघाणी सोसायटया | १९ |
| ४. | दोरखंड उत्पादन सोसायटया | २७ |
| ५. | चर्मोत्पादन सोसायटया | १३ |
| ६. | कातडी कमाविणाऱ्या सोसायटया | ७ |
| ७. | मजुरांच्या सोसायटया | २१ |
| ८. | सुतार सोसायटया | ८ |
| ९. | नीरा, पाम उत्पादन सोसायटया | २ |
| १०. | महिला सोसायटया | २ |
| ११. | इतर प्रकारच्या सोसायटया | ३९ |
| १२. | संघ संस्था | ३ |
| १३. | औद्योगिक बँका | १ |
| १४. | वेत बांबू सोसायटया | १ |
| | एकूण | १९६ |

(संदर्भ–महाराष्ट्राचे जिल्हे– सोलापूर, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई, १९६०, पृ.५३)

इ.स. १९९९–२००० अखेर जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या एकूण ८१३६ सहकारी संस्था होत्या. त्यापैकी १३ टक्के कृषि पतसंस्था होत्या. तर सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाचे एकूण सभासद २०.३७ लाख होते.[४]

सोलापूर जिल्ह्यातील या चळवळीच्या विकासाची खऱ्या अर्थाने सुरूवात झाली ती म्हणजे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. सोलापूर या बँकेच्या स्थापनेने या बँकेची स्थापना दि. ८ मार्च १८१८ रोजी झाली. या बँकेच्या वाढीस प्रारंभी सोलापूर शहरातील रा. ब. जी. के. साठे, व्ही.एस.जोग, एम.आर.गोडबोले, जी.डी. पुंडे, जे.ई.कुलकर्णी, जी.आर. कुभंकोणी या मान्यवरानीयोगदान दिले. बँकेच्या सभासदत्वास ग्रामीण भागात वाव मिळू लागला तेव्हापासून शेतकऱ्यांमधील व जिल्ह्यातील कर्तृत्त्ववान नेतृत्त्व या बँकेस मिळू लागले. त्यामध्ये गणपतराव साठे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील, नामदेवराव जगताप यांनी या बँकेच्या उद्देशास शेतकऱ्यांच्या, कारागिरांच्या घरापर्यंत पोहचविण्यास व जिल्ह्यामध्ये सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेस व वाढीस सिंहाचा वाटा उचललेला होता.[५] सामान्य शेतकरी आणि सहकारी संस्था बळकट करण्यासाठी या बँकेची स्थापना झाली. स्थापनेपासूनच ही बँक शेतकऱ्यांच्या उन्नतीचे कार्य करते. गावपातळीवर शाखा विस्तार करून शेतकऱ्यांच्या दारापर्यंत अर्थसाहय घेऊन जाणारी ही महत्त्वपूर्ण बँक आहे. सोलापूर जिल्ह्यात साधारणतः इ.स.१९०४ ते इ.स.१९१८ या कालावधीत सुमारे १०० पतपेढया स्थापन झाल्या होत्या. या पतपेढयांना मुबंई सेंट्रल बँकेकडून कर्जपुरवठा होत असे. त्या काळी जिल्हा गॅरंटी युनियन्समार्फत कर्ज मिळत असे. अशा युनियन्स कुर्डू, म्हैसगाव, टेंभूर्णी व पापरी येथे स्थापन झाल्या होत्या.[६]

काही पतपेढयांना सरकारकडून व अर्बन बँकेकडून पतपुरवठा प्राप्त होत असे. इ.स.१९१२ च्या कायदयाप्रमाणे इ.स.१९१५ नंतर मॅक्लगॉन कमिटीच्या शिफारशीनुसार मध्यवर्ती बँका अस्तित्वात आल्या. ११ सप्टेंबर १९१७ रोजी पंढरपूर येथे झालेल्या पहिल्या सभेत चर्चिले गेलेल्या अनेक विषयापैकी एक विषय सोलापूर जिल्ह्यात सेंट्रल–को–ऑपरेटिव्ह बँक स्थापने संदर्भात होता. त्यानुसार इ.स.१९१८ च्या मार्च महिन्यात सोलापूर येथील १२ नागरिकांनी व पाच सोसायटयांच्या प्रतिनिधीनी ही बँक रजिस्टर करण्याकरिता रितसर अर्ज केला. त्यात सोलापूरचे कलेक्टर व डिस्ट्रिक्ट जज्ज यांचा समावेश होता. ८ मार्च १९१८ रोजी मुबंई इलाख्याचे त्यावेळचे सहकारी संस्थांचे रजिस्टार श्री.यु.बँक यांनी ही संस्था रजिस्टर

केली आणि २६ मार्च १९१८ रोजी बँकेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा जिल्ह्याचे कलेक्टर श्री. सिम्कॉक्स यांच्या अध्यक्षतेखाली झाली.[७]

सन १९६१–६२ या वर्षी सोलापूर जिल्ह्यामध्ये सहकारी संस्थाचे एकूण सभासद १,९७,४५२ तर सहकारी संस्थांची संख्या १,५४५ एवढी होती.[८] तर सन १९९९–२००० या वर्षामध्ये सभासद २०.३७ लाख तर सहकारी संस्था ८,१३६ एवढया होत्या.[९]

## ➢ पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळ

पंढरपूर हे सोलापूर जिल्ह्यामधील महत्त्वाचे असे तालुक्याचे ठिकाण आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतात कृषि विकास, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून व सहकारी चळवळीच्या माध्यमातून स्थानिक भागाच्या विकासास सुरूवात झाली. अत्यंत कमी पाऊस पडत असलेल्या या क्षेत्रामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात पारंपरिक पद्धतीने शेती व उद्योग केले जात होते. स्वातंत्र्योत्तरकाळानंतर व सहकारी चळवळीच्या विकासानंतर तालुक्यातील पीक पद्धतीत मोठया प्रमाणात बदल होऊन ऊस, कापूस, डाळिंब, द्राक्षे यासारखी नगदी पिके घेतली जाऊ लागली. या बदलत्या पीक पद्धतीमुळे सहकारी चळवळीच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांची स्थापना झाली. सहकार क्षेत्राने पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल केला, क्रांती घडविली, सामान्य माणसाला उभे करण्याचे काम केले. पंढरपूर तालुक्यात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना झालेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वि.का.सेवा सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, पगारदार सेवकांच्या पतसंस्था, अर्बन बँका, पणन संस्था, शेतीमाल प्रक्रिया संस्था, ग्राहक भांडार, मजूर संस्था, बलुतेदार संस्था, औद्योगिक वसाहती, सूतगिरण्या, हातमाग विणकर संस्था, यंत्रमाग विणकर संस्था, देखरेख संघ, शेती साधन पुरवठा संस्था, गृहनिर्माण संस्था, वाहतूक संस्था इत्यादी विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना झाली आहे. प्रस्तुत प्रकारण पंढरपूर तालुक्यातील काही निवडक सहकारी संस्थांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

पंढरपूर तालुक्यातील पहिली प्राथमिक शेती पतपुरवठा सहकारी संस्था (वि.का.सेवा.सह.संस्था) दिनांक ३ नोव्हेंबर १९११ रोजी भाळवणी ता.पंढरपूर या ठिकाणी स्थापन झाली. या सहकारी संस्थेचे नाव भाळवणी वि.का.सेवा.सह.संस्था.मर्या. भाळवणी असे

असून तिचा नोंदणी क्रमांक एसयुआर/ पीआरआर/ आरएसआर/ एसआर/२७६३ असा आहे. दुसरी वि.का.सेवा. सहकारी संस्था दिनांक १५ जानेवारी १९१३ रोजी स्थापन झाली. या सहकारी संस्थेचे नाव करकंब नं.१ वि.का.सेवा सह.संस्था मर्या, करकंब असे आहे. तर तिचा नोंदणी क्रमांक एसयुआर/ पीआरआर/ आरएसआर/ एसआर/५३७ असा आहे. इ.स. १९११ ते इ.स.२००४ या कालखंडात एकूण १२८ वि.का.सेवा.सह.संस्था. पंढरपूर तालुक्यात कार्यरत होत्या.[१०]

पंढरपूर तालुक्यातील दुसरी सहकारी संस्था व पहिली बँक दिनांक १९ नोव्हेंबर १९१२ रोजी पंढरपूर अर्बन को–ऑप बँक लि; पंढरपूर या नावाने स्थापन झाली. या संस्थेचा नोंदणी क्रमांक एसयुआर/बीएनके/(ओ)/५१० असा आहे.[११]

नोकरदारांच्या पत पुरवठा सहकारी संस्थेमध्ये पंढरपूर नगरपरिषद नं.१ कर्मचारी सहकारी पत.संस्था मर्या; पंढरपूर ही संस्था दिनांक २० मार्च १९१८ मध्ये स्थापन झाली.इ.स. २००४ पर्यंत या प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या २७ इतकी होती. इतर नागरी पत पुरवठा सहकारी संस्थामध्ये (ग्रामीण) यशवंतराव चव्हाण ग्रामीण बिगर शेती सह.पत संस्था मर्या; गुरसाळे या संस्थेची स्थापना १६ जानेवारी १९८६ रोजी झाली. या प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या इ.स.२००४ पर्यत २५ इतकी होती. इतर नागरी पत पुरवठा सहकारी संस्था (नागरी) या प्रकारच्या सहकारी संस्थामध्ये श्री शिवप्रताप नागरी सहकारी पत.संस्था मर्या.पंढरपूर या संस्थेची स्थापना दिनांक १४ जानेवारी १९८९ रोजी झाली. इ.स.२००४ पर्यंत या प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या ११ एवढी होती. दिनांक ९ जुलै १९५१ रोजी पंढरपूर तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली असून तिचा नोंदणी क्रमांक २४०६० इतका आहे. या संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध झालेली आहे. दिनांक १७ एप्रिल १९८९ रोजी श्री विठ्ठल फळ उत्पादक सहकारी संस्था मर्या.पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. पंढरपूर तालुक्यात दोन सहकारी साखर कारखाने कार्यरत आहेत त्यापैकी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर गुरसाळे या कारखान्याची स्थापना ०५ मार्च १९७४ रोजी झाली असून त्याचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरजी(अे)/ ४ असा आहे तर चंद्रभागा (स.शि.व.काळे) सहकारी साखर कारखाना भाळवणी या सहकारी साखर कारखान्याची स्थापना २२ जानेवारी १९९० रोजी

झाली असून त्याचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/पीआरजी/(अे)/२९/(एस) असा आहे.[१२]

सामुदायिक शेती संस्थांमध्ये दिनांक ७ डिसेंबर १९६४ रोजी शिंगला गिरीजन मागासवर्गीय सामुदाई शेती सहकारी संस्था मर्या; बादलकोट नेमतवाडी या संस्थेची स्थापना झाली तर २१ ऑगस्ट १९६९ रोजी शेगांव दुमाला मागासवर्गीय सामुदाई शेती सहकारी संस्था मर्या ; शेगांव दुमाला या संस्थेची स्थापना झाली. तेल घाण्या सहकारी संस्थांमध्ये दिनांक १८ डिसेंबर १९५६ रोजी करकंब तेल उत्पादक सहकारी संस्था मर्या. करकंब या संस्थेची स्थापना झाली. ताडगुळ सहकारी संस्थामध्ये दिनांक १२ ऑक्टोबर १९५६ रोजी पंढरपूर विभाग निरा ताड पदार्थ उत्पादक सहकारी संस्था मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. दिनांक ८ ऑगस्ट १९९१ रोजी पंढरपूर गटपातळीवरील बहुउद्देशीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या ; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. दिनांक ७ जानेवारी १९६० रोजी मेवा मिठाई उत्पादक सहकारी संस्था मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली असून तिचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/पीआरडी/(आय)/ ५४३० इतका आहे. दिनांक ०७ मार्च १९९३ रोजी श्री. विठ्ठल खत उत्पादक सहकारी संस्था मर्या ; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. दिनांक ५ डिसेंबर १९९० रोजी श्री. विठ्ठल सहकारी संस्था सूत गिरणी मर्या; पंढरपूर या सहकारी सूत गिरणीची स्थापना झाली. दिनांक २९ नोव्हेंबर २००० रोजी श्री रूक्मिणी सहकारी औद्योगिक वसाहत मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली, प्राथमिक ग्राहक भांडार सहकारी संस्थामध्ये पंढरपूर किराणा भुसार सहकारी ग्राहक भांडार संस्था मर्या. पंढरपूर या संस्थेची दिनांक ९ ऑक्टोबर १९४८ रोजी स्थापन झाली असून तिचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/सीओएन/११५१ असा आहे. इ.स. २००४ पर्यंत अशा प्रकारच्या सहकारी संस्थाची संख्या ८ इतकी होती. गृहनिर्माण सहकारी संस्था (ग्रामीण ) मध्ये दिनांक १२ ऑगस्ट १९९७ रोजी श्री विश्वकर्मा गुमास्ता सह गृहनिर्माण संख्या मर्या ; कासेगांव या संस्थेची स्थापना झाली. तर नागरी भागात दिनांक १४ नोव्हेंबर १९५६ रोजी सिद्धार्थ बेकवर्ड क्लास सह. गृहनिर्माण संस्था मर्या ; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली मजूर सहकारी संस्थामध्ये दिनांक २७ ऑगस्ट १९५७ रोजी पंढरपूर वडार समाज मजूर सहकारी संस्था मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली असून तिचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/

पीआरडी/(एल) ३९३० असा आहे. इ.स.२००४ पर्यंत अशा प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या ७८ इतकी होती. वाहतूक सहकारी संस्थांमध्ये दिनांक २९ सप्टेंबर १९९८ रोजी श्री सुधाकरपंत परिचारक वाहतूक सहकारी संस्था मर्या ; पंढरपूर तर दिनांक २२ मार्च २००१ रोजी श्री चंद्रभागा कृषि उद्योग ऊस तोडणी वाहतूक सहकारी संस्था मर्या ; भाळवणी या संस्थेची स्थापना झाली. पाणी वापर सहकारी संस्थामध्ये दिनांक ३० मार्च १९७९ रोजी श्री. विठ्ठल कालवा पाणी वापर सह. संस्था मर्या; शंकरगांवनळी या संस्थेची स्थापना झाली. इ.स.२००४ पर्यंत पंढरपूर तालुक्यातील अशा प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या ३२ इतकी होती. उपसा जलसिंचन प्रकारच्या संस्थामध्ये दिनांक २७ सप्टेंबर १९९१ रोजी श्री गणेश पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्या; करकंब या संस्थेची स्थापना झाली. दिनांक १६ जून १९९४ रोजी पंढरपूर तालुका कृषि पदवीधर सहकारी संस्था मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. शेती सेवा साधन पुरवठा सहकारी संस्थामध्ये दिनांक १ फेब्रुवारी १९९३ रोजी ज्योतिर्लिंग रासायनिक खते बि–बियाणे सह.संस्था मर्या; अजनसोंड या संस्थेची स्थापना झाली. सहकारी औद्योगिक वसाहती संस्थेमध्ये दिनांक २९ नोव्हेंबर २००० रोजी श्री.रूक्मिणी सहकारी औद्योगिक वसाहत मर्या; पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली असून तिचा नोंदणी क्रमांक एसयुआर/ पीआरआर/आरएसआर/१०७१ असा आहे. इ.स.१९०४ ते इ.स.२००४ पर्यंतच्या कालखंडातपंढरपूर तालुक्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या ७७२ एवढी होती.[१३]

## ➢ दि पंढरपूर अर्बन को–ऑप बँक लि.पंढरपूरः–

पंढरपूर अर्बन बँकेने पंढरपूर तालुक्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल केला आहे. येथील अर्थकारणामध्ये क्रांती घडविली आहे. पंढरपुरातील गरजू लोकांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी या बँकेची स्थापना झाली. प्रथम क्रेडिट सोसायटी नंतर 'क्रेडिट बँक' आणि पुढे 'परिपूर्ण बँक' असा संस्थाविस्तार या बँकेचा झालेला आहे. जून १९११ मध्ये तत्कालीन डिव्हिजनल ऑर्गनायझर बार्शीचे भाऊसाहेब साने वकील हे पंढरपुरात जोग वकिलांच्या घरी भोजनाच्या निमित्ताने आले होते. त्यावेळी त्यांनी बार्शी येथे सहकारी पतपेढी सुरू झाल्याचे सांगितले. त्यावेळी वासुदेव आत्माराम जोशी, दत्तात्रय बाळकृष्ण परिचारक हेही उपस्थित होते. त्यामुळे अशा प्रकारची सहकारी पतपेढी पंढरपुरात असावी अशी कल्पना पंढरीच्या या

लोकांच्या मनात निर्माण झाली. दुसरे दिवशी गावातील प्रतिष्ठित लोकांची बैठक होऊन सहकारी पतपेढी स्थापन करण्याचे ठरविण्यात आले.[१४]

कार्तिक पाडव्याच्या मुहूर्तावर सर्व मंडळी एकत्र आली. पारतंत्र्याच्या काळात सहकाराचे कोणतेही वातावरण नसताना पंढरपूर येथे सहकारी पतपेढी स्थापन झाली. या बैठकीला जिल्ह्याचे असि.कलेक्टर अंजनगावकर हजर होते. त्यांनी बँकेच्या या कार्यास उत्तेजन दिले. संस्थापक मंडळीनी भाग भांडवल गोळा करण्यासाठी घरोघर पदयात्रा सुरू केली. पहिला शेअर संस्थापक विनायक जोग यांनी घेतला. थोडया अवधीत आवश्यक ते शेअर भांडवल गोळा झाले. तत्कालीन शासनाने बॉम्बे सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेतून पाच हजार रूपये कर्ज देऊन पेढीला आर्थिक भक्कमपणा दिला. संस्था नोंदणी करण्यासाठी केलेला अर्ज दि.१२ नोव्हेंबर १९१२ रोजी मंजूर होऊन आला.[१५]

आज पंढरपूर अर्बन बँकेला पंढरपुरच्या अर्थविकासाचे अधिष्ठान म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे. या बँकेच्या स्थापनेत विनायक शिवाजी जोग, वासुदेव आत्माराम जोशी, ह.तु.कवठेकर, दामोदर त्रिंबक पुरंदरे, दत्तात्रय बाळकृष्ण परिचारक, नारायण हरिबा कोलंगडे, द.ना.मांगले, दा.बा.लिगाडेयाचा मोठा वाटा होता.या आठ जणांनी पंढरपूर बँकेची पतपेढी रूपात स्थापना केली. गरीब, गरजू, मध्यमवर्गीय छोटे–छोटे व्यापारी, यांना सावकाराच्या पाशातून मुक्त करण्याच्या हेतूने पतपेढी सुरु करण्यात आली व त्यायोगे अर्थकारणाद्वारे समाजसेवेच्या नव्या पर्वाचा श्रीगणेशा झाला. बँकेची पहिली कायदेशीर सभा दि.१२ डिसेंबर १९१२ रोजी अकबरअल्ली बोहरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी बोहरी यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची उपसमिती नेमण्यात आली. या समितीत विनायक शिवाजी जोग, वासुदेव आत्माराम जोशी, दत्तात्रय बाळकृष्ण परिचारक, दामोदर त्रिंबक पुरंदरे व नारायण हरिबा कोलंगडे हे सदस्य निवडले गेले.[१६]

१९१२ साली फक्त २३०० रूपये भागभांडवलावर सुरू झालेली ही संस्था सध्या १००० कोटी रूपयांची उलाढाल करणारी एक सक्षम बँक म्हणून सहकारी क्षेत्रात स्थिरावलेली आहे. ६०४.९३ कोटी रूपयांच्या ठेवी ३७१.८० कोटी रू.चे कर्ज वाटप आणि पंढरपूर, सोलापूर, बार्शी, सांगोला, लातूर, पुणे, बारामती इत्यादी १६ शाखा असा बँकेचा विस्तार झालेला आहे.[१७] बँकेने स्थापनेपासून आतापर्यत अनेक चढउताराचे दिवस पाहिले आहेत.

इ.स.१९२८ च्या दरम्यान जागतिक मंदीचा भारतातही परिणाम झाला आणि पंढरपूर बँकही आर्थिक संकटात सापडली. या स्थितीत भाऊसाहेब काणे वकिलांच्या रूपाने बँकेला एक धडाडीचे खंबीर नेतृत्त्व लाभले. त्यांनी अनेक कठोर निर्णय घेऊन बँकेला संकटातून मुक्त केले. काणे यांच्या नंतर रा.गो.काळे, रा.न.अत्रे, वा.कृ.उत्पात, रामचंद्र मारूती डोके, पांडुरंग दत्तात्रय आराध्ये आदी अध्यक्ष होऊन गेले. त्यानंतर बँकेला माजी आमदार बाबुरावजी जोशी यांचे नेतृत्त्व बरेच वर्षे लाभले. त्यांच्यासोबत औदुंबरशेठ कवठेकर यांनी जे कार्य केले. त्यामुळे बँक स्थिरस्थावर झाली आणि विस्ताराच्या योजना आखण्यात आल्या.[१८]

**पंढरपूर अर्बन बँकेला लाभलेले चेअरमन आणि त्यांच्या काळातील बँकेची प्रगती :-**

पंढरपूर अर्बन बँकेची पहिले चेअरमन म्हणून श्री.वि.सी.जोग यांची निवड झाल्यानंतर त्यांनी सहकाराची गंगा तालुक्याच्या गावापर्यत नेली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेतही त्यांचा सहभाग होता. १९१७ साली श्री.जोग यांची नियुक्ती सहकार खात्याचे ऑनररी डिस्ट्रीक्ट ऑर्गनायझर म्हणून नेमणूक झाली व त्यांनी बँकेच्या चेअरमनपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी वासुदेव आत्माराम जोशी यांची चेअरमनपदी निवड झाली. त्यांनी आपल्या कर्तृत्त्वाने बँकेला स्थिरता व लोकांचा विश्वास प्राप्त करून दिला. ते इ.स.१९२५ पर्यत चेअरमन होते. त्यांच्या काळात १९२३ साली. 'दि पंढरपूर अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी' या नावाने नोंदलेली ही संस्था 'दि. पंढरपूर अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि. हे नामाभिधान प्राप्त करती झाली.[१९]

इ.स.१९२५-२६ मध्ये श्री. कृष्णाजी रामचंद्र नवाळे हे बँकेचे चेअरमन झाले. इ.स.१९२७-२८ या काळात बँकेने चेक, हुंडी, ड्राफ्टस, रेल्वे रशिदी यांचे वसुलीचे धंद्यास सुरूवात केली. तसेच व्यापारी लोकांना कॅशक्रेडिट कर्जे देण्यास सुरूवात केली. बँकेच्या इतिहासातील पहिलीकॅशक्रेडीट कर्जे नवाळे यांच्या कालखंडात नं.ह.नदाफ, न.स.बडवे, ब.ल.बहादुले, अ.शा.तांबोळी यांना देण्यात आली. १९२९ साली बँकेने मालतारणावर व्यापाऱ्यांना कर्जे देण्यास सुरूवात केली. १९३१ साली चोख व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्याच्या ठराविक मर्यादेपर्यतच्या हुंडया खरेदी करण्याचा व्यवहार बँकेने सुरू केला. १९३२-३३ साली मध्यमवर्ग व छोटे व्यापारी सराफ यांच्या गरजा भागविण्यासाठी सोने-चांदी तारण कर्ज बँकेने सुरू केले. लोकांना बँकिंग शिकविण्यासाठी जुलै १९३१ पासून चेक पद्धत सुरू करण्यात

आली. सेव्हिंग खात्यातील रक्कम चेकने देण्यास सुरूवात केली. तसेच परगावच्या आर्थिक व्यवहारासाठी सोलापूर डि.को.बँक, पुणे सेंट्रल को.बँक, मद्रास प्रॉव्हि.को.बँक, बार्शी सेंट्रल को.बँक या बँकेवर शेकडा फक्त नऊ पै.कमिशन घेऊन चेक्स हुंड्या देऊ लागले. इ.स.१९३४–३५ मध्ये बँक रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची सभासद झाली. एकंदरीत श्री नवाळे यांच्या कालखंडात बँकेला स्थिरता प्राप्त झाली. १९२५ साली बँकेतील ठेवी रू.५१,२०२/– होत्या त्या १९३७ साली २,९३,२२९/– रूपये म्हणजे चौपटीपेक्षा जास्त झाल्या आणि बँकेस नफा सुद्धा ८,१००/– रूपये झाला. अनेक योजना सुरू झाल्या. बँकिंगचे व्यवहार सुरू झाले. इमारती बांधल्या गेल्या. बँकेच्या ठेवी, उलाढाल, नफा भांडवल, यात तर वाढ झालीच पण स्थावर मालमत्ताही वाढली.[२०]

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सर्व जगातच आर्थिक मंदी आली. यावेळी पंढरपूर बँकही आर्थिक संकटात सापडली. अशावेळी भाऊसाहेब काणे हे बँकेचे चेअरमन झाले. पंढरपुरच्या सामाजिक व राजकीय जीवनातील प्रखर बुद्धिवान नेते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी आर्थिक संकटातून बँकेला बाहेर काढले. इ.स.१९३७ पासून बँकेला तोटा होऊ लागला. सभासद संख्या ९३० पासून ७६६ पर्यंत घसरली होती. थकबाकीचे प्रमाण ५० टक्केपर्यंत वाढले. कर्जवसुली थांबली, हुंडी व्यवहार थांबला, अनुत्पादक कर्जे भरमसाठ दिली गेल्याने कर्जबाकी वाढली. काणे यांनी चेअरमनपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रथम कर्जवाटप ४० टक्के ने कमी केले. कर्जदारांच्या भेटी घेतल्या. काहींच्यावर दावे ठोकले. सोने, चांदी तारणासाठी व्हॅल्युअरची नेमणूक केली. पोटनियम कडक केले. बँकेच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविले. या सर्वांचा परिणाम म्हणून बँकेला स्थिरता आली. याचकाळात नोकरवर्गाची वेतनश्रेणी निश्चित झाली. संकटातून बँक बाहेर पडली. ऑडिटच्या 'क' वर्गातून 'ब' वर्गात आली. १९४५ साली 'अ' वर्ग मिळाला. तो आजतागायत कायम आहे.[२१] काणे यांच्यानंतर रा.गो.काळे, रा.न.अत्रे, वा.कृ.उत्पात, रामचंद्र मारूती डोके, पांडुरंग दत्तात्रय आराध्ये आदी अध्यक्ष होऊन गेले.[२२]

१९ सप्टेबर १९५४ रोजी औंदुबर हरबाजी कवठेकर हे पंढरपूर बँकेचे चेअरमन झाले. त्यांनी बँक भरभराटीला नेली व बँकेची सर्वांगीण प्रगती केली. ते जवळजवळ १९ वर्षे बँकेचे चेअरमन होते. इ.स. १९७८ ते इ.स. १९८७ या काळात ते बँकेचे अध्यक्ष होते.[२३]

रिझर्व्ह बँकेने नागरी बँकांना शाखा विस्तार करण्यास मान्यता दिल्यानंतर पंढरपूर बँकेने ५ एप्रिल १९६२ रोजी सांगोला येथे शाखा स्थापन केली. त्यानंतर २० एप्रिल १९६९ रोजी मोडनिंब येथे दुसरी शाखा स्थापन केली.[२४] पुढे बार्शी येथील व्यवसाय, उद्योगधंदे व भक्कम बाजारपेठेचा विचार करून २४ डिसेंबर १९७० रोजी बार्शीत पंढरपूर अर्बन बँकेची शाखा उघडण्यात आली.[२५]

इ.स. १९७५ मध्ये बँकेची धुरा सुधाकरपंत परिचारक यांच्याकडे आली. त्यांनी बँकेला लोकाभिमुख केले. ग्रामीण व शहरी लोकांची नाळ बँकेशी त्यांनी जोडली. इ.स.१९७६ हे वर्ष युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले. या महिला वर्षाचे औचित्य साधून माजी आमदार बाबुरावजी जोशी यांच्या स्नुषा विणाताई जोशी यांच्या अथक परिश्रमातून बँकेची महिला शाखा ५ डिसेंबर १९७६ रोजी पंढरपुरातील दत्त घाटाजवळील पुरंदरे भवनात सुरू केली. महिलांचाही बँकींग क्षेत्रात समावेश व्हावा हा हेतू होता.[२६]

पंढरपूर येथील बँकेचा व्यवसाय मोठया प्रमाणात वाढल्यानंतर पंढरपूर येथील प्रधान कार्यालय व महिला शाखा या दोन शाखा व्यवसायासाठी अपुऱ्या पडू लागल्या. म्हणून बँकेने १३ डिसेंबर १९८५ रोजी मार्केट यार्ड, पंढरपूर येथे बँकेची सातवी व पंढरपुरातील तिसरी शाखा स्थापन केली. पुढे ३१ मार्च १९९० रोजी मार्केट यार्ड, सोलापूर, १३ ऑगस्ट १९९३ टिळक चौक सोलापूर,१३ ऑगस्ट १९९३  वैराग, २३ सप्टेंबर १९९८ नेहरूनगर, सोलापूर येथे बँकेच्या शाखा सुरू करण्यात आल्या.[२७] सुधाकरपंत परिचारक यांच्या काळात सभासद संख्या १२,०९२ तर नफा ३१,७४,८३१ रूपये इतका झाला. ठेवी १० पटीने वाढल्या. इ.स.२००२ मध्ये बँकेचे नेतृत्त्व प्रशांत परिचारक यांच्याकडे आले. त्यांनी ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षांचा अचूक वेध घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी कोअर बँकिंग प्रणाली, एटीएम, डेबिट कार्ड, प्रणालीचा अवलंब केला.[२८]

**बँकेने राबविलेल्या विविध कर्जयोजना –**

बँकेनेअनेककर्ज योजना आखल्या. यात सावली गृहकर्ज योजना, सुशिक्षित बेकारांसाठी स्वावलंबन कर्ज योजना, वैद्यकीय व्यवसायासाठी धन्वंतरी कर्ज योजना, कृषिपूरक कर्ज,

गृहोपयोगी वस्तुंसाठी कर्ज, वाहने, सोने खरेदीसाठी कर्ज अशा विविध योजना कर्जाच्या बाबीसंबंधी राबविल्या जातात.[२९] सुधाकरपंत परिचारक यांच्या काळात सभासदांसाठी अनेक नव्या कर्जयोजना सुरू केल्या. 'घर बांधणी कर्ज' ही पंढरपूर अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेची सभासदांना देणगी आहे. या योजनेतून बार्शी व पंढरपूर यथे अनेक मध्यमवर्गीयांनी आपली स्वतःची घरकुले उभी केली. शासनाने घरबांधणी कार्यक्रम सुरु करण्यापूर्वी हा घरबांधणी कार्यक्रम पंढरपूर बँकेने राबविला. अकलूजसारख्या ग्रामीण भागात ज्यांचे मासिक उत्पन्न अत्यल्प आहे, त्या साखर कामगारांना प्रत्येकी २० हजार रूपये घरबांधणीकरीता कर्ज दिले.[३०]

भांडवल पूर्तता निकष व मान्य उत्पन्न संकल्पना(एन.पी.ए.) या क्षेत्रामध्ये बँकेने उत्कृष्ट कार्य केले आहे. इ.स. २००४-०५ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे रू.९५५.०६ लाख इतकी एन.पी.ए.ची तरतूद करावी लागणार होती. तथापि बँकेने रू.२,०२५.०० लाख इतकी तरतूद केली होती.[३१] रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने नागरी सहकारी बँकांना भांडवल पूर्तता निकष (सी.आर.ए.आर.) ही संकल्पना लागू केली. त्यानुसार दि. ३१मार्च२००४ अखेरपर्यत नागरी सहकारी बँकानी भांडवल पर्याप्तता प्रमाण ९ टक्के पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु पंढरपूर बँकेचे हे प्रमाण इ.स.२००३-०४ या वर्षी २४.२८ टक्के इतके होते. यावरून असे म्हणता येईल की बँकेची प्रगती निश्चितच कौतुकास्पद होती.[३२]

### ➢ सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. सोलापूर, शाखा पंढरपूर –

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही जिल्ह्यातील सहकारी संस्थांची केंद्रीय बँक असून जिल्ह्याच्या व पंढरपूर तालुक्याच्या विकासाच्या दृष्टिने केंद्रबिंदू आहे. तालुक्यातील कामगार, कारागीर, सुशिक्षित बेरोजगार इत्यादी दुर्बल घटकांचा आर्थिक विकास हे बँकेचे ध्येय असून जिल्ह्यातील व तालुक्यातील सहकारी चळवळीची निकोप वाढ होण्यासाठी बँकेने कृषि पतधोरण अधिक सुलभ बनवून सभासदांना शेती व पूरक व्यवसायासाठी तसेच कृषि यांत्रिकीकरण, दूग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, वाहन खरेदी इत्यादीसाठी बँक कर्ज पुरवठा करीत आहे. सोलापूर जिल्ह्यातील कामगार, कारागीर, सुशिक्षित बेरोजगार तसेच आर्थिकदृष्टया मागासलेल्या व दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासन पुरस्कृत योजनांतर्गत एकात्मिक ग्रामीण विकास योजना, विविध प्रकारच्या बिगरशेती संस्था, कारागीर संस्था, पगारदार संस्था इत्यादींना कर्जपुरवठा करून सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचा बँकेने प्रयत्न केला

आहे. तसेच ठेवीदार ग्राहक यांचेसाठी ग्राहकोपयोगी टिकाऊ वस्तू पगाराचे तारणावर व सोनेचांदी तारणावर सुलभ व जलद गतीने कर्जपुरवठा करून आर्थिक गरजा भागविण्यास हातभार लावला आहे. तसेच अलिकडच्या काळात बचत गटासाठी देखील कर्जपुरवठा केलेला आहे. एकूणच सोलापूर जिल्ह्याच्या व पंढरपूर तालुक्याच्या आर्थिक विकासात सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने कार्य केले आहे. त्याबरोबरच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला चालना देण्याचे कार्य केले आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना दि.८ मार्च १९१८ रोजी झाली.[३३] बँक स्थापनेच्या वेळी शेअर्स भांडवल अवघे रुपये २३,२४० एवढे होते आणि ठेवी रूपये २८,२५० एवढया होत्या. या बँकेच्या वाढीसाठी सुरूवातीला सोलापूर शहरातील व जिल्ह्यातील अनेकांचे योगदान लाभले आहे.त्यामध्येव्ही.एम.जोग, जी.डी.साठे, एम.आर.गोडबोले, जी.डी.पुंडे, जे.ई. कुलकर्णी, जी.आर.कुंभकोणी इत्यादींचा सहभाग होता. बँकेच्या सभासदत्वास ग्रामीण भागत प्रतिसाद मिळू लागला. तेव्हापासून शेतकऱ्यांमधील व जिल्ह्यातील कर्तृत्त्ववान नेतृत्त्व या बँकेस मिळू लागले. त्यामध्ये प्रामुख्याने गणपतराव साठे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, नामदेवराव जगताप यांनी बँकेच्या उद्देशास शेतकऱ्यांच्यापर्यत पोहचवण्याचे मोठे कार्य केले आहे. या बँकेच्या सोलापूर जिल्ह्यात एकूण २१४ शाखा असून त्यापैकी १७ शाखा पंढरपूर तालुक्यात कार्यरत आहेत.[३४]

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा पंढरपूर या बँकेची स्थापना दिनांक १९६९ रोजी झालेली आहे. बँकेच्या स्थापनेपासून स्वातंत्र्यपूर्व काळापर्यत सरकारच्या अनास्थेमुळे या बँकेची प्रगती धिम्या गतीने होत राहिली. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात देशाने आणि राज्यानेही सहकारी चळवळीस प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले. सहकारी चळवळीतील तत्कालीन नेत्यांनी दिशा व मार्गदर्शन दिल्यामुळे या चळवळीस गती मिळाली आणि ती गती जिल्ह्यातील आणि पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीच्या वाढीस उपयुक्त ठरली.[३५] सन १९७० नंतरच्या काळात या चळवळीने मोठी झेप घेतली. बँकेच्या सर्वसमावेशक धोरणामुळे व सर्व क्षेत्रातील कार्यकर्त्याच्या एकत्रित काम करण्याच्या धोरणामुळे बँकेने मोठी प्रगती साधलेली आहे. या बँकेने देशपातळीवरचे उत्कृष्ट कार्यप्रणालीचे प्रथम क्रमांकाचे जिल्हा बँक म्हणून

पुरस्कार पटकाविला आहे. तसेच बँकेच्या उत्कृष्ट कार्याबद्दल राज्य सहकारी बँक असोसिएशनकडून दोनवेळा पुरस्कार प्राप्त झाला आहे.[३६]

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पंढरपूर तालुक्यातील अनेक सहकारी संस्थांना कर्जपुरवठा केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विठ्ठल सहकारी साखर कारखाना, चंद्रभागा सहकारी साखर कारखाना, पणन संस्था, शेतीमाल प्रक्रिया संस्था, नागरी सहकारी बँका, दूग्ध व्यवसाय सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था, पाणीपुरवठा सहाकरी संस्था, मजूर सहकारी संस्था, औद्योगिक सह.संस्था, पगारदार सेवक सहकारी पतसंस्था इत्यादी विविध सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जपुरवठा केल्यामुळे तालुक्याच्या आर्थिक विकासास मोठी गती मिळालेली आहे. शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक इत्यादी वर्गाला सुलभ व्याजदराने कर्जपुरवठा झाल्याने त्यांच्या प्रगतीस चालना मिळालेली आहे.[३७]

**बँकेने राबविलेल्या विविध योजना –**

बँकेने सुरूवातीपासूनच सोलापूर जिल्हा व पंढरपूर तालुक्यात विविध योजनाच्या माध्यमातून तालुक्याचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यातील काही प्रमुख योजना खालीलप्रमाणे –

**१) अल्पमुदत पीक कर्जपुरवठा –**

बँक प्रामुख्याने जिल्हयातील व पंढरपूर तालुक्यातील सहकारी शेती संस्थांच्या सभासदांना विविध प्रकारच्या पिकांसाठी कर्जपुरवठा करते. यामध्ये अधिक उत्पादन देणारी अन्नधान्याची पिके, डाळवर्गीय पिके, तेलबिया, कापूस, ऊस तसेच विविध फळबांगासाठी व भाजीपाल्यासाठी ही बँक कर्जपुरवठा करते.

**२) किसान क्रेडिट कार्ड–**

शेतकरी सभासदांना पिकोत्पादनासाठी वेळेवर आणि पुरेसा पीक पतपुरवठा व्हावा म्हणून शासनाने लागू केलेली किसान क्रेडिट कार्ड योजना बँकेने दि. १ एप्रिल १९९९ पासून अमंलात आणली आहे. नियमित व समाधानकारक कर्ज व्यवहार असलेल्या पात्र सभासदांना या योजनेत सामावून घेण्यात आले आहे.

**३) शेतकरी सभासदांसाठी वैयक्तिक जनता अपघात विमा योजना –**

सर्पदंश, विजेचा धक्का, हिंस्त्र श्वापदाकडून हल्ला इत्यादी कारणांमुळे शेतकरी सभासदाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास अशावेळी अपघातग्रस्त सभासदाच्या वारसास आर्थिक मदत मिळावी म्हणून बँकेने कर्जदार शेतकरी सभासदांसाठी सन २००० पासून जनता अपघात विमा योजना लागू केलेली आहे. परिणामी सभासदांचा बँकेवरील विश्वास दृढ होण्यास मदत झाली आहे.

**मध्यम मुदत कर्जपुरवठा –**

सोलापूर जिल्ह्याच्या व पंढरपूर तालुक्याच्या सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची पातळी खोलवर गेलेली आहे. तेव्हा तालुक्यातील जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी जलसिंचन योजनाकरिता जास्तीत जास्त कर्जपुरवठा करणेचे बँकेचे धोरण आहे. जिल्हा बँकेने पाईप लाईन योजनेसाठी ओलिताखाली येणाऱ्या क्षेत्रास एकरी रू.२०,०००/– प्रमाणे जास्तीत जास्त १५ एकरासाठी रू.३,००,०००/– कर्ज देण्याचे निश्चित केले आहे. त्याप्रमाणे संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील व पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीपूरक उद्योग व्यवसायासाठी उदा.शेळीमेंढी पालन, दुभती जनावरे, कुक्कुटपालन, मळणीयंत्र, रेशीम उद्योग इत्यादी विविध योजनांसाठी बँकेमार्फत कर्जपुरवठा केला जातो. तसेच शासनाच्या धोरणानुसार २० कलमी कार्यक्रमातंर्गत लघुसिंचनासाठी गोबरगॅस संयंत्र व एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली दुभती जनावरे व इतर कारणांसाठी मध्यम मुदत कर्जपुरवठा केलेला आहे.

लघुसिंचनासाठी दिलेल्या कर्जामुळे पंढरपूर तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्रात वाढ झालेली असून ऊस, भुईमूग, गहू, डाळिंब, द्राक्षे, विविध प्रकारचा भाजीपाला इत्यादी पैशाच्या पिकाच्या क्षेत्रात वाढ होऊन सभासदांचे उत्पादन व उत्पन्न वाढले आहे. वरील कर्ज योजनेमुळे शेतकरी सभासदांस जोडधंदा मिळून त्यांचे उत्पन्नात भरीव वाढ होताना दिसते आहे. परिणामी सभासदांचे जीवनमान, राहणीमान यांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जा उंचावला आहे.[३८]

**शिखर बँक कर्जे, संकरित पीक उत्पादन कार्यक्रम व मध्यम मुदत कर्जे**

इ.स.१९६९–७० या कालखंडामध्ये वरील योजनांच्या माध्यमातून ग्राहकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न या बँकेने केला शिखर कर्जे, संकरित पीक उत्पादन कार्यक्रम व मध्यम

मुदत कर्जे यावर विशेष भर देण्यात आला. ज्यामुळे शेतकरी, सभासद व ग्राहक या बँकेकडे आकर्षित झाले. याबरोबरच बँकेतील कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा वेगेवगळया योजनाची अंमलबजावणी करण्यात आली. उदा. कर्मचारी घरबांधणी[३९] इ.स.१९७२–७३ मध्ये शेतकऱ्यांना सोसायटयामार्फत पीक उत्पादनासाठी कर्जाचा पुरवठा मोठया प्रमाणात केला गेला, मात्र दुष्काळामुळे संबंध या जिल्ह्यातील ९५५ गावाची आणेवारी ०६ आणेपेक्षा कमी असल्यामुळे अल्पमुदत कर्जाची प्रत्यक्ष वसूली ६५.१५ लाख एवढी होती.[४०]

विशेषत: इ.स. १९७२–७३ मध्ये नवीन कर्जवाटप धोरण अंगिकारण्यात आले. ज्यामध्ये अल्पमुदत कर्जाचे मध्यम कर्जात रूपांतर करण्यात आले. त्याबरोबरच बँकेचे कर्ज व थकबाकीचे कर्जाचे पुनर्वसन सवलतीचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून दिला. ज्यामुळे सततच्या दुष्काळातून सुटका होणे हा उद्देश सफल झाला.[४१] याबरोबरच गटपातळीवर ग्रामीण कारागीर सोसायटयांना कर्जे देण्याची योजना व्यापक प्रमाणात कार्यान्वित करण्यात आली. लोहार, चांभार, सुतार, कुंभार अशा बलुतेदारांसाठी कच्चा माल खरेदी व विक्रीसाठी गटपातळीवर कर्जवाटपाच्या योजनेमुळे वैयक्तिक कारागिरीच्या धंद्यास उत्तेजन दिले.[४२]

इ.स.१९७३–७४ या वर्षामध्ये मागच्या दुष्काळाची पर्वा न करता फक्त जनतेच्या आर्थिक स्थैर्यासाठी नवीन ३६ शाखांची उभारणी करण्यात आली. तसेच कर्जे वाटपाचे नवीन धोरण आखण्यात आले आणि त्याबरोबरच १) अल्पमुदत २) रूपांतर ३) पुनर्वसन ४) मध्यम व दिर्घमुदत ५) कॅश क्रेडीट व इतर व्यक्ती इत्यादी कर्ज वितरीत करण्यात आले.[४३] याशिवाय कर्जवाटपाचे नवीन धोरण इ.स.१९७३–७४ या वर्षामध्ये आखण्यात आले.ऊस उत्पादक सभासदासाठी कॅश क्रेडिट पद्धती असताना नवीन सभासदासाठी 'ऊस थक कर्जे खाते' या नावाचे स्वतंत्र खाते निर्माण करण्यात आले याही कालखंडामध्ये अस्तित्वात असणाऱ्या दुष्काळ परिस्थितीत बँकेने महत्वाची भूमिका पार पाडली.[४४]

इ.स.१९७५–७६ याकालावधीमध्ये नवीन कर्जधोरण, कर्जवाटप धोरणाची अमंलबजावणी वँकेने केली. त्यामध्ये साधे पीक कर्ज, हायब्रीड पीक कर्ज,गहू पायलट पीक कर्ज, उन्हाळी पीक उत्पादन योजना, नवभुधारक शेतकरी या नवीन घटकांना अर्थव्यवस्थेत समावून घेण्याचा बँकेचा प्रयत्न अतिशय महत्त्वपूर्ण होता. विशेषत: शेतकऱ्यांना,

अल्पभुधारकांना, ऊस शेती करणाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी एक पाऊल पुढे जाऊन बँकेने पुढाकार घेतला.[४५]

इ.स.१९८०–८१ च्या कालखंडामध्ये बँकेने शेती क्षेत्राबरोबरच पूरक अशा जोडधंद्याकडे लक्ष देण्याचे धोरण आखले ज्यात दूग्ध व्यवसाय, मेंढपाळ, भूमिहीन कारागीर यांना स्वावलंबी बनविण्याचे धोरण आखण्यात आले व त्यानुसार कार्य करण्याची व अंमलबजावणी करण्याची योजना आखण्यात आली. खरे तर यामुळे कर्जाचा आकडा वाढला व त्याबरोबरच अवर्षंणग्रस्त क्षेत्रे इ.साठी विशेष योजना आखण्यात आल्या.[४६] समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा विकास बँक कुवतीनुसार पुढे येताना दिसून येते.

१९८२–८३ सालच्या ६५ व्या अहवालामध्ये विशेष जाणवणारी गोष्ट अशी  की भूमीहिनांना सुद्धा जोडधंदे मिळवून देणेसाठी, आर्थिक स्थैर्य प्रदान करण्यासाठी त्याबरोबरच बलुतेदाराचे जीवनमान सुधारण्यासाठी मध्यम कर्जाचा पुरवठा करून सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पंढरपुरच्या विकासात मोठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.[४७] संकरित पीक कर्जे योजना किंवा गोडावून बांधकामासाठी दिर्घ मुदत कर्जे इ.स.१९८२–८३ या कालखंडातील विशेष योजना असून मागच्या १०, १२ वर्षातील सततच्या दुष्काळामुळे कर्जदार  कर्जफेडीस तयार होताना दिसून येत नव्हता. याची जाणीव बँकेला होती. इ.स.१९८४–८५ या वर्षाच्या वार्षिक अहवालाचे अवलोकन करता असे लक्षाात येते की, आर्थिक समतोल राखणे हा बँकेचा मूलभूत उद्देश होता. त्याबरोबरच जोडधंद्यामध्ये कुक्कुटपालनला प्रोत्साहन देण्यासाठी व श्रीमती इंदिरा गांधीच्या २० कलमी योजनेची अंमलबजावणी करणेसाठी शिवाय दारिद्र्यरेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक वनीकरण, गोबरगॅस सयंत्र यासाठी आर्थिक मदत व तरतुद करणे हे इ.स.१९८२–८३ यावर्षी अपेक्षित होते. बँकने या कामी एक पाऊल पुढे जाऊन शेतीसाहित्य खरेदीसाठी अल्पमुदतीचे कर्ज देवून आर्थिकदृष्टया सक्षम करण्याचे धोरण बँकेने अवलंबिले.[४८]  उपसा जलसिंचन योजनेसाठी कर्जपुरवठयाबरोबरच नवीन २० कलमी योजनेचा सहभाग,कोरडवाहू शेती विकास प्रसार, कडधान्य व वनस्पती तेलबियासाठी पतपुरवठा या द्वारे बँकेने सामान्य जनतेशी संबंध प्रस्थापित करण्याच प्रयत्न केला.[४९]

इ.स.१९८९–९० मध्ये काही नवीन प्रश्न घेऊन आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी जनमानसामध्ये उतरण्याचे काम बँकेने केले. ओलिताखालील क्षेत्र वाढविण्यासाठी पाईप लाईन्स, इलेक्ट्रीकल्स् मोटार्स, ऑईल इंजिन्स विहिरी दुरूस्ती, कडधान्य व तेलबिया उत्पादन वाढीसाठी त्याबरोबरच दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण कमी करण्यासाठी त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. कुक्कुटपालन, तुती लागवड, रेशीम उद्योग, वृक्षारोपण , सामाजिक व कृषि वनीकरण, उर्जासाधन विकास, फलोद्यान यासंबंधी सर्व आर्थिक घटकांना व्यवस्थितपणे न्याय देण्याचे काम बँकेने उत्कृष्टपणे पार पाडले.[५०] इ.स.१९८९–९० पर्यत जी कर्जाची पूर्वीची धोरणे होती ती कायम ठेऊन इ.स.१९९४–९५ मध्ये नवीन तुती लागवड व रेशमी उद्योग, सर्वंकष पीक विमा, कृषि पंढरी योजना, याबरोबरच शाखा विस्तार यातून खऱ्या अर्थाने बँकेने आपल्या कर्जविस्तार धोरणांचा विकास आणि विस्तार केला.[५१]

पंढरपुरच्या विकासाच्या दृष्टिने जिल्हा मध्यवर्ती बँक ही अतिशय मूलगामी स्वरूपाची ठरली. पंढरपूर तालुक्यातील कामगार, कारागीर, सुशिक्षित बेरोजगार याबरोबरच दुर्बल घटकांच्या विकासासाठी तसेच असंघटीत क्षेत्राच्या विकासासाठी पतधोरण, कर्जेधोरण अधिकाधिक सुलभ करण्याचे उद्दिष्टे बँकेने ठेवले. त्यानुसार इ.स.१९९५–९६ या कालवधीत – कृषि प्रपत्र योजना, लघुजलसिंचनासाठी परवाने देऊन त्यांना कॅनाल व भिमा नदीमधून पाणी उचलण्यासाठी आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न केला. जलसंपत्तीचा सुयोग्य वापर करण्यासाठी बँकेने

१) विकासात्मक कृती आराखडा (डी.ओ.पी.) योजना

२) शेतकी मंडळ (विकास वॉलंटियर वाहिनी)

३) कृषि पंढरी योजना.इ. योजना आखल्या व नाबार्डच्या सुचनेनुसार बँकेच्या कामकाजाचे नियोजन करण्यात आले.[५२]

पढंरपूर तालुक्याच्या विकासाच्या दृष्टिने किंवा समतोल विकास साधण्याच्या दृष्टिने जिल्हा बँकेने काही महत्वपूर्ण कृतिशिल कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. त्यामध्ये इ.स.१९९६–१९९७ या आर्थिक वर्षामध्ये पाईप लाईन, ईलेक्ट्रिक मोटार, ऑइल इंजिन, विहीर दुरूस्ती, ठिबक/तुषार जलसिंचन, जमिनीच्या मशागतीसाठी व शेतीमाल वाहतुकीसाठी ट्रॅक्टर, कडधान्ये व तेलबिया उत्पादन वाढीसाठी, दारिद्रय रेषेखालील लोकांचे जीवन

उंचावण्यासाठी निरनिराळया बाबीसाठी गोबर गॅस सयंत्राद्वारे इंधन बचत व सेंद्रीय खत निर्मितीसाठी मदत याशिवाय दुर्बल घटकांशी समाजाशी सलोखा राखण्याचा प्रयत्न आपल्या नियोजित कामकाजाच्या बाहेर जावून जिल्हा बँकेने केला.[५३]

महाराष्ट्र व भारत सरकारच्या आर्थिक सर्वकष धोरणाचा स्वीकार करून शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी बँकेने खूप योगदान दिले त्यामुळेच कुक्कुटपालन, दुभती जनावरे, रेशीम उद्योग, मळणीयंत्र, ट्रॅक्टर खरेदी यामुळे सभासदांस जोडधंदा मिळून त्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ झाल्याचे दिसून येते. बँकेच्या उत्कृष्ट कार्यशैलीमुळे इ.स.१९९५–९६ साली नाबार्डकडून प्रथम पुरस्कार मिळाला असल्यामुळे सामाजिक जाणिवा उत्तरोत्तर वाढत गेल्या. त्यामुळे इ.स.१९९७–९८ मध्ये बँकेस राजारामबापू पाटील मुद्रा राज्यस्तरीय प्रतियोगितेमध्ये द्वितीय पुरस्कार मिळाला.

वाहन अपघात, इमारत पडून अपघात, विजेच्या झटक्यापासून मृत्यू याबरोबरच सर्पदंश पुरात वाहून जाणे, विहिरीत पडून, जनावरापासून किंवा झाडावरून पडून मृत्यू आल्यास एक लाख रूपये पर्यतचा विमा आर्थिक संरक्षण मिळणेसाठी महाराष्ट्रात अग्रक्रमाने जनता अपघात विमा पॉलिसी राबवणारी बँक म्हणून ही बँक नावाजली गेली. याबरोबरच शासनाच्या विविध धोरणाचे द्वारे दारिद्रय निर्मूलनाच्या राष्ट्रीय  कार्यात सहभाग त्याद्वारे ग्रामीण विकास साधणेसाठी ही बँक सतत प्रयत्नशील राहिली.[५४] या बँकेच्या माध्यमातून

१) नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटच्या तारणावर ओव्हरड्राफ्ट कर्ज देण्याची सुविधा

२) अल्पमुदत पीक कर्ज पुरवठा

३) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

४) रूपांतर कर्ज योजना

५) शेतकरी सभासदांसाठी वैयक्तिक जनता अपघात विमा योजना इ. विविध योजना राबविल्या जातात.[५५]

याबरोबरच ग्राहकांना अंसख्य सवलती देण्याचे धोरणे बँकेद्वारे आखण्यात आले. महिला बचतगट योजना, सर्वंकष पिके विमा योजना याबरोबरच विकासात्मक कृषि आराखडा एकंदरीतच बँकेने आपल्या कार्यामध्ये व्यापक सुधारणा केल्यामुळे या बँकेचे नाव मोठया प्रमाणात महाराष्ट्राभर झाले. इ.स.१९९९ ते २००० मध्ये संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा

झाल्या त्या सर्व अतिशय प्रभावी झाल्या. ज्यामध्ये कुटुंब कल्याण ठेव योजना यातून मासिक ५० रूपये कपात करून सभासदांना योजनेनुसार सहाय्य देण्यात येत असे. लग्न, आजार, मृत्यू यामध्ये ताबडतोब मदत दिली जात असे.[५६] कुटुंब कल्याण योजनेद्वारे दिलेल्या शिक्षणविषयक अर्थसहाय्यामुळे खऱ्या अर्थाने बँक सहकाराच्या क्षेत्रात मोलाची भूमिका बजावताना दिसून येते. इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये उत्कृष्ट गुण मिळविलेल्या सभासदांच्या मुलामुलींना शिष्यवृत्ती देऊन बँकेने सामाजिक बांधिलकी जपल्याचे दिसून येते. एकंदरीत आरोग्य, लग्न, शिक्षण व इतर सहाय्याच्या माध्यमातून बँकेने तळागाळातील घटकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला.

इ.स.२००० ते २००१ हा कालखंड सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जडणघडणीतील मोलाचा कालखंड ठरला. २१ वे शतक त्याबरोबरच खुली अर्थव्यवस्था जागतिकीकरणामुळे बँकेवर काही निर्बंध लागू होणार होते. त्यामुळे जागतिकीकरणाच्या ओघात स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर स्वतःच्या विकास करण्यासाठी बँकेने अतिशय सक्षमपणे काम केले. उदा. स्वतःचे भांडवल वाढविणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे, ठेवी वाढविणे, मेंबर कर्ज, सभासदांचे कर्ज यातील अनिष्ट तफावत दूर करणे, शिवाय काटकसरीच्या माध्यमातून खर्चावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कार्याबरोबरच पारदर्शक व्यवहार अतिशय महत्त्वपूर्ण होता. वरील सर्व जोखीमा स्वीकारून बँकेने खालील सुविधा देण्याचा प्रयत्न केला.

१) नॅशनल सेव्हिंग्ज सार्टिफिकेटच्या तारणावर कर्जे देणे

२) शिखर कर्जे योजना

३) अल्पमुदती पीक कर्जे पुरवठा

४) महाराष्ट्र शासनाची पिक उत्पादन प्रोत्साहन योजना

५) मध्यम मुदत रूपांतर सवलत

६) स्वर्णजंयतीग्राम स्वरोजगार योजना

७) फलोद्यान विकास/शेतीमाल विकास प्रक्रिया[५७]

यासारखे अनेक प्रकल्प व इतर ग्रामीण जीवनाशी थेट संबंधित असलेल्या घटकांकडे लक्ष देण्यात आले. शाखाविस्ताराबरोबर बँकांची स्वमालकीची इमारत या कामी संचालक मंडळ

सभा व सेवक वर्ग यांनी खूप महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली इ.स.१९६५ पासूनच्या लेखापरिक्षणामध्ये बँकेने सतत २००१ पर्यंत 'अ' वर्ग दर्जा प्राप्त केला आहे.

इ.स.२००१ पासून ते इ.स.२००४ पर्यंतच्या कालखंडामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पंढरपूर तालुक्यातील कार्याचा आढावा घेताना असे दिसून येते की शेतीला प्राधान्य देण्याबरोबरच शेतीपुरक व्यवसायला प्राधान्य देण्यामध्ये ही बँक अग्रेसर ठरली विशेषत: पंढरपूर तालुक्यातील द्राक्ष उत्पादनाच्या वृद्धीसाठी, नव्याने द्राक्षबाग लागवडीसाठी, द्राक्षबाग फाऊंडेशनसाठी मध्यम मुदत कर्जे मंजुरीचे धोरण बँकेचे संचालक मंडळाने स्वीकारले. त्याचबरोबरच हिरवा व पिवळा बेदाना निर्माण करण्यासाठी किमान ०२ एकर द्राक्षबाग असणाऱ्या सभासदांना बेदाना निर्मांण शेडसाठी प्रतियुनिट रू.१,१५,००० रूपये कर्ज देण्याचे धोरण स्वीकारले.[५८] याबरोबर ट्रॅक्टर, ट्रेलर, औजारे शिवाय मत्स्य व्यवसाय, दुभती जनावरे यात गाय, म्हैस, शेळया, मेंढया, बैलजोडी, बैलगाडी घेण्यासाठी इतर कर्जामध्ये थोडयाफार प्रमाणात, कर्जाचे वाटप करण्यात आले.[५९]

खाजगी वित्तीय संस्थांच्या वाढत्या आक्रमणामुळे सहकारी बँकाना अधिक जबाबदारीने कार्य करण्याची गरज होती हे इ.स.२००४-०५ च्या ८७ व्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक सभेमध्ये दिसून आले. शेतकऱ्याच्या जीवनात स्वयंपूर्णता मिळवून देण्यासाठी मोठी कामगिरी या बँकेने केलेली आहे. कायम दुष्काळी असणाऱ्या काही भागाला न्याय देण्यासाठी या बँकेने हरितगृह शेतीला प्रोत्साहन दिले त्याबरोबरच कोरडवाहू शेती व शेतीपूरक व्यवसायाला आधार देण्याची बँकेची भूमिका लक्षणीय ठरली. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना या कालावधीमध्ये अत्यंत निर्णायकपणे संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. त्याबरोबरच सभासदांना लाभांश देण्याचे धोरण आखण्यात आले. नाबार्डच्या योजनेखाली बँकेने ४ योजनांचा लाभ पंढरपूर तालुक्यातील सर्वच गावांना देण्यात आला. ज्यात

१) नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत शेतकऱ्यांच्या कर्जाचे रूपांतर

२) थकबाकीदार सभासदांसाठी योजना

३) एकरकमी परतफेड योजना

४) सावकारी कर्ज परतफेड योजना[६०]

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सहकाराच्या क्षेत्रातील अग्रगण्य बँक असून सोलापुरच नव्हे तर महाराष्ट्रातील सहकारी बँकांमध्ये अगदी मानाचे स्थान मिळवणारी बँक होय. इ.स.१९१८ मध्ये स्थापना झाल्यापासून उत्तरोत्तर या बँकने सोलापूर जिल्हातील सर्वच तालुक्यांमध्ये व गावांगावामध्ये हळूहळू शाखेचा विस्तार केला. केवळ भौतिक विस्तारच नाही तर जिल्ह्यातील सर्वच गावांमध्ये आर्थिक व्यवस्थेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत जनतेशी नाते जपण्याचा प्रयत्न केला. सहकाराच्या क्षेत्रातून सामाजिक आर्थिक, शैक्षणिक विकास साधण्यासाठी या बँकेने जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये आपल्या सहकाराच्या तत्त्वातून सर्वच घटकांना आपल्या बँकेशी जोडण्याचा प्रयत्न केला. एकंदरीतच बँकेच्या वार्षिक अहवालांचे अवलोकन करता असे लक्षात येते की शिक्षित–अशिक्षित, बेरोजगार अल्पभुधारक, दारिद्र्य रेषेखालील, भूमिहीन याबरोबर समाजातील सर्वच घटकांना सहकारात समावून घेण्याच प्रयत्न केला. कर्ज देण्याची वेगवेगळी धोरणे अवलंबून जिल्ह्याबरोबरच पंढरपूर तालुक्याच्या विकासात मोलाची भर घातली पंढरपुरच्या दुष्काळग्रस्त भागातील लोकांना सिंचनासाठी अनुदान देण्यापासून तर आणेवारी कमी असणाऱ्या कालखंडात कर्जदाराच्यामागे कर्जाची मागणी न करता त्यांना पुन्हा बँकेकडे आकृष्ट करण्यासाठी नवनवीन योजना आखल्या. शेतीसाठी बैलजोडी देण्याबरोबरच वेगवेगळी औजारे देणे, बि–बियाणांसाठी कर्जे देणे, तसेच विशिष्ट प्रतीच्या पिकांचे उत्पादन पंढरपुरात करण्यासाठी वेगवेगळे अनुदान, कर्जे व आकर्षक योजनाची अमलंबजावणी केली. वेगवेगळया संस्थांना कर्जे देण्याबरोबरच त्यांचे बिजारोपण पंढरपूर तालुक्यात करण्यासाठी ही बँक नेहमीच पुढे राहिली. एकंदरीत केंद्र सरकारच्या प्रत्येक योजनांची अंमलबजावणी करण्याबरोबरच काही विशेष प्रयत्न करून या बँकेने पंढरपूर तालुक्याच्या विकासास हातभार लावला. वेगवेगळया सोसायटया उभारून त्यांना कर्जे व सुरक्षितता देऊन पंढरपूर तालुक्याच्या आर्थिक नाडया मजबूत करण्यात या सहकार शाखेचा वाट खूपच महत्वाचा आहे. मात्र खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणामुळे विशेषतः इ.स.१९९० नंतर अगदी जपून पावले टाकण्याचे धोरण या सहकार शाखेला अंगीकारावे लागले. आजच्या अतिशय स्पर्धात्मक कालखंडामध्ये पावले उचलता न आल्यामुळे या बँका व सहकार चळवळीला ग्रहण लागल्याचे दिसून येते.

- **दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि.पंढरपूर –**

स्वातंत्र्यपूर्व काळात सहकारी संस्थांची वाढ अतिशय मर्यादित स्वरूपाची होती. इ.स.१९५०–५१ नंतर सहकारी चळवळीस सामाजिक नेतृत्त्व आणि शासनाच्या बदलत्या धोरणाची साथ लाभून चांगला वेग येऊ लागला. नागरी बँकांची मुलत: स्थापनाच ही स्थानिक रित्या सर्वसामान्य जनतेस बचतीची सवय लावणे आणि त्यांना योग्य वेळी अर्थसहाय्य करणे या हेतूनेच करण्यात आली आहे. समाजवादी समाज रचनेची निर्मिती करणे आणि आर्थिक व्यवस्थापनातील इष्ट ते बदल घडवून आणण्याच्या गरजेतून नागरी सहकारी बँकांची निर्मिती झालेली आहे. सहकारी बँकींग क्षेत्रात नागरी सहकारी बँका हया प्राथमिक सहकारी बँका म्हणून गणल्या जातात. प्रामुख्याने अल्प व मध्यम उत्पादनाची साधने असलेल्या लोकांची आर्थिक गरज भागविणे, बचतीची सवय लावणे, तसेच सावकारी पिळवणुकीतून त्यांची सुटका करणे हे या नागरी सहकारी बँकांची प्रमुख उद्दिष्टे आहेत. याच उद्देशाने दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना झालेली आहे.

इ.स १९५६ व इ.स १९५८ मध्ये चंद्रभागा नदीला आलेल्या महापुरामुळे पंढरपूर शहराचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. पंढरपुरच्या विकासाच्या आणि विस्ताराच्या दृष्टिने पंढरपुरवासियांना प्रगतीच्या नवीन दिशेची वाटचाल करावी लागली. सदर वाटचालीतूनच या शहरात सहकारी तत्त्वावर चालणारी आणखी एक बँक स्थापन करावी असे पंढरपुरातील काही प्रतिष्ठीत व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मनामध्ये आले.समाजातील विखुरलेला 'पैसा' एकत्र करून या पैशाचा उपयोग समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नती व उत्कर्षासाठी व्हावा व पर्यायाने देशातील गरीबी व बेकारी करण्यासाठी आपल्या हातून देश सेवा व्हावी या कल्पनेने पंढरपुरातील भगवान गणेश भाटुले, बा.ज.बुरजे, बबनराव बडवे, बाबुराव घळसासी, विठ्ठलराव जवंजाळ, तात्यासाहेब गुर्जर, र.गा.जोशी, वि.औ तथा बाबुराव म्हमाने, प्र.हि.गांधी, औदुंबर कोडिंबा पाटील, प.रू.फडे, ब.ग.डोबें, पां.कृ.घळसासी, पं.रा.स्वामी, शि.ज.भिंगे, म.प.शेटे, दे.सि.भिंगे, म.अ.सोनावणे, व.स.परचंडे, भं.प.बडवे, ब.का.लिगाडे, शिवप्पा उंबरे इत्यादी व अशा अनेक अज्ञात व्यक्तिंनी या बँकेच्या उभारणीसाठी प्रयत्न केले आहेत. त्या काळात एका शहरात एकापेक्षा जास्त नागरी सहकारी बँका सुरू करणेस परवानगी देणेत यावी असा बदल सहकारी कायदयामध्ये करणेबाबत विधानसभेत विधेयक चर्चिले जात होते त्यामुळे वरील

कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळाले व त्याची फलनिष्पत्ती म्हणून सहकार खात्याकडून दिनांक १२ जून १९६१ रोजी या बँकेची नोंदणी होऊन पुढील वाटचालीस हिरवा कंदील दाखविला गेला.[६१]

सहकार्य हे तत्व, ध्येय धोरण समजून दुर्बल घटकांना व अज्ञान समाजाला या बँकेमार्फत स्थापनेपासून संचालकांच्या सहकार्याने कर्जे देऊन सहाय्य केले आहे. समाजातील सामान्य माणसाला बँकिंग व्यवहाराची माहिती देणे व सावकाराच्या तावडीतून मुक्त करणे, त्याचबरोबर बँकेचे सभासदात वाढ करणे व सर्व थरातील समाजाला आर्थिक प्रगतीसाठी सहाय्य करणे हे या बँकेचे प्रमुख उद्देश आहेत.[६२] इंदिरा गांधी यांच्या २० कलमी गतिमान आर्थिक कार्यक्रमामुळे देशातील मरगळलेल्या समाजाला एक प्रकारची नवीन चालना दिली गेली होती. या बँकेने इ.स.१९७५–७६ या वर्षामध्ये छोटे–छोटे व्यापारी, उद्योग करणारे लोक उदा हॉटेल, पानपट्टी, सायकल दुकानदार, ॲटोरिक्षा चालविणारे अशा आर्थिकदृष्टया दुबळया असणाऱ्या समाजास बँकेने योग्य त्या प्रकारे कर्जपुरवठा करून वरील कार्यक्रमास हातभार लावलेला होता.[६३]

**बँकेच्या शाखा –**

३१ मार्च २००४ अखेर या बँकेच्या मुख्य कार्यालय व इतर पाच शाखा, कार्यरत आहेत.मुख्य शाखेची स्थापना १५ ऑगस्ट १९६१ रोजी, करकंब शाखेची स्थापना १२ जुलै १९८१ रोजी, मार्केट यार्ड शाखा पंढरपुरची स्थापना ७ मे १९८९ रोजी, कुर्डूवाडी शाखेची स्थापना २ मे १९९४ रोजी, महूद शाखेची स्थापना २१ ऑगस्ट १९९५ रोजी आणि टेंभुर्णी शाखेची स्थापना २३ फेब्रुवारी १९९६ रोजी झालेली आहे. विशेष म्हणजे बँकेच्या सर्व शाखा फायद्यात आहेत. ही गोष्टी उल्लेखनीय आहे.[६४]

**कोष्टक क्रमांक ३**

**दि पंढरपूर मर्चटस् को–ऑपरेटिव्ह बँक लि पंढरपूर बँकेची प्रगती**

| तपशील | १९६२ | १९६७ | १९७२ | १९७७ | १९८२ | १९८७ | १९९२ | १९९७ | २००२ | २००४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | ३४६ | ६३० | ७३७ | १०१७ | १,७५५ | २,४७० | ३३३६ | ४२८१ | ६३४१ | ७०२४ |
| भाग भांडवल | २७,५०० | १,०३,४५० | १,१९,४५० | १,५०,९०० | ३,००,७२५ | ४,३९,००० | ७४६,००० | १३४०००० | २४०४००० | २९३६००० |
| राखीव व इतर निधी | ५०० | १६,७६० | ७५,४८० | २,१५,२७० | ७,८८,०६० | २७,४६,५०० | ८०३८००० | १५२८७००० | ३६२४६००० | ४९८०३००० |
| ठेवी | ५८,००० | १,६५,७८० | ५,८४,१८० | २६३२०३५ | १,०४,४१,४५० | १,७०,००,००० | ३९३२३००० | ११३७४४००० | ३०२११३००० | ३९९७८०००० |
| कर्जे | २,०१,००० | ८,९३,८०० | ८,१५,१०० | २०,३९,३०० | ८३,९८,५०० | १,१६,३१,५०० | ३०७३३००० | ९३०४४००० | २२८०८१००० | २७४४००००० |
| गुंतवणूक | ७६५० | २५,६०० | ४५,५८० | ६,०३,८१५ | २१,०५,००० | ६३,१३,००० | १४७१५००० | ३१२७५००० | ११२५२२००० | १६६२९६००० |
| नफा | | १६,१२० | २५,४५० | ७९,०३० | ३,५३,४१० | ८,२६,००० | १४४४००० | ३०४४००० | ६१६२००० | ५१७९००० |
| डिव्हीडंड | | ५% | ६% | ९% | १२% | १२% | १२% | १५% | १५% | १५% |
| ऑडिट वर्ग | ब | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| खेळते भांडवल | २,४०,००० | ९,७०,५४० | १०,३६,८०० | ३१,३६,८३५ | १,२२,५०,३२५ | २,१६,६९,७२० | ५४८७४००० | १४११७३००० | ३७१५८२००० | ४८६५८८००० |

( संदर्भ – दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि.पंढरपूर या बँकचे इ.स १९६२ ते इ.स.२००४ पर्यंतचे वार्षिक अहवाल)

दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि.पंढरपूर या बँकेने इ.स १९६२ ते इ.स.२००४ या कालखंडात सातत्याने प्रगती केलेली आहे. इ.स १९६२ मध्ये बँकेची सभासद संख्या ३४६ होती तर इ.स.२००४ ती ७०२४ इतकी झाली. बँकेचे भागभांडवल याच कालावधीत २७,५०० रूपयावरून २९,३६,००० रूपये इतके झाले, राखीव व इतर निधी ५०० रूपयांवरून ४९८०३००० रूपये इतका झाला. ठेवी ५८,००० रूपयांवरून ३९९७८०००० रूपये इतक्या झाल्या. इ.स.१९६२ मध्ये बँकेने २,०१,००० रूपये इतके कर्ज दिले होते तर इ.स २००४ मध्ये यामध्ये वाढ होऊन २,७४,४०,००० रूपये एवढे कर्ज दिलेले होते. याच कालावधीत ७६५० रूपयांवरून १६,६२,९६,००० रूपये इतकी गुंतवणूक बँकेने केलेली होती. बँकेच्या स्थापनेपासून नफ्यामध्ये सातत्याने वाढ झालेली आहे. इ.स २००४ मध्ये बँकेला ५१,७९,००० इतका नफा झालेला होता. इ.स.१९६२ मध्ये बँकेचे २,४०,००० रूपये इतके खेळते भांडवल होते तर इ.स. २००४ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ते ३७,१५,८२,००० रूपये इतके झाले. इ.स १९६७ मध्ये बँकेने आपल्या सभासदांना ५% डिव्हीडंड दिलेला होता. पुढील काळात यामध्ये सातत्याने वाढ झालेली दिसते. इ.स.२००४

मध्ये १५ टक्के डिव्हीडंड दिलेला होता. इ.स. १९६२ मध्ये बँकेला ऑडिट वर्ग 'ब' मिळालेला होता. त्यानंतर मात्र सातत्याने बँकेला ऑडिट वर्ग 'अ' मिळालेला आहे. एकंदरीत वरील कोष्टकाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की बँकेने स्थापनेपासून इ.स.२००४ पर्यत सर्वच क्षेत्रात प्रगती केलेली आहे.

## ➢ श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर ता. पंढरपूर

महाराष्ट्राच्या दक्षिण काशीत चंद्रभागेच्या तीरावर शेतकऱ्यांच्या नंदनवनाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठीइ. स. १९७३ पासून श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना उभारणीचे प्रयत्न करण्यात आले. चळे व पटवर्धन कुरोली या दोन ठिकाणी साखर उद्योग उभा करण्यात आलेले अपयश पाहता पुन्हा शेतकरी नव्याने सभासद होईल याची खात्री नव्हती. मात्र औदुंबर कोंड्बिा पाटील व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून तालुक्यातील गुरसाळे या ठिकाणी इ.स.१९७३ रोजी श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. २० ऑक्टोबर१९७६ रोजी कारखान्याचे भूमीपूजन झाले आणि इ.स.१९८० पासून प्रत्यक्ष गाळपास सुरूवात झाली आणि हा कारखाना तालुक्याच्या विकासाचा केंद्रबिंदू बनला.या कारखान्याने औदुंबर कोंडिबा पाटील, वसंतराव श्रीमंतराव काळे यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात आपला नावलौकिक प्राप्त केला होता.[६५]

**श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने राबविलेल्या विविधयोजना-**

**१) माती पृथकरण योजना**

कारखानाकार्यक्षेत्रातील निरनिराळया भागातील जमिनीच्या मातीचे परीक्षण करण्या-साठी माती पृथ्य:करण योजना कारखान्याने सुरू केली. मातीचे परीक्षण करून कोणती किती प्रमाणात खते वापरावयाची यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मदत व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय केमिकल व फर्टिलायझर लि. या संस्थेमार्फत नमुने तपासले. या योजनेचा ऊस उत्पादन वाढीला चांगला फायदा झाला.[६६]

**२) मागासवर्गीय ऊस उत्पादक अनुदान योजना** सन १९८१-८२ च्याहंगामापासून महाराष्ट्र शासनाने अल्पभुधारक, मागासवर्गीय अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांना ऊस पिकासाठी अनुदान देण्याची योजना जाहीर केली होती. या योजनेनुसार पहिल्या वर्षी बियाणेला ८०० रूपये, खतासाठी १,२००रूपये व रोख २५० रूपये

अशी एकूण २,२५० रूपये आणि त्यापुढील दोन वर्षात खोडवा पिकासाठी प्रत्येक वर्षी १४५० रूपये व त्यापुढील दोन वर्षासाठी ७५० रूपये (प्रत्येकी) अनुदान मिळणार होते. त्यानुसार कारखान्याने ८८ पात्र शेतकऱ्यांची ८३ एकरासाठी प्रकरणे तयार करून मा. साखर संचालक , पुणे यांच्याकडून १,८६,७५० रूपयेचे अनुदान मिळविले होते.[६७]

**३)कारखाना सांडपाणी विल्हेवाट योजना**

कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावून प्रदुषणाचा धोका टाळण्यासाठी व सार्वजनिक आरोग्यास इजा पोहचू नये या हेतूने तज्ज्ञ डॉ. सुब्बाराव 'यांच्या सल्ल्यानुसार  चैतन्य मेटलस व इंजिनिअर्स यांचा सांडपाणी शुद्धीकरण प्लँट बसवून तो कार्यान्वित केलेला आहे. या प्लँट मधून शुद्ध केलेले पाणी कारखान्याच्या ऊस बियाणे प्लॉटसाठी वापरण्यात येत आहे.

**४) शैक्षणिक व कामगार कल्याण योजना**

कारखाना परिसरातबालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय सुरू करण्यात आली आहेत. तसेच शैक्षणिक सुविधा वाढविण्यासाठी स्वतंत्र शिक्षण संस्थेची स्थापना केली आहे. तसेच प्रवासासाठी स्कूल बस सुरू केली.[६८]

**५) मिनीबस सेवा**

कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना पंढरपुरहून कारखान्यावर येताना होणाऱ्या अडचणीचा विचार करून कारखान्याने स्वत:ची बस खरेदी करून अल्प मोबदल्यात बस सेवा सुरू केली. त्याचा फायदा कर्मचारी आणि विद्यार्थी वर्गाला होत आहे.[६९]

**शेती विकास**

ऊस उत्पादनासाठी लागणारी बी बियाणे, खते, औषधे, मजुरी इ.च्या किंमती दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत.त्याचबरोबर साखर निर्मितीसाठी लागणारे इतर मालाचे दर वाढत आहेत. त्याचा विचार करून शेती व्यवसाय किफायतशीरपणे करता यावा म्हणून कारखाना प्रयत्न करतो. शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, शुद्ध बियाणांचा पुरवठा, मशागतीच्या शुद्ध पद्धती ,रासायनिक खते इ. कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना पुरविले जाते. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सुधारित व शुद्ध जातीचे ऊसाचे उत्पादन होण्यासाठी पाडेगाव ऊससंशोधन नर्सरी

मधून शुद्ध बियाणे आणून कारखान्याच्या मळयात दोन जातीच्या ऊसाची नर्सरी तयार केली आणि त्या नर्सरी मधून सभासदांना माफक दरात ऊस बियाणे उपलब्ध करून दिले.[७०]

### उपसा जलसिंचन योजना

कारखाना कार्यक्षेत्रातील  महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळाकडील पाच उपसा जलसिंचन योजना महामंडळाकडून विकत घेण्याच्या दृष्टिने महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बरोबर चर्चा व वाटाघाटी करून ताब्यात घेण्यासाठी खरेदी किंमत पोटी रक्कम १,६७,००० रूपये पहिला हप्ता भरला. तसेच उपसा जलसिंचन योजनेमधील शेतकऱ्यांना काही अडचणी आहेत त्या सोडविण्याचे प्रयत्न केले.[७१]

### रबरी टायर बैलगाडया

लोखंडी धावेच्या बैलगाडीमुळे रस्ता बराच खराब होतो. तसेच बैलांना होणाऱ्या त्रासामुळे त्यामधून होणाऱ्या ऊसाच्या वाहतुकीवर परिणाम होतो. त्यामुळे त्या बैलगाडीतून ऊसाचा पुरवठा हवा तसा होत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून कारखान्याने ऊस वाहतुकीसाठी २०० रबरी टायर बैलगाडया तयार करून घेतल्या व त्या बैलगाडीतून ऊसाची वाहतूक सुरू केली.

### कामगार कॉलनी

कारखाना साईटवर कामगार व त्यांच्या कुटुंबियांना राहण्यासाठी अद्यावत कॉलनी उभारली असून एकूण २१० कामगार कुटुंबिय या योजनेचा फायदा घेत आहेत.

### वाचनालय

कारखान्याच्या सेवकांना साईटवर नामवंत लेखकांच्या पुस्तकांचे सुसज्ज असे एक वाचनालय चालू केले आहे. त्यामध्ये दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके व मासिके ठेवण्यात आली असून त्यांचा लाभ कामगार व कामगारांच्या कुटुंबियांना होत आहे.ग्रामीण भागात यामुळे वाचन संस्कृतीचा विकास होण्यास मदत झाली आहे.

### दुचाकी स्वयंचलित वाहनांचे वाटप

कारखान्यातील बरेचसे कामगार हे दूरवरच्या ठिकाणावरून कामावर येतात. त्यांना वेळेवर व कमी खर्चात कामावर येणे जाणेसाठी कारखान्याने स्वत:चे हमीदार व बँक ऑफ बडोद्याच्या सौजन्याने ४० मोटार सायकल व ३० बजाज एम  ८०  या  दुचाकी  स्वयंचलित

वाहनाचे कामगारांना वाटप केले आहे. तसेच स्वत:च्या फंडातून ९० सायकली वाटप केल्या आहेत त्यांचा लाभ कर्मचारी यांना होत आहे.

## बोनस व सानुग्रह अनुदान

कारखाना सभासदांना नफ्यातून बोनस वाटप करतो. एकूण नफ्याच्या २०टक्केबोनस व ५टक्केसानुग्रह अनुदान दिले जाते.[७२]

## यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था

कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक, बिगर सभासद, कामगार यांना आर्थिक अडचणीच्या वेळी मदत मिळण्याकरिता आणि सभासदांकडून आकर्षक व्याजदराने ठेवी स्विकारणे या उद्देशाने कारखाना साईटवर यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली आहे. या संस्थेतून सभासदांना पीक कर्ज, रासायनिक खतासाठी कर्ज व दुभत्या म्हैशीसाठी कर्ज वाटप केले जाते.

## हिरवळीचे खत वाटप

कारखाना कार्यक्षेत्रातील जमिनीची सुधारणा होण्यासाठी व जमिनीचा पोत कायम टिकून राहण्यासाठी कारखाना हा सभासदांना ' ना नफा ना तोटा ' या तत्वावर ताग व धैचा या हिरवळीचे खताचे बियाणे वाटप करतो.

## शेती अवजारे वाटप योजना

शेतकऱ्यांचे जमिनीचे मशागतीसाठी पैसा, श्रम व वेळ याची बचत करण्याकरता कृषिव्हेटर या औजाराने जमिनीची सर्व प्रकारची मशागत एकाच वेळी होऊन जमीन पेरणे लायक तयार होते. म्हणून कारखान्याने कृषिव्हेटर कार्यक्षेत्रातील ट्रॅक्टरधारक सभासदांना वाटप केले आहेत त्यांना प्रत्येकी ५,००० रूपये अनुदान दिले आहे.

## साखर विकास निधी योजना

साखर विकास निधी योजनेअंतर्गत ऊस विकास योजनेपैकी माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा उभारणी, त्रिस्तरीय बेणेमळा लागवड योजना, अल्प कालावधीत पक्व होणारी सुधारीत ऊस जातीच्या लागवडीस प्रोत्साहनात्मक अनुदान उष्णबाष्प प्रक्रिया संयंत्र इ. साठी केंद्र शासनाने ६०.४४ लाख रूपये कर्ज मंजूर केले होते.

**सभासद विमा योजना**

कारखान्याच्या सभासदांचा दुर्दैवाने अपघाती निधन झाल्यास त्यांच्या वारसांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने विमा कंपनीकडून जनता अपघात विमा घेतलेला आहे. विमा हप्त्याची रक्कम कारखान्याच्या भाग विकास निधीतून भरलेली असून कोणत्याही सभासदास अपघात, सर्पदंश, बैलाने मारणे, विहिरीत पडून मृत्यू, आग, विजेचा धक्का इत्यादीने मृत्यू झाल्यास विमा कंपनीकडून त्यांचे वारसांना १ लाख रूपये भरपाई दिली जाते.[७३]

**कोष्टक क्रमांक ४**

**श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना ऊस गळीत, साखर पोती उत्पादन, साखर उतारा आणि दर माहिती पत्रक**

| अ.क्र | गळीत हंगाम | हंगाम दिवस | ऊस गळीत (मे.टन) | साखर पोती (क्विंटल) | सरासरी साखर उतारा (टक्के) | ऊसाला दिलेला अंतिम दर (खोडकीसह) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९७९–८० | ३० | ३१४८ | १३८९ | ४.४१ | १७५.०० |
| २ | १९८०–८१ | ११३ | १२७४६२ | १२४७२५ | ९.७८ | २३८.७२ |
| ३ | १९८१–८२ | १८७ | २६७४३५ | २७२८२७ | १०.२० | २००.०० |
| ४ | १९८२–८३ | २१८ | ३४०५१८ | ३५२४०४ | १०.३५ | १८५.४४ |
| ५ | १९८३–८४ | १२२ | १७८९२८ | १९१७४९ | १०.७२ | २३०.१८ |
| ६ | १९८४–८५ | १८४ | २६८४४० | २७९३९७ | १०.४१ | ३२०.५० |
| ७ | १९८५–८६ | १८२ | ३०४९९५ | ३२४८३७ | १०.६५ | ३१६.०० |
| ८ | १९८६–८७ | १८३ | ३८१३८८ | ३९७७११ | १०.४३ | ३२३.०० |
| ९ | १९८७–८८ | २०८ | ४१४०७६ | ४१५६८३ | १०.०४ | ३४५.०० |
| १० | १९८८–८९ | १६४ | ३३८६५८ | ३६५७३५ | १०.८० | ३७५.०० |
| ११ | १९८९–९० | २४५ | ५७७१११ | ५९५५४३ | १०.३१ | ४४०.०० |
| १२ | १९९०–९१ | २२४ | ६०९४३९ | ६१८०६९ | १०.१४ | ४४२.०० |
| १३ | १९९१–९२ | १७५ | ६११४६४ | ६४१६२३ | १०.४९ | ४२५.०० |
| १४ | १९९२–९३ | १४४ | ५६६६७८ | ६११५७२ | १०.७२ | ६०२.०० |
| १५ | १९९३–९४ | १४९ | ५९४५५८ | ६३११९५ | १०.६२ | ८६६.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १९९४–९५ | २०९ | ८०५१०३ | ८२६२८५ | १०.२६ | ७४७.०० |
| १७ | १९९५–९६ | २१४ | ८२०८९८ | ८१६१४५ | ९.९४ | ६७२.०० |
| १८ | १९९६–९७ | १४५ | ५८३१७० | ६००२७० | १०.२९ | ७९०.०० |
| १९ | १९९७–९८ | १८६ | ७७९७९९ | ८५१५२७ | १०.५४ | ९२८.०० |
| २० | १९९८–९९ | २०३ | ८८६६६७ | ९४३१०१ | १०.६४ | ८३७.०० |
| २१ | १९९९–२००० | २०९ | ८७६३६६ | ९७६४७५ | ११.१४ | ८२५.०० |
| २२ | २०००–२००१ | १७४ | ७६३१९४ | ९०२७४३ | ११.८३ | ८६५.०० |
| २३ | २००१–२००२ | १४८ | ६२२६९७ | ७३६६७५ | ११.८३ | ८७०.०० |
| २४ | २००२–२००३ | १४६ | ७७४५८३ | ९१४०८५ | ११.८१ | ७३७.०० |
| २५ | २००३–२००४ | ८४ | ४५८८१५ | ५३७१३६ | ११.७१ | ९०५.०० |

(संदर्भ –श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे सन १९७९–८० ते सन २००३–०४ पर्यंतचे वार्षिक अहवाल)

वरील कोष्टकाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा पहिला गळीत हंगाम इ.स.१९७९–८० मध्ये सुरू झाला. या हंगामात एकूण ३० दिवस कारखान्याने ऊसाचे गाळप केले, ३,१४८ मे.टन ऊसाचे गाळप करण्यात आले. १,३८९ साखरेच्या पोत्यांचे उत्पादन झाले, ४.४१ टक्के इतका सरासरी साखर उतारा होता या वर्षी कारखान्याने ऊसास प्रति टनास १७५ रूपये दर दिला. यानंतर मात्र प्रत्येक वर्षी वरील बाबींमध्ये वाढ होत गेली. इ.स.१९८९–९० या हंगामात कारखाना विक्रमी २४५ दिवस चालला व ५,७७,१११ मे. टन ऊसाचे गाळप केले, तर ५,९५,५४३ साखर पोत्यांचे उत्पादन करण्यात आले, या वेळी साखरेचा उतारा १०.३१ टक्के होता कारखान्याने या वर्षी ४४० रूपये प्रतिटनास दर दिला होता इ.स.२००३–०४ या हंगामात कारखाना एकूण ८४ दिवस चालला, ४,५८,८१५ मे.टन ऊसाचे गाळप केले, ५,३७,१३४ साखर पोत्यांचे उत्पादन करण्यात आले, ११.७१ टक्के सरासरी साखर उतारा मिळाला तर ऊसास प्रतिटनास ९०५ रूपये इतका दर दिला होता. वरील कोष्टकावरून कारखान्याने उत्तरोत्तर काळात सातत्याने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केल्याचे दिसून येते.[७४]

## ➢ चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.वसंतनगर, भाळवणी :–

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी वसंतदादा काळे यांनी चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. या कारखान्याचे भूमिपूजन दि. १०जानेवारी .१९९६ रोजी झाले. तर चाचणी गळीत हंगाम शुभारंभ दि.२८ मार्च १९९९ रोजी झाला.[७५]

**कोष्टक क्रमांक ५**

**चंद्रभागा सहकारी साखर कारखाना सभासद संख्या**

| वर्षे | सभासद संख्या |
|---|---|
| २००१–०२ | ४,८६१ |
| २००२–०३ | ५,६४२ |
| २००३–०४ | ५,६४२ |

(संदर्भ : चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याचे वार्षिक अहवाल, सन २००१–०२ ते २००३–०४)

**चंद्रभागा सहकारी साखरकारखान्याने राबविलेले विविध उपक्रम –**

कारखान्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना सुरू केलेल्या आहेत. सभासदांना ऊसाचे सुधारित जातीचे बेणे बिनव्याजी दिलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेतकरी मेळावे घेतले जातात. सभासदांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबिरे घेतली जातात. सन २००१–०२ मध्ये कारखाना परिसरात ५,००० विविध प्रकारची झाडे लावली आहेत. पर्यावरण रक्षणाच्यादृष्टिने कारखान्याने उचललेले हे एक क्रांतिकारक पाऊल होते.[७६]

**कारखाना व्यवस्थापन व कामगार –**

कारखान्यातील बहुसंख्य कामगार वर्ग कारखाना परिसरातील असून सभासदांचीच मुले आहेत. त्यामुळे सभासदांच्या हिताबरोबरच कामगारांचे हित व्यवस्थापनामार्फत जोपासले जाते. कारखाना कार्यस्थळावर इयत्ता १ ली ते इयत्ता ७वी पर्यत मुलांच्या शिक्षणासाठी 'साखर शाळेची' व्यवस्था करण्यात आलेली आहे. मुलांनाशालेय साहित्य कारखान्यामार्फत दिले जाते. कामगारांना विमा, बोनस, प्रॉव्हिडंड फंड इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. कामगारांचे व त्यांच्या मुलांचे आरोग्य चांगले राहवे, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या भूमिकेतून कारखाना कार्यस्थळावर कल्याणराव काळे क्रिडा मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

कारखान्यामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येते. कामगारांच्या सोयीसाठी जीवनावश्यक वस्तू त्वरीत व स्वस्त दरात उपलब्ध व्हाव्यात या हेतूने 'चंद्रभागा बझार' ची स्थापना करण्यात आली आहे.[७७]

**आधुनिक पाणी व्यवस्थापनासाठी कारखान्याने केलेले प्रयत्न –**

सुरूवातीच्या कालखंडात कारखान्यामध्ये मशिनरी व प्रोसेससाठी दिवसाला दहा लाख लिटर पाणी लागत असे. परंतु पाण्याचा तुटवडा पाहता कारखान्यामध्ये पाण्याच्या काटकसरीने वापराबाबत आधुनिक तंत्राचा वापर करून ऊसामधील पाणी प्रोसेसमध्ये वापरून जास्तीचे वाया जाणारे ऊसाचे रसामधील गरम पाणी कुलींग टॉवरचे सहाय्याने थंड करून पुन्हा प्रोसेसमध्ये वापर केला असलेने दररोज दहा लाख लिटर पाण्याऐवजी फक्त अडीच लाख लिटर पाणी लागते.[७८] त्याचप्रमाणे सभासदांनी आपल्या शेतामध्ये ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करून पाण्याची बचत करावी यासाठी कारखान्याने कर्जपुरवठा केलेला आहे.[७९]

**सभासद व कर्मचारी अपघात विमा योजना –**

सध्याचे मानवाचे जीवन गतीमान, धकाधकीचे झाले असून लोकांचे जीवन असुरक्षित झालेले आहे. काही दुःखद प्रसंगी घरातील कर्ता व्यक्ती अपघाताने मृत्यू पावल्यास त्याचे कुटुंबिय निराधार होत असतात. कारखाना हे कुटुंब असून परिवारातील सभासद व कामगार हे सदस्य आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही संचालक मंडळाची कुटुंब प्रमुख म्हणून जबाबदारी असल्याने सभासद व कामगारांचा अपघात विमा राबविणे हे कर्तव्य आहे. म्हणून कारखान्याने दि.न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि.यांचे कडून विमा घेतलेला आहे. सभासदांचे व कामगारांचे अपघाती निधन झाल्यास मयताचे वारसास विमा कंपनीकडून एक लाख रूपये भरपाई मिळणार अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.[८०]

आजच्या प्रगत माहिती व तंत्रज्ञानाचा वापर कारखान्याच्या कामकाजात करण्यासाठी व स्पर्धेच्या युगात अस्तित्व टिकवण्यासाठी सर्व विभागाचे संगणकीकरण केलेले आहे. तसेच सभासदांच्या हितासाठी ऊसास चांगला भाव देता यावा यासाठी विविध विभाग कार्यान्वित केलेले आहेत. डिझेल पंप, पेट्रोल पंप, डिस्टिलरी विभाग, यासारखे सहप्रकल्प उभे करून कारखान्याच्या व सभासदांच्या हिताचा नेहमीच विचार केला जातो.[८१]

एकंदरीत पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीचा इतिहास व व्याप्ती यांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, पंढरपूर तालुक्यातील पहिली सहकारी संस्था दि.३ नोव्हेंबर १९११ रोजी स्थापन झाली. मात्र स्वातंत्र्योत्तर काळानंतर विविध प्रकारच्या सहकारी संस्था येथे स्थापन झाल्या सहकारी चळवळीच्या विकासामुळे तालुक्यातील पीक पद्धतीत मोठया प्रमाणात बदल होऊन ऊस, कापूस, डाळिंब, द्राक्षे, बोरे, पपई, केळी यासारखी नगदी पीके घेतली जाऊ लागली. या बदलत्या पीकपद्धतीमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, दूध संस्था, अर्बन बँका, पतसंस्था, विकास सेवा संस्था, पणन संस्था, गृहनिर्माण संस्था, वाहतूक संस्था इत्यादीची मोठया प्रमाणात वाढ झाली. या विविध प्रकारच्या सहकारी संस्थामुळे पंढरपूर तालुक्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्यास मदत झाली आहे.

## संदर्भ


१) महाराष्ट्राचे जिल्हे– सोलापूर, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई, १९६०, पृ.४८

२) कित्ता

३) कित्ता

४)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९–२०००.पृ.१३,१४

५) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित सोलापूर, वार्षिक अहवाल, सन २०००–२००१, पृ.११

६) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक१५ डिसेंबर २०११, पृ.८

७) कित्ता

८)District Statistical abstract of Solapur District, : Berou of Economics and statastics ,Government of Maharashtra, Bombay,1961-62, P.2

९) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००–२००१, पृ.९

१०)सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पंढरपूर जिल्हा सोलापूर यांच्या कार्यालयाकडून मिळालेली माहिती

११)ताठे विद्याधर; शतार्थश्री, शताब्दी गौरव गाथा, १९१२ ते २०१२, दि पंढरपूर अर्बन को ऑप. बँक लि. पंढरपूर, २९ डिसेंबर २०१२, पृ.५३

१२)सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पंढरपूर जिल्हा सोलापूर यांच्या कार्यालयाकडून मिळालेली माहिती

१३)कित्ता

१४) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक५ डिसेंबर २०११, पृ.९

१५) ताठे विद्याधर(संपा.), उपरोक्त पृ.५३

१६) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक१५ डिसेंबर २०११, पृ.९

१७) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक२३ डिसेंबर २०१५, पृ.७

१८) जोशी अभय, पंढरपूर अर्बन बँक, विश्वासाची १०० वर्षे, दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, १५ डिसेंबर २०११, पृ.९

१९) ताठे विद्याधर(संपा.), उपरोक्त, पृ.५४

२०) कित्ता, पृ.५५

२१) कित्ता, पृ.७९

२२) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक१५ डिसेंबर २०११, पृ.९

२३)ताठे विद्याधर(संपा.), उपरोक्त, पृ.५६

२४) कित्ता, पृ.५७

२५) दैनिक लोकमत, सोलापूर आवृत्ती,दिनांक२५ डिसेंबर १९७०, पृ.६

२६) जोशी अभय, पंढरपूर अर्बन बँक, विश्वासाची १०० वर्षे, दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, १५ डिसेंबर २०११, पृ.९

२७) ताठे विद्याधर(संपा.), उपरोक्त, पृ.५९

२८) दैनिक सकाळ, वर्धापन दिन विशेष, सोलापूर आवृत्ती, दिनांक२८ फेब्रुवारी २०१५, पृ.३

२९) मुलाखत– सुधाकररामचंद्र परिचारक, पंढरपूर, दिनांक १०मे २०१५

३०) ताठे विद्याधर(संपा.), उपरोक्त, पृ.५७

३१) दि.पंढरपूर अर्बन को ऑप बँक लि. पंढरपूर, ९३ वा वार्षिक अहवाल, सन २००४–०५, पृ.६

३२) दि.पंढरपूर अर्बन को ऑप बँक लि. पंढरपूर, ९२ वा वार्षिक अहवाल, सन २००३–०४, पृ.६

३३) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर यांचेकडील रेकॉर्ड, फाईल क्र.३०६४, पृ.२२

३४) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सोलापूर, ८२वावार्षिक अहवाल, सन २००१–०२, पृ.१२

३५) मुलाखत– प्रशांत प्रभाकरपरिचारक, पंढरपूर, दिनांक २० एप्रिल २०१६

३६) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सोलापूर, ८२ वा वार्षिक अहवाल, सन १९९९–२०००, पृ.११

३७) मुलाखत– प्रशांत प्रभाकरपरिचारक, पंढरपूर, दिनांक२० एप्रिल २०१६

३८) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सोलापूर, ८२ वा वार्षिक अहवाल, सन १९९९–२०००, पृ.१८–१९

३९) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ५२ वा वार्षिक अहवाल, सन १९६९–७०, पृ.४

४०) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ५५ वा वार्षिक अहवाल, सन १९७२–७३, पृ.५

४१) कित्ता पृ.६

४२) कित्ता

४३) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ५६ वा वार्षिक अहवाल, सन १९७३–७४, पृ.३, ४

४४) कित्ता

४५) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ५८ वा वार्षिक अहवाल, सन १९७५–७६, पृ.७

४६) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ६३ वा वार्षिक अहवाल, सन १९८०–८१, पृ.५

४७) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ६५ वा वार्षिक अहवाल, सन १९८२–८३, पृ.१

४८) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ६७ वा वार्षिक अहवाल, सन १९८४–८५, पृ.१

४९) कित्ता, पृ.१०

५०) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ७२ वा वार्षिक अहवाल, सन १९८९–९०, पृ.१५

५१) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ७७ वा वार्षिक अहवाल, सन १९९४–९५, पृ.१६,१७

५२) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ७८ वा वार्षिक अहवाल, सन १९९५–९६, पृ.१०, ११

५३) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ७९ वा वार्षिक अहवाल, सन १९९६–९७, पृ.५

५४) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ८१ वा वार्षिक अहवाल, सन १९९८–९९, पृ.११

५५) कित्ता, पृ.१८

५६) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल कोऑप.बँक लि.सोलापूर, ८२ वा वार्षिक अहवाल, सन १९९९–२०००

५७) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ८३ वा वार्षिक अहवाल, सन २०००–०१, पृ.१३ ते २८

५८) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ८६ वा वार्षिक अहवाल, सन २००३–०४, पृ.१८

५९) कित्ता, पृ.२०

६०) दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप.बँक लि.सोलापूर, ८७ वा वार्षिक अहवाल, सन २००४–०५, पृ.१८

६१) गानमोटे सु.वि.कथा ही बँकेच्या उत्कर्षाची, जाधव वा.शं(संपा.), दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर, रौप्य महोत्सव स्मरणिका सन १९८७, पंढरपूर, ३० मे १९८७, पृ.१

६२) दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर, १२ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद सन १९७२–७३, पृ.३

६३) दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर, १५ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद सन १९७५–७६, पृ.३

६४) दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर, ४३ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद सन २००३–०४, पृ.५

६५) मुलाखत लक्ष्मण नामदेव पवार, चिलाईवाडी ता.पंढरपूर, दिनांक २३ ऑक्टोबर २०१५

६६)श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन १९८२–८३, पृ.१२

६७)श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन १९८४–८५, पृ.१८

६८)श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन १९८७–८८, पृ.२१

६९)श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन १९९४–९५, पृ.१४

७०)मुलाखतमोहन बाबासाहेब कोळेकर, गुरसाळे, ता. पंढरपूर, दिनांक २५ ऑक्टोबर २०१५

७१)श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन १९९९–२०००, पृ.१८

७२)श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन २००२– २००३, पृ.१४

७३)श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, सन २००३–०४ पृ.१८

७४)श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखाना, लि.वेणुनगर, ता.पंढरपूर, वार्षिक अहवाल, वार्षिक अहवाल १९८०–८१ ते २००३–०४

७५)कवडे सुधाकर; झुंज,सहकार शिरोमणी वसंतराव काळे यांचे चरित्र, विठाई प्रकाशन, पंढरपूर, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१४, पृ.

७६) चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.भाळवणी, ता.पंढरपूर, १२ वार्षिक अहवाल, सन २००२–०३, पृ.८

७७) चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.भाळवणी, ता.पंढरपूर, ११ वा वार्षिक अहवाल, सन २००१–०२, पृ.७

७८)चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.भाळवणी, ता.पंढरपूर, १२ वा वार्षिक अहवाल, सन २००२–०३, पृ.८

७९) मुलाखत;कल्याणराव वसंतराव काळे, वाडीकुरोली, ता.पंढरपूर, दिनांक १४ डिसेबर २०१६

८०) चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.भाळवणी, ता.पंढरपूर, १३वा वार्षिक अहवाल, सन २००३-०४, पृ.११

८१)मुलाखत; माणिकराव जगताप, कार्यकारी संचालक, चंद्रभागा सहकारी साखर कारखाना, भाळवणी, ता.पंढरपूर, दिनांक६ मे २०१५

# प्रकरण चौथे

# पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला लाभलेले नेतृत्त्व

## ➢ प्रस्तावना –

जगामध्ये आजपर्यंत अनेक चळवळी झाल्या. त्यातील काही यशस्वी झाल्या तर काही अयशस्वी झाल्या. ज्या चळवळी यशस्वी झाल्या त्याचे कारण म्हणजे त्यांना लाभलेले नेतृत्त्व होय. म्हणूनच कोणत्याही संस्थेची, चळवळीची प्रगती अखंडीतपणे होण्यासाठी योग्य नेतृत्त्वाची आवश्यकता असते. हे नेतृत्त्व चळवळीतील सर्वांना सामावून नेणारे असावे, कार्यशील असावे. चळवळीला जर योग्य नेतृत्त्व लाभले तर चळवळ निश्चितपणे आपल्या कार्यात यशस्वी होते. त्याचप्रमाणे सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी अशा निष्ठावान नेतृत्त्वाची आवश्यकता असते.नेतृत्त्वही लोकांकडून अपेक्षित कार्य करून घेण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांना योग्यप्रकारे निर्देशित करणारी, त्यांना कार्य प्रवृत्त करणारी प्रक्रिया आहे. नेतृत्त्व ही जबाबदारी स्वीकारण्याची ती पार पाडण्याची क्षमता आहे. नेतृत्त्वाशिवाय कोणतीच सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा आर्थिक चळवळ अगर क्रांती शक्य नसते. प्रस्तुत प्रकरणात पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला लाभलेल्या नेतृत्त्वाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## ➢ औदुंबर कोंडिबा पाटील –

पंढरपूर तालुक्याच्या कृषि औद्योगिक क्रांतिचे जनक म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते ते औदुंबर पाटील यांचे दैदिप्यमान व्यक्तिमत्त्व व सहकारी क्षेत्रातील असामान्य असे त्यांचे कर्तृत्त्व सहकारी नेत्यांना व कार्यकर्त्यांना दीपस्तंभासारखे आहे. पंढरपूर तालुका हा सहकारी चळवळीच्या बाबतीत आघाडीवर आहे. या तालुक्यात सहकारी चळवळीस ज्यांनी खतपाणी घातले त्यात औदुंबर पाटील यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. निःस्वार्थ बुद्धीने व विधायक वृत्तीने प्रेरित झालेला माणूस लोककल्याणाचे कार्य करू शकतो याचा स्फूर्तिपद आदर्श म्हणजे औदुंबर पाटील होत.

औदुंबर पाटील यांचा जन्म मोहोळ तालुक्यातील येवती या गावी सधन पाटील कुटुंबामध्ये २३ नोव्हेंबर १९२३ रोजी झाला. त्यांच्या वडिलांकडून त्यांना सामाजिक कार्याचे बाळकडू मिळाले. लहानपणापासूनच त्यांनी वेगवेगळया क्षेत्रात सामाजिक कार्य करण्यास

सुरूवात केली. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या गावातच झाले तर पुढील शिक्षण घेण्यासाठी ते पंढरपूर येथे आले, शिक्षण घेत असतानाच हळूहळू व्यापार करण्याकडे त्यांची दृष्टि गेली आणि पंढरपुरातील एक नावाजलेले अडत व्यापारी म्हणून त्यांना प्रतिष्ठा मिळाली. त्यांची ग्रामीण जीवनाशी अत्यंत जवळीकता होती. शेतकऱ्यांच्या जीवनात सुख संपन्नता यावी त्यांच्या ऊसाला चांगला भाव मिळावा यासाठी त्यांनी श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची इ.स.१९७३ मध्ये स्थापना केली.[१]

**सहकारातील कार्य –**

पंढरपूर तालुक्यात सहकारी साखर कारखाना स्थापन केल्याशिवाय शेतकऱ्यांचा विकास होणार नाही हे धोरण मनाशी बाळगून सर्व सहकाऱ्यांच्या साहय्याने श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची गुरसाळे येथील उजाड माळरानावरती निर्मिती करून २५०० मे.टन क्षमतेचा कारखाना सुरु केला. ऊसाचे अतिरिक्त होणारे उत्पादन पाहून कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन ३५०० मे.टन केली. आज७५०० मे.टन क्षमतेने कारखाना चालत आहे. औदुंबर आण्णानी अत्यंत काटकसरीने व उत्तम प्रशासक म्हणून अगदी अल्प कालावधीत कारखाना कर्जमुक्त केला व प्रत्येक गळीप हंगामात शेतकऱ्यांना जिल्ह्यात एक नंबरचा ऊसाला दर दिला. कारखान्याच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्याचा मोठा आर्थिक विकास झाला.[२]

आण्णांनी राजकीय क्षेत्रात विविध पदे भूषविली पंढरपूर नगरपालिका, पंढरपूर तालुका पंचायत समिती, सोलापूर जिल्हा परिषद, पंढरपूर मर्चण्ट बँक, पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष,महाराष्ट्रराज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, श्री.विठ्ठल हॉस्पिटल अशा अनेक संस्थांच्या व राजकीय पदांच्या माध्यमातून त्यांनी मोठे सामाजिक कार्य केले. संस्कारापासून दुरावलेल्या विद्यार्थी वर्गाला सुसंस्कृत करणारी रिमांड होम ही संस्था चांगल्या पद्धतीने चालविली.[३]

कर्मवीर औदुंबर आण्णांनी शेतकऱ्यांच्या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे या हेतूने कारखाना कार्यस्थळावरती 'श्री विठ्ठल प्रशाला' स्थापन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. त्या प्रशालेची अल्पावधीतच प्रगती होऊन प्रशालेमध्ये तंत्र शिक्षण, कला व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली, त्याचप्रमाणे कारखाना परिसरामध्ये

त्यांनी यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करून सभासदांना ऊस बिल जागेवरच देण्याची व्यवस्था केली.[४]

पंढरपूर तालुक्यात कॉंग्रेसचा उमेदवार आमदार पदाच्या निवडणुकीत सतत अयशस्वी का होतो, यांचे निदान करण्यासाठी कॉंग्रेसचे थोर नेते यशवंतराव चव्हाण पंढरपुरात आले. त्यांनी पंढरपूर तालुक्याच्या राजकीय परिस्थितीचे निदान केले व औदुंबर पाटील यांना आमदार पदाची उमेदवारी दिली, त्यात त्यांना यश प्राप्त झाले.[५] इ.स. १९६८ नंतर औदुंबर पाटील यांनी कॉंग्रेसला नवसंजीवनी दिली. तालुक्यातील मराठा समाज व इतर जातीधर्मातील लोकांना हाताशी धरून कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली. सलग १७ वर्षे त्यांनी पंढरपूर तालुक्याचे नेतृत्त्व केले. याच काळात त्यांना सहकारातून साखर उद्योग सुरू करण्याचे सुचले. औदुंबर पाटलांनी आपले सहकारी यशवंतभाऊ पाटील, सुधारकपंत परिचारक, भास्करराव गायकवाड इत्यादीच्या मदतीने शेअर्स गोळा करून श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यांनी संस्थापक चेअरमन म्हणून १५ वर्षे या कारखान्याचे काम पाहिले या संस्थेवर त्यांचे प्रेम इतके वाढले की सतत या संस्थेचा कारभार पाहता यावा यासाठी औदुंबरअण्णा कारखान्यावरच राहत असत. त्यांनी कारखान्याच्या विकासासाठी मर्यादितच सभासद ठेवले. कारखान्याच्या मशिनरीची निवड करताना दर्जाकडे लक्ष दिले. त्यांनी अवघ्या चार वर्षात कारखाना कर्जमुक्त केला. शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य दर देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. त्यांनी त्यांच्या काळात ऊसाला ९२५ रूपये एवढा विक्रमी भाव दिला. परिणामी तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली सायकल घेणे स्वप्न वाटणाऱ्या शेतकऱ्याला मोटारसायकल घेणे शक्य झाले. आमदारकी गेल्याचे दु:ख न करता साखर उद्योग भरभराटीस आणण्याचे व्यापक काम औदुंबरअण्णांनी केले. या कामगिरीमुळे लोक त्यांना कर्मवीर म्हणू लागले.[६] पंढरपूर तालुक्यातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचे श्रेय औदुंबर पाटलांकडेच जाते. मूळ संस्थापक आणि चेअरमन या नात्याने श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना अंत्यत लोकप्रिय बनविण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांनी तालुक्याचे राजकारण करत असतानाच जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचे चेअरमन म्हणूनही मोठे कार्य केले.[७]

ग्रामीण भागातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ग्रामीण भागातील प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी विधानसभेमध्ये गेले पाहिजे हा विचार आण्णांच्या मनात निर्माण झाला व इ.स.१९६२ मध्ये त्यांनी पंढरपूर विधानसभेची निवडणूक लढविली व ते विजयी झाले. इ.स. १९६२ ते इ.स. १९८० या प्रदिर्घ कालखंडात त्यांनी पंढरपूर तालुक्याचे नेतृत्त्व केले व पंढरपूर तालुक्याच्या विकासाचे स्वप्न साकार केले.[८]

इ.स. १९६२ च्या विधानसभा निवडणुकीत औदुंबर पाटील यांना भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची उमेदवारी मिळाली या निवडणुकीत त्यांना २८,२४६ इतकी मते मिळाली व झालेल्या मतदानाच्या ५९.३४ टक्के मते मिळवून ते निवडून आले. त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी उमेदवार जयवंत मोरे यांना या निवडणुकीत १३,२७५ इतकी मते मिळाली.[९] इ.स. १९६७ च्या निवडणुकीतही इ.स.१९६२ च्या निवडणुकीचीच पुनरावृत्ती झाली.यावेळी औदुंबर पाटील यांना २६,३३६ इतकी मते मिळाली. व झालेल्या मतदानच्या ५२.४० टक्के मते मिळवून ते निवडून आले तर जयवंत मोरे यांना या निवडणुकीत १४,५९१ इतकी मते मिळाली.[१०] इ.स. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत औदुंबर पाटील यांना पुन्हा भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची उमेदवारी मिळाली. या निवडणुकीत त्यांना ३४,४१२ इतकी मते मिळाली झालेल्या मतदानाच्या ६३.९८ टक्के मते मिळवून ते निवडून आले. यावेळी त्यांनी अपक्ष उमेदवार बाळू डोंबे यांचा १९,४९७ इतक्या मतांनी पराभव केला.[११] इ.स.१९७८ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची उमेदवारी पुन्हा औदुंबर पाटील यांना मिळाली. या निवडणुकीत औदुंबर पाटील यांना ३९,२०५ इतकी मते मिळाली व ते झालेल्या मतदानाच्या ४९.५२ टक्के मते मिळवून निवडून आले. त्यांनी त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी सुधारक परिचारक यांचा ३,६६२ इतक्या मतांनी पराभव केला.[१२] इ.स. १९८० च्या निवडणुकीमध्ये औदुंबर पाटील यांना कॉग्रेस (अर्स) या पक्षाची उमेदवारी मिळाली. मात्र या निवडणुकीत त्यांचा पाडुंरग भानुदास डिंगरे या कॉग्रेस (आय)च्या उमेदवारांकडून ३,१९९ इतक्या मतांनी पराभव झाला.[१३] औदुंबर कोंडीबा पाटील यांनी इ.स. १९६२ पासून पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका लढविल्या इ.स.१९६२, इ.स.१९६७, इ.स. १९७२, इ.स.१९७८ च्या निवडणुकीमध्ये त्यांना विजय मिळाला मात्र इ.स.१९८० च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पांडुरंग डिंगरे यांच्याकडून पराभव पत्करावा लागला.

## औदुंबर पाटील यांचे विधानसभेतील कार्य

पंढरपूर तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी विधानसभेमध्ये गेले पाहिजे शासन दरबारी आपल्या समस्या मांडण्यासाठी आण्णांनी इ.स.१९६२ मध्ये पंढरपूर तालुका विधानसभेची निवडणूक जिंकून विधानभवनात प्रवेश केला. पुढे सलग १८ वर्षे विधानसभेचे सदस्य राहून पंढरपूर तालुक्याच्या विकासाचे स्वप्न साकार केले.

५ एप्रिल १९६६ रोजी औदुंबर पाटील यांनी विधानसभेत सरकारला विनंती केली की, सरकारतर्फे शेतकऱ्यांना वेळेवर तगाई मिळत नाही, आणि मिळालीच तर दीर्घ कालावधी लागतो. शेतकऱ्यांना इंजिनची आवश्यकता असेल तर चारसहा महिन्यांचा वेळ लागतो आणि पिकांना पाणी देण्याची वेळ निघून जाते. खत ज्यावेळी पिकांना मिळायला पाहिजे त्यावेळी कधीच मिळत नाही या सर्व गोष्टींमुळे सर्व सरकारी योजनांबाबत शेतकरी एकदम निरूत्साही झालेला आहे. या गोष्टींचा सरकारने विचार केला पाहिजे यासाठी सर्व सरकारी यंत्रणा कार्यक्षम रीतीने राबविली पाहिजे आणि शेतकऱ्यांना वेळेवर विविध गोष्टी मिळवून दिल्या पाहिजेत अशी त्यांनी विधानसभेत सरकारला विनंती केली.

चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये मोठमोठया पाटबंधारे प्रकल्पांचा समावेश होता. तेव्हा पंढरपूर तालुक्याची संजीवनी ठरणाऱ्या उजनी प्रकल्पाचे काम सुरू करण्याविषयी सरकारची काय योजना आहे? कारण १९६६ या वर्षीच्या बजेटमध्ये फक्त ७० लाख रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ती तरतूद फारच अपुरी आहे. उजनी प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्याची विनंती त्यांनी वारंवार सरकारकडे केली.[१५]

पंढरपूर हे पवित्र धार्मिक क्षेत्र आहे. या ठिकाणी राज्याच्या आणि देशाच्या निरनिराळया विभागातून भाविक लोक येतात तेव्हा या शहराचे जे प्रश्न आहेत ते पर्यायाने या राज्याच्या सर्व विभागाचे होतात.परंतु त्यांच्याकडे सरकारने पाहिजे तितके लक्ष दिलेले नाही पंढरपूर शहराच्या समस्या सोडविण्यासाठी व शहराला विविध सुविधा देण्यासाठी सरकारने प्रयत्न करण्याची विनंती औदुंबर पाटील यांनी केली.[१६]

महाराष्ट्र राज्यात उदयोगधंदयाची वाढ व्हावी म्हणून कापूस, गळीताचे धान्ये अशा पिकांना सरकारने प्रोत्साहन दिले होते. परंतु या चांगल्या योजनांमध्ये ज्या काही उणीवा होत्या त्याकडे पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या

अगोदर तारणाशिवाय कोणतेही कर्ज मिळत नव्हते मात्र चौथ्या योजनेत लहान शेतकरी आणि शेतीवर काम करणारा मजूर यांना सहाय्य करण्याकरिता या अर्थसंकल्पात अनेक योजना आहेत. उदा.विहीर खोदण्याकरिता, बांध बंदिस्ती करीता किंवा जमीन समतल करण्याकरिता या लोकांनी जर एकत्र येऊन कर्जाची मागणी केली तर कर्ज मिळणार आहे.तेव्हा या विविध योजना शेतकऱ्यांमध्ये लवकरात लवकर पोहचवण्याचा सरकारने प्रयत्न करावा.[१७] नोव्हेंबर १९७४ मध्ये विधानसभेमध्ये प्रश्न क्र.४३,९६८ द्वारे औदुंबर पाटील यांनी राज्यातील साखर कारखान्याच्या बाबतीत शासनाकडून सुचविण्यात आलेल्या आदर्श पोट नियमाबाबत विचारणा केली असता सरकारकडून लेखी उत्तराच्या माध्यमातून उत्तरे देण्यात आली त्यात १) संचालक मंडळाची निवड मतदान पद्धतीने करण्यात येईल २) ऊसाच्या तोडणीचा खर्च शासनाने दयावा. त्याबरोबरच वाहतूकखर्च देखील शासनाद्वारेच दिला जावा.३) ऊसाचा भाव हा शासनाद्वारे ठरविण्यात येईल व आदर्श पोटनिवडणुका बाबतीत आग्रह धरण्यात येत आहे अशी उत्तरे देण्यात आली.[१८]

### कृषि सहाय्यक व ग्रामसेवकांसाठी स्वतंत्र केडर

दि.१७ डिसेंबर १९७४ रोजीच्या तारांकित प्रश्न ४२,४९२ द्वारे राज्याच्या ग्रामविकास मंत्र्यास, कृषि सहाय्यक व ग्रामसेवकांसाठी संयुक्त केडर तयार करण्यासंदर्भात किती प्रगती झाली व त्या केडरचे स्वरूप कोणते असेल या संबधी विचारणा केली असता शासनाद्वारे पुढील स्पष्टीकरण देण्यात आले. ग्रामसेवकांसाठी एकात्मिक आकृतीबंधाची अंमलबजावणी १ मार्च १९७५ पासून होणार असून १ एप्रिल १९७४ पासून पदे निर्माण करण्यात येतील शिवाय कृषि पदवीधर असलेल्या उमेदवारांची ग्रामविकास अधिकारी पदांवर नियुक्ती करण्यात येईल. ग्रामसेवक व कृषि सहाय्यक यांची कार्ये एकत्र करण्यात येतील. डेव्हलपमेंट ऑफिसर हे पद प्रमोशनने भरावे व इतर स्पष्टीकरणे शासनाने ग्रामसेवक व कृषि सहाय्यक भरती व केडरच्या बाबतीत श्री.औदुंबर पाटील यांना दिली. त्यानुसार भविष्यात प्रत्येक गावाला ग्रामसेवक व असिस्टंट ग्रामसेवक मिळाला.[१९]

### क्षय रोग्यांसाठी खाटाची व्यवस्था

महाराष्ट्रातील आरोग्याच्या दृष्टिने व्यापक अशी विचारणा श्री औदुंबर पाटील यांनी महाराष्ट्र शासनाला विधानसभेमध्ये केली ज्यात सन्माननीय आरोग्यमंत्री यांना राज्यातील क्षय

रोग्यांसाठी निरनिराळया हॉस्पिटलमध्ये एकूण किती खाटाची व्यवस्था केली आहे व त्या संबंधी काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. याला शासनातर्फे पुढीलप्रमाणे उत्तर देण्यात आले. क्षयरोग्यांसाठी विवक्षित कक्ष (Isolated Word) याबरोबरच जादाचे औषधोपचार यांची सोय करण्यात आली आहे असे उत्तर देण्यात आले.[२०]राज्यांतील दैनंदिन जीवनाश्यक वस्तुच्या वाढत्या किंमती कमी करण्यासंदर्भात त्याबरोबरच कृषि व औद्योगिक उत्पादनामध्ये खंड पडणे आणि जनतेला सोसाव्या लागणाऱ्या अडचणी संदर्भात विधानसभेमध्ये प्रश्न विचारले.[२१] अन्य मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळ स्थापण्यासंदर्भात तारांकित प्रश्न क्र.४०,३८७ द्वारे प्रश्न विचारला त्याबरोबरच कैदयांसाठी कुठे कुठे वसाहती स्थापन करण्यात येणार आहेत यासंबधी सरकारशी विचारणा केली.[२२]

**महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद**

५ ऑगस्ट १९७५ मध्ये महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद सोडविण्यासाठी आघाडी सरकारने काय पाऊल उचलेले यासंबधीची ठोस विचारणा औदुंबर पाटील यांनी केली त्याबरोबरच जकात कराऐवजी बहुउद्देशीय उलाढाल कर सुरू करण्यासंबंधी त्यासंबधीचा निर्णय घेण्यासंबंधी व निर्णय घेतल्यास किती कालावधीत निर्णय घेण्यात येणार आहे याची माहिती घेतली व कार्यवाही करण्यास कटिबद्ध असलेल्यांना निश्चित तारीख देण्यासाठी सांगितले.[२२] वेळोवेळी महाराष्ट्राच्या विधानसभेत औदुंबर पाटील यांनी महाराष्ट्र कर्नाटक सीमावादा संदर्भात अनेक प्रश्न विचारले त्यांनी ४०,८८८ या प्रश्न क्रमाकांद्वारे सीमाप्रश्नांसदर्भात विविध प्रश्न विचारले.[२३]

प्रश्न क्रमांक ४०,५९२ अंतर्गत मिरजलातूर हया नॅरोगेज लोहमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याच्या कामाचे अंतिम सर्वेक्षण (Final Location Survay)पूर्ण झाले आहे काय व सर्व्हे पूर्ण झाला असल्यास प्रत्यक्ष कामास केव्हापासून सुरूवात होणार आहे. या प्रश्नाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी जिल्ह्यातील रेल्वे मिरज–कोल्हापुरशी जोडण्याचा घाट घातला. मिरज लातूर या नॅरोगेजच्या संदर्भात प्रश्न विचारून मराठावाडा व पश्चिम महाराष्ट्र यांना दळणवळणाच्या दृष्टिने जोडून आर्थिक व व्यापारी विकासाला चालना देण्याचे धोरण औंदुबर पाटील यांनी आखल्याचे दिसून येते.[२४] प्रश्न क्र.४०,१७५ द्वारे दूध महामंडळ स्थापन करण्याबाबत शासनाच्या

विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर खुली चर्चा करून उत्तर देण्याचे आवाहन केले. त्यासंबंधी दुग्धशाळा विकासमंत्री खुलासा करतील काय यासंबंधी समग्र विचारसरणी श्री औदुंबर पाटील यांनी केली.

०२ ऑक्टोबर १९७४ रोजी राज्यातील मुद्रण संस्थांनी आपल्या मागण्यांसाठी एक दिवसाचा हरताळ पाळून आपल्या मागण्या शासनास सादर केल्या होत्या. त्यासंबंधी सरकारला उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. याबरोबरच रेवरा कारंजा पूलाचे काम जो अलिबाग व उरण तालुक्याला जोडतो त्या जमिनीचे सर्वेक्षण करून ते पूलाचे काम केव्हा पूर्ण होणार यासंबंधी शासनाची भूमिका जाणून घेतली.[२५]

## जिल्हा समन्वय समितीवर शेतमजुरांचा प्रतिनिधी घेणेबाबत

दि.२४ नोव्हेंबर १९७५ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ५२,५८९ द्वारे कामगार मंत्र्यांना औदुंबर पाटील यांनी खालील घटकांचा खुलासा करावयास लावला.

१) शेतमजुरांच्या किमान वेतन बाबतचीअंमलबजावणी व जिल्हा समन्वय समितीची भूमिका.

२) जिल्हा समन्वय समितीमध्ये शेतकऱ्यांचा प्रतिनिधी घेण्याबाबत कोणकोणते निर्णय घेतले. याद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावरील समित्यामध्ये शेतकऱ्यांना किंवा शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींना सामावून घेण्याची शिफारस केली व त्याची अंमलबजावणी करण्याचा पाठपुरावा केला.[२६]

## राज्य मार्केटिंग फेडरेशनची पुनर्रचना

दि.१२ डिसेंबर १९७५ रोजी महाराष्ट्र शासनाला 'औदुंबर पाटील यांनी राज्य मार्केटिंगची पुनर्रचना करण्यासंदर्भात अनेक प्रश्न विचारले त्यांना शासनामार्फत सविस्तर उत्तरे देण्यात आली. [२७]जानेवारी व फेब्रुवारी १९७६ या दोन महिन्याच्या कालावधीमध्ये सोलापूर व सांगली जिल्ह्यातील ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत होण्याची सर्वसाधारण कारणे व हा वीजपुरवठा खंडीत न होण्यासाठीच्या संदर्भात उपाययोजना करणे यासंबंधी औदुंबर पाटील यांनी सर्व शासकीय धोरणाची इत्यंभूत माहिती मागविली.[२८]

दि.१६ मार्च १९७६ रोजी ॲव्हेरो प्रकारचे विमानतळ बांधून घेणे त्याबरोबरच या प्रकारच्या विमानतळासंदर्भात कोणकोणत्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यासंबंधी

मूलगामी प्रश्न विचारून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात विमान वाहतुकीच्या सोई का करण्यात आल्या नाहीत याची त्यांनी सविस्तर माहिती मागविली.[२९]

एंकदरीत राज्यातील पंढरपूर तालुक्यातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक, कृषिविषयक, दळणवळणाशी संबंधीत व रोजगाराच्या बाबतीतील विविध प्रश्न जाणून घेऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. अनुसूचित जातीजमातीच्या प्रश्नांनी विधानसभा दणाणून सोडली. शिवाय आरोग्याच्या संबंधी प्रश्न विचारून सरकारला उपाययोजना करण्यासाठी विनंती केली. एवढेच नाहीतर लातूरपंढरपूर ते मिरज रेल्वे लाईनच्या विस्तारीकरणामुळेया पट्टयातील आर्थिक स्थिती मजबूत होईल व व्यापार वाढेल यातून सामाजिक व सांस्कृतिक अभिसरण होईल. लोकांना आपले विचार भावना अभिव्यक्त करता येतील. यासाठी रेल्वेच्या विस्तारीकरणासाठी वेळोवेळी सरकारचे लक्ष वेधून घेतले. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामसेवक, असिस्टंट ग्रामसेवक, कृषि अधिकारी, यांचे महत्त्व ओळखून सरकारला त्यांच्या रितसर नेमणुकीसाठी वेळोवेळी विधानसभेत प्रश्न विचारून भंडावून सोडले. त्याबरोबरच कृषिच्या क्षेत्रात मुलभूत परिवर्तन करण्यासाठी सरकारने वेळोवेळी पाऊले उचलली पाहिजेत यासंबंधी अतिशय आक्रमक भूमिका घेतली. आरोग्याच्या बाबतीतही तितकीच आक्रमक भूमिका पाटील यांनी घेतली. ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्याची स्थिती, रोग्यांसाठी उपलब्ध असणारे औषधाचे प्रमाण त्यांच्यासाठी उपलब्ध असलेली गावची व्यवस्था परिपूर्ण आहे की नाही त्याबरोबरच टी.बी.सारख्या रोगावर सरकारची काय भूमिका आहे. सरकारने अतिरिक्त औषधपुरवठा करून ठेवला आहे काय किंवा अशा रूग्णांसाठी अतिरिक्त उपाययोजना केल्या आहेत का याविषयी सरकारला प्रश्न विचारले आरोग्याच्या प्रश्नावर टाळाटाळ करण्याच्या सरकारच्या दुटप्पी भूमिकेचा कडाडून विरोध केला काही सूचनाही केल्या. वाढती महागाई, दैनंदिन जीवनातील वस्तुंचा तुटवडा, वस्तुंच्या वाढत्या किमंती, कृषि उत्पादन वाढविण्यासाठीच्या सरकारच्या उपाययोजना, जनतेची होणारी ससेहोलपट या व अन्य प्रश्नांनी औदुंबर पाटलांनी विधानसभा दणाणून सोडली. एकंदरीत पंढरपूर तालुक्याचा विविधांगी विकास करण्यासाठी तालुक्याच्या विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी औदुंबर पाटील यांनी अविरतपणे कार्य केले. परिणामी तालुक्याचा मोठा विकास झालेला आहे.

## ➢ माजी आमदार पांडुरंग भानुदास उर्फ तात्यासाहेब डिंगरे यांचे सहकार चळवळीतील योगदान –

श्री पांडुरंग भानुदास उर्फ तात्यासाहेब डिंगरे यांची जन्म तारीख निश्चित माहित नाही. मात्र शाळेच्या दाखल्यात २० जून १९१८ ही त्यांची जन्मतारीख आहे. त्यांचा जन्म पांडुरंगाचे जे सात सेवाधारी आहेत त्यापैकी पांडुरंगाला आरसा दाखविणाऱ्या डिंगरे कुळात झाला. त्यांचे शालेय शिक्षण लोकमान्य विद्यालयात झाले. शालेय जीवनपासूनच ते स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेत होते. इ.स. १९४२ च्या चले जाव आंदोलनात त्यांनी भाग घेतला व त्यांना कारावास भोगावा लागला. पुढे ते मराठी विषय घेऊन एम.ए. झाले. त्याचवेळी ते नगरपालिकेत शॉप इन्स्पेक्टर झाले. खरेतर श्री. पांडुरंग डिंगरे हे विविध पैलू असलेले एक तेजस्वी रत्न होते. पांडुरंगाला आरसा दाखविणारे सेवाधारी, निर्भीड पत्रकार, लेखक, तेजस्वी वक्ते, विधानसभा दणाणून सोडणारे अभ्यासू आमदार असे व्यक्तिमत्त्व म्हणजे पांडुरंग डिंगरे होत, ते नुसते पत्रकार नव्हते तर विद्वान, अभ्यासू लेखक होते. मराठी, संस्कृत, हिंदी या भाषातील शेकडो ग्रंथ त्यांनी अभ्यासले होते. रामायण, महाभारत या ग्रंथाचा त्यांचा अभ्यास वाखणण्यासारखा होता. मराठी वाङ्मयाचा व संत साहित्याचा गाढा अभ्यास त्यांनी सतत चालू ठेवला होता. उत्तम वक्ते म्हणून ते प्रसिद्ध होते. विधानसभेतील त्यांची भाषणे अक्षरश: घणाघाती असत म्हणून त्यांना “पंढरपूरचा बुलंद आवाज तसेच पंढरपूरची मुलूख मैदान तोफ” अशा सार्थ उपमा लावल्या जात.[३०]

### पत्रकार व संपादक

तात्यासाहेब डिंगरे यांनी गोफण या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक व पत्रकार म्हणून वेगवेगळया विषयांवर प्रसंगानुरूप विपुल लेखन केले त्यांच्या लेखनाला व्यासंग व सखोल अभ्यासाचा पाया असल्याने त्यांच्या लेखनाने समाजमनाला कार्यप्रवण केले. पत्रकारिता केवळ व्यवसाय म्हणून नव्हे तर ते एक व्रत म्हणून त्यांनी अंगिकारले. गोफणमधून त्यांनी सरकारच्या चुकीच्या धोरणाविरूद्ध टीकेची झोड उडविली. साने गुरूजींच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाच्या काळात तात्यांच्या लेखणीला धार चढली होती. आमदार तात्या डिंगरे यांनी साने गुरूजींच्या विठ्ठल मंदिर प्रवेश चळवळी दरम्यान दैनिक गोफणमधून चळवळी संदर्भात प्रबोधनकारी प्रभावी लेख लिहिले. त्यांनी गोफण वृत्तपत्रातून शिक्षण, सामाजिक समता, स्वच्छता, साक्षरता, राष्ट्रप्रेम

व स्वातंत्र्य चळवळ इत्यादी विषयावर लेखन केले.[३१] बांग्लादेश युद्धाच्या काळात त्यांनी रोज 'गोफण' चे विशेषांक काढले. जनता सरकारच्या काळात कॉग्रेसचे 'शिदोरी' नावाचे साप्ताहिक त्यांनी हाती घेतले. ते बंद पडण्याच्या मार्गात होते. मरू घातलेल्या त्या पत्रात तात्यांनी आपल्या तेजस्वी लेखणीने प्राण ओतला व ते पुन्हा जीवंत झाले. त्यांच्या आक्रमक लिखाणाने वाचकांना अक्षरश: वेड लावले होते.[३२]

**तात्यासाहेब डिंगरे यांचे विधानसभेतील कार्य –**

१९७८ सालच्या विधानसभा निवडणुकीत औदुंबर पाटील विजयी झाले. इ.स.१९८० च्या विधानसभा निवडणुकीत औदुबंर पाटील (कॉंग्रेस एस) तर तात्यासाहेब डिंगरे यांना कॉंग्रेस आय.ची उमेदवारी मिळाली या निवडणुकीत सुधाकरपंत परिचारक व इतर कॉंग्रेस नेत्यांनी तात्यांचा हिररीने प्रचार केला. सुधाकरपंत परिचारक यांच्या ग्रामीण भागातील संपर्काचा पुरेपुर फायदा तात्यांना झाला. या निवडणुकीत त्यांनी कॉंग्रेस (अर्स)चे उमेदवार औदुबंर पाटील यांचा पराभव केला व झालेल्या मतदानांच्या ५१.६० टक्के मते मिळवून ते निवडून आले.[३३] विधानसभेत गेल्यावर तात्यांनी आपली चमक पहिल्याच दिवशी दाखविली इतर आमदारांच्या शपथा मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी भाषेत झाल्या. यावेळी तात्यांनी संस्कृतमध्ये शपथ घेतली. शासनाकडे संस्कृत भाषेतील शपथेचा मजकूर नव्हता, तो तात्यांनी तयार करायला लावला.[३४] ११ एप्रिल १९८१ रोजी तात्यासाहेब डिंगरे यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत उदयोगधंदयाच्या प्रश्नांविषयी चर्चा करताना सरकारला काही प्रश्न विचारले त्यांनी सरकारकडे उदयोग खात्यांच्या धोरणाची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. तसेच महाराष्ट्रातील उदयोगधंदयाचे विकेंद्रिकरण झाले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली पंढरपूर तालुक्यात उदयोगधंदयाची स्थापना करावी व तालुका उदयोगप्रधान करावा. अशी मागणी त्यांनी मांडली पंढरपूर तालुक्यात उदयोगधंदयाची स्थापना करावी व तालुका उदयोगप्रधान करावा. अशी मागणी शासनाकडे केली.[३५]

१२ जुलै १९८३ रोजी श्री.पाडुरंग डिंगरे यांनी महाराष्ट्रातील सर्व उदयोगधंदयाचे महाराष्ट्राच्या विविध भागात विकेंद्रीकरण व्हावे व यासाठी सरकारने विशेष प्रयत्न करण्याची मागणी केली. त्याचबरोबर मुंबई, पुणे, ठाणे या भागातील उदयोगधंदे वाढले मात्र उर्वरीत

महाराष्ट्रातील उदयोग ३९% ते ३२% ने कमी झाले याची कोणती कारणे आहेत असा प्रश्न सरकारला विचारला.[३६]

**पंढरपुरातील लहान-मोठ्या व्यावसायिकांना तात्यासाहेबांनी केलेले सहकार्य :-**

पंढरपूर तालुक्यातील लहान–मोठे व्यावसायिक व शेतकरी यांच्या मूलभूत आर्थिक गरजा भागविण्यासाठी पंढरपूर शहरात व तालुक्याच्या वेगवेगळया भागात कृषी पतसंस्था, नागरी पतसंस्था स्थापन करण्यात तात्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पंढरपूर तालुक्यातील उदयोगांचे विकेंद्रीकरण व तालुक्याच्या ग्रामीण भागात औद्योगिकरणाचा वेग वाढविण्यासाठी शासनाच्या विविध योजना त्यांनी तालुक्यात आणलेल्या आहेत. नवीन उद्योग सुरू करण्यासाठी, जुन्या उदयोगांचा विकास करण्यासाठी तसेच लघु उदयोजकांना भांडवल मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य औदयोगिक व गुंतवणूक महामंडळ, जिल्हा उदयोग केंद्र इत्यादी महामंडळामार्फत तालुक्यातील लहान–मोठया व्यावसायिकांना मदत मिळवून दिलेली आहे. प्रामुख्याने पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. येथे औदयोगिक वसाहत नाही. मात्र येथे छोटया मोठया लघु व कुटीर उदयोगांना भरपूर वाव आहे. पंढरपूर शहरातील मोकळया जागेत लघु व कुटीर उदयोग सुरू करण्यासाठी नगरपालिकेकडून परवाने दिले जातात. हे परवाने नगरपालिकेचा आरोग्यधिकारी, स्वच्छता समिती, स्थायी समिती यांच्या मंजुरीने दिले जातात. या कामी व्यावसायिकांना तात्यासाहेबांची मोठी मदत झालेली आहे.[३७] पंढरपूर शहरात व तालुक्यात लाकूड वखारी, सागवाणी वखारी, लाकूड कापण्याच्या गिरण्या, छापखाने, हातमाग उदयोग, साबण कारखाने, मिठाईवाले, वीट भट्टया, चुना भट्टया, दाळे–चिरमुरे भट्टया, पाव भट्टया–गिरण्या व ऑईल मिल्स, तपकीर कारखाने, हळद–कुंकू कारखाने, उदबत्त्या कारखाने, बत्ताशे, बांगडया तसेच तुळशीमाला, वीणा, चिपळया, टाळ, मृदुंग इत्यादी संगीत साधने, धार्मिक पुस्तके यांची मोठया प्रमाणात होते. यात्रा काळात पंढरपूरात आर्थिक उलाढाल मोठी असते. अशा व्यावसायिकांना सहकाराच्या माध्यमातून तात्यासाहेबांनी मदत केलेली आहे.[३८]

वारकरी संप्रदायात प्रवृत्ती व निवृत्ती यांचा संगम झालेला आहे. सर्वसमावेशक असणारा हा संप्रदाय समाजाच्या तळापर्यंत रूजला. आज भारतात व भारताच्या इतर प्रांतात शैव–

वैष्णवांचे पंथीय झगडे आहेत. परंतु महाराष्ट्रात असे झगडे नाहीत. आज समाजात संकुचित विचारसरणी नसून सर्वसमावेशकता व सहिष्णुता पहायला मिळते ती वारकरी संप्रदायामुळेच या संप्रदायामध्ये वारीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आषाढी–कार्तिकी, माघी व चैत्री या प्रमुख चार वाऱ्यांना लाखो भाविक पंढरपूरात येतात. याशिवाय प्रत्येक महिन्याच्या शुद्ध एकादशीला मोठी वारी भरते. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र असल्याने पंढरपूरला भेट देणाया भाविकांची संख्या मोठी आहे. दरवर्षी लाखो पर्यटक पंढरपूरला भेट देतात. शहरात उद्योगासाठी पोषक वातावरण असले तरी येथील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे स्वतः वैयक्तिक जमीन खरेदी करून त्या जागेवरती व्यावसाय सुरू करण्यास छोटया उदयोजकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. मात्र असे असले तरी शहरात मठ आणि फडांची मोठया प्रमाणात स्थापना होत आहे. अनेकजण एकत्र येऊन फडासाठी किंवा मठासाठी जमीन खरेदी करत आहेत. खरेतर हा एक प्रकारचा सहकारच आहे. या फड आणि मठांच्या स्थापनेमुळे पंढरपूर शहराचा मोठा विस्तार झालेला आहे.[३९] पंढरपूर शहरात सर्व जातीधर्मातील लोकांचे वास्तव्य आहे. शेती, शेतमजूर, बांधकाम व्यवसाय, पशुपालन, छोटे मोठे व्यवसाय व यात्रा काळातील व्यवसाय इत्यादी घटकावर येथील आर्थिक जीवन अवलंबून आहे.[४०]

**नगरपालिकेतील कार्य –**

पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुका पुढे ढकल्यामुळे श्री डिंगरे यांनी महाराष्ट्र सरकारचे मनपूर्वक अभिनंदन केले त्याबरोबरच भाविकांसाठी नगरपालिकेने उत्तरोत्तर जास्त सुविधा पुरवाव्यात अशी विनंती केली.[४१] वस्तुत: स्वत: डिंगरे यांनी पंढरपूर नगरपालिकेमध्ये चार–पाच वर्षे काम केले त्यामुळे सेल्फ सर्पोटिंग पद्धतीनेच ही कामे झाली पाहिजेत. नगरपालिकेमध्ये प्रशासकाची नियुक्ती करून त्यांच्याकडून पंढरपूरच्या सार्वजनिक कामकाजाचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यात यावे, असे केल्याने नगरपालिकेची खचलेली परिस्थिती सुधारण्यास मदत होईल असे त्यांचे मत होते. नगरपालिकेच्या प्रशासकाची मुदत वाढवून देणे व त्यातून पंढरपुरचा विकास साध्य करणे त्याबरोबरच नगरसेवकांना त्यात समाविष्ट करून घ्यावे हा विचार त्यांनी मांडला लाखो वारकरी विठ्ठलच्या दर्शनाला येतात मात्र त्यांना हव्या तशा सोईसुविधा देण्यात पंढरपुरची नगरपालिका कायमच कमी पडत असते इतकेच नाहीतर पंढरपुरातील दैनंदिन प्रश्नांची सोडवणूक करण्यात सुद्धा नगरपालिकेची दैना वाईट होत असल्यामुळे पंढरपूरचे

पुनर्निर्माण करण्यासाठी तेथील लोकांचा विकास करण्यासाठी नगरपालिका निवडणुका पुढे ढकलून व प्रशासक नेमून पंढरपूरचा भौतिक व आर्थिक विकास करावा अशी मागणी सभागृहामध्ये श्री तात्या डिंगरे यांनी केली.[४२]

## कृषि व सहकारातील कार्य

पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीच्या विकासामध्ये तात्यासाहेब डिंगरे यांचे खूप मोठे योगदान आहे. सहकार चळवळीला त्यांनी दिलेल्या योगदानामुळे पंढरपूर तालुक्याचा विकास होण्यास मदत झालेली आहे. ते सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक व औद्योगिक बँकेचे वीस वर्षे सल्लागार (डायरेक्टर) होते. पंढरपूर मार्केट कमिटीचे चेअरमन आणि ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांची कारकीर्द अविस्मरणीय सेवेची होती. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक असताना त्यांनी तालुक्यात पीककर्ज योजना जोरदारपणे राबवली. त्याचबरोबर छोटया शेतकरी मजुरांसाठी कर्ज देण्याची योजना त्यांनी राबवली. तात्यांचे जीवलग स्नेही वि.स.पागे हे त्यावेळी खादी ग्रामोद्योगाचे अध्यक्ष होते त्यांनी आपल्या स्नेहाचा लाभ जनतेला व्हावा य हेतूने सहकारी संस्थांना कमी दराने कर्ज मिळवून दिले. व्यवसायाला सुरूवात करून देण्यासाठी मार्गदर्शन केले. प्रामुख्याने तेली समाज ग्रामोद्योग संस्था, ताडगुळ विक्री करणाऱ्यांची संघटना, खत प्रक्रियेसाठी लिंबोळयाचे एकत्रिकरण करणारी संघटना स्थापन केली या माध्यमातून अनेकांना छोटे–मोठे काम मिळू लागले वेगवेगळया संस्थांच्या माध्यमातून अनेक योजना राबवून माणसे कामाला लावून आर्थिक चणचण थांबविल्याशिवाय समाज प्रगती करू शकणार नाही असे त्यांचे ठाम मत होते.

पंढरपूर मर्चन्टस् बँकेच्या स्थापनेमध्ये तात्यांचा मोठा सहभाग होता. पण त्याठिकाणी त्यांनी कधीही आपल्या अधिकारांचा गाजावाजा केला नाही.[४३] पांडुरंग सहकारी साखर कारखान्यांची निर्मिती करण्यासाठी व मंजुरीसाठी तात्यांनी प्रयत्न केले. पुढे या सहकारी साखर कारखान्यामुळे पंढरपूर तालुक्याचा मोठा विकास झाला. रांझणी कॅनालचा प्रश्न, एम.आय.डी.सी ची मंजुरी, आय.टी.आय.कॉलेज, इत्यादी संस्थांच्या निर्मितीत त्यांचे मोठे योगदान आहे.[४४] पांडुरंग सहकारी साखर कारखान्याला परवानगी देताना त्यांना कारखान्याचे चेअरमन करण्याच्या अटीवर शासनाने परवानगी दिली होती. त्यांनी कारखान्याच्या संचालक

मंडळावर निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली. कारखाना चालविताना त्यांनी स्वच्छ कारभाराचा आदर्श घालून दिला. लाखो रूपयांच्या टेंडरमध्ये कसलाही भ्रष्टाचार झाला नाही.[४५]

सभागृहामध्ये कृषि विषयी भूमिका मांडताना ते म्हणतात, कृषि सहकारी व नियोजनाच्या संकल्पनाची झालेली परवड याची सभागृहाने गंभीर दखल घेतली पाहिजे व सरकारने या प्रश्नी विचार केला पाहिजे ही भूमिका पांडुरंग डिंगरे यांनी मांडली. बुधवार दि. ०६ एप्रिल १९८३ रोजी कृषि अंतर्गत दूग्ध पुरवण्याच्या मागण्यावर विचार मांडण्याबरोबरच महाराष्ट्रातील दुष्काळाचे वास्तव वर्णन त्यांनी केले. दुधाच्या वाटपाचे धोरणाबाबत डिंगरे यांनी महाराष्ट्र सरकारला अशी मागणी केली की, "खेडयातून गोळा होणारे दूध प्रथम ग्रामीण भागातील गर्भवती, बाळांतीण, लहान मुले आणि शाळेतील मुलांना पाजा आणि मग उरलेले दूध मुंबईतील श्रीमंताना द्या." तसेच सरकारने ग्रामीण भागासाठी सबसिडी द्यावी असे कणखर मत सभागृहासमोर मांडले.[४६] कृषि अंतर्गत दूग्ध पुरवठयाच्या मागण्यावर तात्यांनी ग्रामीण भारताचे वास्तव वर्णन करून दूध हे मुख्यत: प्रथम ग्रामीण भागातील लोकांना पुरविले पाहिजे. त्यांची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे व त्याबरोबरच ग्रामीण आरोग्यासाठी दूध हा महत्त्वपूर्ण घटक असल्याचा निर्वाळा दिला. जीवनावश्यक वस्तुंचे समतोल वाटप करण्यात यावे समाजातील वंचित वर्गाला दूध व दुग्धजन्य पदार्थांचा फायदा मिळावा स्त्रियांना पोषक आहार दिला जावा यासाठी अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन डिंगरे यांनी सभागृहामध्ये केले. महाराष्ट्र सरकारने १९८२–८३ साली ३९ कोटी २८ लक्ष लिटर दुधाचे वाटप केले. त्यापैकी एकटया मुंबई शहरास ३२ कोटी ८२ लक्ष लिटर दूध वाटले, तर पुणे २ कोटी ७२ लक्ष लिटर तर नागपूर शहरात १ कोटी ९९ लक्ष लिटर म्हणजेच या ३ मोठया शहरात सुमारे ३७ कोटी ५६ लक्ष लिटर दुध वाटण्यात आले आणि बाकी सर्व महाराष्ट्राची बोळवण १ कोटी ७२ लक्ष लिटरवर करण्यात आली. श्रीयुत डिंगरे यांनी याविषयी पुराणातील कथा सांगितली गाई, गुरांची खिल्लारे आणि दुधाचे उत्पादन गोकुळात तर दुधाचा पुरवठा राजधानी मथुरेला. गोकुळाच्या दुधावर कंसाचा मथुरेतील राक्षस गलेलठ्ठ होत आहे. त्यामुळे खेडयापाडयातील गोकुळाचे गोपाळ वंचित ठेऊन मुंबईच्या मथुरेतील उच्च उत्पन्नाच्या श्रीमंताना दूध पुरविण्याचे महाराष्ट्र सरकारने थांबविले तर आम्हालाही श्रीकृष्णासारखे आंदोलन पुकारावे लागेल असा गर्भित इशारा दिला.[४७]

**राज्यातील विविध जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती**

तात्यासाहेबांनी महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील आणि त्यांच्या मंत्रीमंडळाने जी उपाययोजना केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले त्याचबरोबर दुष्काळ सदृश्य परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी सरकारने सकारात्मक पावले उचलली पाहिजेत त्यासाठी त्यांनी काही उपाययोजना सुचविल्या. दुष्काळी प्रश्नावर विधानसभेमध्ये चर्चा करताना त्यांनी काम दया, अन्न दया, पाणी दया, कडबा दया या चार मागण्या प्रामुख्याने मांडल्या जातात आणि सरकार यापैकी काहीही करीत नाही अशी विरोधी पक्ष फोडणी देतात. अडीचशे इंच पाऊस कोसळणारा सह्याद्री ज्याच्या उशाशी आहे, कृष्णा, भीमा, नीरा, कावेरी, गोदावरी अशा नद्या ज्याच्या अंगाखांद्यावरून वाहतात त्या स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्या महाराष्ट्रात दुष्काळावर चर्चा करावी ही दुर्दैवाची आणि दुःखाची गोष्ट आहे. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात साधन सामुग्रीचा तुटवडा नाही, नैसर्गिक उपलब्धतेचा नाही, तुटवडा आहे तो बुद्धिचा आणि नियोजनाचा.[४८] सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ कायमचा दूर व्हावा यासाठी उजनी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबरोबरच दुष्काळ हटविण्याची इच्छाशक्ती निर्माण करण्याची गरज श्री डिंगरे यांनी प्रतिपादीत केले मुबंईमध्ये होणारा पाण्याचा अपव्यय आणि उर्वरित महाराष्ट्र पाण्यासाठी दाही दिशा फिरतो हे विदारक चित्र मांडण्याबरोबरच मुंबईचा पाणी पुरवण्याचा दुसरा ६४० कोटीचा टप्पा जर उर्वरित महाराष्ट्रासाठी वापरला गेला असता तर महाराष्ट्रावर ही वेळच आली नसती असे विधान केले. झाडे लावली पाहिजेत, धरणे बांधली पाहिजेत, पाण्याचे योग्य प्रमाणात वाटप केले पाहिजे असे केले तरच महाराष्ट्रातील दुष्काळाचे विदारक वास्तवाची चर्चा करण्याचा प्रसंग विधानसभेवर येणार नाही असे मत श्री डिंगरे यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ कायमचा दूर व्हावा यासाठी सरकारने निपक्षपातीपणे व प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. दुष्काळ हटविण्यासाठी आवश्यक असणारी मानसिकता निर्माण होण्याची गरज आहे. कोटयवधी रूपये खर्च करूनही दुष्काळाचे संकट टाळता येत नाही. त्यामागचे अधिकाऱ्यांचे हितसंबधावरही श्री पांडुरंग डिंगरे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले तसेच नैसर्गिक दुष्काळाबरोबरच सावकारांनी आवश्यक वस्तुंचा साठा करून ठेऊन अन्नधान्याचा कृत्रिम दुष्काळ निर्माण केला आहे. याकडे सरकारचे लक्ष वेधले.[४९]

**मंडल आयोग व अस्पृश्यता :**

मंडल आयोगाच्या शिफारशींवर चर्चासत्रामध्ये श्री.डिंगरे यांनी सकारात्मक चर्चा केली याबरोबर गुरूवार दि. ०८ डिंसेबर१९८३ रोजी दलित समाजावर झालेल्या अत्याचाराला वाचा फोडण्याचेही काम केले. हजारो वर्षे या दलित समाजावर आम्ही अत्याचार केले आहेत. व सर्व हक्कापासून त्यांना वंचित ठेवले आहे. त्या अन्यायाला प्रकट वाचा फोडणे आणि कबुली देणे हे आमचे कर्तव्य आहे. त्याकरीता प्रायश्चित घेण्याची वेळ आली तर त्याकरीता सुद्धा पुढे होणे हे आमचे कर्तव्य आहे. दलितांच्या उद्धारासाठी आपण धर्म, जात, वर्ण विसरून एकत्र येऊन लढले पाहिजे असा विचार प्रकट केला.[५०]

दलितांच्या राखीव जागांना पाठिंबा देण्याबरोबरच मागासलेल्या जातीसाठी नवनवीन योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी प्रयत्न केले. दलितांना सर्व सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, जातीयता नष्ट करावी, धर्मसत्तेचे कठोर वर्तन कायद्याद्वारे निषिध करण्यात यावे असे परखड मत मांडले.मंडल आयोगाने जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालांच्या प्रति अभ्यास करण्यासाठी मिळू शकलेल्या नाहीत शासन टनवारी रद्दी छापते पण मंडल आयोगाच्या शिफारसी त्यांनी काही छापलेल्या नाहीत याची ही खंत व्यक्त केली, त्याबरोबरच श्रीयुक्त डिंगरे यांनी मानवाच्या मागासलेपणाची कारणे ही त्याच्या आर्थिक विपन्नावस्थेत शोधली. त्यांच्या मते "माणूस आर्थिक दृष्टया मागासलेला असल्यामागचे कारण म्हणजे आज समाजातील काही वर्गाने उत्पादनाच्या साधनावर कब्जा केलेला आहे. म्हणून तो मागासलेला आहे. संबंध उद्योगधंदे आणि शेती या वरिष्ठ लोकांच्या हातामध्ये आहेत. त्यांच्या हातामधून ते काढून घेतले पाहिजेत आणि त्याची वाटणी खालच्या वर्गात केली पाहिजे तरच हा मागासलेला वर्ग वर येऊ शकेल."[५१]

**अस्पृश्योध्दार**

मंडल आयोगासंदर्भात झालेल्या चर्चेत श्री.पांडुरंग डिंगरे यांनी सहभाग घेऊन महत्त्वपूर्ण विवेचन केले. दलितांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून साने गुरूजीनी पंढरीत उपोषण केले. या आंदोलनात डिंगरेनी पुरोगामी भूमिका घेऊन साने गुरूजींना पाठींबा दिला.[५२] एवढेच नाही तर साने गुरूजीना आमरण उपोषणासाठी पंढरपुरातील मठात जाग मिळवून देण्यापासून ते त्यांच्या उपोषणाचे समर्थन करण्यासाठी गोफण या साप्ताहिकातून ऐतिहासिक वृतांकन केले. 'मंदिर

प्रवेशाचे महाभारत’ हे पुस्तक इ.स.१९९६–१९९७ मध्ये म्हणजे उपोषणाच्या पन्नास वर्षानंतर झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी प्रकाशित केले.[५३]

डिंगरे यानी घटना समितीला तत्वांच्या अंमलबजावणीची मागणी केली, अस्पृश्यांच्या स्वांतत्र्याची मागणी केली. आरक्षणाचे समर्थन करून, अस्पृश्यांप्रती उदार दृष्टिकोन ठेवण्याची विनंती सभागृहासमोर केली. कालेलकर आयोग व मंडल आयोगाचे समर्थन केले. ज्यांना हजारो वर्षे प्रवेश मिळाला नाही त्यांच्यासाठी आता जर आरक्षण देण्याची वेळ आली तर कुरकुर करण्याची काय गरज आहे.

जोपर्यंत या जाती नष्ट होणार नाहीत तो पर्यंत आपल्या समाजामध्ये समता येणार नाही छत्रपती शाहू  महाराजाच्या १९०२ सालच्या आरक्षणाचे उदाहरण देऊन डिंगरे यांनी आता आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे असे संतप्त उद्‌गार काढले. छत्रपती शिवाजी महाराज, गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या त्यागाची उदाहरणे देऊन सभागृहाला सामाजिक समतेचा विचार आचरण्यात आणण्याची विनंती केली.

दि.०८ डिसेंबर १९८३ रोजी श्री. डिंगरे यांनी सभागृहामध्ये मंडल आयोगाच्या शिफारसींवर चर्चा केली. व त्यातील सारांश वाचला.“It is the Commission’s firm conviction that the radical transformation of the existing production relations is the most Important single step that can be taken for the ‘welfare’ and upliftment of all backward classes”[५४]

एकंदरीतच श्री पांडुरंग डिंगरे यानी आपल्या विधानसभा सदस्यत्वाच्या कालखंडामध्ये समाजातील सर्वच प्रश्नांचा सखोल विचार करून त्यांच्या निर्मूलनासाठी सभागृहामध्ये अतिशय बुद्धिवादी व सर्वसमावेशक मते मांडली होती जी काळाच्या पुढे जाणारी होती. दुष्काळाच्या प्रश्नांपासून ते दुधाच्या प्रश्नापर्यंत, ग्रामीण अर्थकारणापासून ते राष्ट्रीय उद्योगधद्यांच्या विकेंद्रित उभारणी पर्यत, मंदिर देवस्थान प्रश्नापासून ते अस्पृश्यांना देण्यात येणाऱ्या आरक्षणापर्यंत, आरोग्याच्या प्रश्नापासून ते वाहतूक सुखसुविधेचे प्रयत्न, वीज कोळसा व उद्योगाचे विकेंद्रीकरण यातून श्री.पाडुंरंग डिंगरे यांच्या वैचारिक व कृतिशील विचारांचा पिंड आपल्या लक्षात येतो. बालपणापासून झालेले संस्कार, त्याबरोबरचा शिक्षण व वर्तमानपत्राची आवड, पंढरपूर नगरपालिकेतील कामाचा अनुभव, पंढरपूरची यात्रा व तेथील समस्या या बद्दलची तळमळ

कुठेतरी असल्यामुळे मानवाचा सर्वांगीण विकास हेच ध्येय असणाऱ्या डिंगरे यांनी नगरपालिकेमध्ये प्रशासक नेमा पण पंढरपूरचा चेहरा–मोहरा बदला, वारकऱ्यांच्या समस्या सोडवा हे सातत्याने सांगत असत. म्हणूनच त्यांना पंढरपूरचे भिष्माचार्य म्हणून ओळखले जाते.

## श्री. सुधाकरपंत रामचंद्र परिचारक –

सुधाकर परिचारक यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले असून विशेषत: सहकारी चळवळीत त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. सहकरी तत्त्वारील साखर कारखानदारी हे महाराष्ट्राचे वैशिष्टय असून अडचणीत सापडलेल्या साखर कारखान्यांना पुन्हा उभारी देण्यासाठी श्री. परिचारक यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.सहकार, समाजकारण, राजकारण, अशा विविधांगी क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून पंढरपुरचे सहकारमहर्षी सुधाकर परिचारक यांना ओळखले जाते. त्यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९३५ रोजीपंढरपूर येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव रामचंद्र बाळकृष्ण परिचारक होय. त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था केली होती. त्यांनी मॅट्रिकपर्यत शिक्षण पूर्ण केले. घरातील सामाजिक व राजकीय कार्याचा वारसा असल्यामुळे सुधाकर परिचारक हे समाजकार्याकडे आकर्षित झाले.[५५]

### सामाजिक कार्य

सुधाकर परिचारक यांना बालपणापासूनच समाजसेवा व राजकारण या क्षेत्राबाबत आवड होती. वडील व काका यांचेकडून प्रेरणा व बाळकडू घेऊन समाजकार्य व राजकारणामध्ये सन १९५८ मध्ये सर्वोदय संमेलनापासून सक्रीय सहभाग घेतला.आपल्या घरी येणाऱ्या सामान्य माणसाच्या अडचणी सोडविण्याचाते नेहमी  प्रयत्न करीत. सत्तेच्या हव्यासापोटी जनतेत वारंवार खोटी आश्वासने देण्याऱ्या नेत्यापेक्षा वेगळी दिशा घेऊन काम करण्याऱ्यामध्ये निश्चितच सुधाकर परिचारक यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. कोणाशी वैरभाव न करता त्यांनी सामाजिक कार्य चालू ठेवले. समाजकार्यात व राजकारणात ज्यांनी वेळोवेळी आमदार परिचारक यांच्याबाबत कटकारस्थाने केली. त्यांच्याबद्दल मनात राग वा द्वेषाची भावना न राहता भूतकाळातील सर्व गोष्टी विसरुन शत्रुंचीही ते कामे करत.[५६] सुधाकर परिचारक यांची सामाजिक बांधिलकी मोठी होती. त्यामुळेत्यांच्या कालखंडात पंढरपूर अर्बन  बँकेने अनेक सामाजिक उपक्रम राबविले. अकलूजमधील साखर कामगारांना स्वतःचे घरकुल बांधण्यासाठी प्रत्येकी

रू.२०,०००/– ची कर्जे दिली. पंढरपुरात रूग्णवाहिकेची गरज होती. बँकेने रूग्णवाहिका विकत घेतली व अत्यंत माफक दरात जनतेला उपलब्ध करून दिली. गरीब सभासदांच्या अंत्यविधीस रू.५०० ची मदत सुरू केली.[५७]

जनसामान्याच्या सुखदुःखामध्ये सहभागी होण्याच्या त्यांच्या खास वैशिष्टयामुळे हजारो लोकांचे सुधाकर परिचारक हे श्रद्धास्थान ठरले. राजकारणामध्ये ते खऱ्या अर्थाने स्वच्छ राहिले. आर्थिक संकटाच्या आगीच्या खाईत सापडलेल्या व ज्यांचे अस्तित्व पूर्णतः संपुष्टात येऊ पहात असणाऱ्या भीमा सहकारी साखर कारखान्यावर स्वकर्तृत्वाने व कल्पक बुद्धिमत्तेच्या आधारे प्रयत्नांची पराकाष्टा करून त्यानी कारखान्यास नवसंजीवन दिले. हजारो कामगार व अगणित ऊसबागायतदारांना, यांच्या मुलाबाळांना पुढे काय? या भेडसावणाऱ्या प्रश्न चिन्हापासून मुक्त केले.[५८]

पंढरपूर या तीर्थक्षेत्राचा सर्वांगीणविकास व्हावा यासाठी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न करून 'सुंदर पंढरपूर' ही योजना कार्यान्वित केली. सदर योजनेतील पहिल्या टप्प्यातील रू.१० कोटीचे काम पूर्ण झाले असून पंढरपुरातील प्रदक्षिणा रोड रूंद करून आषाढी व कार्तिकी यात्रेचे वेळी पंढरीनगरीत येणाऱ्या कोटयावधी वारकऱ्यांना वाहतुकीची मोठी सुविधा उपलब्ध करून दिली. सुधाकर परिचारक यांनी पंढरपूर येथे धन्वंतरी सहकारी रूग्णालयाची स्थापना केली.[५९]

### राजकीय कार्य

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे पंढरपुरचे माजी आमदार सुधाकर परिचारक यांनी आपल्या कार्याची सुरूवात कॉंग्रेस पक्षातून केली होती. सुधाकर परिचारक यांना समाजकार्याचा व राजकारणाचा वारसा आपल्या घरातूनच मिळाला होता. त्यांचे वडील रामचंद्र बाळकृष्ण परिचारक हे पंढरपूर तालुक्यातील खर्डी गावचे सतत ३७ वर्षे सरपंच होते. तर काका दिवाणबहाद्दूर गोविंद उर्फ बाबासाहेब परिचारक हे पंढरपूर नगरपरिषदेचे ११ वर्षे नगराध्यक्ष होते. यांचा वारसा घेऊन सुधाकरपंतानी आपल्या कार्याची सुरूवात इ.स.१९५५ पासून केली.[६०] इ.स.१९६७ मध्ये पंढरपूर तालुका पंचायत समितीच्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाची उमदेवारी मिळाली. या निवडणुकीत परिचारक विजयी

झाले. इ.स.१९७३ पर्यत पंचायत समितीमध्ये सदस्य व उपसभापती म्हणून कार्य केले. सन १९७२ मध्ये ते सोलापूर जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडले गेले.[६१]

१९७८ सालच्या विधानसभा निवडणुकीत सुधाकर रामचंद्र परिचारक यांना ३५,५४३ मते मिळाली एकूण मतदानाच्या ४४.८९ टक्के इतकी मते त्यांना मिळाली. या निवडणुकीत त्यांचा औदुंबर कोंडिबा पाटील यांच्याकडून ३,६६२ इतक्या मतांनी पराभव झाला.[६२] इ.स.१९८५च्या विधानसभा निवडणुकीमध्ये सुधाकर परिचारक यांना पंढरपूर विधानसभा मतदार संघातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची उमेदवारी मिळाली या निवडणुकीत त्यांना ६०,८१७ मते मिळाली. झालेल्या मतदानाच्या ५५.५० टक्के मते त्यांना मिळाली. त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी उमेदवार यशवंतराव गोपाळराव पाटील यांचा त्यांनी १३,६४४ इतक्या मतांनी पराभव केला.[६३] इ.स.१९९० च्या निवडणुकीमध्ये परिचारक यांना पुन्हा काँग्रेसची उमेदवारी मिळाली या निवडणुकीत त्यांना ८९,५९७ इतकी मते मिळाली. झालेल्या मतदानाच्या ७६.९४ टक्के इतकी विक्रमी मते त्यांना यावेळी मिळाली.[६४] १९९५ सालच्या निवडणुकीतही सुधाकर परिचारक यांनाच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची उमेदवारी पुन्हा मिळाली. या निवडणुकीत त्यांना ८०,०८४ इतकी मते मिळाली झालेल्या मतदानाच्या ३७.४७ टक्के इतकी मते त्यांना मिळाली. या निवडणुकीतील त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार राजाराम औदुंबर पाटील यांना ७३,९१४ मते मिळाली. परिचारक यांचा या निवडणुकीत ६,१७० मतांनी विजय झाला.[६५] इ.स.१९९९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुधाकर परिचारक यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळाली. यावेळी ते ८३,५५९ मते मिळवून निवडून आले. झालेल्या मतदानाच्या ५२.९६ टक्के इतकी मते त्यांना मिळाली. या निवडणुकीतील त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार वसंतराव श्रीमंत काळे यांना ६८,१९६ मते मिळाली. यावेळी परिचारक यांच्याकडून काळे यांचा १५,३६३ इतक्या मतांनी पराभव झाला.[६६] इ.स.२००४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी पुन्हा सुधाकर परिचारक यांना मिळाली. या निवडणुकीत ते ८४,५५४ इतकी विक्रमी मते मिळवून निवडून आले.[६७] सुधाकर परिचारक यांनी इ.स.१९७८ पासून विधानसभेच्या निवडणुका लढविल्या इ.स.१९७८ च्या पहिल्याच निवडणुकीत त्यांना अपयश आले. इ.स.१९८० ची विधानसभा निवडणूक त्यांनी लढविली नाही. मात्र इ.स.१९८५ पासून ते इ.स.२००९ पर्यंत ते सातत्याने पंढरपूर विधानसभा मतदार संघातून

निवडून आले. त्यांनी पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे सलग चोवीस वर्षे इतके प्रदिर्घकाळ नेतृत्त्व केले.[६८]सन २००९ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आदेशानुसार स्वतःच्या विधानसभा उमेदवारीचा त्यांना त्याग करावा लागला.[६९]

सन २००० मध्ये सुधाकर परिचारक यांची एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. इ.स.१९९३ पासून सतत तोटयात असणारे एस.टी.महामंडळ सन २००६ –०७ या वर्षात प्रथमच रू.२३ कोटी नफा मिळवून त्याला आर्थिक अडचणीतून बाहेर आणले. सन २००५ मध्ये विधानसभा अस्तित्वात येताच पुन्हा एस.टी.महामंडळाचे अध्यक्षपदी फेरनियुक्ती झाली. इ.स. २००९ पर्यत एस.टी.महामंड्ळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उत्तम काम केले.[७०]

**विधानसभेतील कार्य :**

दि. २३ एप्रिल १९९२ रोजी महाराष्ट्राच्या विधानसभेत श्री सुधाकरपंत परिचारक यांनी पंचायतराज समितीचा सातवा व आठवा अहवाल सभागृहात सादर केला. त्यांनी या अहवालामधील काही महत्त्वाच्या शिफारशी सभागृहाच्या लक्षात आणून दिल्या. जिल्ह्याच्या संतुलित विकास करण्यासाठी समितीने शिफारस केली होती. प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्वतंत्र समिती नेमण्यापेक्षा शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमून प्रत्येक जिल्ह्यातील अविकसित विभाग निश्चित केला पाहिजे अशी शिफारस या समितीने केली होती. बालवाडयातील शिक्षकांना दरमहा १०० रूपये मानधन दिले जाते. महागाईचा विचार करता ही रक्कम अतिशय कमी आहे. या शिक्षकांना किमान ४०० रूपये मानधन देण्याची शिफारस या समितीने केली होती. ग्रामीण पाणीपुरवठयाच्या योजना उभारण्यासाठी मोठा खर्च केला होता. त्या पूर्ण झाल्यानंतर नियोजनाच्या अभावी त्यातून मिळणारे पाणी लोकांना व्यवस्थित मिळत नाही. परिणामी या योजनावरील खर्च वाया जातो. म्हणून यावर योग्य नियोजन करून शासनाने पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावेत.[७१]

समितीने जिल्हा परिषदा व पंचायत समितीमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले उदा.एका जिल्हा परिषदेने १ रूपया नाममात्र भाडयाने तीन वर्षे एका खाजगी व्यक्तिला ट्रॅक्टर भाडयाने दिला होता. तसेच दुसऱ्या एका जिल्हा परिषदेने एक ट्रक दुरूस्तीसाठी वर्कशॉपमध्ये पाठविण्याची नोंद होती. प्रत्यक्षात मात्र तो ट्रक सात वर्षे साखर कारखान्यासाठी ऊसाची वाहतूक करत होता. अधिकाऱ्यांच्या दौऱ्याचे तपशिलही मजेदार होते. मात्र या दौऱ्याची

चौकशी केली असता दौऱ्याच्या ठिकाणी असणाऱ्या नोंदवहयामध्ये त्यांची नोंद नव्हती. या अधिकाऱ्यांनी २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या दिवशीही दौरे दाखविले होते. यावरून तेथे मोठा भ्रष्टाचार दिसून येता होता. महाराष्ट्राच्या अनेक जिल्हा परिषदांमध्ये मोठया प्रमाणात अफरातफरीची उदाहरणे घडली होती. याची शासनाने तात्काळ चौकशी करावी व दोषींना शिक्षा द्यावी अशी शिफारस समितीने केली होती.[७२]

नांदेड जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण व शिक्षण खात्यातील भ्रष्टाराबाबत प्रश्न क्रमांक २१,५३७ अन्वये सु.रा.परिचारक यांनी विधानसभेमध्ये प्रश्न विचारला होता. यावर अभयसिंह राजे भोसले यांनी सविस्तर उत्तर दिले.[७३] सहकारी संस्था (सुधारणा) विधेयकाबाबत सु.रा.परिचारक यांनी २७ जुलै २००० रोजी सभागृहामध्ये आपले मत मांडले ते म्हणतात, सहकारी संस्था विधेयकात दुरूस्तीला दुरूस्ती दिली आहे म्हणून त्यामधील बंधपत्राची अट काढून टाकावी. विधेयकात दुरूस्ती सुचविताना असे सांगितले होते की, एखादया सोसायटीची स्थापना झाली आणि त्यानंतर तिला तीन वर्षे पर्यंत मताचा अधिकार असू नये. परंतु त्या संस्थेची गुणवत्ता पाहून समजा संस्था स्थापन झाली आणि वर्षभराने ऑडीट केले त्या संस्थेची आखणी असेल तर त्यामधून व्यवहार चालू आहे का नाही का नुसत्या मताकरिता संस्था काढली हे तपासावे पण सरसकट तीन वर्षाची अट घातली आहे ती घालू नये अशी विनंती सुधाकर परिचारक यांनी सभागृहाला केली. वार्षिक सभांच्या बाबतीत जी सुधारणा आणलेली आहे ती स्वागतार्ह आहे. अनेक संस्था या वार्षिक सभा घेतात. कुठेतरी एखादी संस्था वार्षिक सभा घ्यावयाचे टाळत असेल तर ती त्या मुदतीत घेतली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर एका माणसाला एकच मत देता येईल हे व्यवहारात बसणारे नाही. अनेक सदस्यांनी याबाबतीत सूचना केलेल्या आहेत. तेव्हा याबाबतीतील स्पष्टीकरण कळालेले नाही. दुर्बल घटक, मागासवर्गीय महिला यांना मत द्यावयाचे असेल तर ते कसे काय देणार, एकच मत द्यावयाचे असेल तर ते देता येणार नाही. यामध्ये दुरूस्ती विसंगत वाटते. असे मत परिचारक यांनी मांडले. तसेच सेवा सोसायटयांना जिल्हा बँकांमार्फत दिलेला कर्जपुरवठा आहे. तो त्यात्या सोसायटयाकडून वसूल करून घ्यावा. त्या सोसायटया व साखर कारखान्यांचे संबंध मैत्रीचे असावेत. दूध सोसायटया, कोंबडी पालन सोसायटया त्यांच्यासोबत असू नयेत. त्याला

कायद्याने बंदी घालावी. वरील विधेयकाला पाठिंबा देऊन त्याचा स्वीकार करावा व हे विधेयक मंजूर करावे अशी सभागृहात त्यांनी शासनास विनंती केली.[७४]

**सहकारातील कार्य**

श्री सुधाकरपंत परिचारक यांनी सामान्य कार्यकर्त्यापासून सुरूवात करत भीमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनपद भूषविले. सुरूवातीपासून त्यांनी सहकारी चळवळीत आत्मियतेने भाग घेण्यास सुरूवात केली. पंढरपूर तालुक्यातील पहिला सहकारी साखर कारखाना श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना उभारणीसाठी त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सन १९९३ मध्ये श्रीपूर ता.माळशिरस येथील बृहन महाराष्ट्र शुगर फेडरेशन इंडस्ट्रिज या खाजगी साखर कारखान्याचे रूपांतर सहकारी कारखान्यात करून नवीन श्री.पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची त्यांनी मुहूर्तमेढ रोवली. परिचारकांचे नेतृत्त्व आणि विश्वासार्हतेच्या जोरावर श्रीपूर येथील पांडुरंग कारखान्याने अडचणीच्या काळातही ४ लाख, ४७ हजार टनांचे गळीत केले. सन २०१६ –१७ या काळापर्यत कारखान्याने सहविजनिर्मिती प्रकल्पातून ३ कोटी ४० लाख युनिट वीज विकली आहे. याचा सामान्य शेतकऱ्यांना चांगलाच फायदा झाला आहे. सहकार क्षेत्रातील वीजनिर्मितीचा हा भारतातील पहिला कार्बन क्रेडीट मिळविणारा मोठा प्रकल्प आहे. या कारखान्याचाजिल्ह्यातील सर्वोच्च एफआरपी दर देणारा कारखाना म्हणून नावलौकीक आहे.[७५]

भीमा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सुधाकरपंत परिचारक यांनी सहकारात भरीव योगदान दिले. या कारखान्याच्या माध्यमातून मोहोळ, पंढरपूर व मंगळवेढा तालुक्याचा आर्थिक, सामाजिक विकास घडून आला. या कारखान्यात सुधाकरपंत परिचारक यांची १९८६ सालापासून प्रशासकीय चेअरमन म्हणून नियुक्ती झाली. भीमा सहकारी साखर कारखाना अत्यंत कार्यक्षमतेने चालविला सन १९८९ ते २०१० या कालावधीत सदर कारखान्यास उर्जितावस्था आणून प्रगती पथावर पोहचविले या कालावधीत सदर कारखान्याकडेसोलापूर जिल्ह्यातील एक लक्षवेधी अग्रणी कारखाना म्हणून पाहिले जाते.[७६]

श्री सुधाकरपंत परिचारक यांची सन १९६६ साली दी पंढरपूर अर्बन को अर्बन बँक लि.चे संचालक म्हणून निवड झाली. त्यांनी सन २००२ पर्यत हे पद भूषविले. आपल्या कार्याचा ठसा सहकार चळवळीत निर्माण केला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन १९७५ मध्ये

दी पंढरपूर अर्बन को ऑप. बँक लि.चे चेअरमन पद देण्यात आले. त्यांनी १९८९ पर्यत म्हणजे १४ वर्षे बँकेचे चेअरमनपद भूषविले. आपल्या कार्याचा ठसा उमटवत त्यांनी बँकेला एक अग्रक्रम मिळवून दिला.[७७] सुधाकरपंताची तिसरी पिढी आपल्या कर्तबगारीने बँकेचे नेतृत्त्व करीत आहेते शहरी व ग्रामीण भागातील लोकप्रिय नेते आहेत. त्यांच्या लोकाभिमुख नेतृत्त्वाखाली बँकेची प्रगती गरूडाच्या वेगाने होऊ लागली. 'घर बांधणी कर्ज' ही दी पंढरपूर अर्बन को ऑप. बँकेच्या अंतर्गत योजना सुरू केली. याचा सर्वसामान्यांना चांगला फायदा झाला. सन १९७५ मध्ये ते बँकेचे चेअरमन झाल्यानंतर त्यांनी आर्थिक स्थिरता व शिस्त पाळून संस्थेच्या विकासासाठी व विस्तारासाठी प्रगतीचा मंत्र स्वीकारला. सन १९७६–२००० या काळात सुधाकरपंतानी हे काम अत्यंत तडफेने, दैवदन्त प्रामाणिक निष्ठेने केले. आणि संस्थेचे १००० कोटीचे उद्दिष्टपूर्ती केली.[७८]

बँक ही आर्थिक संस्था आहे. तिचा विकास झाला पाहिजे असे पंत यांना वाटत होते. म्हणून दी पंढरपूर अर्बन को ऑप. बँक लि.च्या अनेक शाखा निर्माण केल्या. पंढरपुरातच अनेक शाखा निर्माण केल्या. तसेच सोलापूर, बार्शी येथे या बँकेच्या शाखा आहेत. समाजातील सर्व सामान्य गरजूपर्यत पोहचले पाहिजे. असे सुधाकर यांना वाटत होते. त्यांना कर्ज उपलब्ध करून देणे आपले कर्तव्य आहे असे त्यांना सारखे वाटत असे. यासाठी अनेक योजनांच्या माध्यमातून गरजूंना कर्जे वाटप केली. केवळ तारण पाहून ज्यांनाकर्ज देता येणे शक्य नव्हते, त्यांना त्यांच्या रास्त कारणासाठी पतपुरवठा केला. ते परतफेड निश्चित करतील याची खात्री होती. कर्जदारांनी सुधाकर परिचारक यांचा विश्वास खरा ठरविला व अर्बन बँक समाजाची अर्थवाहिनी ठरविली. या त्यांच्या कार्याचा आढावा घेवून महाराष्ट्र शासनाने सन १९९३ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबईचे संचालक म्हणून नियुक्त केले. हा त्यांचा गौरव होता.[७९]

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोशिएशनद्वारा दिला जाणारा कै.विष्णु आण्णा पाटील जीवन गौरव पुरस्काराने श्री सुधाकरपंत परिचारक यांना सन्मानित करण्यात आले.सन २००८ मध्ये महाराष्ट्र राज्य विधानसभेतील उत्कृष्ट भाषणपट्टू हा पुरस्कार भारताचे राष्ट्रपती आदरणीय प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. सन २०१३ मध्ये सोलापूर जिल्हा नागरी बँक्स

असोशिएशन तर्फे सहकाररत्नपुरस्कार प्रदान केला. व २०१३ सालचा भक्ती सेवा पुरस्कार ही त्यांना देण्यात आला.[८०]

श्री सुधाकरपंत परिचारक यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली सहकार चळवळीला सोलापूर जिल्ह्यात चांगले स्थान मिळवून दिले. त्यांच्या काळात अर्बन बँकेची प्रगती तर जिल्ह्याच्या मर्यादा पार करून सर्व राज्यामध्ये प्रगतीची घोडदौड जोमाने सुरू केली. सहकार क्षेत्रामध्ये जो आपला वेगळा ठसा व तेजस्वी प्रतिमा निर्माण करणारे ते एकमेव असे उदाहरण आहे. ते आपल्या कुशल नेतृत्त्वामुळे, निस्वार्थी वृत्तीमुळे व धडाडीच्याकार्यप्रणालीमुळेघडले.[८१] सुधाकरपंत परिचारक यांनी पंढरपूर तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचे नेतृत्त्व केले आहे. ज्या ज्या संस्थांचे नेतृत्त्व केले त्या त्या संस्थांना त्यांनी यशाच्या शिखरावरती नेऊन ठेवले. उदा. त्यांच्या नेतृत्त्वाखाली पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्रातील आदर्श सहकारी साखर कारखाना म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे. या कारखान्यास त्यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध प्रकारचे पुरस्कार मिळालेले आहेत. सहकारी चळवळीतील त्यांच्या योगदानामुळे महाराष्ट्र शासनाने त्यांना सहकार भूषण हा किताब देऊन त्याचा गौरव केला आहे.[८२]

एकंदरीत सोलापूर जिल्ह्याच्या व सहकारी संस्थाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये श्री.सुधाकरपंत परिचारक यांचा फार मोठा मोलाचा वाटा आहे. त्यांनी आत्तापर्यंतचे कारकिर्दीत सहकारी संस्थांच्या माध्यमातून सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य हे निश्चितच उल्लेखनीय व आदर्शवादी आहे. त्यांनी भिमा सहकारी साखर कारखाना लि.टाकळी सिंकदर, श्री.पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर, व युटोपियन शुगर कचरेवाडी या साखर कारखान्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी साखर कारखानदारीच्या माध्यमातून इतर कारखान्याकडे एक आदर्श निर्माण केलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने अनेक विक्रम मोडीत काढीत देश व राज्य पातळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त केलेले आहेत. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व पंढरपूर अर्बन बँकेचे ते अनेक वर्षे संचालक व काही काळ दोन्ही बँकेचे चेअरमन म्हणून ही उत्तम काम केले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत त्यांनी २५ वर्षे काम केले. विधानसभेचे सभापती तालिका पद त्यांनी अनेक वर्षे भूषविले सोलापूर जिल्ह्यातील

दुष्काळी परिस्थिती, जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न राज्यातील सहकार व साखर कारखान्यांचे प्रश्न याविषयावर विधानसभेत ते नेहमी बोलत असत. एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर काम करत असताना त्यांनी एसटी महामंडळाच्या कारभारात भरीव सुधारणा करून महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारली. निर्भिड व स्वच्छ प्रतिमा असलेले लोकप्रतिनिधी म्हणून सोलापूर जिल्ह्यात त्यांची ओळख आहे. एकूणच पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला त्यांनी दिलेल्या योगदानामुळे तालुक्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास होण्यास मदत झाली आहे.

## ➢ वसंतराव श्रीमंत काळे –

पंढरपूर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील कर्तृत्त्ववान नेतृत्त्व म्हणून वसंतराव काळे यांना ओळखले जाते. सहकारी चळवळीच्या वाढीसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. विशेषतः पंढरपूर तालुक्याच्या पश्चिमेकडील भागाचा कृषि विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. वसंतरावाचे नेतृत्त्व म्हणजे खऱ्याखुऱ्या अर्थाने ग्रामीण नेतृत्त्व होते. त्यांनी पंढरपूर तालुक्यात अनेक प्रकारच्या सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, शेती माल प्रक्रिया तसेच व्यायामशाळा स्थापन केल्या. पंढरपूर तालुका सहकार क्षेत्रात अग्रेसर करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

**जन्म व बालपण :–**

वसंतराव काळे यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथे ८ फेब्रुवारी १९४४ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील श्रीमंत सय्याप्पा काळे यांनी वसंतराव यांना शिक्षणासाठी त्यांच्या मामांच्या गावी गादेगाव ता.पंढरपूर येथे पाठविण्यात आले. वसंतराव शिक्षण घेत असतानाच त्यांच्यात कुस्तीविषयी आवड निर्माण झाली. गादेगाव येथे शाळेत आल्यावर त्यांनी इयत्ता सहावीपर्यंत शिक्षण घेतले.[८३] वसंतरावांना बंदिस्त शिक्षण आवडत नसल्यामुळे त्यांनी शिक्षण घेण्याचे सोडून दिले आणि आपले सर्व लक्ष कुस्तीकडे वळविले. कुस्तीत त्यांनी चांगले यश मिळविले. पुढे कुस्तीसाठी त्यांना कोल्हापूर येथे तालमीत पाठविण्यात आले. त्यासाठी लागणारा सर्व खर्च त्यांचे मामा नामदेव बागल यांनी उचलला. कोल्हापुरच्या मठ तालमीतील पांडुरंग सुतार वस्ताद यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कुस्तीचे धडे घेतले.[८४] कोल्हापुरहून आपल्या मूळ गावी वाडी कुरोली येथे आल्यानंतर त्यांनी कुस्तीच्या

क्षेत्रात संपूर्ण पंढरपूर तालुक्यात आपला दबदबा निर्माण केला होता. भंडीशेगाव येथील श्रीनाथ यात्रेनिमित्त होणाऱ्या कुस्त्यांच्या फडासाठी वसंतराव काळे यांनी जोरदार तयारी केली होती. या यात्रेत त्यांची कुस्ती भंडीशेगावचे नावाजलेले पैलवान गोविंद यलमार यांच्याशी ठरली व या नावाजलेल्या पैलवानास चीतपट करून वसंतराव काळे यांनी कुस्तीमध्ये आपला दबदबा निर्माण केला.[८५]

**कृषि क्षेत्रातील योगदान :.–**

वसंतराव काळे कोल्हापूर येथे असताना त्यांनी कोल्हापूर परिसरातील शेतकऱ्यांची प्रगती जवळून पाहिली. लहान–मोठया उद्योगांची माहिती मिळवली. सहकाराच्या माध्यमातून येथील कृषिचा झालेला विकास तशाच पद्धतीचा विकास पंढरपूर तालुक्याचा करता येईल का. याविषयी विचार करण्यास सुरूवात झाली. कोल्हापूर परिसरातील शेतकरी शेतीच्या माधमातून विकसित होतात. मात्र पंढरपूर तालुक्यातील शेतकरी मागास आहेत. त्यांचा विकास झाला तर वेगळे परिवर्तन होईल याची सुरूवात त्यांनी आपल्यापासून करण्याचा निर्णय घेतला. वसंतरावांनी स्वतःची शेती बागायती करण्याचा निर्णय आपल्या वडिलांना बोलून दाखविला. मात्र त्यांच्या वडिलांनी विरोध केला. वसंतरावांच्या वडिलांच्या मते, कर्ज काढून शेती बागायत करायची म्हणजे काळया आईला गहाण ठेवायच ? मात्र आपल्या मामांच्या मदतीने वसंतराव यांनी वडिलांची समजूत काढली व पुढे भूविकास बँकेतून चार हजार रूपये कर्ज काढले. भागभांडवल कपात होऊन ३,८००/– रूपये वसंतरावांना मिळाले. त्यातून त्यांनी कोल्हापूर येथून कूपर कंपनीचे इंजिन खरेदी केले. नगदी पिकांच्या माध्यमातून त्यांनी आधुनिक शेती करण्यास सुरूवात केली.[८६]

वसंतरावांनी आपल्या शेतात नवनवीन प्रयोग करण्यास सुरूवात केली. त्यांनी सांगोला तालुक्यातील काही भागातील शेतकऱ्यांकडून डाळींबाच्या बागाची माहिती घेतली. खिलारवाडी येथील राजाराम इंगोले यांच्याशी त्यांची ओळख झाली. राजाराम इंगोले यांच्या मदतीने वसंतरावांनी पंढरपूर तालुक्यात डाळिंब लागवडीचा पहिलाच प्रयोग केला. त्यांचे शेतीतील नवनवीन प्रयोग पाहण्यासाठी शेतकरी शेतावर येऊन वसंतरावांशी चर्चा करू लागले. वसंतरावांनी आपल्या शेतात डाळिंबाच्या रोपाची नर्सरी तयार केली. तालुक्यातील शेतकऱ्यांबरोबर रत्नागिरी, सातारा, पुणे, सांगली जिल्ह्यापर्यंत त्यांच्या नर्सरीचा बोलबाला

झाला. महाराष्ट्राबाहेरही त्यांच्या रोपांची मागणी होऊ लागली. लागवडीतील प्रगतीशील बागायतदार हे नवे बिरूद त्यांच्या नावापुढे लावण्यात येऊ लागले. त्यांच्या डाळींबाच्या नर्सरीचा इतका बोलबाला झाला की, आंध्रप्रदेश शासनाच्या शासकीय रोपवाटिकेस डाळिंबाच्या रोपांचा पुरवठा करण्याचे काम वसंतरावांना मिळाले.[८७]

महाराष्ट्रासह पंढरपूर तालुक्यात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात झाल्यानंतर महाराष्ट्रातील कापसाची बाजारपेठ कोलमडून पडली असतानाच शेजारच्या कर्नाटक राज्यात मात्र कापसाला चांगला भाव मिळत होता. वसंतरावांनी भाळवणी व परिसरातील शेतकऱ्यांचा कापूस एकत्रित करून तो कर्नाटकच्या बेंगलोर, विजापूर, हुबळी येथील बाजारपेठांमध्ये विकून शेतकऱ्यांना फायदा मिळवून दिला.[८८] राजकारणात रमल्यानंतरही वसंतरावांनी शेती व शेतकऱ्यांकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. पारंपरिक शेती करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहयाने शेती करावी हा त्यांचा नेहमी कटाक्ष असायचा. इस्त्राईल या देशाने ठिबक सिंचनाचा वापर करून कृषि उत्पादन वाढविले होते. याचा अभ्यास करण्यासाठी काही शेतकऱ्यांना इस्त्राईलला पाठविण्याचे जैन कंपनीने ठरविले यात वसंतरावांचे नाव होते. इस्त्राईलमध्ये पडणारा कमी पाऊस, डोंगरमाथ्याची शेती, दुष्काळ या सर्व गोष्टीवर मात करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तेथील शेतकऱ्यांनी शेतीमध्ये क्रांती केली. सहा दिवसांच्या या दौऱ्यात वसंतरावांनी शेतीतील बारकावे, विज्ञानाचा होणारा पुरेपुर वापर इत्यादीची सखोल माहिती घेतली. दुभाषकांकरवी तिथल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेती उत्पादनावर प्रक्रिया उद्योग उभारून इस्त्राईलच्या शेतकऱ्यांनी जगासमोर वेगळा आदर्श ठेवला होता. प्रक्रिया उद्योगाशिवाय शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होणार नाही. हा विश्वास त्याच्या मनामध्ये निर्माण झाला.

ईस्त्राईलचा दौरा करून आल्यानंतर वसंतरावांनी आपल्या शेतात सर्वत्र ठिंबक सिंचन पद्धतीचा वापर केला. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांशी विविध कृषि धोरणावर चर्चा करून शेतीमध्ये त्याचा अवलंब केला. वसंतरावांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून केलेल्या कृषि प्रगतीची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना सन १९८९ चा शेतीनिष्ठ पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. हा पुरस्कार मिळाल्याने ते महाराष्ट्रासाठी व पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आदर्श ठरले.[८९]

**सहकार क्षेत्रातील कार्य –**

सरपंचपदापासून राजकीय जीवनाची सुरूवात करणाऱ्या वसंतराव काळे यांनी सहकार क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली. विठ्ठल परिवाराची स्थापना करून त्यांनी पक्षीय राजकारणाच्या गोंधळात आपले स्वतःचे अस्तित्त्व निर्माण केले. विठ्ठल परिवाराच्या माध्यमातून त्यांनी पंढरपूर तालुक्याच्या राजकारण व सहकार क्षेत्रामध्ये मानाचे स्थान मिळविले होते. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निमित्ताने एकत्रित आलेल्या राजकीय नेत्यांनी गृहनिर्माण संस्था स्थापन केली. मात्र या संस्थेमध्ये वसंतरावांना सभासद करून घेतले नाही. या गोष्टीची त्यांना खंत वाटत होती. म्हणून त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन दुसरी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. याविषयी एन.आर.कांबळे, एन.टी.जगताप, दिगंबर सांळुखे, सोमनाथ पाटील या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांनी आपला विचार बोलून दाखविला. सत्तेचे विकेंद्रीकरण करून तिची फळ समाजातील शेवटच्या घटकांना चाखण्यासाठी मिळावीत म्हणून तहहयात काम करणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने 'यशवंत गृहनिर्माण संस्था' मर्या.पंढरपूर ही संस्था इ.स. १९८२ ला स्थापन केली.[१०]

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चांगली प्रगती केली होती. वसंतरावांनी समविचारी शेतकऱ्यांशी चर्चा करून सर्वांनी सहकार्य तत्वावर उत्पादित मालाची विक्री करण्याचे धोरण मांडले. वाडीकुरोली, भंडीशेगाव, जैनवाडी, पिराची कुरोली, धोंडेवाडी, भाळवणी या परिसरात डाळिंब, द्राक्षे, केळी, पपईच्या बागांमध्ये वाढ झाल्याने त्यांच्या विक्रीसाठी सर्वांनी एकत्रित येऊन सन १९९० ला गणेश फलोत्पादक संघ, भाळवणी या संस्थेची स्थापना केली. संघाच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांचा उत्पादित माल वसई, ठाणे, नाशिक, हैद्राबाद, मुंबई, दिल्ली या बाजारपेठेत संघाच्या मार्फत पाठविला जाऊ लागला. परिणामी शेतकऱ्यांच्या मालास जास्तीत जास्त दर मिळू लागला.[११]

**प्रतिभादेवी नागरी सहकारी पतसंस्था :–**

पंढरपूर तालुक्याच्या पश्चिम भागातील लहान–लहान शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याच्या हेतूने ३० सप्टेंबर १९९१ रोजी वसंतरावांनी भंडीशेगाव येथे 'प्रतिभादेवी नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. पुढे पतसंस्थेच्या कार्याची व्याप्ती वाढल्यानंतर पंढरपूर येथेही पतसंस्थेची शाखा सुरू करण्यात आली.[१२]

**चंद्रभागा दूध डेअरी लि.वाखरी –**

सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाच्या राजकीय सत्तेची चावी प्रस्थापित राज्यकर्त्याच्या हाती असल्याने तालुक्यात दूध खरेदीमध्ये राजकारण होत आहे. असे विठ्ठल परिवारातील नेत्यांना व सभासदांना वाटत होते. श्री विठ्ठल परिवारातील दूध संस्थामार्फत पुरविल्या जाणाऱ्या दुधाला जाणीवपूर्वक कमी प्रत लावून त्रास दिला जात आहे.अशा काही तक्रारी वसंतराव यांच्याकडे गेल्यानंतर याला पर्याय म्हणून दुसरा दूध संघ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सहकारी तत्वावर दूध संस्था स्थापन करण्यावर अडचणी होत्या शेवटी सहकारी तत्वावर चालविण्याच्या उद्देशाने वाखरी येथे चंद्रभागा दूध डेअरीची सन १९९९ ला स्थापना करण्यात आली. या प्रकल्पामध्ये दररोज ३० हजार लिटर दूधाचे संकलन होऊ लागले. चंद्रभागा डेअरीजच्या रूपाने पंढरपूर तालुक्यात नव्या धवल क्रांतीस सुरूवात झाली. श्री विठ्ठल परिवाराच्या संकुलात चंद्रभागा डेअरीच्या रूपाने सहकार भक्कम होण्यास सुरूवात झाली.[९३]

**चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.भाळवणी –**

पंढरपूर तालुक्यामध्ये ऊसाचे क्षेत्र वाढल्याने श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्या–मध्ये उसाचे गाळप होणे अशक्य होऊ लागले. वाढत्या ऊसाच्या गाळपासाठी आणखी एका साखर कारखान्याची गरज भासू लागली. वसंतरावांनी तालुक्याच्या पश्चिम भागात साखर कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला. कासेगाव व भाळवणी जिल्हा परिषद गटातील ४६ गावांसाठी 'नियोजित चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.भाळवणी' या संस्थेची नोंदणी करण्याचा ठराव झाला. पंढरपूर येथील सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयाकडे १२५० मे.टन साखर उत्पादन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आला.[९४] कारखाना मंजुरीच्या कामासाठी वसंतरावांचे मुंबई, दिल्ली या शहरांकडे हेलपाटे सुरू झाले. नवा कारखाना उभारण्यासाठी राजकीय घडामोडींना वेग आला. हाती घेतलेले काम तडीस नेल्याशिवाय स्वस्थ न बसण्याचा वसंतरावाचा स्वभाव होता. कारखान्यास मंजुरी मिळविण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू असतानाच सहकारी साखर कारखानदारीस नव्याने परवानगी देण्याबाबतच्या शासनाच्या धोरणामध्ये आमूलाग्र बदल करण्याच्या हेतूने सहकार खात्याने १२५० मे.टन क्षमतेच्या ऐवजी २५०० मे.टन क्षमतेचे कारखाने उभारल्यास साखर उत्पादनात वाढ होईल. म्हणून शासन

दरबारी दाखल केलेले १२५० मे.टन क्षमतेच्या सर्व कारखान्याचे प्रस्ताव रद्द करण्याचा निर्णय घेतला. शासनाच्या या धोरणाचा फटका चंद्रभाग सहकारी साखर कारखान्यास बसला. दि.२० ऑगस्ट १९८४ रोजी कारखान्याचा प्रस्ताव नाकारण्याचे शासनाचे पत्र वसंतरावाच्या हाती पडले. मात्र तरीही ते हतबल झाले नाहीत. तर त्यातून पुन्हा कारखाना उभारणीसाठी प्रयत्न करू लागले.[९५]

चंद्रभागा सहकारी साखर कारखाना उभारायचा हे वसंतरावचे स्वप्न होते नव्हे, त्यांचे ते ध्येय बनलले होते. त्यांनी सुरूवातीचा प्रस्ताव रद्द झाल्यानंतर पुन्हा नव्याने २५०० मे.टन क्षमतेच्या कारखान्याचा प्रस्ताव दाखल केला. त्याच्या मंजुरीसाठी पुन्हा प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू झाली. यासाठी ते तत्कालीन सहकारमंत्री व मुख्यमंत्री यांना अनेक वेळा भेटले. मुख्यमंत्री पदावर विराजमान झालेल्या वसंतदादा पाटील, शिवाजीराव पाटील निलंगेकर, ए.आर. अंतुले, शरद पवार यांच्या वेळोवेळी भेटी घेण्यासाठी मंत्रालयात जाणाऱ्या वसंतरावांच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चांगल्या ओळखी झाल्या होत्या. शेवटी त्यांच्या प्रयत्नानी १२ जानेवारी १९९० रोजी चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि. भाळवणी या कारखान्याच्या नोंदणीस परवानगी मिळाली.[९६]

पहिल्या वेळेस कारखान्यास परवानगी नाकारल्यानंतर वसंतरावांनी एखादा खाजगी तत्वावर चालणाऱ्या कारखान्याची खरेदी करण्याचा विचार मनात आणला. श्रीरामपूर येथील डहाणूकर यांचा १२५० मे.टन क्षमतेचा कारखाना विकत घेऊन त्याची मशिनरी आणण्यासाठी चर्चा झाली. २ कोटी ५० लाख रूपयांचा मशिनरची व्यवहार ठरला. पन्नास हजार रूपये इसारा देण्यात आला. मात्र स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केल्याने कारखाना विक्रीचा व्यवहार होणार नसल्याचा निरोप आला आणि वसंतरावांचा आणखी एक प्रयत्न वाया गेला. पुढे बेलापूर शुगर हा हरेगावचा बंद असलेला कारखाना विक्रीस निघाल्याचे समजताच त्यांनी तो खरेदी करण्यासाठी पुन्हा प्रयत्न केले. हरेगावच्या आपटे यांच्या कारखान्याच्या मशिनरी खरेदीचा करार झाला. पण तेथेही स्थानिक राजकारणाने अडचणी निर्माण केल्या. गोविंदराव आदिकांनी या कारखान्याचे ५५ टक्के शेअर्स खरेदी करून स्वतःची मालकी स्थापन केली होती. त्यामुळे त्यांच्याशीच मशिनरी खरेदीचा व्यवहार झाला. तरीही पुन्हा नव्याने चंद्रभागा साखर कारखाना स्थापन करण्याची जिद्द वसंतरावांनी सोडली नाही.[९७]

पश्चिम महाराष्ट्रामध्ये पहिला शिवसेनेचा साखर कारखाना उभारण्यासाठी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्याशी वसंतराव काळे यांची भेट घडवून आणण्याचा निर्धार हर्षवर्धन पाटील यांनी केला. चौदा वर्षे एका कारखान्यासाठी अखंड झुंज देणाऱ्या वसंतरावाचा बाणा त्यांनी हेरला. वसंतरावांच्या पाठीशी सरकारची पूर्ण ताकद उभारण्याच्या इराद्याने त्यांनी वसंतरावांना विश्वासात घेतले. सहकारमंत्री दिवाकर रावते यांच्याशी कारखाना उभारणीसाठी चर्चा केली. पुढे मुख्यमंत्र्यांच्या भेटीच्या वेळी पंढरपूर तालुक्याची सारी राजकीय परिस्थिती मुख्यमंत्र्यांना सांगितली. पश्चिम महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर साखर कारखानदारांचा असलेला दबदबा त्यांनी मुख्यमंत्र्यांना पटवून दिला. साखर कारखानदारीच्या रूपाने पंढरपूर तालुक्याच्या राजकारणात झालेली स्थित्यंतरे समजावून सांगितली. चंद्रभागा सहकारी साखर कारखान्यास मदत केल्यास महाराष्ट्रातील शिवसेनेचा पहिला साखर कारखाना उभारणीचे श्रेय मिळेल. हा राजकीय आशावाद मुख्यमंत्र्यांना पटला. मुख्यमंत्र्यांनी वसंतरावांना कारखाना उभारणीसाठी सर्वस्वी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.[९८]

**शैक्षणिक कार्य –**

वसंतरावांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. इस्त्रायल दौऱ्याच्या वेळी शिक्षणाअभावी त्यांना डावलण्याचा प्रयत्न झाला होता. इस्त्रायल दौऱ्यामध्ये दुभाषकाच्या मदतीने त्यांनी ज्ञान मिळविले होते. तेथे त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळून चुकले. शिक्षणामुळे कुटुंबाची चौफेर प्रगती होते. शिक्षणाच्या गैरसोयीमुळे ग्रामीण भागातील मुले अडाणी राहू नयेत परिसरातील बागायती क्षेत्र वाढत असले तरी माध्यमिक शिक्षणाची सोय झाल्याशिवाय परिसरात शैक्षणिक क्रांती होणार नाही. हे त्यांनी ओळखले. यासाठी त्यांनी १३ डिसेंबर १९८९ रोजी श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ, वाडीकुरोली या नावाने शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या अंतर्गत वसंतरावांच्या घरीच १५ जून १९९० पासून पाचवी आणि आठवी असे दोन वर्ग सुरू करून न्यू इंग्लिश स्कूलची सुरूवात केली. त्यांनी वाडीकुरोली येथे न्यू इंग्लिस स्कूलला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाची सुरूवात केली. जैनवाडी येथे श्रीमंतराव काळे विद्यालय, आढीव येथील भैरवनाथ विद्यालय, या श्री विठ्ठल परिवाराच्या शैक्षणिक संकुलामध्ये त्यांनी उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय केली. त्यांच्या या प्रयत्नामुळे खेडयापाडयातील अनेक विद्यार्थी अन् विशेषतः

विद्यार्थिनींची संख्या वाढत होती. महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणाविषयी वसंतरावांनी महाराष्ट्रातील थोर शिक्षणतज्ज्ञ व रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन एन.डी.पाटील यांच्याशी चर्चा करताना आपली स्पष्ट मते त्यांच्यापुढे मांडली व व्यावसायिक शिक्षण देण्याचे धोरण राबविण्याविषयी वसंतरावांनी आग्रह धरला यातून त्यांना शिक्षणाविषयी किती तळमळ होती. हे दिसून येते.[९९]

**राजकीय कार्य –**

वसंतराव काळे यांचा खऱ्या अर्थाने राजकारणात प्रवेश झाला तो म्हणजे सन १९७१ रोजी त्यांची वाडीकुरोलीच्या सरपंचपदी निवड झाली. मुख्यमंत्र्यांनी सहकारमंत्री जयप्रकाश मुंदडा यांना फाईल काढून माहिती घेण्यास सांगितले. या बातमीने पंढरपूर तालुक्यात राजकीय वादळ निर्माण झाले. अनेक कार्यकर्त्यांनी वसंतरावांना भेटून कारखाना उभारणीसाठी योग्य राजकीय निर्णय घेण्यासाठी पाठिंबा दिला. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कारखाना उभारणीसाठी वसंतरावांनी विनाअट शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

१९ जानेवारी १९९६ रोजी चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याच्या भूमिपूजनासाठी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी येण्याचे मान्य केल्याने कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू झाली. या भूमीपूजनासाठी सहकारमंत्री दिवाकर रावते, राज्यमंत्री हर्षवर्धन पाटील, प्रतापसिंह मोहिते पाटील हेही हजर होते. या कार्यक्रमानंतर वसंतरावांची राजकीय जबाबदारीही वाढली होती. वसंतरावांनी सहा वर्षापूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर नजीकच्या मे.बेलापूर शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि.हरेगाव या खाजगी कंपनीशी त्यांच्या साखर कारखाना खरेदीचा करार करून घेतला होता. केंद्र सरकारने नवीन सहकारी साखर कारखान्यास परवाना देण्यास बंदी घातल्याने त्यांनी हा निर्णय घेतला होता. खरेदीचा करार झाल्यानंतर ठरलेल्या ३२० लाख रूपये किंमतीपैकी ११० लाखांचा पहिला हप्ता देण्यात आला. परंतु या व्यवहारात पुढे अडचणी आल्या. कारखाना मालकांनी किमंत कमी आल्याचे कारण सांगून अडवणूक केली. पुन्हा कारखान्याची किंमत ठरविण्यासाठी मूल्यांकन समिती समोर पुन्हा बैठक घेण्यात आली आणि ३२० लाखांमध्ये ठरलेल्या कारखान्याची ७०२ लाख किंमत ठरवून पुन्हा नव्याने करार करण्यात आले. वसंतरावांनी रात्रंदिवस केलेल्या परिश्रमामुळे २८ मार्च १९९९ रोजी कारखान्याच्या चाचणी हंगामाचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री दिवाकर रावते यांच्या

शुभहस्ते आणि कृषिराज्यमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ऊसाची पहिली मोळी टाकण्यात आली आणि चंद्रभाग सहकारी साखर कारखाना सुरू झाला.[१००]

सरपंच म्हणून वसंतदादांचा जनसंपर्क व कामाची जिद्द पाहून तसेच त्यांची पक्षनिर्माण आणि कामाची दखल घेऊन आमदार औंदुबरअण्णा पाटील यांनी वसंतदादावर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदाची जबाबदारी सोपविली. ३ ऑक्टोबर १९७२ रोजी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीच्या रूपाने त्यांनी पंढरपूर तालुक्याच्या राजकारणात चंचुप्रवेश केला. सन १९७९ मध्ये औदुंबरअण्णा पाटील यांनी वसंतरावांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी भाळवणी गटातून उमेदवारी दिली. तर विरोधकांनी गादेगावच्या रामभाऊ बागल यांना उमेदवारी दिली. या निवडणुकीत वसंतरावांचा सहज विजय झाला. पुढे ते दि.१७ जुलै १९७९ ते ३० जून १९९० पर्यत पंढरपूर तालुका पंचायत समितीचे उपसभापती म्हणून कार्यरत राहिले. सामान्य जनतेशी सातत्याने संपर्क रहावा म्हणून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. सन १९९२ च्या निवडणुकीत पंचायत समिती भंडीशेगाव गणातून ते पुन्हा विजयी झाले.[१०१]

पंढरपूर तालुक्यात वसंतरावांनी कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले होते. चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याच्या उभारण्याच्या बाबतीत काँग्रेस पक्षाकडून त्यांना न्याय मिळाला नव्हता. म्हणून त्यांनी १८ जानेवारी १९९६ रोजी काँग्रेस पक्षाचा त्याग करून तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.[१०२]

सन १९९९ ची निवडणूक वसंतरावांनी लढवावी यासाठी कार्यकर्ते त्यांना भेटत होते. परंतु यावेळी लोकसभा व विधानसभा हया निवडणुका एकत्रित घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला होता. पंढरपूर मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र वसंतरावांनी यावेळी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यामुळे त्यांच्या विरोधात काँग्रेस आणि राष्ट्रवादीने विधानसभेसाठी सुधाकरपंत परिचारक यांना तर लोकसभेसाठी रिपब्लिकन पार्टीचे रामदास आठवले यांना उमेदवारी दिली होती. वसंतराव शिवसेनेत सक्रीय असले तरी तालुक्यातील काँग्रेस आणि दलित विचाराच्या मतदाराची मते मिळविण्यासाठी त्यांनी शिवसेनेच्या अधिकृत चिन्हावर निवडणूक लढवू नये. असा राजकीय मातब्बरांनी सल्ला दिला होता. स्थानिक राजकीय परिस्थिती, मतदार संघातील साखर उद्योग, जिल्हा बँकेचे वर्चस्व, त्यामधून मतदारांवर टाकला

जाणारा दबाव या सर्व परिस्थितीची माहिती त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना दिली. तेव्हा पंढरपूर विधानसभा मतदारसंघामध्ये वसंतरावांना शिवसेना पुरस्कृत अपक्ष लढण्यासाठी परवानगी देण्यात आली. शिवसेनेच्या राजकारणात राज्यात पुरस्कृत उमेदवारीची पहिली नोंद वसंतरावांच्या रूपाने झाली. या निवडणुकीत त्यांना ६८,१९६ मते मिळाली व त्यांचा सुधाकर परिचारक यांच्याकडून १५,३६३ इतक्या मतांनी पराभव झाला.मात्र कुटील राजकारणामुळे त्यांचा १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला.[१०३]

सन २००० रोजी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाली. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्याऐतिहासिक निवडणुकीत वसंतराव काळे यांच्या पॅनेलच्या सर्वच्या सर्व २० उमेदवारांना तीन हजार मतांच्या फरकाने विजयश्री मिळाली होती. या निवडणुकीने जिल्ह्याच्या राजकारणात दबदबा निर्माण करून गेली तीन तपाहून अधिक काळ पंढरपूर तालुक्याच्या राजकारणावर हुकमत गाजविणाऱ्या एका युगाचा अंत(औंदुबरअण्णा पाटील) झाला आणि वसंतरावांच्या रूपाने नव्या युगाचा पंढरपूर तालुक्याच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला. २३ मार्च २००० रोजी त्यांची विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून वसंतराव काळे यांची निवड झाली.[१०४]

सहकाराच्या माध्यमातून त्यांनी पंढरपूर तालुक्याच्या सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आणि सहकाराचा आधार घेत पंढरपूर तालुक्याच्या काही भागात आपले राजकीय वर्चस्व निर्माण केले. या वर्चस्वातूनच अनेक विधायक गोष्टीची सुरूवात पंढरपूर तालुक्यामध्ये झाली. त्यांच्या कार्याचे फळ म्हणून त्यांना सन १९८९ चा शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्कार मिळाला. सन २००० ला  तालुक्यातील जनतेच्या वतीने सहकार शिरोमणी ही पदवी दिली गेली.[१०५]

एकंदरीत पंढरपूर तालुक्याच्या सहकारी चळवळीला त्यांनी दिलेल्या योगदानामुळे तालुक्यात अनेक सहकारी संस्थांची स्थापना झाली. या सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यानी अनेक शैक्षणिक संस्थांचीही स्थापना केली. परिणामी पंढरपूर तालुक्याचा विविधांगी विकास करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

### ➢ यशवंतराव गोपाळराव पाटील –

सहकार चळवळीला केंद्रस्थानी मानून व समाजवादी विचारांच्या प्रभावातून अविरत वाटचाल करणारा नेता म्हणून यशवंतभाऊ पाटील यांच्याकडे पाहिले जाते. जवळपास ८४ वर्षे त्यांनी सार्वजनिक क्षेत्रातील कामासाठी खर्ची घातली. यशवंतभाऊ पाटील यांचा जन्म १२ एप्रिल १९३३ रोजी पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गोपाळराव पाटील व आईचे नाव इंदिराबाई पाटील होते. वडिलांचा व्यवसाय शेती हा होता. शेती कोरडवाहू असल्याने घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. पाटील कुटुंबात संस्काराची गर्भश्रीमंती होती. यशवंतभाऊ पाटील यांनी मॅट्रीकपर्यतचे शिक्षण मोडनिंब येथील उमा विद्यालयात सायकलवरून प्रवास करून पूर्ण केले. पुढे शिकण्याची आवड असून देखील त्यांना शिक्षण घेता आले नाही. यशवंतभाऊ पाटील यांना वडिलांकडून समाजसेवेचे बाळकडू मिळाले. मॅट्रिक झाल्यावर त्यांना पुढे वयाच्या १८ व्या वर्षी समाजाच्या शाळेत दाखल व्हावे लागले.[१०६]

**सामाजिक कार्य**

यशवंतभाऊ पाटील यांना घरातून सामाजिक कार्याचे धडे मिळत होते. शिक्षण घेत असताना ते गावातील  सामान्यांना मदत करत असत. याच दरम्यान ते यशवंतराव चव्हाण व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराने प्रेरित केले. त्यांच्यातील कमालीची नम्रता, थोरांचा आदर, जिद्द, प्रामाणिकपणा आणि गरिबांविषयी तळमळ या गुणामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व ओसंडून वाहत होते.[१०७]

**राजकीय कार्य :**

यशवंतभाऊ पाटील यांचा मूळ पिंड हा समाजकारणाचा होता. त्यांना समाजकारणाची जास्त आवड होती. इ.स.१९६० च्या दशकातील राजकारण सरळमार्गी विचाराने विचाराशी लढणारे होते. अशावेळी प्रचार हा एका विशिष्ट दर्जानेच होता होता. अशा काळात ते सन १९५७ ला जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून निवडून आले. ते या पदावर सन १९६२ पर्यत कार्यरत होते. घरातून त्यांना सामाजिक कार्याचा वारसा मिळाला होता. त्या सामाजिक कार्याचे फलित म्हणून १९६२ साली ते भोसे गावचे सरपंच झाले. सरपंच पदाची धुरा त्यांनी इ.स.१९७१ पर्यत सांभाळली. गावचा विकास करून घेतला. या कार्याची धुरा सांभाळत असतानाच त्यांची नियुक्ती वि.का.स.सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून झाली. यामुळे

सामाजिक कामाचा फायदा त्यांना सार्वजनिक जीवनातील उत्साह वाढवण्यास निश्चितच झाला.[१०८]

यशवंतभाऊ पाटील यांच्यावर सहकार मत्री शंकरराव मोहिते पाटील, नामदेवराव जगताप, बाबुराव (आण्णा) पाटील या जिल्ह्यातील दिग्गज व्यक्तिचा प्रभाव होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरदचंद्रजी पवार यांनी यशवंतभाऊ पाटील यांच्या संघटन कौशल्याचा उपयोग त्यांच्यावर पक्षाच्या जिल्हा नेतृत्त्वाची जबाबदारी टाकून केला. सन १९६२ ते १९६७ या कालावधीत त्यांनी पंढरपूर तालुका पंचायत समितीचे सभापती म्हणून भूमिका पार पाडली. या काळात तालुक्याचे योग्य पद्धतीने संघटन केले होते. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून पुन्हा त्यांना सन १९९२ ते ९९ या काळात पंढरपूर पंचायत समितीचे सभापती म्हणून धुरा सांभाळण्यास दिली.[१०९]

शरदचंद्रजी पवार यांनी त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी व्यवस्थित सांभाळली. तालुक्याची घडी नीट बसल्यावर यशवंतभाऊ पाटील यांना जनतेने सन १९७९ ला जिल्हा परिषदेवर अध्यक्ष म्हणून निवडून दिले.दिलेली जबाबदारी त्यांनी व्यवस्थित सांभाळली होती. कार्याचा व्याप वाढत असतानाही त्यांना विठ्ठल कारखान्याचे संस्थापक, व्हाईस चेअरमन पद देण्यात आले. त्यांच्या कार्याचा आलेख वरती चढत गेला. यशवंतभाऊ पाटील यांच्या सामाजिक बांधिलकीमुळे त्यांना आपल्या कार्यात यश मिळत गेले. सन २००५ साली यशवंतभाऊ पाटील यांच्यावर रयत शिक्षण संस्थेने विभागीय चेअरमनपदाची धुरा सोपविली.[११०]

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात भाऊंचा दबदबा निर्माण झाला. यशवंतभाऊ पाटील हे जिल्हापरिषदेचे अध्यक्ष झाल्यावर पंढरपूर तालुक्याच्या कृषि औद्योगिक क्रांतीची मुहुर्तमेढ श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निमित्ताने रोवली. त्यांनी तालुक्यातील जनतेचा विश्वास संपादन केला. लोकसभेची निवडणूक हरल्यावर भाऊंनी लक्ष्मणराव ढोबळे यांना चुनाभट्टीचा लघुद्योग स्वतः बँकेस जामीन राहून उभारुन दिला. यशवंतभाऊ पाटील सभापती असताना सुधाकरपंत परिचारक यांना उपसभापती व जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी संधी देऊन तालुक्याच्या राजकारणाच्या मुख्य प्रवाहाता आणले. विठ्ठल कारखान्याच्या स्थापनेकामी यशवंतभाऊ पाटील यांचेही योगदान मोठे आहे. त्यानी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे

अधिक लक्ष दिले आणि शेतकऱ्याच्या पाण्यापासून ते रस्त्यापर्यंतच्या अनेक समस्या सोडविल्या.[१११]

## ➢ प्रकाश बापूराव पाटील –

पंढरपूर तालुक्याच्या सहकार चळवळीमध्ये प्रकाश पाटील यांचे मोठे योगदान आहे. त्यांचा जन्म पंढरपुर तालुक्यातील तुंगत या गावी १३ जुलै १९५५ रोजी झाला. त्यांनी बी.ए.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रथमत: गावातील वि.का.स.सेवा सोसायटीच्या माध्यमातून व जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी, शेतीसाठी, व्यवसायासाठी त्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी सर्वोतपरी मदत केली. पुढे तालुक्यातील विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.[११२]

### सहकारातील कार्य

पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास मान्यता मिळविताना चेअरमन म्हणून तात्यासाहेब डिंगरे तर संचालक म्हणून प्रकाश पाटील यांची निवड करण्यात आली होती. आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्या नेतृत्त्वाखाली भीमा सहकारी साखर कारखान्यामध्ये संचालक म्हणूनत्यांनी काम केले आहे. इ.स.२००५ ते २०१० या काळात त्यांनी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून कार्य केले. पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांना पुरेसे कर्ज मिळत नसे अडीअडचणीच्या प्रसंगी हे लोक व्यापाऱ्यांकडून उचल घेत किंवा खाजगी सावकारांकडून पैसे घेत असत. यावर पर्याय म्हणून त्यांनी कर्मयोगी सु.रा.परिचारक या पतसंस्थेची दि.२८ ऑगस्ट१९८९ रोजी स्थापना केली. या पतसंस्थेचा जन्म लोकांच्या गरजेतून झाला.सध्या ही संस्था पंढरपूर तालुक्यातील इतर पतसंस्था किंवा बँकापेक्षा ठेवीवरती सर्वात जास्त व्याजदर देते तसेच या संस्थेचा व्याजदरही इतर बँकांपेक्षा १ ते २ टक्क्यांनी जास्त आहे. या पतसंस्थेच्या माध्यमातून त्यांनी वैयक्तिक सहकाराला सुरूवात केली.[११३]

### राजकीय कार्य

सन १९७८ पासून प्रकाश पाटील हे पंढरपूर तालुका युवक काँग्रेस (आय) चे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. पक्षातर्फे लढविलेल्या विविध निवडणुकांमध्ये त्यांनी सक्रीय सहभाग

घेतला. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये कॉग्रेस पक्षाचे खासदार संदिपान थोरात, आमदार तात्यासाहेब डिंगरे व सुधारकपंत परिचारक यांनी लढविलेल्या निवडणुकांमध्ये सक्रीय सहभाग घेऊन पक्षास यश मिळवून देण्यात सिंहाचा वाटा युवक काँग्रेस पक्षाने (आय) ने घेतला याचे फळ म्हणून त्यांना सोलापूर जिल्ह्याचे युवक काँग्रेस (आय) चे उपाध्याक्ष पद मिळाले. सोलापूर जिल्हा परिषद सदस्य म्हणून ते इ.स.२०१२ मध्ये स्थायी कमिटीचे सदस्य झाले. स्थायी कमिटीमुळे पंढरपूर तालुक्यातील पंचायत समितीमध्ये अडीअडचणींचे आकलन करून जिल्हा परिषद मिटींगमध्ये मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. या काळात त्यांनी तुंगत गटातील नारायण चिंचोली, ईश्वर वाठार, बिटरगांव, देगाव, अंजनसोड, शेगांव दु. इत्यादी तुंगत गटातील गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या विविध योजना राबविल्या. तसेच तालुक्यातील इतर गावातही जि.प.च्या योजना राबविल्या श्रीयुत प्रकाश पाटील यांनी सन १९८० ते १९९१ या कालखंडात तुंगत गावचे सरपंच म्हणून यशस्वी कार्यभार सांभाळला. या काळात त्यांनी पाणीपुरवठयाचीसोय, डी.सी.सी.बँकेची शाखा, भूमिगत गटार योजना, रस्ते, क्रीडांगण इत्यादी बाबींची निर्मिती करून गावाचा विकास केला. सन १९८२ ते १९९३ पर्यंत अशासकीय सदस्य म्हणून संजय स्वावलंबन योजनेचे काम पाहिले आहे. या योजनेमार्फत तालुक्यातील अनेकांना शिवणयंत्रे, सायकल दुकान, हातगाडी, किराणा मालाचे दुकान, बारा बलुतेदार योजना तालुक्यात राबविली व संजय स्वावलंबन योजनेमार्फत त्यांना लाभ मिळवून दिला.[११४]

पंढरपूर तालुक्यामध्ये काँग्रेस (आय) पक्ष बळकट करण्यासाठी व सर्व तालुक्यातील कार्यकर्ते एकत्र येण्यासाठी २३ मार्च २००१ व २४ जून २००३ मध्ये पंढरपूर तालुका कार्यकर्ता व शहर काँग्रेस (आय) कमिटी कार्यकर्ता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच २४ सप्टेंबर २००६ रोजी त्यांनी उज्वलाताई शिंदे यांचे अध्यक्षतेखाली पंढरपूर तालुक्यातील कार्यकर्ते एकत्र येण्यासाठी सर्व आजी माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्री संत तनपुरे महाराज मठामध्ये भव्य कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करून सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. २६ जुलै २००८ रोजी त्यांनी भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील व केंद्रीय ऊर्जामंत्री यांच्या उपस्थितीत काँग्रेस (आय) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेण्यात आला होता. त्यांच्या नेतृत्त्वाखाली सन २००७ मध्ये तुंगत येथील ग्रामपंचायत स्वबळावर निवडून आणून

तालुक्यामध्ये एक प्रकारचा आदर्श निर्माण केला. व तुंगत गावातील लोकांच्या अडी अडचणी सोडवून गावकऱ्यांचे हित जोपासले.[११५]

### सामाजिक कार्य

श्रीयुत प्रकाश पाटील हे लायन्स क्लब पंढरपूरचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. या संस्थेमार्फत त्यांनी आजपर्यंत तीन वेळा तुंगत या गावी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते या शिबिरांचा लाभ तालुक्यातील अनेकांना झालेला आहे. सन २००४ व २००६ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे भिमा नदीने रौद्र रूप धारण करून पंढरपूर शहरास पुराने वेढा दिला त्यामुळे नदीकाठी असलेल्या नागरिकांना राहण्यासाठी घर, पिण्यासाठी पाणी व पोटासाठी अन्न मिळवणे यासाठी भटकंती करावी लागत होती त्यावेळी सुमारे १०,०००, लोकांना अन्न व पिण्याचे स्वच्छ पाणी यांचे त्यांच्या घरोघरी जाऊन पुरवठा केला व ज्यांची घरे पूर्णपणे पाण्यामध्ये गेली अशा पूरग्रस्त लोकांना सामाजिक मठामध्ये आश्रय दिला. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपन मोहीम, स्मृतिदिन मेळावे, सहकार सप्ताह इत्यादी मार्फत त्यांनी निरनिराळ्या योजना कार्यान्वित करण्याचे काम केलेले आहे. शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय करता यावा म्हणून त्यांनी राजरत्न कुक्कुटपालन संघाची निर्मिती केली आहे. पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर व भीमा सहकारी तसेच विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि.गुरसाळे या कारखान्यांत संचालक म्हणून काम करीत असताना कारखान्यांचे माध्यमातून वेळोवेळी लोकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये रस्ते दुरूस्ती करणे, वेळेवरती ऊस नेणे, ऊसासंबंधी येणाऱ्या अडचणी सोडविणे, दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चारा पाण्याची सोय करणे, अनेकांना शिक्षणासाठी मदत करणे, दवाखान्यासाठी मदत करणे इत्यादी सामाजिक कामे केली आहेत.[११६]

### भूषविलेली पदे

प्रकाश पाटील यांनी आजपर्यत अनेक पदांवरती काम केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पंढरपूर तालुका काँग्रेस (आय) कमिटीचे अध्यक्ष, युवक काँग्रेस (आय) उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच, कर्मयोगी सु.रा.परिचारक ग्रा.बि.शेती सह. पतसंस्था मर्या.तुंगत ता. पंढरपूर संस्थापक चेअरमन, सोलापूर डिस्ट्रीक्ट क्रेडीट ॲण्ड सॅलरी अर्नेस को ऑप.सोसायटी फेडरेशन लि. सोलापूर, संचालक भीमा सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर,

श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. गुरसाळे ता. पंढरपूर या कारखान्यांचे संचालक म्हणून त्यांनी कार्य केले. राजरत्न कुक्कुटपालन संघाचे चेअरमन, भीमा पाटबंधारे विभागसदस्य, लायन्स क्लब, पंढरपूर सदस्य इत्यादी ठिकाणी त्यांनी वेगवेगळया पदांवरती काम केलेले आहे.[११७]

अशा प्रकारे विविध सहकरी संस्थांच्या माध्यमातून आणि काँग्रेस (आय) पक्षाच्या माध्यमातून श्रीयुत प्रकाश पाटील यांनी पंढरपूर तालुक्याच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात आपले मोठे योगदान दिलेले आहे. विविध राजकीय संस्था, सहकारी संस्था शासकीय व अशासकीय संस्था, सेवाभावी संस्था या संस्थामध्ये विविध पदांवरती काम करताना त्यांनी पंढरपूर तालुक्याच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

## ➢ प्रशांत प्रभाकर परिचारक –

पंढरपूर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील कर्तृत्ववान नेतृत्त्व म्हणून प्रशांत प्रभाकर परिचारक यांना ओळखले जाते. सहकार, शिक्षण, समाजकारण व राजकारण अशा विविधांगी क्षेत्रात त्यांनी आपला दैदिप्यमान ठसा उमटविला आहे. त्यांचा जन्म १९ ऑगस्ट १९६५ रोजी झाला. आमदार सुधाकरपंत परिचारक हे त्यांचे काका होत. आपल्या काकांकडूनच त्यांना राजकीय व सहकार क्षेत्राचा संपन्न वारसा लाभला. सामाजिक क्षेत्रातील जनसेवेची प्रेरणा मिळाली त्यांच्या प्रोत्साहनामुळे श्री.प्रशांत परिचारकांचे व्यक्तिमत्त्व नुसते आकारले नाही तर ते एक अनुभवी, जिल्ह्यातील व पंढरपूर तालुक्यातील शैक्षणिक, सहकार व सामाजिक क्षेत्रातील मानबिंदू ठरले आहेत.

### राजकीय व सहकार क्षेत्रातील कार्य –

इ.स.१९८३ पासून त्यांनी आपल्या राजकीय कार्याला सुरूवात केली. नॅशनल स्टुडंट युनियन ऑफ इंडिया (NSUI)चेते १९८३–८४ साली अध्यक्ष झाले. इ.स.१९८६ ते १९९० पर्यंतच्या काळात पंढरपूर तालुका युवक कॉग्रेसचे अध्यक्ष इ.स.१९८६ ते १९९० या काळात सोलापूर जिल्हा युवक कॉग्रेसचे उपाध्यक्ष, १९९० साली खर्डी ता.पंढरपूर या गावचे सरपंच, १९९९ ते २०१४ या काळात राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे प्रांतिक सदस्य, इ.स.१९९३ पासून पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूरचे संचालक, इ.स.१९९९ पासून सोलापूर जिल्हा दूध उत्पादक व प्रक्रिया संघ सोलापूर चे संचालक, इ.स.२००४ ते २०१६ या कालखंडात

सोलापूर जिल्हा दूध उत्पादक व प्रक्रिया संघाचे अध्यक्ष, इ.स.२००२ ते २०१५ या काळात सोलापूर जिल्हा बँक असोसिएशन सोलापूरचे संचालक, इ.स.२००३ ते २००८ या काळात महाराष्ट्र राज्य अर्बन को–ऑप बँक फेडरेशन लि.मुंबई चे उपाध्यक्ष, इ.स.२००८ पासून सोलापूर जिल्हा बॉक्सिंग असोसिएनचे अध्यक्ष इ.स.२०१० ते २०११ या कालखंडात दि पंढरपूर अर्बन को–ऑप बँक लि.पंढरपूर चे चेअरमन, इ.स.२०१५ पासून सोलापूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक लि.सोलापूरचे संचालक तर ३० डिसेंबर २०१५ पासून भाजपा–शिवसेना व मित्रपक्ष पुरस्कृत अपक्ष उमेदवार म्हणून विधानपरिषदेवर प्रचंड मताधिक्याने ते विजयी झाले. या राजकीय कार्याबरोबर अखिल भारतीय कृषि व पशु संशोधन मंडळ (NIANP) कृषि मंत्रालय, भारत सरकार या राष्ट्रीय कमिटीवर अशासकीय सदस्य म्हणून इ.स. २००९ ते २०११ या कालखंडात निवड झाली. इ.स.२०१० पासून महाराष्ट्र राज्य नगरविकास निगमच्या अभ्यास कमिटीवर अशासकीय सदस्य म्हणून निवड, इ.स. २०१० ते २०१३ या काळात नॅशनल डेअरी रिसर्च इन्टिटयूट  कर्नाल, हरियानाचे सदस्य, तसेच शैक्षणिक क्षेत्रात पांडुरंग प्रतिष्ठान मार्फत कर्मयोगी पॉलिटेक्निक व इंजिनियरींग कॉलेज शेळवे ता.पंढरपूर व उमा महाविद्यालय, पंढरपुरचे ते मार्गदर्शक व विश्वस्त आहेत तसेच पंढरपूर तालुका पंचायत समिती, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद सोलापूर, पंढरपूर नगरपरिषद, मंगळवेढा नगरपरिषद इत्यादीचे ते मार्गदर्शक आहेत. युटोपियन शुर्गस, मंगळवेढा या साखर कारखान्याची त्यांनी स्थापना केली आहे.[११८]

**दि पंढरपूर अर्बन को.ऑप.बँक लि.पंढरपूर चे चेअरमन म्हणून कार्य –**

इ.स.२००१ च्या सुमारास बँक व्यवस्थापनात एक मोठा बदल झाला. श्रीमंत सुधाकरपंताना राज्याच्या व जिल्ह्याच्या राजकारणात अनेक मोठया जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत असल्याने बँकेच्या कारभारात लक्ष देणे अवघड होऊ लागले म्हणून त्यांनी बँकेची धुरा प्रशांत परिचारकांच्या हाती सोपवली. इ.स.१९९० ते २००० या काळात देशात व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात ज्या अनेक आर्थिक घडामोडी झाल्या त्या साऱ्यांचा जबरदस्त परिणाम देशाच्या सकल बँकिंग क्षेत्रावर झाला होता. मात्र या अडचणीच्या काळातही त्यांनी बँकेची मोठी प्रगती केली. त्यांच्या कालखंडात ०८ फेब्रुवारी २०१३ रोजी पंढरपूर येथे बँकेची नवीन शाखा स्थापन झाली. ३१ऑक्टोबर २०१० रोजी बँकेची कोथरूड, पुणे येथे बँकेची १३वी शाखा स्थापन केली. १८

ऑक्टोबर २०१० रोजी लातूर येथे १४वी शाखा स्थापन केली, दि.११नोव्हेंबर २०१२ रोजी १५वी शाखा बारामती येथे स्थापन केली. प्रशांत परिचारक यांच्या कालखंडात बँकेने मोठी प्रगती केली आहे.[११९]

**सामाजिक कार्य –**

श्री.प्रशांत परिचारक यांनी जिल्हा दूध संघ, सहकारी साखर कारखाने, दि.पंढरपूर अर्बन को.ऑप.बँक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,कृषि उत्पन्न बाजार समिती पंढरपूर या सहकारी संस्थांमार्फत अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला. सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्बल नागरिकांसाठी तालुका पातळीवर व ग्रामीण भागामध्ये अनेक नागरी सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सेवा सोसायटया, दूध सोसायटया स्थापन करण्यात प्रशांत परिचारक यांचा सिंहाचा वाटा आहे. मूकबधीर व अंधासाठी शाळांची स्थापना करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. अपंगत्व व शस्त्रक्रिया, शिबिर कर्करोग, रोगनिदान, नेत्रदान, रक्तदान अशा विविध राष्ट्रीय एकात्मतेसाठी मोफत शिबिरांचे नेहमीच आयोजन करण्यात ते नेहमी सक्रीय असतात. पुरग्रस्तांसाठी अन्नधान्य, आर्थिक मदत तसेच दुष्काळग्रस्त भागांना पाण्याच्या टाक्या, टँकरद्वारे पाणीवाटप, गारपीठ ग्रस्ताना नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले तसेच पंढरपूर तालुक्यातील महिला सक्षमीकरणासाठी बँकेमार्फत महिला बचत गटांना कर्जपुरवठा उपलब्ध करून दिला. तसेच अनेकांना शैक्षणिक कार्यासाठी मदत केली. अनेकांना दवाखान्यासाठी, अडीअडचणीच्या प्रसंगी आर्थिक मदत केली, दुष्काळाच्या प्रसंगी चारा छावण्या सुरू करण्यासाठी वेळोवेळी मदत केली. तसेच विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी त्यांना वेगवेगळया प्रकारची मदत केली व तालुक्यात सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयांचे आयोजन करण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे.[१२०]

## ➢ कल्याणराव वसंतराव काळे –

विठ्ठल परिवाराचे नेते, म्हणून पंढरपूर तालुक्यातील जनतेला कल्याणराव काळे यांची ओळख आहे. त्यांचा जन्म पंढरपूर तालुक्यातील वाडीकुरोली येथे ४ सप्टेंबर १९७२ रोजी झाला. त्यांच्या वडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी चांगली सोय केली होती मुलांच्या शिक्षणासाठी त्यांचे वडील वसंतराव काळे हे पंढरपूर येथे येऊन राहिले. कल्याणरावांनी दहावीपर्यंत शिक्षण

घेतले वसंतरावांचा राजकारणातील वाढता वावर यामुळे त्यांना शेतीकडे लक्ष देता येत नव्हते. म्हणून कल्याणरावांनी दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर शेतीची जबाबदारी सांभाळण्यास सुरूवात केली. नगदी पिकांच्या विक्रिच्या निमित्ताने त्यांना बाजारपेठेची चांगलीच ओळख झाली. सुधारित शेतीचा वडिलांचा वारसा व स्वतः कृतिशील शेतकरी असल्यामुळे स्वतःच्या शेतीमध्ये आधुनिक पद्धतीने वेगवेगळी बागायती पिके घेऊन त्यांनी तालुक्यात एक प्रकारचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा विवाह माळशिरस तालुक्यातील वाघोली येथील नामदेव माने शेंडगे यांची मुलगी संगिता हिच्याशी १६ फेब्रुवारी १९९७ रोजी झाला.[१२१]

**सहकार चळवळीला लाभलेले योगदान**

सहकार शिरोमणी वसंतराव काळे यांनी पंढरपूर तालुक्यात विविध सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, शेतीमाल प्रक्रिया संस्था तसेच व्यायामशाळा इत्यादी संस्थाची स्थापना केलेली असून त्या संस्थांच्या कार्याची धुरा वाहण्याचे काम अध्यक्ष, संचालक, सभासद व मार्गदर्शक या विविध पदांच्या माध्यमातून कल्याणराव काळे अत्यंत कार्यक्षमतेने कार्यवाही करीत आहेत. सहकार हा अर्थकारणाचा, समाजकारणाचा व राजकारणाचा पाया आहे. त्याचबरोबर समाजसुधारणेला सहकाराची खूप मोठी मदत होते. सहकाराच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तिंच्या व्यक्तिमत्त्वावर व दृष्टिकोनावर सहकाराचे फलित अवलंबून असते. सहाकाराचा प्रभाव समाजकारणावर पडत असतो. कल्याणराव काळे यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून अनेक कामे केली या संस्थांच्या माध्यमातूनच समाजाचा आर्थिक विकास आणि सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सन २००० पासून ते आजतागत सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून काम करीत आहेत.[१२२]

पंढरपूर तालुक्यातील यशवंत गृहनिर्माण सहकारी संस्थेचे चेअरमन म्हणून त्यांनी चांगली कामगिरी केली आहे. याच कालावधीत निशिगंधा सहकारी बँक लि.पंढरपूर या बँकेचे चेअरमन पदही त्यांनी सांभाळले पंढरपूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये सेवासंस्था, पतसंस्था, दूधडेअरी आणि सहकारी साखर कारखान्याचे संचालक पदही त्यांनी भूषविले. वाडीकुरोली येथील विविध कार्यकारी सेवा सह.संस्था, तसेच श्रीराम दूध व्यवसाय सह.संस्था या संस्थाचे संचालक म्हणूनही ते कार्यरत आहेत. एकंदरीत पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीच्या विकासात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.[१२३]

**राजकीय कार्य –**

विठ्ठल परिवारातच कल्याणरावानी राजकारणाचे धडे गिरविले होते. त्यांच्या राजकारणाची सुरूवात ही सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदापासून झाली. सन २००० पासून ते आजतागायत बँकेच्या चेअरमनपदाची यशस्वी धुरा सांभाळत आहेत. महाराष्ट्र राज्य सह.साखर कारखाना संघ लि. मुंबई याचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काही काळ काम पाहिले आहे. याशिवाय सोलापूर जिल्हा काँग्रेस (आय) कमिटीचे उपाध्यक्ष, सोलापूर जिल्हा परिषद सदस्य, वाडीकुरोली ग्रामपंचायत सदस्य, श्री.गणेश फलोत्पादक सह.संघ याही संस्थाचे ते सदस्य आहेत. पंढरपूर तालुक्यातील राजकीय कार्याच्या माध्यमातून त्यांनी सहकार चळवळीवर आपला ठसा उमटविला आहे.[१२४]

**शैक्षणिक कार्य –**

शिक्षणआणि सहकाराशिवाय सर्वसामान्य लोकांचा उद्धार होणार नाही अशी शिकवण कल्याणराव काळे यांना त्यांच्या वडिलांपासूनच मिळाली होती. त्यामुळे पंढरपूर तालुक्याची शैक्षणिक प्रगती करण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. ते सध्या श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ, वाडीकुरोली या संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत. या संस्थेने पंढरपूर तालुक्यात अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना केलेली आहे. त्यामध्ये वाडीकुरोली माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, भैरवनाथ माध्यमिक विद्यालय,आढीव, श्रीमंतराव काळे माध्यमिक प्रशाला, जैनवाडी, मॉर्डन हायस्कूल, पिराचीकुरोली, चंद्रभागा शिक्षण प्रसारक मंडळामार्फत त्यांनी वसंतराव काळे विद्या मंदिर या शाळेची इ.स.२००५ मध्ये स्थापना केली. तसेच वसंतराव काळे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, धोंडेवाडी, वसंतराव काळे अध्यापक विद्यालय, धोंडेवाडी या संस्थांची त्यांनी स्थापना केली या संस्थांमार्फत ग्रामीण भागातील बहुजनांच्या मुला–मुलींची शैक्षणिक सोय झालेली आहे. तसेच ग्रामीण भागातील मुलांच्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची सोय करून त्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. परिणामी ग्रामीण भागातील युवकांना काही प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत.[१२५]

**सामाजिक कार्य –**

कल्याणराव काळे यांनी आपल्या जन्मगावी केंद्र शासनाची निर्मल ग्राम पुरस्कार योजनेची अंमलबजावणी करून गावामध्ये जलस्वराज्य तसेच हागणदारीमुक्त गांव यासारख्या

योजना राबवून ग्रामीण विकासाची संकल्पना पूर्ण केली असून, गावास केंद्र शासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार मिळविण्यात यश संपादन केलेले आहे.[१२६] सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक वसंतराव काळे यांचे गाव म्हणून संपूर्ण पंढरपूर तालुक्यात आपली वेगळी ओळख जपणारे वाडीकुरोली हे गाव गेल्या चाळीस वर्षापासून तंटामुक्त गांव असून, आजतागायत परंपरा जोपासण्यात आली आहे या गावाचा उल्लेख एकमुखी व एकसंघ गांव म्हणून केला जातो १९६५ साली वसंतराव काळे सरपंच झाल्यापासून गावातील एकही माणूस पोलिस स्टेशन अथवा कोर्टात दिसत नसायचा तसाच वसा त्यांचे सुपुत्र कल्याणराव काळे यांनी घेतला आहे सध्या त्यांच्याच नेतृत्त्वाखाली गाव एकोप्याने काम करीत आहे.[१२७]

सोलापूर जिल्हा हा कायमस्वरूपी दुष्काळसदृश्य परिस्थितीत असल्यामुळे खेडोपाडी पिकाच्या पाण्याची परिस्थिती अडचणीची होत असल्यामुळे चंद्रभागा नदीत, त्याचप्रमाणे कॅनॉलमधून पाणी सोडण्यासाठी तसेच नदीतील पाणीवापर पिकासाठी होऊ नये म्हणून शासनाने जप्त केलेली इलेक्ट्रीक उपकरणे व इतर साधने शेतकऱ्यांना परत करावीत म्हणून तसेच काम नसलेल्या कामगारांना रोजगार हमीची कामे मिळावीत म्हणून कल्याणराव काळे यांनी सतत रास्ता रोको, आंदोलने अत्यंत शांत व सनदशीर मार्गाने करून सर्वसामान्य शेतकऱ्यांचा व कामगारांचा कैवारी म्हणून सदरची माहिती शासन दरबारी पोहोच करण्याची जबाबदारी त्यांनी अनेकवेळा पार पाडली.[१२८]

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून गोर–गरीब जनतेला तातडीची व अल्पदरात वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून वसंतदादा मेडीकल फौंडेशन व जनकल्याण युवा मंच यांच्या वतीने पंढरपूर येथे सर्व सोयीनेयुक्त अद्यावत जनकल्याण हॉस्पिटलची स्थापना करून परिसरातील गोरगरीब रूग्णांना सवलतीच्या दरात रूग्णसेवा देण्यात येत आहेत. हॉस्पिटलच्या माध्यमातून माफक दरात रूग्ण वाहिका सेवा उपलब्ध करून दिली आहे. तसेच कल्याणराव काळे यांनी स्वत:ही दवाखान्यासाठी, शिक्षणासाठी, मुलीच्या विवाहासाठी आर्थिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तिंना आर्थिक मदतीचा हात दिलेला आहे. तालुक्यात सामुदायिक विवाह सोहळयांचे आयोजन करण्यात आले आहे. दुष्काळाच्या वेळी चारा छावणी सुरू करण्यासाठी त्यांनी

वेळोवेळी शासनदरबारी प्रयत्न केले. तसेच त्यांच्या ताब्यात असणाऱ्या सहकारी संस्थांच्या माध्यमातूनही दुष्काळाच्या वेळी जनतेला मदत केली आहे.[१२९]

**कल्याणराव काळे यांना मिळालेले पुरस्कार –**

श्री.कल्याणराव काळे यांना नवी दिल्ली येथे दि.१८ नोव्हेंबर २००७ रोजी नॅशनल स्टेटस अॅवार्ड फॉर इंडस्ट्री, एक्सलन्स – २००६ चा पुरस्कार इकॉनॉमिक ग्रोथ सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने दिल्ली कॉंग्रेस कमिटीचे सदस्य श्री.अनिस दुराणी, खासदार श्री.अंबानी रॉय व संस्थेचे अध्यक्ष श्री.जोगिंदरसिंग यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.[१३०]

एकंदरीत कल्याणराव काळे यांनी पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला दिलेल्या योगदानामुळे तालुक्याचा राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होण्यास मदत झाली आहे त्यांनी विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून विविध गावांमध्ये शेतकऱ्यांचे मेळावे आयोजित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलेले आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या माध्यमातून ब्राझील व इंग्लंड दौरा करून तेथील आधुनिक शेती व तंत्रज्ञानाचा अभ्यास करून आपले येथील शेती व साखर उद्योगाच्या प्रगतीस चालना देण्यास ते सतत प्रयत्नशील असतात. युवा शक्तीस व पौराणिक काळापासून चालत आलेल्या कुस्ती खेळास प्रेरणा मिळावी म्हणून प्रत्येक वर्षी वसंतराव काळे यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी कारखाना कार्यस्थळावर वसंत केसरी कुस्ती स्पर्धांचे आयोजन करतात. यामधून युवा शक्ती खेळाकडे आकर्षित होताना दिसून येत आहे. तसेच सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून त्यांनी तालुक्यात विविध योजना राबविल्या आहेत. एकंदरीत पंढरपूर तालुक्याच्या विकासात त्यांचे मोठे योगदान आहे.

## ➢ तात्यासाहेब रंगनाथ पाटील –

पंढरपूर तालुक्याच्या उत्तरेकडील भागात सहकाराचा प्रसार करण्यामध्ये तात्यासाहेबांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांचा जन्म ०१ जून १९५५ रोजी पंढरपूर तालुक्यातील शेळवे या गावी झाला.त्यांचे शिक्षण इयत्ता पाचवीपर्यंत झाले. आर्थिक परिस्थिती हलाखिची असल्याने त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. त्यांचा व्यवसाय शेती हा असून त्यांनी शेतीमध्ये

आधुनिक तंत्रज्ञान वापरून व शेतीला पशुधनाची जोड देऊन किफायतशीर शेती करण्याचा प्रयत्न केला आहे.

तात्यासाहेबांची सुरूवातीची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. दुसऱ्याचा बैल जोडीला दिल्याशिवाय त्यांच्या शेतात औत चालत नव्हता. पैरा पद्धतीचा अवलंब केल्याशिवाय किंवा सहकाराशिवाय माणूस व्यवस्थीत जगू शकत नाही, याची अनुभूती त्यांना आली आपण दुसऱ्याला मदत केली व दुसऱ्याने आपल्याला मदत केली तरच आपले चालते याची खरी प्रेरणा त्यांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे आली. अशा कारणांमुळे सहकारी चळवळीमध्ये भाग घेण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. इ.स.१९८० पासून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. इ.स.१९८५मध्ये ते वि.का.सेवा सोसायटीचे चेअरमन झाले, एकूण १० वर्षे ते वि.का.सेवा सोसायटीचे चेअरमन होते आणि आजही ही संस्था त्यांच्या नेतृत्त्वाखाली चालविली जात आहे. मार्च १९९४ मध्ये त्यांनी श्रीराम पाणीवाटप सहकारी संस्था स्थापन केली. खऱ्या अर्थाने सहकारी तत्त्वावरील पाणी वाटप करणारी ही सोलापूर जिल्ह्यातील पहिली संस्था स्थापन झाली होती मात्र या संस्थेचे रजिस्ट्रेशन मात्र दुसऱ्या क्रमांकाने झाले. पहिल्या क्रमांकाचे रजिस्ट्रेशन शेवरे गावातील पाणी वाटप संस्थेचे झाले. इथे खऱ्या अर्थाने राजकारण झाले. कारण ही संस्था मोहिते-पाटील यांच्या कार्यकर्त्यांची होती. मात्र पहिले काम हे शेवते येथील पाणी वाटप संस्थेचे सुरू झाले होते. त्यांनी ३ डिसेंबर १९९८ मध्ये पांडुरंग बिगर शेती पतसंस्थेचीही स्थापना केलेली आहे. या संस्थेचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/ आरएसआर(आर) ११३९ असा आहे.[१३१]

शेवते ता. पंढरपूर येथील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत ते सलग तीन वेळा निवडून आले. ते पंढरपूर तालुका पंचायत समितीचे दोन वेळा सदस्य म्हणून निवडून आले खऱ्या अर्थाने भोसे गटातून त्यांना चार वेळा अप्रत्यक्षरित्या नेतृत्त्व करण्याची संधी मिळाली. त्यांच्याच सांगण्यावरून यशवंतभाऊनी ज्यावेळी ओ.बी.सी. साठी आरक्षण होते तेव्हा बाळासाहेब माळी यांना तिकीट देण्यात आले तर ज्यावेळी महिला खुला प्रवर्ग यासाठी आरक्षण होते त्यावेळी सौ.कोळवले यांना तिकीट देण्यात आले. या चारही वेळा त्यांच्या गटाचा उमेदवार पंचायत समितीच्या निवडणुकीत विजयी झाला.[१३२]

त्यांच्या ताब्यातील वि.का. सेवा सोसायटीने शेतकऱ्यांना योग्य दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी खत विक्रीचे सहकारी दुकान काढले, सहकारी संस्थेचे सभासद करून घेणे, त्यांना कर्जपुरवठा करणे, तळागाळातील लोकांच्यासाठी कार्य करणे, बेरोजगारांना काम मिळवून देणे, दूध संकलन करणे, विक्री करणे, दूध व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना रोजगार मिळवून देणे, शेतकऱ्यांना व छोटया उदयोजकांना सहकारची माहिती करून देणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे ही त्यांच्या संस्थांची प्रमुख उद्दिष्टे आहेत.[१३३]

तात्यासाहेबांनी स्थापन केलेल्या विविध सहकारी संस्थांमुळे व्यक्तीचा, गावाचा वतालुक्याचा विकास झालेला आहे. दुर्बल घटकांना या सहकारी चळवळीचा मोठया प्रमाणात लाभ मिळाला नाही मात्र ग्रामपंचायतीच्या माध्यमातून त्यांना मदत केलेली आहे. तात्यासाहेबांवर यशवंतभाऊ पाटील यांचा मोठा प्रभाव होता. यशवंतभाऊ हे अध्यात्मिक दृष्टया संताच्या शिकवणुकीप्रमाणे सात्विक विचाराने काम करीत दुसऱ्यांची सेवा करण्यात ते नेहमी धन्यता मानत. राजकारणात व सहकारी चळवळीत काम करीत असताना यशवंतभाऊंच्या मार्गदर्शनानुसारच त्यांनी काम केले यशवंतभाऊ व तात्यासाहेबांना फार मोठया सत्तेत जाता आले नाही मात्र मोठे विचार त्यांनी आत्मसात केले.

राजकारणात व सहकारी चळवळीत काम करीत असताना सामाजिक बांधिलकी मानून त्यांनी दुर्बल घटकांसाठी, दलितांसाठी मोठे कार्य केले. पंचायत समितीच्या माध्यमातून यशवंतभाऊ पंचायत समितीचे सभापती असताना तालुक्यातील इतर गावांपेक्षा शेवते गावाला मोठे लाभ मिळवून दिले. अनेकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. गरजूंना घरकुले मिळवून दिली, शेतकऱ्यांना विहिरीसाठी, पाईपलाईनसाठी, खते व बि–बियाणांसाठी, शेतीच्या अवजारांसाठी मोठी मदत केली तसेच शेवते गावातील व तालुक्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली याशिवाय दवाखान्यासाठी, मुलींच्या लग्नासाठी नेहमीच त्यांनी वेळोवेळी आर्थिक मदतही केली आहे.[१३४]

एकंदरीत तात्यासाहेब पाटील यांनी पंढरपूर तालुक्याच्या उत्तरेकडील भागात विविध सहकारी संस्थांची स्थापना केलेली आहे. या विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी अनेकांना रोजगार मिळवून दिलेला आहे. सोलापूर जिल्ह्यातील पहिली पाणीवाटप संस्था सहकारी तत्वावर उभी करून त्यांनी खऱ्या अर्थाने सहकाराला चालना दिली आहे. त्यांनी सहकाराच्या

माध्यमातून विधायक स्वरूपाचे राजकारण केलेले आहे. तसेच राजकारणाचा वापर सहकार चळवळीच्या वाढीसाठी केलेला आहे. त्यांच्या विविधांगी कार्यामुळे पंढरपूर तालुक्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झालेला आहे. त्यांच्या रूपाने ग्रामीण भागातील नेतृत्त्व पुढे आलेले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## ➢ श्री.शांतीनाथ बाबुराव बागल –

शांतीनाथ बागल यांनी पंढरपूर तालुक्याच्या सहकारी चळवळीला आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांचा जन्म ०१ जून १९५६ रोजी एका शेतकरी कुटुंबात गादेगाव ता.पंढरपूर येथे झाला. त्यांनी इ.स. १९७३ मध्ये सहकार चळवळीमध्ये प्रवेश केला. १९७३ पासून ते आजतागायत ते अविरतपणे सहकार क्षेत्रामध्ये कार्य करीत आहेत. ते स्वतः दे.भ.बाबुरावजी विठोबा बागल यांचे वारसदार आहेत. लहानपणी सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील यांचे त्याच्या घरी नेहमी ये–जा असे. तसेच त्यांच्यावर यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव पडला. या सर्वांच्या प्रेरणेमुळेच त्यांना सहकार चळवळीमध्ये भाग घेण्याची प्रेरणा मिळाली.[१३५]

शांतीनाथ बागल यांनी गजानन सहकारी दूध उत्पादक संस्था गादेगाव या संस्थेची इ.स.१९९० मध्ये स्थापना केली. गादेगाव वि.का.सेवा सहकारी सोसायटी मर्या. गादेगाव नं.२ या सहकारी संस्थेची २१ जून १९९३ रोजी स्थापना केली. या संस्थेचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/ आरएसआर/एसआर/ १०५९ असा आहे.[१३६]

दूध संकलन करणे, विक्री करणे, पशुखाद्य कमी दरात सभासदांना पुरविणे. शेतकरी सभासदांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावणे, शेतकरी सभासद बांधवांना कमी व्याजदरात कर्जपुरवठा करणे, शेतकरी सभासदांना विविध सेवा अल्प दरात देणे ही त्यांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांची उद्दिष्टे आहेत. त्यांच्या ताब्यात असणाऱ्या सहकारी संस्थांनी समाजातील दुर्बल घटकांना मोठी मदत केलेली आहे. दरवर्षी १५० सभासदांना अल्प दरात कर्जपुरवठा केला जातो.

आजपर्यंत तालुक्यातील विविध सहकारी संस्थांना त्यांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यामध्ये पंढरपूर तालुका सहकारी खरेदी–विक्री संघाचे २५ वर्षे चेअरमनपद सांभाळले आहे. त्यांनी गजानन सहकारी दूध उत्पादक संस्था गादेगाव या संस्थेची इ.स.१९९० मध्ये स्थापना केली. ते या संस्थेचे चेअरमनपद सांभाळत आहेत. पंचगंगा सह.दूध उत्पादक संस्था

पळशी ता. पंढरपूर या संस्थेची इ.स.१९९३ मध्ये स्थापना केली. गादेगाव येथे गादेगाव नं.२ वि.का.सेवा सहकारी सोसायटीची स्थापना इ.स.१९९४ मध्ये केली. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग असून ते सलग पाच वर्षे या कारखान्याचे संचालक होते. गादेगाव येथे दे.भ.बाबुरावजी बागल ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची इ.स.१९९४ मध्ये स्थापना केली. या संस्थेचे चेअरमन पद ते सांभाळत आहेत. गादेगाव येथे इ.स.१९९५ मध्ये स्थापन झालेल्या श्री. विठ्ठल सहकारी कुक्कुटपालन या संस्थेचे ते मुख्य प्रवर्तक आहेत. पंढरपूर तालुक्यातील कै.औदुंबररावजी पाटील गटाच्या ३५ वि.का.सेवा सहकारी सोसायटयांच्या स्थापनेस त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे.[१३७]

आजपर्यंत त्यांनी स्थापन केलेल्या विविध सहकारी संस्थांमुळे व त्यांच्या नेतृत्त्वामुळे पंढरपूर तालुक्याची औद्योगिक प्रगती झालेली आहे. त्याचबरोबर इ.स.१९९० नंतरच्या कालखंडात विविध सहकारी दूग्ध उत्पादक संस्थांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे एक निश्चित साधन मिळण्यास मदत झाली आहे. शेतकरी सभासदांचा दूध उत्पादन हा एक व्यवसाय बनला आहे. त्यांनी स्थापन केलेल्या विविध कार्यकारी सोसायटयांच्या स्थापनेमुळे खाजगीकरण व उदारीकरणाच्या कालखंडातही शेतकरी सभासदांना कर्जपुरवठा करून त्यांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावलेला आहे. त्यांनी स्थापन केलेल्या पतसंस्थेमुळे शेतकरी, छोटे उद्योजक यांना सुलभतेने कमी व्याजदराने कर्जपुरवठा झाल्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती झालेली आहे. पर्यायाने पंढरपूर तालुक्याचा विकास होण्यास मोठी मदत झालेली आहे.[१३८]

पंढरपूर तालुक्यातील दुर्बल, दलित, आर्थिकदृष्टया गांजलेल्या अनेकांना त्यांनी शिक्षणासाठी, आरोग्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी, विवाहासाठी, क्रीडा व सांस्कृतिक मंडळासाठी त्यांनी अनेकवेळा आर्थिक मदत केली आहे. त्यांच्यावर यशवंतराव चव्हाण, सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील व औदुंबरअण्णा पाटील या नेत्यांचा प्रभाव आहे.

एकंदरीत शांतीनाथ बागल यांच्या सहकारी चळवळीतील नेतृत्त्वामुळे पंढरपूर तालुक्याच्या पश्चिम भागात अनेक सहकारी संस्थांची स्थापना झाली. ग्रामीण भागातील

बेरोजगारांना रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. त्यांच्या विविधांगी नेतृत्त्वामुळे पंढरपूर तालुक्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झालेला आहे.

## ➢ दशरथ पंढरीनाथ खळगे –

दशरथ खळगे यांचा जन्म शेवते ता.पंढरपूर येथे १ जून १९५८ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचा शेती हा व्यवसाय असून त्यांनी शेतीमध्ये अनेक नाविन्यपूर्ण प्रयोग करून आधुनिक शेती केलेली आहे. म्हणून पंचक्रोशीत ते एक प्रगतशील बागायतदार म्हणून ओळखले जातात. त्यांचे पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण शेवते येथे झाले तर आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण भोसे ता.पंढरपूर येथे झाले. त्यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून आपल्या भागाचा मोठा विकास केलेला आहे.

इ.स.१९८७ मध्ये गावातील अनेकांच्या आग्रहाखातर शेवते ग्रामपंचायत निवडणुकीसाठी त्यांनी पॅनेल उभे केले. त्यात ते यशस्वी झाले. इ.स.१९९० ते १९९५ या काळात त्यांनी शेवते गावचे सरपंच म्हणून काम केले. इ.स.१९९५ ते २००० या काळात त्यांनी औदुंबरअण्णा पाटील यांचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून काम केले. दरम्यानच्या काळात औदुंबरअण्णा पाटील व वसंतदादा काळे यांच्यात मतभेद निर्माण झाले. परिणामी इ.स.१९९८ पासून वसंतदादांनी चळवळ उभी केली वया चळवळीत ते यशस्वी झाले. इ.स.२००० मध्ये विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लागली. यावेळी वसंतदादांनी संचालक पदासाठी त्यांचे नाव सुचविले. या निवडणुकीत ते निवडून आले. इ.स.२००० पासून ते आजतागायत सलग चार वेळा ते विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून काम पाहत आहेत. वसंतदादांच्या निधनानंतर चेअरमन पदाची जागा रिक्त झाल्याने निवडणूक लागली यावेळी दशरथ खळगे हे भारत भालके यांचे काम आवडल्याने त्यांच्या पाठीशी उभे राहिले. इ.स.२००२ मध्ये श्री.भारत भालके विठ्ठल सहकारी कारखान्याचे चेअरमन झाले. तेंव्हापासून त्यांनी दशरथ खळगे यांच्यावरती विश्वास ठेऊन त्यांना विविध जबाबदारीची पदे देण्यात आली.दशरथ खळगे यानी ५ वर्षे कामगार कमिटीचे चेअरमन म्हणून काम पाहिले. तसेच ऊस तोडणी वाहतूक कमिटीचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम पाहिले. या कालावधीत त्यांचा अनेक लोकांशी संबंध आला. त्यांनी अनेकांच्या समस्या सोडविण्यासाठी अविरतपणे काम केले. आपल्या संचालक पदाच्या काळात त्यांना अनेकांची कामे करण्यास वाव मिळाला.[१३९]

दशरथ खळगे यांनी पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला आपले मोठे योगदान दिलेले आहे. इ.स.२००० पासून ते तालुक्याच्या सहकारी चळवळीत काम करीत आहेत. त्यांनी शेवते या गावात एक बहुउद्देशीय संस्था स्थापन केली. तसेच एक क्रीडा मंडळही स्थापन केले. त्यांनी इ.स.१९९८ मध्येएक सहकारी दूध संस्थाही स्थापन केली होती. या दूध संस्थेचे दररोज ७०० लिटर दूध संकलन होत होते. जिल्हा दूध संघांच्या विरोधी गटात असतानाही ही संस्था अतिशय चांगली चालत होती. मात्र बदलत्या परिस्थितीमुळे आजही संस्था बंद पडलेली आहे.[१४०] शेतकऱ्यांना सभासद करून घेणे, त्यांच्या गरजा भागविणे, सहकाराचा प्रसार करणे, सहकाराचे महत्त्व पटवून देणे. सामाजिक कार्यासाठी मदत करणे ही त्यांच्या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून आपल्या गावचा आणि पंढरपूर तालुक्याचा विकास केलेला आहे. तसेच सामाजिक बांधिलकी मानून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक कार्यासाठी अनेकांना मदत केलेली आहे. इ.स.२००४ मध्ये विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भारत भालके यांना आमदार करण्यासाठी त्यांनी संपूर्ण पंढरपूर तालुक्याचा दौरा केला मात्र यावेळी विठ्ठल परिवारातील दोन नेते एकमेकांसमोर उभे राहिल्याने त्यांचा पराभव झाला. इ.स.२००९च्या विधानसभा निवडणुकीत विठ्ठल परिवाराचे नेते भारत भालके यांना पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातून कॉंग्रेस पक्षाची उमेदवारी मिळाली. यावेळी त्यांच्या विजयासाठी दशरथ खळगे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठे प्रत्यन केले त्यात त्यांना यश मिळाले या निवडणुकीत भारत भालके यांना १,०६,१४१ इतकी मते मिळाली व त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धीउमेदवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विजयसिंह मोहिते–पाटील यांचा ३७,३६६ मताने पराभव झाला.[१४१]

एकंदरीत पंढरपूर तालुक्याच्या सहकार चळवळीला व या चळवळीच्या विकासात दशरथ खळगे यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांच्यावर भारत भालके यांचा प्रभाव असून त्यांच्याच मार्गदर्शनानुसार ते आपली राजकीय वाटचाल करीत आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या व नेतृत्त्व दिलेल्या संस्थामुळे पंढरपूर तालुक्यातील बेरोजगाराचे प्रमाण कमी होत आहे.

### ➢ बाळासाहेब महादेव राऊत–माळी –

बाळासाहेब महादेव राऊत–माळी यांचा जन्म १ जून १९६४ रोजी शेवते ता.पंढरपूर येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण शेवते या ठिकाणी झाले तर

आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण भोसे या ठिकाणी झाले. त्यांचा व्यवसाय शेती हा असून ते एक प्रगतशील शेतकरी म्हणून ओळखले जातात. त्यांनी शेवते व पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला आपले मोठे योगदान दिलेले आहे.

इ.स.१९९० मध्ये त्यांनी शेवते गावची ग्रामपंचायत निवडणूक लढविली व पहिल्याच प्रयत्नात ते निवडून आले. याचवेळी ते शेवते गावचे उपसरपंच झाले. इ.स.१९९० ते १९९२ या कालखंडात ते शेवते गावचे उपसरपंच होते.[१४२] इ.स.१९९२ मध्येत्यांना पंचायत समितीचे तिकीट देण्यात आले व पंचायत समितीच्या निवडणुकीतही ते निवडून आले.[१४३]यावेळी त्यांना उपसरपंच पदाचा राजीनामा द्यावा लागला. या दोन्ही निवडणुकांत त्यांना गावातील लोकांनी मोठी मदत केली ते अल्पसंख्यांक माळी समाजातील असूनही जातीची अडचण आली नाही. यावरून असे म्हणता येईल की शेवते गावात सलोख्याचे व सौहार्दाचे वातावरण आहे. सहकारामुळे बंधुभावाची भावना निर्माण होते. याचा प्रत्यय प्रत्यक्षात त्यांना आला. या ठिकाणी त्यांना जातीचा अडसर निर्माण झाला नाही तर त्यांच्या कार्यामळे त्यांना यश मिळाले खरेतर पंढरपूर तालुक्यातील नेतृत्त्वाला जातीचा अडसर आलेला नाही. यावरून हे सिद्ध होते की, पंढरपूर तालुक्यातील जनता नेतृत्त्वाच्या कामाकडे पाहून त्यांना निवडून देते. सहकाराने धार्मिक भेदभाव दूर केला जातो. बंधूभाव निर्माण होतो. हे तालुक्यातील जनतेने सिद्ध करून दाखविले आहे.[१४४]

बाळासाहेब माळी यांनी खऱ्या अर्थाने इ.स.१९९५ मध्ये सहकार क्षेत्रामध्ये प्रवेश केला. त्यांनी परिचारक गटातर्फे रुक्मिणी महिला सहकारी दूध संस्था व शेवते वि.का.सेवा संस्था नं.२ या सहकारी संस्थांची स्थापना केली.त्यांनी स्थापन केलेल्या वि.का.सेवा.सह.संस्था.मर्या.शेवते.नं.२या संस्थेचा नोंदणी क्रमांक एसयुआर/पीआरआर/आरएसआर/एसआर/ १०४० असा आहे.[१४५]दूध संकलन करणे, विक्री करणे, सोलापूर जिल्हा दूध संघाला दूध पाठविणे, सभासद करून घेणे, शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडविणे. त्यांना कर्ज वाटप करणे, त्यांना सहकाराचे महत्त्व पटवून देणे, सहकाराद्वारे गावचा व तालुक्याचा सर्वांगीण विकास करणे, ही त्यांच्या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यांच्या सहकारी संस्थांमार्फत तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती व शासनाच्या विविध योजनांमार्फत त्यांनी शेवते गावातील व तालुक्यातील दुर्बल घटकांना घरकुले, शिलाई मशीन, विहीर, पाईप लाईन,

इलेक्ट्रिक मोटर, सायकल इत्यादी साहित्याचेवाटप केलेले आहे. बहुतेक वेळा पंचायत समितीच्या माध्यमातून त्यांनी ही मदत केलेली आहे. तसेच त्यांनी स्वतःही सामाजिक बांधिलकी मानून गावातील व तालुक्यातील अनेक गरजू व्यक्तिंना शिक्षणासाठी, दवाखान्यासाठी, मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत दिली आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांसाठी व बी–बियाणांसाठी तसेच विविध सांस्कृतिक व क्रीडा मंडळांना तसेच देवस्थानांनाही मदत दिली आहे खऱ्या अर्थाने गरजूंना मदत करणे ही आपली सामाजिक बांधिलकी आहे. या जाणिवेतून त्यांनी सातत्याने मदत केली आहे वआजही ते करीत आहेत.

आपल्या गावाबरोबरच त्यांनी तालुक्यातील सहकारी चळवळीलाही आपले योगदान दिलेले आहे. इ.स.१९९०–९२ या कालखंडात ते शेवते गावचे उपसरपंच होते, इ.स.१९९५–२००० या काळात ते पंचायत समिती सदस्य होते, इ.स.२००९–२०१४ या कालखंडात पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर या कारखान्याचे संचालक होते, इ.स.२००९–२०१४ या कालखंडातच ते सोलापूर जिल्हा दूध संघाचे संचालक होते, इ.स.२०१६ पासून ते पंढरपूर तालुका दूध संघाचे चेअरमन म्हणून काम पहात आहेत.

आज पंढरपूर तालुका दूध संघाचा पगार प्रत्येक १० दिवासाला अगदी वेळेवर होतो. पूर्वी असे नव्हते सुधाकरपंत परिचारक व प्रशांत परिचारक याचे योग्य नेतृत्त्व व मार्गदर्शन, शिस्त, काम करण्याची पद्धत अतिशय जलद, फसवणूक नाही, दबाव नाही, कोणत्याही निर्णयात वा कामात हस्तक्षेप नाही परिणामी या तालुक्याने सहकारात मोठी झेप घेतलेली आहे.[१४६]

एकंदरीत बाळासाहेब माळी यांच्यावर सुधाकरपंत व प्रशांत परिचारक यांचा मोठा प्रभाव आहे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार ते सहकार चळवळीला आपले योगदान देत आहेत. त्यांनी सुरूवातीपासूनच दूध डेअरी, सोसायटीत काम केले आणि नंतर राजकारणात प्रवेश केला. राजकारणाच्या माध्यमातून त्यांनी सहकार चळवळीचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सहकारामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये मोठया सुधारणा झालेल्या आहेत. त्यांच्या नेतृत्त्वामुळे पंढरपूर तालुक्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक विकास होण्यास मोठी मदत झालेली आहे.

## ➢ बाळासाहेब दादू पाटील –

बाळासाहेब दादू पाटील यांचा जन्म १ जून १९५८ रोजी सुपली ता. पंढरपूर येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या गावी सुपली येथे झाले, इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतचे शिक्षण जैनवाडी येथे तर आठ्वी ते दहावीपर्यतचे शिक्षण पंढरपूरयेथे झाले. सुरूवातीपासूनच ते एकत्र कुटुंबामध्ये वाढले. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे त्यांच्यावर मोठे संस्कार झाले. आजही त्यांचे एकत्र कुटुंब आहे. त्यांच्या कुटुंबात एकूण २५ सदस्य आहेत. खऱ्या अर्थाने एकत्र कुटुंब पद्धतीमुळे कुटुंबाचा विकास होतो. घरातूनच सहकाराची सुरूवात होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांचा व्यवसाय हा शेती असून ते पंढरपूर तालुक्यातील एक प्रगतशील शेतकरी म्हणून ओळखले जातात. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक पद्धतीनेते हा व्यवसाय करतात. शेतीला सहकाराची जोड दिली तर निश्चितपणे शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षमपणे उभा राहतो. यासाठी ते सातत्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रबोधन करतात. त्यांच्या या प्रबोधनामुळे सुशिक्षित तरूण वर्ग आज शेतीकडे वळत आहे.[१४७]

इ.स.१९९० मध्ये त्यांनी प्रथमतः प्रशांत परिचारक यांच्या सोबत राजकीय क्षेत्रामध्ये काम करण्यास सुरूवात केली. इ.स.१९९५ मध्ये त्यांनी सुपली ता. पंढरपूर येथील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्त्वाखाली पॅनेल उभे केले व ते निवडून आणले. इ.स.२००० मध्ये त्यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत पुन्हा त्यांचे पॅनेल निवडून आणले व ते स्वतः यावेळी सुपली गावचे सरपंच झाले.सुपली गावची ग्रामपंचायत २० वर्षापासून त्यांच्या गटाकडे आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्रामपंचायतीचे कामकाज चालत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्रामपंचायतीने अनेक विधायक स्वरूपाची कामे केली आहेत व एक आदर्श ग्रामपंचायत म्हणून पंढरपूर तालुक्यात नावलौकिक मिळविलेला आहे.[१४८]खऱ्या अर्थाने त्यांनी प्रशांत परिचारकांच्या मार्गदर्शनानुसार इ.स.१९९७ मध्ये श्रीराम महिला दूध संस्था, सुपली या सहकारी संस्थेची स्थापना करून सहकारी चळवळीमध्ये प्रवेश केला.इ.स.२०१२ मध्ये पंढरीरत्न प्रशांतराव परिचारक वि.का.सेवा सोसायटीची स्थापना केली. सध्या ते या संस्थेचे संस्थापक चेअरमन म्हणून काम पाहात आहेत. इ.स २०१५ पासून ते पांडुरंग सहकारी साखर

कारखान्याचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. सुपली विकासेवा सोसायटी गेल्या २0 वर्षापासून त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करीत आहे. प्रशांतराव परिचारक युवा मंचाचे खजिनदार म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. इ.स.१९९५ ते २000 या काळात ते सुपली गावचे ग्रामपंचायत सदस्य होते. इ.स.२000 ते २00५ या काळात त्यांनी सुपली गावचे सरपंच म्हणून काम केले. इ.स.२0१0 ते २0१५ या काळात त्यांच्या पत्नी पद्मिनी यलमर पाटील या ग्रामपंचायत सदस्य होत्या. त्यांनी २००२–०३ मध्ये प्रशांत परिचारकांसोबत संपूर्ण पंढरपूर तालुक्याचा दौरा केला आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतमजुरांना, छोटया उद्योजकांना, सहकाराचे महत्त्व पटवून दिले. ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान सुधारणे, सहकाराविषयी त्यांच्यात जागृती निर्माण करणे, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहीत करणे, सहकारी संस्थांचे सभासद करून घेणे, शेतकऱ्यांना, छोटया उद्योजकांना कर्ज पुरवठा करणे, दूध संकलन करणे, विक्री करणे व संकलन केलेले दूध दुधपंढरी या सहकारी दूध संघाकडे पाठविणे ही त्यांच्या सहकारी संस्थांची प्रमुख उद्दिष्टे आहेत.[१४९]

सुधाकरपंत परिचारक व प्रशांत परिचारक यांचा त्यांच्यावरती फार मोठा प्रभाव आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखालीते पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला आपले योगदान देत आहेत. तालुक्याच्या पश्चिम भागात सहकारी संस्थांचे जाळे विणण्यात प्रशांत परिचारकांप्रमाणेच त्यांचाही महत्त्वपूर्ण सहभाग आहे. सुधाकरपंत परिचारक जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व चेअरमन असताना त्यांनी शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात कर्जे दिली. परिणामी तालुक्यात विहीरी व पाईपलाईन यांची मोठया प्रमाणात वाढ झाली. बाळासाहेब पाटील यांनी सुपली या गावात तसेच संपूर्ण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या सहकाराच्या माध्यमातून सोडविल्या आहेत. पूर्वी राष्ट्रीयीकृत बँका शेतकऱ्यांना कर्जे देत नव्हत्या. अशावेळी बाळासाहेबांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून व वि.का.सेवा सोसायटयांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व छोटया उद्योजकांना मोठया प्रमाणात कर्जे देऊन त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम केलेले आहे. सहकारातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये मोठया सुधारणा झालेल्या आहेत. सुपली येथील वि.का.सेवा सोसायटी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काम करीत आहे. या सोसायटयांच्या माध्यमातून त्यांनी द्राक्ष बाग, डाळींब बाग, ऊस शेती यासाठी मोठा कर्जपुरवठा केलेला आहे.[१५०]

बाळासाहेबांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून गावातील व तालुक्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना नेहमीच आर्थिक मदत केली आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, दवाखान्यासाठी, शेतकऱ्यांना त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी, बी–बियांणासाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून तसेच स्वतःही नेहमीच मदत केलेली आहे. याबरोबरच गावातील अनेक क्रीडा मंडळांसाठी, धार्मिक कार्यासाठी, गणेश मंडळासाठी, गावातील ग्रामदेवतेच्या यात्रेवेळी सर्वोतोपरी साहय केलेले आहे. एकंदरीत पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीचा विकास होण्यासाठी त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

वरील नेत्यांच्याशिवाय लक्ष्मण नामदेव पवार, मोहन बाबासाहेब कोळेकर, पांडुरंग यशवंतराव पाटील, गोकुळ दिगंबर जाधव, विठ्ठल अण्णासाहेब मोरे, चांगदेव दत्तात्रय कदम, विभीषण दादाराव पवार, रामदास चव्हाण, राजाराम सावंत, जयसिंह बाळासाहेब देशमुख, कृष्णात पुरवत, रामभाऊ बागल, गंगाधर विभुते, शिवाजीराव कोळवले, बाळासाहेब वामनराव देशमुख, सुनेत्रा विजयसिंह पवार, बाळासाहेब कौलगे, दामोदर पवार, विलास देठे, यशवंत नागणे, नामदेव ताड इत्यादी अनेक नेत्यांचे योगदान पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला लाभले आहे. तालुक्यातील सहकारी चळवळीला पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले त्याचबरोबर या सहकारी संस्थांच्या माध्यमातून विधायक स्वरूपाचे राजकारणही केले.

## संदर्भ –


१) बोंगाळे विठ्ठल प्रभाकर; सहकारातील दीपस्तंभ कै.कर्मवीर औदुंबर आण्णा, पवार आर.डी.(संपा.), श्री.विठ्ठल रौप्य महोत्सवी वर्ष स्मरणिका, गुरसाळे, डिसेंबर २००८, पृ.२५

२) कित्ता

३) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर आवृत्ती, दिनांक २९ नोंव्हेंबर १९९५, पृ.३

४) बोंगाळे विठ्ठल प्रभाकर; उपरोक्त, पृ.२५

५) बदक प्रभाकर ; साठवणीतील आठवणी, तोंडे कमल (संपा.), पंढरपुरातील गतकालीन वंदनीय नेते, राजयोगीनी अहिल्यादेवी होळकर मागास महिला चॅरिटेबल ट्रस्ट, पंढरपूर, २००३ पृ.१४

६) उत्पात क्रांतिसिंह; मागोवा भूतकालीन आणि वर्तमानकालीन नेत्यांचा, तोंडे कमल (संपा.) ; उपरोक्त, पृ.२४,२५

७) कोर्टीकर अशोक ; सिंहावलोकन गतकालाचे, तोंडे कमल (संपा.) ; उपरोक्त, पृ.४४

८) मुलाखत; युवराज विलासराव पाटील, ता.पंढरपूर, दिनांक २१ ऑक्टोबर २०१६

९)www.eci.nci/eci; statistical Report on General Election,1962, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.296

१०) करडेकर डॉ अनिल शेषराव; महाराष्ट्र: निवडणुका आणि निकाल सन १९६२ ते १९९९, राज्यसभा, लोकसभा, विधानपरिषद, विधानसभा ; बाबुकाका प्रकाशन, नेरूळ, नवी मुंबई, प्रथमावृत्ती, जुलै २०००, पृ.११६

११)www.eci.nci/eci; statistical Report on General Election,1972, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.313

१२) www.eci.nci/eci; statistical Report on General Election,1978, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.346

१३) करडेकर डॉ अनिल शेषराव; उपरोक्त, पृ.२४२

१४) केसरी नागेश(संपा.); महाराष्ट्र विधानसभा सदस्यांची आडनावानुक्रमे यादी (सन १९३७ ते २०१३), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन,मुंबई १२ एप्रिल २०१३, पृ.१०५

१५) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ५ एप्रिल १९६६(महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.६६८

१६)कित्ता

१७) कित्ता

१८) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, ५ नोव्हेंबर १९७४(महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.६६८

१९) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ७ मार्च १९७५, खंड–४३, क्रमांक १०,( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ. ८

२०) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक. १० मार्च,खंड–४३, ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२७

२१) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ३१ जुलै १९७५, खंड–४५, क्रमांक १,(महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.१६

२२) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ४ ऑगस्ट १९७५, खंड–४५, क्रमांक–५ (महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.५/२९

२३) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ५ ऑगस्ट १९७५, खंड–४५.१ (महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.६/९

२४) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ७ मार्च १९७५, खंड–४३, क्रमांक १,( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.१०

२५) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक १० मार्च १९७५( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.११ /१०

२६) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक २४ नोव्हेंबर १९७५, खंड–४६, क्रमांक १,(महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.१/६४

२७) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक २० मार्च १९७६, खंड–४७, क्रमांक १२( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.१२/१

२८) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ७ मार्च १९७५( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.१० /८

२९) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक १६ मार्च १९७६( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.८/१९

३०)कोर्टीकर अशोक ; सिंहावलोकन गतकालाचे, तोंडे कमल (संपा.) उपरोक्त, पृ.४५

३१) कदम (डॉ.) विकास, पंढरपूर व वारकरी संप्रदायाचा विकास, अरूणा प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, १२ जुलै २०१९, पृ. ४३

३२) अढवळकर पु.बा; तात्यासाहेब डिंगरे पंढरपुरचे एक गौरवपूर्ण व्यक्तिमत्त्व, उत्पात किशोर पांडुरंग (संपा.), उपरोक्त, पृ.४६,४७

३३)www.eci.nci/eci ; statistical Report on General Election,1980, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.340

३४) उत्पात वा.ना; वज्रापेक्षा कठीण व फुलाहून कोमल व्यक्तिमत्त्व : श्री. तात्या डिंगरे, उत्पात किशोर पांडुरंग (संपा),उपरोक्त, पृ.३१

३५) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक २१ एप्रिल १९८२, खंड ६४, क्र.२९( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२/२९

३६) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ११ एप्रिल १९८४, ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२२/६६

३७) चौधरी (डॉ.) दत्ता, पंढरपूर नगरीचा इतिहास, मुक्ता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१५

३८) कदम (डॉ.) विकास, पंढरपूर व वारकरी संप्रदायाचा विकास, उपरोक्त, पृ. २८

३९) कित्ता, पृ. ८२

४०) कित्ता, पृ. २८

४१) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक १२ एप्रिल १९८४, क्रमांक २३,( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.९८

४२)कित्ता

४३) केसकर मानसी ; धवल किर्तीचा गांधीवादी लोकनेता, तोंडे कमल (संपा.), उपरोक्त, पृ.९

४४)उत्पात क्रांतिसिंह; मागोवा भूतकालीन आणि वर्तमानकालीन नेत्यांचा, तोंडे कमल (संपा.) ; उपरोक्त, पृ.२५

४५) बागल बजरंग ; माझ्या जीवनाचे शिल्पकार: श्री.तात्यासाहेब डिंगरे, उत्पात किशोर पांडुरंग (संपा),उपरोक्त, पृ.१०५

४६) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ६एप्रिल १९८६, ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.५४

४७) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ६ एप्रिल१९८३, खंड–६७, क्रमांक २१,( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२१/७७

४८) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ८ मार्च १९८३, खंड–६७, क्रमांक २,( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२/५१

४९) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक खंड–६७१, क्रमांक १,(महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२/५३

५०) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ८ डिसेंबर १९८३,खंड–६९, क्रमांक ८,(महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.४५,४६

५१) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ९ डिसेंबर १९८३, खंड–६९, क्रमांक ८, ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.८/७३

५२)ह.भ.प. रामदास महाराज जाधव ; हीच प्रेमाची विनवणी, उत्पात किशोर पांडुरंग (संपा),उपरोक्त, पृ.९

५३) ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे ; आरसाधारी शोभादर्शी : आदरणीय तात्या, उत्पात किशोर पांडुरंग (संपा),उपरोक्त, पृ.७

५४) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक ८ डिसेंबर १९८३, ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.८/७६

५५) Sundaram M.S. ; Brief Write up on shri sudhakarpant Paricharak,Shinde Vikarmsingh.P.(Ed.) ; Bharatiya sugar, Volume No.42-3, Pune, May –June 2017, P.24

५६) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर, आवृत्ती, दिनांक २४ ऑक्टोबर २००१, पृ.२

५७)ताटे विद्याधर(संपा.), शतार्थश्री शताब्दी गौरवगाथा, १९१२–२०१२, दि पंढरपूर अर्बन को ऑप.बँक लि., पंढरपूर, २९ डिसेंबर २०१२, पृ. ८२

५८) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर, दिनांक २४ ऑक्टोबर २००१, पृ.२

५९) मुलाखत, सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर, दिनांक १० मे.२०१५

६०)Pitke Sandeep ; Fortune, Shinde Vikarmsingh.P.(Ed.) Op. cot.P.46

६१) Kulkarni Ajit; Sudhakarpant Paricharak, Shinde Vikarmsingh. P.(Ed.) Op.Cit. P.51

६२) www.eci.nci/eci ; statistical Report on General Election,1978, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.346

६३)www.eci.nci/eci ; statistical Report on General Election,1985, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.355

६४) www.eci.nci/eci; statistical Report on General Election,1990, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.385

६५)www.eci.nci/eci; statistical Report on General Election,1995, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.423

६६) www.eci.nci/eci; statistical Report on General Election,1999, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.349

६७)www.eci.nci/eci; statistical Report on General Election,2004, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.379

६८) केसरी नागेश (संपा.) ; उपरोक्त, पृ.१००

६९) मुलाखत; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर, दिनांक.१० मे २०१५

७०)Mane Vamanrao B ; Sudhakarpant Paricharak : A sage in politics Shinde Vikramsingh. (Ed.) po.cit.p.31

७१) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक २३ एप्रिल १९९२, खंड –९५, क्र.२३ ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.२३/२४

७२) कित्ता

७३) कित्ता

७४) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, दिनांक २७ जुलै २००० ( महाराष्ट्र विधानसभा डिबेटस्) पृ.९/१६६

७५) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक २२ जानेवारी २०१७ पृ.५

७६) मुलाखत; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर, दिनांक.१० मे २०१५

७७) कित्ता पृ.८२

७८) मुलाखत; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर, दिनांक.१० मे २०१५

७९)Kulkarni Ajit ; Sudhakarpant Paricharak, Shinde Vikram-singh. P. (Ed.), Op.cit P.50

८०) मुलाखत ; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर, दिनांक.१० मे २०१५

८१) उत्पात क्रांतिसिंह; मागोवा भूतकालीन आणि वर्तमानकालीन नेत्यांचा, तोंडे कमल (संपा.) ; उपरोक्त, पृ.२६

८२)Kulkarni Ajit; Sudhakarpant Paricharak, Shinde Vikarmsingh. P.(Ed.) Op.Cit. P.55

८३) कवडे सुधाकर ; झुंज, सहकार शिरोमणी वसंतराव काळे यांचे चरित्र, विठाई प्रकाशन, पंढरपूर, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१४, पृ.२३७

८४) कित्ता, पृ.३८

८५) कित्ता, पृ.४४

८६) कित्ता, पृ.५६

८७) मुलाखत ; बाळासाहेब काळे, वाडीकुरोली. ता.पंढरपूर दिनांक.२२ जानेवारी २०१७

८८) कित्ता,

८९) कवडे सुधाकर ; झुंज, उपरोक्त, पृ.८९

९०) कित्ता, पृ.१०१

९१) कित्ता, पृ.८५,८६

९२) मुलाखत; महादेव मल्लिकाजुर्नदेठे, तुंगत, ता. पंढरपूर, दिनांक १३ मे २०१७

९३) मुलाखत; कल्याणराव काळे, वाडीकुरोली. ता.पंढरपूर, दिनांक.१४ डिसेंबर २०१६

९४) कवडे सुधाकर ; झुंज, उपरोक्त, पृ.८२

९५) मुलाखत; कल्याणराव काळे, वाडीकुरोली. ता.पंढरपूर, दिनांक.१४ डिसेंबर २०१६

९६) कवडे सुधाकर; झुंज, उपरोक्त, पृ.९३

९७) कित्ता, पृ.११४,११५

९८) मुलाखत; कल्याणराव काळे, वाडीकुरोली. ता.पंढरपूर, दिनांक.१४ डिसेंबर २०१६

९९) कवडे सुधाकर; झुंज, उपरोक्त, पृ.२१६

१००) दैनिक लोकमत; सोलापूर आवृत्ती, दिनांक २९ मार्च १९९९, पृ.१

१०१) मुलाखत; शिवाजीराव बागल, वाडीकुरोली.ता.पंढरपूर, दिनांक २५ मे २०१७, पृ.१

१०२) दैनिक संचार, सोलापूर आवृत्ती, दिनांक २९ मार्च २०००, पृ.१

१०३) मुलाखत;राजसिंह दगडू माने, भंडीशेगांव ता. पंढरपूर, दिनांक ०६ जानेवारी २०१७

१०४) दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दिनांक २४ मार्च २०००, पृ.१

१०५) कवडे सुधाकर ; झुंज, उपरोक्त, पृ.२३८

१०६) दैनिक लोकमत ; सोलापूर आवृत्ती, दिनांक २९ मार्च १९९९, पृ.१

१०७) कित्ता

१०८) मुलाखत; पांडुरंग यशवंत पाटील, भोसे.ता.पंढरपूर, दिनांक ३ फेब्रुवारी २०१७

१०९) कित्ता

११०) मुलाखत ; तात्यासाहेब रंगनाथ पाटील, शेवते.ता.पंढरपूर, दिनांक २८ मे २०१७

१११)WWW.pandharpurlive/2016/01/ Slog-post 452.htm ? m = 0

११२) मुलाखत ; प्रकाश बापूराव पाटील, पंढरपूर दिनांक ८ जून २०१७

११३)सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पंढरपूर यांच्या ऑफिसकडून मिळालेली माहिती

११४) दैनिक ;पंढरी संचार, पंढरपूर, दिनांक १३ जुलै २०११, पृ.३

११५) मुलाखत ; प्रकाश बापूराव पाटील, पंढरपूर, दिनांक ८ जून २०१७

११६) कित्ता

११७) दैनिक;पंढरीभूषण, पंढरपूर,दिनांक.१३ जुलै २०१३, पृ.२

११८) मुलाखत; प्रशांत प्रभाकर परिचारक, पंढरपूर, दिनांक २० एप्रिल २०१६

११९) ताटे विद्याधर (संपा.); उपरोक्त, पृ.६३

१२०) मुलाखत ; प्रशांत प्रभाकर परिचारक, पंढरपूर, दिनांक २० एप्रिल २०१६

१२१) कवडे सुधाकर; झुंज, उपरोक्त, पृ.२१६

१२२) मुलाखत; कल्याणराव काळे, वाडीकुरोली. ता.पंढरपूर, दिनांक.१४ डिसेंबर २०१६

१२३) कित्ता

१२४) कवडे सुधाकर; झुंज, उपरोक्त, पृ.१५५

१२५) मुलाखत; डॉ.सुधीर शिवाजी शिनगारे, भंडीशेगांव, ता.पंढरपूर, दिनांक.८ मार्च२०१६

१२६) मुलाखत; समाधान वसंतराव काळे, वाडीकुरोली ता.पंढरपूर दिनांक.१४ डिसेंबर २०१६

१२७) कित्ता

१२९) मुलाखत, विलासराव वसंतराव काळे, वाडीकुरोली ता.पंढरपूर, दि.१५ मे २०१७

१३०) कल्याणराव काळे यांच्या ऑफिसकडून मिळालेली माहिती

१३१) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर यांच्या ऑफिसकडून मिळालेली माहिती

१३२) मुलाखत ; तात्यासाहेब रंगनाथ पाटील, शेवते ता.पंढरपूर ,दिनांक २२ एप्रिल २०१७

१३३) कित्ता

१३४) कित्ता

१३५) मुलाखत ; शांतीनाथ बाबुराव बागल, गादेगांव ता.पंढरपूर, दिनांक २२ एप्रिल २०१७

१३६) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर यांच्या ऑफिसकडून मिळालेली माहिती

१३७) मुलाखत; शांतीनाथ बाबुराव बागल, गादेगांव ता.पंढरपूर, दिनांक २२ एप्रिल २०१७

१३८) कित्ता

१३९)मुलाखत ; दशरथ पंढरीनाथ खळगे, शेवते ता. पंढरपूर, दिनांक २६ मे २०१७

१४०) कित्ता

१४१) www.eci.nci/eci; statistical Report on General Election,2009, To The Legislative Assembly OF Maharashtra , Election Commission Of India, New Delhi, P.451

१४२) ग्रामपंचायत शेवते ता.पंढरपूर यांच्याकडून मिळालेली माहिती.

१४३) मुलाखत ; बाळासाहेब महादेव राऊत माळी, शेवते ता.पंढरपूर, दिनांक २५ मे २०१७

१४४) कित्ता

१४५) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पंढरपूर ता.पंढरपूर जि.सोलापूर यांच्या ऑफिसकडून मिळालेली माहिती

१४६) मुलाखत; बाळासाहेब महादेव राऊत माळी, शेवते ता.पंढरपूर, दिनांक २५ मे २०१७

१४७) मुलाखत ; बाळासाहेब दादू पाटील ,सुपली ता.पंढरपूर, दिनांक २० मे २०१७
१४८) ग्रामपंचायत सुपली ता. पंढरपूर यांच्याकडून मिळालेली माहिती.
१४९) मुलाखत ; बाळासाहेब दादू पाटील,सुपली ता.पंढरपूर, दिनांक १३ जून २०१७
१५०) कित्ता

# प्रकरण पाचवे

# सहकार चळवळीचा पंढरपूर तालुक्यातील आर्थिक व सामाजिक जीवनावर झालेला परिणाम

## ➢ प्रस्तावना

सहकारी संस्थांच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्याचा आर्थिक व सामाजिक विकास मोठया प्रमाणावर झालेला आहे. तालुक्यातील आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांमध्ये पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला आवश्यक तथा लक्षणीय यश मिळालेले आहे. सहकार ही देशाची शक्ती आहे, तिचा पुरेपूर वापर पंढरपूर तालुक्याने केलेला आहे. सहकारी संस्थांच्या स्थापनेत, संचालनात व संवर्धनात सर्वसामान्यांचा सहभाग, सभासदांचा वाढता सहभाग महत्त्वाचा आहे. उत्पादक शेतकरी सामान्य जनता यांच्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात, चालविल्या जातात. सहकाराच्या माध्यमातून समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच पिळवणूक रोखण्याचा प्रयत्न केला जातो. सहकारी संस्थाचालक सामाजिक बांधिलकी मानून सहकाराचे संवर्धन करतात. या सर्व गोष्टी पंढरपूर तालुक्याच्या बाबतीत घडलेल्या आहेत. सहकारी संस्थांद्वारे गरीबी दूर करण्याच्या कामी त्यांच्या राज्यस्तरीय शिखर संस्थांनी व मोठया प्रथितयश संस्थांनी यात विशेष आवड दाखविली आहे. पंढरपूर तालुक्यात सहकारी संस्थांच्या माध्यमातून “लोकशाही मार्गाने आर्थिक, सामाजिक विकास, आर्थिकविकासाबरोबर सामाजिक न्याय, संपत्तीचे न्यायाधिष्ठित वितरण, पिळवणुकीचे निर्मूलन” हे आपल्या शासनाने घोषित केलेले प्रत्यक्षात अंगीकारलेले सर्वमान्य धोरण आहे. या धोरणानुसारच पंढरपूर तालुक्याची वाटचाल सुरू आहे.

आज सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यामध्ये सहकार चळवळीच्या बाबतीत पंढरपूर तालुक्याचे स्थान वरचे आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून या तालुक्याने अनेक क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण भागाचा जो काही विकास झाला आहे. त्यामध्ये सहकारी चळवळीचा हिस्सा मोलाचा आहे. या चळवळीने तालुक्याच्या शहरी व ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय बदल घडवून आणले आहेत. तालुक्याच्या ग्रामीण भागात कृषि औद्योगिक समाज उभा राहिला

आहे. सामान्य शेतकरी, शेतमजूर यांना सहकार चळवळीने विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतले आहे. महाराष्ट्रात सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा महाराष्ट्रातील सहकारी सोसायटयांना इ.स. १९६२ पासून लागू झाला. व महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विकासास मोठी गती प्राप्त झाली. इ.स. १९६० ते इ.स. १९८० या काळात महाराष्ट्रात सहकार सर्वत्र बहरला. या काळात सहकाराचे सुवर्णयुग म्हणता येईल अशी नेत्रदिपक प्रगती पहावयास मिळाली.[१]

## ➢ सहकारी साखर कारखाने आणि कृषि विकास

सहकारी साखर कारखाने ऊसाची लागवड, वाहतूक आणि उसाची खरेदी यांची जबाबदारी उचलतात, शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करून कारखाने साखर उत्पादनाची प्रक्रिया पूर्ण करतात. ऊसाची किंमत मंत्र्यांची समिती ठरविते आणि ऊस कारखान्यास विकल्यानंतर त्या किंमतीप्रमाणे शेतकऱ्यांना पैसे दिले जातात. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सुरूवातीच्या काळात स्थापन झालेले साखर कारखाने कार्यक्षमतेन चालले आणि यशस्वी झाले या साखर कारखान्यांनी कृषि विकासासाठी आपले मोठे योगदान दिले.[२] महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी शेतीला कृषिपूरक उद्योग व्यवसायाची जोड दिली. अनेक सहकारी साखर कारखान्यांनी जलसिंचन योजनांची निर्मिती केली. बी–बियाणे, खते शेतीची अवजारे इत्यादीसाठी कारखान्यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली. कृषि प्रक्रिया उद्योग उभारले तसेच शेती व फळबागांचा विकास केला शेतीला बारमाही करण्यात सहकारी साखर कारखान्यांची भूमिका ही अतिशय महत्त्वपूर्ण आहे.[३] सहकारी साखर कारखान्यांच्या भूमिकेमुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होऊन त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून कारखाने शेतकऱ्यांना नेहमी मार्गदर्शन करतात, माती परीक्षण केले जाते. ऊसाच्या नवीन जातीची शेतकऱ्यांना माहिती देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्याबाबत प्रात्यक्षिकेही दिली जातात.[४]

पंढरपूर तालुक्यातील साखर कारखान्यांनी स्वतःच्या पैशातून उत्कृष्ट बी–बियाणे, कंपोस्ट खत तयार करणे, माती परीक्षण प्रयोगशाळा काढून मोफत माती परीक्षण, शेतीसाठी व जमीन सुधारणेसाठी सहाय्य करणे, उपसा जलसिंचन योजनेसाठी कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच पाझर तलाव, नद्यावरील बंधारे यावर खर्च केला आहे. परिणामी तालुक्यातील हजारो

एकर जमीन पाण्याखाली आली आहे. नद्यांवर व ओढयांवर पूल बांधून तसेच रस्ते निर्माण करून कृषि विकासाला चालना दिलेली आहे.[५]

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून कार्यक्षेत्रातील सामान्य शेतकरी, शेतमजूर व मागासवर्गीय जाती जमातीच्या विकासासाठी कारखान्याच्या शेती विभागाने शेती विकासावर अधिक लक्ष केंद्रीत करून अनेक योजना राबविल्या आहेत. या योजनांसाठी अनेक शेती तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे. शेती विकासाच्या विविध योजनेत शुद्ध व निरोगी ऊस बेण्याचा सवलतीच्या दरात पुरवठा करणे, अनुदान देणे, खते व वाहतुकीची सवलत उपलब्ध करून देण्यासाठी दरवर्षी मोठया प्रमाणात अनुदान दिले जाते. ऊस शेती किफायतशीर उदयोगाची जननी आहे. ऊस शेती किफायतशीर चालली तरच अनेक महत्त्वाचे उदयोगधंदे आपल्या कार्यक्षेत्रात उभे राहतील याचा विचार करून या कारखान्याने मोठी मदत केली आहे.तसेच इ.स. १९८०–८१ मध्ये ऊसाचे एकरी उत्पादन व दर्जा वाढविण्यासाठी सभासदांना शुद्ध बियाणांचा पुरवठा कारखान्याने पाडेगाव व अकलूज येथील शासकीय नर्सरीमधून सुधारित बेणे आणून स्वतःच्या मालकीचा नर्सरी प्लॉट तयार करून सभासदांना सुधारित जातीचे सी.ओ.७२१९, सी.ओ. ७१२५, सी.ओ. ७४० बेण्याचे वाटप करून शेतीच्या विकासास चालना दिली आहे. तसेच इ.स. १९८०–८१ या अहवाल सालात १७२ सभासदांना सुधारित जातीच्या बेण्याचे वाटप केले आहे. हे बेणे पुरविताना सभासदांना माफक दरात म्हणजे एक हजार टिपऱ्या मागे शासकीय दर ६५ रूपये असताना त्यामध्ये १५ टक्के सबसिडी देऊन बेणे पुरवठा केलेला आहे. तसेच कारखाना कार्यक्षेत्रातील निरनिराळया भागातील जमिनीच्या मातीचे परिक्षण करून जरूरीप्रमाणे रासायनिक व सेंद्रिय खते वापरण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मदत व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय केमिकल व फर्टिलायझर लि. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांच्या जमिनीचे नमुने तपासण्यात आले. ऊस पिकास योग्य वेळी रासायनिक खतांची मात्रा मिळण्यासाठी ४७ ऊस उत्पादक सभासदांना ७२०४६. ५० रूपयाचे खत वाटप करण्यात आले तर ६१ बिगर सभासदांना ८०,९४८ रूपयाचे खत वाटप करण्यात आले.[६] कारखाना कार्यक्षेत्रातील जमिनीची सुधारणा होण्यासाठी व जमिनीचा पोत कायम टिकून राहण्यासाठी कारखान्याने “ना नफा ना तोटा” या तत्वावर ताग व धैंचा हिरवळी खताचे बियाणे वाटप करण्यात आले होते. इ.स. १९९३ –९४ या अहवाल सालात

कारखान्याने १०० क्विंटल ताग व २५ क्विंटल धैंचा बियाणे खरेदी करून त्यांचे अनुक्रमे २५० सभासदांना ताग व ६० सभासदांना धैंचा बियाणे वाटप करण्यात आले होते.[७]

इ.स. १९९९ –२००० या अहवाल सालात बागायती जमिनीत अती पाण्याचा वापर, असमतोल खतांचा वापर आणि सेंद्रिय खतांचा अभाव यामुळे जमिनीचा पोत खराब होऊ लागल्यामुळे दर एकरी उत्पादनात घट होत होती म्हणून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने कारखान्याच्या सभासदांच्या हितासाठी कारखाना कार्यस्थळावर भव्य इमारत बांधून सर्व उपकरणांनी सुसज्ज अशी माती परीक्षण प्रयोगशाळा सुरू केली. इ.स. १९९९–२००० मध्ये या प्रयोगशाळेचा बऱ्याच सभासदांनी फायदा घेतला होता. इ.स. १९९९–२००० मध्ये १०० ठिकाणच्या मातीचे नमुने तपासण्यात येऊन ९०० एकरापर्यंत सर्वेक्षण केले होते. तसेच कारखान्यामार्फत ऊस पिकासाठी समतोल खताची मात्रा वापरणेबाबत ऊस विकास विभागाकडून मार्गदर्शन केले जाते. तसेच सभासदांना आंबा, निलगिरी, सुरू इ. फळझाडे व शोभिवंत रोपांची विक्री केली आहे.सभासदांना त्यांचा ऊस गळीतास आल्यानंतर प्रत्येक सभासदास ४ मे.टन प्रेसमड प्रति टनास २५ रूपये या दराने सवलतीच्या दरात वाहतूक करून त्वरित त्यांच्या शेतावर पोहोच करण्याची व्यवस्था केलेली आहे.त्यामुळे सभासदांना मळीचे खत म्हणून उपयोग करण्यासाठी मळी उपलब्ध होत आहे.[८] इ.स. २०००–२००१ या अहवाल सालात विठ्ठल सह. साखर कारखान्याने ऊस पिकासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, शेतकऱ्यांना आत्मसात व्हावे यासाठी कारखान्याच्या ऊस विकास विभागामार्फत विविध शेतकरी मेळावे आयोजित करण्यात आले होते. इ.स. २००० –२००१ यावर्षी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कमी पाऊस झाल्याने व नदी काठच्या कार्यक्षेत्रात अती पाण्याचे वापरामुळे जमिनी खराब होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे ठिबक सिंचन योजना कारखान्याने राबविली आहे. कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी सभासदांना ठिबक सिंचनासाठी हेक्टरी १०,००० रूपयाचे अनुदान दिलेले आहे. या योजनेअंतर्गत ३७२ सभासदांनी ३९२ एकर क्षेत्रावर ठिबक सिंचन संच बसविले आहे त्यामुळे सभासदांच्या पाणी वापरात बचत झाली व प्रति हेक्टरी उत्पादनात वाढ झाली आहे.[९] इ.स. २००१– २००२ या अहवाल सालात सुधारित ऊस जातीची लागवड मोठया प्रमाणात व्हावी व साखर उतारा वाढावा याकरिता कारखान्यामार्फत उधारिने सूक्ष्म अन्नद्रव्ये खतांचा पुरवठा सभासदांना केला आहे. इ.स.

२००१– ०२ मध्ये ४१३ सभासदांना रू. ११,७१,२८० एवढया रकमेचे सूक्ष्म द्रव्येयुक्त खतांचे वाटप करण्यात आले.[१०]

चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याने इ.स. २००१–२००२ या अहवाल सालात आपल्या सभासदांना को.सी.६७१, को.सी.८६०३२ या सुधारित जातीचे बेणे बिनव्याजी दिले होते. लोकरी मावा या रोगाचा पिकांवरील प्रसार रोखण्यासाठी औषध फवारणीची व्यवस्था व त्यासाठी मोठी मदत सभासदांना केली होती. त्याचप्रमाणे द्रवरूप खते तसेच प्रेसमड इत्यादी सभासदांना पुरविले जाते. कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेतकरी मेळावे घेतले जातात.[११] चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याने इ.स. २००२–२००३ या अहवाल सालात कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता अधिक व्हावी म्हणून कारखान्याने केंद्र शासनाकडे ऊस विकास निधी अंतर्गत सवलतीचे कर्जाची मागणी केली व या कर्जाचा वापर कारखान्याने सभासदांचा विकास करण्यासाठी केला आहे. तसेच कारखाना परिसरात मोठया प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे.[१२]

## ➢ साखर कारखाने आणि आर्थिक विकास –

सहकारी साखर उदयोगाने पंढरपूर तालुक्याच्या कृषि औद्योगिक विकासास मोलाचा हातभार लावला आहे. ही वस्तुस्थिती असली तरी सहकारी साखर कारखाने म्हणजे परिसराच्या सर्वांगीण विकासाची केंद्रे होत असेम्हणणे पूर्ण सत्य नसून अर्धसत्य आहे. याठिकाणी सर्वांगीण विकास या शब्दप्रयोगात मानवी जीवनाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषि व औद्योगिक अशा सर्वच अंगाचा विकास अभिप्रेत आहे. संपूर्ण सहकारी साखर कारखानदारीने असा विकास करणे अगत्याचे आहे. हा विचार करताना काही मोजक्याच सहकारी साखर कारखान्यांनी व सहकारी संस्थांनी ही किमया काही प्रमाणात साधली आहे. याचा अर्थ परिसराच्या सर्वांगीण विकासाचे सामर्थ्य या उदयोगात असले तरी ध्येयवेडाने ते राबविण्यासाठी आवश्यक असणारे चारित्र्य संपन्न नेतृत्त्व त्यास लाभले पाहिजे. पंढरपूर तालुक्यात औदुंबर पाटील, पांडुरंग डिंगरे, सुधाकरपंत परिचारक, वसंतराव काळे, प्रशांतराव परिचारक, भारत भालके, यशवंतभाऊ पाटील, राजाभाऊ पाटील, कल्याणराव काळे, वसंतनाना देशमुख, कृष्णातभाऊ पुरवत, प्रकाश पाटील, तात्यासाहेब पाटील, दशरथ खळगे, बाळू माळी, रामभाऊ बागल, राजभाऊ माने, संभाजीराव शिंदे, वसंतनाना देशमुख,

दौलतराव देशमुख, बाळासाहेब पाटील, दगडू हाके यांच्यासारख्या नेतृत्त्वामुळे तालुक्याचा विकास झालेला आहे.[१३]

शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी कृषिउद्योगात सर्वाधिक यश सहकारी साखर उद्योगाने मिळवले आहे. आर्थिक विकास हा मानवाच्या जीवन समृद्धीचा पाया आहे. हे तत्त्व विचारात घेऊन पंढरपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यांनी हे कार्य सर्वप्रथम केले आहे. ग्रामीण भागातील ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाला चांगला भाव मिळू लागल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. त्याचबरोबर आर्थिक स्थिती सुधारल्याने त्यांच्यामध्ये उद्योगशीलताही निर्माण झाली. सुबत्ता आल्याने व कारखान्याने शेती करण्यासाठी आधुनिक साधने उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण भागातील शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करू लागला. तालुक्यातील सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून प्रतिवर्षी विविध प्रकारच्या ठेवी ठेऊन घेतात. परिणामी शेतकऱ्यांना अप्रत्यक्षरित्या बचतीची सवयही लागली. आज अनेक शेतकऱ्यांच्या ठेवी कारखान्याकडे आहेत.[१४]

शेतकरी हा नेहमी या ना त्या कारणाने आर्थिक अडचणीत सापडतो. त्याची सोडवणूक करण्याची इच्छा असूनही सोडवणूक करता येत नाही त्यातून मार्ग काढण्यासाठी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली आहे.[१५] या संस्थेने सभासदांना पीक कर्ज, रासायनिक खतासाठी कर्ज, व दुभत्या म्हैशीसाठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे. या संस्थेचा फायदा कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील जनतेसाठी होत आहे. एकंदरीत सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागातील जनेतचा मोठया प्रमाणात विकास झालेला आहे.

## ➢ सहकारी साखर कारखाने आणि शैक्षणिक विकास–

शैक्षणिक सुविधांची निर्मिती हा कोणत्याही घटक राज्यांच्या सर्वांगीण आर्थिक विकासाचा एक निकष मानला जातो. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारीने इ.स.१९८० नंतरच्या दशकात अभियांत्रिकी, वैद्यकीय, कला, वाणिज्य व विज्ञान, कृषि महाविद्यालये स्थापन करून शैक्षणिक संकुले निर्माण केली आहेत. अलिकडच्या काळात या सहकारी साखर कारखान्यांनी मुलांसाठी सुरू केलेल्या साखर शाळा ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. अशाप्रकारे महाराष्ट्रात शैक्षणिक विकास घडवून सहकारी संस्थांनी

दुर्बल घटकांना आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखविला आहे.[१६] गावोगावी माध्यमिक शाळा व तालुका पातळीवर महाविद्यालये स्थापन करण्यात सहकारी साखर कारखान्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. तसेच वसतिगृहाच्या माध्यमातून राहण्याच्या सोयी केल्याने ग्रामीण भागातील मुलांना अत्यअल्प खर्चांत उच्च शिक्षण घेणे शक्य झाले आहे.[१७]

ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा विकास करण्यात सहकारी चळवळीचा कार्यभाग मोठा आहे. यात शंका नाही. पंढरपूर तालुक्यातील साखर कारखान्यांनी व इतर सहकारी संस्थांनी आपापल्या परिसरात शाळा, विद्यालये चालवून ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रसार केला आहे. महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक संस्था या सहकारी साखर कारखान्यांनी चालू केल्या नसत्या तर बहुसंख्य ग्रामीण युवक–युवती शिक्षणापासून वंचित राहिले असते.[१८] पंढरपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यांनी आपल्याला मिळणाऱ्या नफ्यापैकी काही भाग शिक्षणासाठी खर्च केला आहे. यामध्ये विठ्ठल सहकारी साखर कारखाना व चंद्रभागा सहकारी साखर कारखाना या संस्थांचा समावेश आहे. या कारखान्यामार्फत आय.टी.आय. हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज इत्यादी शैक्षणिक संस्थाही चालविल्या जात आहेत.[१९] विठ्ठल सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर श्रीमान औदुंबरावजी पाटील ग्रामीण विकास एण्डाऊमेंट प्रतिष्ठान संचलित श्री विठ्ठल प्रशाला व ज्यु. कॉलेजमार्फत शैक्षणिक सुविधा तसेच गरीब होतकरू मुलांना स्कॉलरशिप देऊन त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी सोयी सवलती उपलब्ध करवून दिलेल्या आहेत. कारखान्याने कारखाना साईटवर विना अनुदान तत्वावर इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी पर्यत प्राथमिक शाळा सुरू केली असून ती यशस्वीपणे चालू आहे. कारखान्याने ऊस तोडणी मजुरांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून कारखाना कार्यस्थळावर साखर शाळा कार्यान्वित केली असून सदर साखर शाळेत ऊस तोडणी मजुरांची मुले शिक्षण घेत आहेत.[२०] विठ्ठल प्रशालेत इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण दिले जाते. याशिवाय कला व विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. तसेच बालवाडी, प्राथमिक शिक्षण व कॉम्प्युटरचे शिक्षणही दिले जाते. सन २००० ते २००१ या अहवाल सालात विठ्ठल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये १,२८७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. कारखाना साईटवर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाची सोय झाल्यामुळे कारखान्याच्या परिसरातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना याचा फार मोठा लाभ झालेला आहे.[२१]

चंद्रभागा सहकारी साखर कारखान्यातील बहुसंख्य कामगार वर्ग कारखाना परिसरातील असून सभासदांचीच मुले आहेत. त्यामुळे सभासदांच्या हिताबरोबरच कामगारांचे हित व्यवस्थापनामार्फत जोपासले जाते. कारखाना कार्यस्थळावर इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यत शिकणाऱ्यामुलांच्या शिक्षणासाठी साखर शाळेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मुलांना शालेय साहित्य कारखान्यामार्फत पुरविले जाते. तसेच कामगार वसाहतीत राहणाऱ्या कामगारांच्या मुलांसाठी छोटा शिशु व मोठा शिशु याप्रमाणे वर्ग सुरू करून जून २००३ पासून वसंतराव काळे बालविकास मंदिर या नावाने शिशु शाळा सुरू केली आहे.[२२]

औंदुंबरअण्णा पाटील व वसंतराव काळे यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखाना व चंद्रभागा सहकारी साखर कारखाना यांच्यामार्फत पंढरपूर तालुक्यात अनेक शैक्षणिक संस्थांचे जाळे उभारले आहे. औंदुबर पाटील यांनी सुरू केलेल्या विठ्ठल प्रशालेप्रमाणेच वसंतराव काळे यांनीही वाडीकुरोली येथील न्यू इंलिश स्कूलला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय केली आहे. जैनवाडी येथे श्रीमंतराव काळे विद्यालय, आढीव येथे श्री भैरवनाथ विद्यालय या श्री विठ्ठल परिवाराच्या शैक्षणिक संकुलामध्ये उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय झाली. सहकारातून समृद्धीकडे हा सहकाराचा मूलमंत्र प्रत्यक्ष कृतीमध्ये आणला या विविध शैक्षणिक संस्थांना सहकारी साखर कारखान्यांनी मोठी मदत केली आहे.[२३]

## ➢ सहकारी साखर कारखाने आणि सामाजिक विकास

पंढरपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून विविध योजना राबविलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे –

### सामुदायिक विवाह सोहळे –

पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल सहकारी साखर कारखाना व चंद्रभागा सहकारी साखर कारखाना तसेच पंढरपूर तालुक्याच्या बाहेर असणारे पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर व भीमा सहकारी साखर कारखाना लि. सिकंदर टाकळी यांनी अनेक वेळा सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. चंद्रभागा कारखान्याच्या मदतीने ७ फेब्रुवारी २००४ रोजी मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.[२४]

पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल व चंद्रभागा सहकारी साखर कारखान्यांनी तसेच कार्यक्षेत्र पंढरपूर तालुका असणारे मात्र तालुक्याच्या बाहेर असणारे पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर ता. माळशिरस व भीमा सहकारी साखर कारखाना लि. सिंकदर टाकळी ता.मोहोळ या सहकारी साखर कारखान्यांनीही अनेक वेळा सामाजिक बांधिलकीतून सामुदायिक विवाह सोहळयांसाठी मदत केलेली आहे.[२५]

**मागासवर्गीय ऊस उत्पादक अनुदान योजना –**

सन १९८१–१९८२ सालापासून महाराष्ट्र शासनाने अल्पभूधारक मागासवर्गीय अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांना ऊस पिकासाठी अनुदान देण्याची योजना जाहीर केली. या योजनेनुसार विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने आपल्या परिसरातील मागासवर्गीय व नवबौद्ध ८८ शेतकऱ्यांची ८३ एकरासाठी प्रकरणे तयार करून मा.साखर संचालक पुणे यांचे मार्फत रूपये १,८६,७५० चे अनुदान मिळवून दिले होते.[२६] इ.स. १९८१–८२ पासून कारखाना सातत्याने प्रत्येक वर्षी मागासवर्गीय व नवबौद्ध शेतकऱ्यांना मदत करीत आहे.

**कामगार सुखसोई व सांस्कृतिक कार्यक्रम –**

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने आपल्या साईटवर विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणले होते. तसेच कारखान्यावरील कामगारांच्यासाठी विविध सुविधा दिलेल्या आहेत. कारखाना साईटवर कामगार व त्यांच्या कुटुंबियांना राहण्यासाठी अद्ययावत कॉलनी उभारली आहे. एकून २१० कामगार कुटुंबियांनी या योजनेचा फायदा घेतला आहे.[२७]

**वैद्यकीय सुविधा –**

कारखान्याच्या सेवकांना व कारखाना साईटवर राहणाऱ्या त्यांच्या कुटुंबियांना तसेच ऊस तोडणी मजुरांना कारखाना साईटवर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने कारखान्याने इ.स. १९८५–८६ सालापासून एम.बी.बी.एस.डॉक्टरचीनेमणूक केली आहे. त्यांना कारखाना साईटवर दवाखाना सुरू करून देण्यात आला आहे. त्यामुळे माफक दरात वैद्यकीय सेवेच फायदा कामगारांना मिळत आहे. तसेच कारखान्याच्या साईटवर अनेकदा कारखान्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.[२८]

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने कारखान्याच्या सेवकांना व साईटवर राहणाऱ्या त्यांच्या कुटुंबियांना कारखाना साईटवर सुसज्ज असे वाचनालय सुरू केले आहे. त्यामध्ये

विविध प्रकारचे ग्रंथ, दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके व मासिके ठेवण्यात आली असून त्याचा लाभ फार मोठया प्रमाणात कामगारांना मिळत आहे. तसेच कारखान्याचा बराचसा कामगार वर्ग हा बऱ्याच अंतरावरून आपल्या गावावरून कामावर येत असतो. त्यांना कामावर कमीत कमी श्रमात व वेळेवर येण्यासाठी व जाण्यासाठी कारखान्याने स्वतःच्या हमीवर बँकेमार्फत मोटार सायकली व सायकली यांचे वाटप केले आहे.[२९] कारखान्याने कामगारांच्यासाठी पिठाची गिरणी, स्वस्त धान्य दुकान इत्यादी विभाग चालू केले आहेत. तसेच कर्मचारी कॉलनी, वैद्यकीय सुविधा, बससेवा, वाचनालय, प्रोजक्टर इ. सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

**सभासद विमा योजना –**

अनेक प्रसंगी कारखान्याच्या सभासदांवर अपघातामुळे दुःखाचा डोंगर कोसळतो. अशा वेळेस कारखान्याकडून मदतीचा हात सभासदांच्या वारसांना देता यावा म्हणून नॅशनल इन्शुरन्स कं. लि. शाखा सातारा या कंपनीकडून जनता अपघात विमा घेतलेला आहे. हप्ता रक्कम कारखान्यांच्या भाग विकास निधीतून भरला जातो. कोणत्याही सभासदास अपघात झाल्यास विमा कंपनीकडून १,००,००० रूपये त्याच्या वारसास भरपाईदाखल मिळतात.कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास १,००,००० रूपये व अंशत: अपंगत्व आल्यास ५० हजार रूपये अशी मदत मिळते.[३०] कारखाना कार्यक्षेत्रात विजेच्या सततच्याकमी जास्त दाबामुळे सभासदांच्या इलेक्ट्रीक मोटारी जळण्याचे प्रमाण वाढलेमुळे सभासदांच्या इलेक्ट्रीक मोटारीचा विमा दि.न्यू.इंडिया,इन्शोरन्स कं.लि.सोलापूर यांचेकडे घेतलेला आहे. २००२–०३ या सालात ५,०४९ मोटारींचा विमा घेतलेला असून विम्यापोटी सभासदांना ८,७२,०२५ रूपये रकमेचे वाटप करण्यात आले आहे.[३१]

**सांस्कृतिक कार्यक्रम –**

पंढरपूर तालुक्यातील विविध सहकारी संस्थांच्या कार्यस्थळावर विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.त्यामध्ये स्वातंत्र्य दिन,प्रजासत्ताक दिन,महाराष्ट्र दिन, हनुमान जयंती, श्री दत्त जयंती,श्री गणेशोत्सव,कामगार दिन इत्यादी कार्यक्रम उत्साही व खेळीमेळीच्या वातावरणात साजरे केले जातात.[३२] तालुक्यातील विविध सहकारी संस्थांनी आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून जनतेमध्ये एकीची भावना निर्माण झाली आहे. तसेच अनेकांच्या कलागुणांना संधी मिळाली आहे.सहकारी संस्थांनी व्यासपीठ उपलब्ध करून

दिल्याने स्थानिक मनोरंजनांच्या साधनांचा विकास झाला आहे.[३३]

**चारा छावणी –**

पंढरपूर तालुक्यातील श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने इ.स.२००३–२००४ या अहवाल सालात अत्यल्प पावसामुळे कारखान्याचे कार्यक्षेत्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी कारखाना कार्यस्थळावर दि.१८ ऑगस्ट२००३ पासून जनावरांसाठी छावणी सुरू केली होती.हिरवा चारा, पेंड, औषधोपचार इत्यादीसाठी कारखान्याने ३१ मार्च २००४ अखेर ४१,१४,१३४ रूपये इतका खर्च केला असून सभासद शेतकऱ्यांना दिलासा मिळून त्यांचे पशुधन वाचविणे शक्य झाले आहे.[३४] विठ्ठल सहकारी साखर कारखान्याप्रमाणेच तालुक्यातील चंद्रभागा सहकारी साखर कारखाना ,तालुक्याच्या बाहेरील पांडुरंग सहकारी साखर कारखाना,भीमा सहकारी साखर कारखाना, दूध संघ,जिल्हा मध्यवर्ती बँक, पंढरपूर अर्बन को.ऑप. बँक इत्यादी विविध सहकारी संस्थांनी दुष्काळाच्या वेळी शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी चारा छावण्या सुरू करण्यास मदत केली. दुष्काळाच्या वेळी शेतकऱ्यांना व आर्थिक दुर्बल घटकांना मदत करणे ही आपली सामाजिक बांधिलकी आहे हे प्रमाण मानून तालुक्यातील संस्थांनी विविध प्रकारची मदत केलेली आहे.[३५]

**सहकारी साखर कारखाने आणि रोजगार निर्मिती –**

सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागतील बहुजन समाजास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झालेल्या आहेत. तसेच साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागामध्ये नवीन उद्योगधंद्याला चालना मिळून या भागाचा आर्थिक विकास होऊ लागला आहे. सहकारी साखर कारखान्यामुळे विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत आहेत. तालुक्यातील प्रत्येक साखर कारखान्यात कायम व हंगामी स्वरूपात गाडीवान, ऊसतोडपे व इतर असे जवळपास १०००० लोकांना कायम व हंगामी रोजगाराची संधी मिळत आहे.ग्रामीण भागाच्या रोजगार निर्मितीमध्ये सहकारी साखर कारखान्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.[३६]

साखर उद्योग हा शेती क्षेत्रावर आधारित अवलंबून असणारा महत्त्वाचा उद्योग आहे.पंढरपूर तालुक्यातील विविध साखर कारखान्यांच्या स्थापनेमुळे दूध व्यवसाय, पोल्ट्री,पशुपालन इत्यादी शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळण्यास मदत झाली. तसेच कारखान्यांच्या उभारणीमुळे पतसंस्था, बँका, वाहतूक संस्था, शैक्षणिक संस्था,गृहनिर्माण

संस्था, औद्योगिक संस्था इत्यादींचा विकास होऊन यामधूनही ग्रामीण भागात नवीन रोजगार निर्मिती झाली. यातून तालुक्यातील जनतेला उत्पन्नाची साधने मिळाल्याने लोकांचा आर्थिक स्तर सुधारला आहे, तसेच राहणीमानाचा दर्जाही सुधारण्यास मदत झाली आहे .या रोजगार निर्मितीमुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर रोखण्यास मदत होऊन पंढरपूर तालुक्यातील बेरोजगारी काही प्रमाणातदूर होण्यास मदत झालेली आहे.[३७]

एकंदरीत पंढरपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यामुळे तालुक्याचा शैक्षणिक विकास, दवाखान्यांची सुविधा, घरबांधणी, कलाक्रीडा, पाणी पुरवठा योजना, सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन इत्यादी बाबींद्वारे मोठा सामाजिक विकास झालेला आहे.

## ➢ दि.पंढरपूर अर्बन को.ऑप.बँक आणि सामाजिक बांधिलकी

अर्थकारणाबरोबरच सामाजिक परिस्थितीचे सदैव भान ठेऊन सामाजिक उपक्रम राबविणारी बँक म्हणून पंढरपूर अर्बन बँकेचा लौकीक आहे ज्या समाजाने बँकेला आर्थिक बळकटी दिली. त्या समाजासाठी सामाजिक बांधिलकीचे धोरण बँक नेहमीच राबवित असते.२६ जानेवारी १९५६ रोजी अतिवृष्टीमुळे पंढरपूर येथे मोठा पूर आला होता.यावेळी बँकेने रूग्णांना रूग्णोपयोगी साहित्य पुरविण्याची सेवा सुरू केली. सर्पदंशाची इंजेक्शने, ऑक्सिजन सिलेंडर यासारख्या साहित्याचा यामध्ये समावेश होता. पुरामुळे यावेळी साथीच्या रोगांनी थैमान घातले होते.नगरपालिकेच्या दवाखान्यात इंजेक्शने नव्हती, बँकेने ती उपलब्ध करून दिल्यामुळे काही जणांचे प्राण वाचले. इ.स. १९५९ मध्ये कार्तिक वारीत येणाऱ्या भाविकांना चांगल्या दुधाची बँकेमार्फत उपलब्धता करून दिली व त्याची रास्त भावात विक्री केली. या योजनेचा प्रारंभ सहकार मंत्री श्री. बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते केला होता. याचवर्षी जनतेला रास्त दरात धान्य मिळावे म्हणून बँकेने स्वस्त धान्य दुकान काढले.[३८]

पंढरपूर हे वारीवर जगणारे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. तेथील व्यापारी वारीत व्यापारासाठी भरमसाठ व्याजाने कर्ज काढीत. त्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी बँकेने 'प्रासंगिक कर्ज योजने' चा शुभारंभ केला. या योजनेस प्रचंड प्रतिसाद मिळाला.इ.स. १९९२ मध्ये बँकेने ५० वर्षे पूर्ण केली होती पण त्यावेळेस चीनी आक्रमणामुळे देश संकटात होता. त्यामुळे बँकेने सुवर्णमहोत्सव साजरा केला नाही. त्या वर्षीचा सारा लाभांश भागधारकांनी राष्ट्रीय संरक्षण निधीला दिला व सहकारी क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला. इ.स. १९६७ मध्ये पंढरपुरला पुराने

वेढा दिला. त्यावेळी बँकेने पूरग्रस्तांना मदत केली होती. इ.स. १९६८ मध्ये कोयना परिसरात भूकंप झाला यावेळी बँकेने भूकंपग्रस्तांना घोंगडयांचे वाटप केले होते. शिवाय भूकंपग्रस्तांना १,५०१ रु ची आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली होती.

इ.स. १९७२–७३ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता.हे वर्ष बँकेचे हिरक महोत्सवी म्हणजे साठावे वर्ष होते.मात्र दुष्काळामुळे बँकेने हा कार्यक्रम रद्द केला व महोत्सवासाठी होणाऱ्या पैशाचा योग्य वापर केला व दुष्काळ निधीस सढळ हाताने मदत केली. इ.स. १९७५–७६ वर्षातगरीब व शिकाऊ विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांचे वाटप करून समाजसाक्षरतेस प्रोत्साहन दिले. इ.स.. १९८० मध्येगुजरातेत मोरवी येथे पुरात सापडलेल्या नागरिकांना आर्थिक मदत बँकेने पाठविली.गारपीटीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांच्या मदत निधीस देणगी दिली, इतकेच नव्हे तर कुटुंबनियोजनासाठी आर्थिक मदत केली. बार्शी येथे अश्विनी कॅन्सर रिसर्च व रिलीफ सोसायटीने ग्रामीण जनतेसाठी कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याची योजना केली व एक लाख रूपयांची देणगीही बँकेने तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.मोहनराव पाटील यांच्या शुभहस्ते दिली.[३९] बँकेने आपल्या वाटचालीत अनेक सामाजिक संस्थांना आर्थिक मदत केली आहे. तसेच इ.स. १९८५–८६ साली पंढरपूर शहर व तालुक्यातील अनेक माध्यमिक शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना गणवेशाचे बँकेमार्फत वाटप करण्यात आले होते.[४०]

इ.स. १९८६–८७ च्या कालखंडात भीमा नदीला मोठा महापूर आला. यावेळी बँकेने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांना ५१,००० रूपये पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी दिला. त्याचबरोबर बँकेने सामाजिक बांधिलकीचे भान ठेऊन सभासदांना गंभीर स्वरूपाचा आजार झाल्यास वैद्यकीय मदत व गरीब सदस्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास अंत्यविधीसाठी सुद्धा मदत देण्याचे कार्य सुरू केले. त्याचबरोबर सर्व सोईनी युक्त अशी रूग्णवाहिका, शववाहिका, ना नफा ना तोटा या तत्वावर चालू केली. इ.स. १९९५ –९६ मध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बार्शीला महिला मेळाव्याचे आयोजन केले. तसेच आरोग्य शिबीराचे आयोजन करून गरजू कुष्ठरोग्यांना कॅलिपर्स, कुबडया, पोलिओग्रस्तांना तीन चाकी सायकली विनामूल्य देण्यात आले. २००३ साली दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली होती. बँकेने सामाजिकतेचे भान ठेऊन दुष्काळ सदृश्य स्थितीतील गावांना टँकरद्वारे

पाणीपुरवठा केला. वाडया वस्त्यांवरील पाण्याच्या साठयांची चणचण भासणाऱ्या ठिकाणी पाण्याच्या टाक्यांचे वाटपही केले. तसेच उत्कृष्ट समाज प्रबोधन करणाऱ्या गणेशोत्सव व नवरात्र मंडळांना पारितोषिक देऊन सन्मानित केले.[४१]

बँकेने सामाजिक बांधिलकी म्हणून गुजरात भूकंपग्रस्तांना ५,००,००० रू.ची भरीव आर्थिक मदत केली होती.तसेच सर्व बँक कर्मचाऱ्यांनी १ दिवसाचे वेतन भूकंपग्रस्तांसाठी पाठविले होते.बार्शी येथील लायन्स क्लब व रोटरी क्लब यांना जनसेवा अधिक प्रभाविपणे करता यावी यासाठी प्रत्येकी एक ॲम्ब्युलन्सदेणगी रूपाने दिलेली आहे.[४२] दि.८ मार्च २००३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्ताने महिला मेळाव्याचे आयोजन केले होते. तसेच सदर मेळाव्याच्या निमित्ताने 'भारतीय संस्कृतीतील स्त्री 'या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. तसेच महिलांच्यासाठी विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. सोलापूर येथील दंगलग्रस्त व्यक्तिंना मदत म्हणून बँकेतर्फे २,००,००० रूपयेची आर्थिक मदत दिली[४३].

इ.स. २००४–२००५ या अहवाल सालात बँकेच्या वतीने उच्च माध्यमिक परिक्षेत राज्यात मराठी,संस्कृत विषयात सर्वप्रथम आलेल्या व सोलापूर जिल्ह्यात सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यास अनुक्रमे श्री.संत ज्ञानेश्वर महाराज सुवर्णपदक ,श्री बाबा महाराज पाध्ये सुवर्ण–पदक आणि श्री संत तुकाराम महाराज सुवर्ण पदक प्रदान करणेचा कार्यक्रम तसेच लोकसेवा आयोग, अभियांत्रिकी, माध्यमिक शालांत परीक्षा व इतर गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दक्षिण भारतात आलेल्या त्सुनामी लाटांमुळे झालेल्या राष्ट्रीय आपत्तीस मदत म्हणून बँकेतर्फे ५,००,००० रूपयेव सर्व कर्मचाऱ्यांतर्फे एक दिवसाचे वेतन आर्थिक मदत म्हणून 'मुख्यमंत्री सहाय्यता निधीस 'पाठविण्यात आली.[४४] १९८९–९० मध्ये भारत व जग आर्थिक संक्रमणाच्या अवस्थेतून जात असताना आर्थिक सक्षमतेसाठी तळागाळातील शेवटच्या घटकाला स्वयंपूर्ण करण्यासाठी लोकांना लघुउद्योग, किरकोळ व्यापार, छोटे वाहतूकदार, स्वयंरोजगार करणारे ग्रामीण कारागीर यांना बँकेने सर्वोतोपरी मदत व सुयोग्य कर्जपुरवठा केला आहे.[४५]

### ➢ दि.पंढरपूर मर्चन्टस को.ऑप.बँक लि.पंढरपूर आणि सामाजिक बांधिलकी –

दि.पंढरपूर मर्चन्टस को.ऑप बँकेने सामाजिक भान ठेऊनआतापर्यंत अनेक कार्ये केली आहेत. या बँकेने रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने पंढरपूर येथील वा.बा.नवरंगे बालकाश्रमास

१०,००० रूपये तसेच मुख्यमंत्री दुष्काळ निधीस २५,००० रूपये मदत दिली. त्याचप्रमाणे इतर सामाजिक संस्थांनाही बँकेने देणगी दिली आहे.[४६] बँक सभासद, खातेदारांचे ज्याप्रमाणे हित पाहते, तसेच दुर्बल घटकांसाठी बँकेने मोठया प्रमाणात कर्जाचे वाटप केलेले आहे. बँकेने सुशिक्षित, बेरोजगार, मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया दुर्बल व कमकुवत घटकांना व गरजवंताना अर्थसहाय्य केले आहे. व त्यांना समाजामध्ये स्वावलंबी व मानवाचे जीवन जगण्यास मदतीचा हात दिला आहे. त्याचप्रमाणे सन १९८७–८८ हे वर्ष निवासी वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले होते त्यास अनुसरून नवीन घरबांधणीसाठी जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले होते.[४७]बँक सभासदाचे खातेदाराचे हितासाठी ज्याप्रमाणे तत्पर आहे. त्याचप्रमाणे सामाजिक हिताकडे लक्ष देत आहे. पंढरपूर येथे इ.स. १९८५–८६ पर्यंत रक्तपेढीची सोय नव्हती. सदर सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टिने पंढरपूर येथील इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे मदतीने रक्तपेढी उभी करण्यात आली आहे. सदर रक्तपेढी उभी करण्यासाठी बँकेने २५,००० रूपयांची मदत केली होती.[४८] या बँकेने दुष्काळ निवारणार्थ पाणी टंचाईच्या काळात १०,००० रूपये पाण्याच्या टाकीसाठी शासनाकडे सुपूर्त केलेले होते. त्याचप्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत याप्रमाणे अनुदान दिलेले आहे. तसेच बँकेने वारकऱ्यांना वैदयकीय सुविधा दिलेल्या आहेत.[४९] बँकेने पंढरपूर शहरातील व बँकेच्या कार्यक्षेत्रातील विविध सामाजिक, शैक्षणिक संस्थांना, व्यक्तिंना आर्थिक व जाहिरात रूपाने देणग्या दिलेल्या आहेत. ओरिसा राज्यात आलेल्या महापुराच्या वेळी महापूर पिडितासाठी अर्थसहाय्य देऊनआपली निष्ठा व कर्तव्ये यांचे बँकेने सदैव पालन केलेले आहे.[५०]

बँकेने प्रामुख्याने व्यापारी व मध्यम वर्गीय नोकरदार वर्गास सुलभ हप्त्याने तसेच समाजातील आर्थिक दुर्बल घटकास धंदयासाठी भांडवल, मालवाहतूक, ट्रक, हॉटेल, बेकरी, मुद्रण व्यवसायासाठी कर्ज, तसेच पंढरपूर येथे भरणाऱ्या यात्रेत लहान लहान व्यापारी वर्गास नैमित्तिक कर्ज पुरवठा केलेला आहे अशा प्रकारे बँकेने सामाजिक बांधिलकी व देशाचे आर्थिक संतुलन साधत स्वतःचा विकास उत्तम प्रकारे केलेला आहे. इ.स.१९७४ मध्ये बँकेने स्वतःचे वास्तुत प्रवेश केल्यापासून दि इंडियन रेडक्रॉस सोसायटीसारख्या सेवाभावी संस्थेस, बालकांना ट्रीपल पोलिओ, बी.सी.जी. इत्यादी डोस व इंजेक्शन देण्याकरिता दर बुधवारी बँकेची इमारत विनामुल्य ठराविक वेळेपुरती वापरावयास दिली आहे. या अगोदर बालकांना हे डोसेस व

इंजेक्शन देण्यासाठी पालकांना सोलापूर येथे जाऊन येणे खर्चाचे होत असे त्यामुळे गरीब जनतेची पंढरपूर येथे सोय झाली. अशाप्रकारे ही बँक केवळ बँकेचे सभासद व खातेदार यांच्याच उत्कर्षाचा विचार न करता सामाजिक ऋणातून काही प्रमाणात मुक्त होणेसाठी सतत प्रयत्न करीत आहे. गरजेच्यावेळी रक्त पुरवठा वेळेवर मिळू शकत नव्हता इंडियन रेडक्रॉस सोसायटीने पंढरपूर येथे रक्तपेढीची मुहुर्तमेढ रोवली. तिच्या उभारणीस बँकेने मदत केली तसेच दि इंडियन रेडक्रॉस सोसायटीस वातानुकुलीत हॉल बांधण्यासाठी दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑप. बँकेने सहकार्य केले होते.[५१]

## ➢ सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर आणि सामाजिक व आर्थिक विकास–

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंढरपूर तालुक्यातील विविध शाखांनी सहकाराच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्याचा मोठा सामाजिक व आर्थिक विकास केलेला आहे.

**सहकार अर्थव्यवस्थेचा कणा –**

सहकारी बँकांच्या गाव खेडयातील विस्तारलेल्या शाखांनी ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने अर्थक्रांति केली. ग्रामीण लोकांना शेती,उद्योग, व्यापार व इतर कारणांसाठी वित्तपुरवठा करून ग्रामीण भागाचा चेहरा–मोहरा बदलण्याचे काम सहकार चळवळीने केले आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सामान्य शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत जाऊन कर्ज दिले. त्याचा परिणाम शिवारे फुलली. सुबत्ता आली, ग्रामीण लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली. शैक्षणिक व आर्थिक विकास झाला. मागेल त्याला कर्जे देऊन बँकेने खऱ्या अर्थाने हा जिल्हा सुजलाम, सुफलाम केला. माढा, माळशिरस, पंढरपूर या तालुक्यांमध्ये खरी अर्थक्रांति झाली.[५२]

**फळबाग –**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सुरूवातीच्या काळापासून शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी भक्कम पाठबळ दिले आहे. बँकेने आर्थिक मदतीबरोबर फळबाग लागवडीचे तंत्रज्ञान आणि मार्गदर्शन केले आहे.वेगवेगळया प्रकारच्या फळबागांना बँकेने कर्जपुरवठा केला आहे. उजनी धरणाचे पाणी शेतात आल्याने आणि जिल्हा बँकेने आर्थिक मदत व मार्गदर्शन केल्यामुळे पंढरपूर तालुक्यातील शेतीमध्ये आमूलाग्र बदल झाला. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केल्यानंतर बँकेच्या वतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेतकरी

मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन फळबाग लागवड व विकासाचे मार्गदर्शन केले जाते.या उपक्रमाला बँकेच्या संचालक मंडळाने भक्कम पाठिंबा दिला. या उपक्रमाची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली आणि संपूर्ण राज्यात हा उपक्रम राबविण्यात आला. फळबाग वाढीसाठी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एक प्रकारचा आदर्शच महाराष्ट्रासमोर घालून दिला.[५३]

**शेतीला आर्थिक साहय–**

उजनीचे पाणी शेतीमध्ये आले परंतु शेतीमधून उत्पन्न घेण्यासाठी शेतकऱ्यांची ओढाताण होऊ लागली. ही वस्तुस्थिती ओळखून सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांना आर्थिक साहय करण्याचे ठरविले. गावोगावी सहकारी सोसायटयामार्फत शेतीला कर्जपुवठा सुरू केला. त्यासाठी ग्रामीण भागामध्ये जिल्हा बँकेच्या शाखा सुरू केल्या. शेती विकासासाठी शेतकऱ्यांना पीक कर्ज, पाईपलाईन, ट्रॅक्टर, हार्वेस्टर, मळणीयंत्र, ठिबक सिंचन स्पिंकलर विहीर खोदणे व जमिनीचे सपाटीकरण या कार्यासाठी मोठया प्रमाणात कर्जपुरवठा उपलब्ध करून दिला. तसेच शेतीबरोबर जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय, मत्स्य व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व रेशीम उद्योग यासारख्या जोडधंदयांना बँकेने कोटयवधी रूपयांचा कर्जपुरवठा करून आर्थिक पाठबळ दिले आहे.[५४]

**दूग्ध व्यवसायाला मदत –**

पंढरपूर तालुक्यातील धवलक्रांतीचा पाया सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने घातला आहे. शेतकऱ्यांना संकरित गायी खरेदी करण्यासाठी जिल्हा बँकेने कर्जपुरवठा केला. जिल्हा बँकेकडून मिळालेली आर्थिक स्वरूपाची मदत दूध संघाने प्राथमिक दूध उत्पादक सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वाटप केली.[५५]

**कृषि औद्योगिक विकास –**

साखर कारखाने उभारणीसाठी स्वभांडवल ३० टक्के असणे गरजेचे असते. हे स्वभांडवल ३० टक्के गरीब शेतकऱ्यांकडून उभे करणे कारखान्यापुढील आव्हान होते.या कामात जिल्हा बँकेने शेतकऱ्यांना सोसायटीच्या माध्यमातून १:५ याप्रमाणे रूपये २०० मार्जिनवर १८०० रूपये कर्ज मंजूर करण्याचा क्रांतिकारक निर्णय घेऊन साखर कारखाने उभे करण्याचे महान काम केले. त्याचबरोबर कारखान्यांना बँकेने दीर्घ मुदतीची कर्जे, खेळते भांडवल कर्ज,

स्टोअर माल हाय पोथिकेशन कर्जे उपलब्ध करून देऊन साखर कारखान्यांना वित्तपुरवठा केला. जिल्हा बँकेने शेती विकासासाठी लागणारा वित्तपुरवठा करून पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने विकास केला. त्याचबरोबर शेतीपूरक उद्योगांना कर्जपुरवठा करून हे उद्योग उभे केले आहेत.[५६]

**बँकिंग सोयी सुविधा–**

पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागामधील जनतेला बचत व काटकसरीची सवय लावण्यामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंढरपूर तालुक्यातील शाखाचे योगदान महत्त्वाचे आहे.ज्या ठिकाणी राष्ट्रीयीकृत व खाजगी बँका आपल्या शाखा काढत नाहीत त्याठिकाणी बँकेने आपल्या शाखा काढल्या आहेत.ग्रामीण भागातील जनतेला बँकींग सोयी व सुविधा उपलब्ध करून देण्यात जिल्हा बँकेची भूमिका महत्त्वाची आहे.[५७]

- **पंढरपूर तालुका प्राथामिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित पंढरपूर –**

पंढरपूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित पंढरपूर या सहकारी संस्थेने शिक्षकांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी सर्व सभासदांना आर्थिक सहाय्य केलेले आहे. सभासदांना अल्पदरात पंखे व ब्लँकेटस पुरविलेले आहेत. तसेच एस.एस.सी. परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या सभासदांच्या मुलांना प्रत्येकी २५१ रूपयाचे बक्षीस पतसंस्थेमार्फत देण्यात येते.[५८]

- **यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, गुरसाळे ता.पंढरपूर आणि सामाजिक व आर्थिक विकास –**

यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्थेने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊनइ.स. २००४–०५ मध्ये मुख्यमंत्री सहायता निधीस २५,००० रूपये दिले होते. तसेच या पतसंस्थेने तालुक्यातील शेतकऱ्यांना छोटया उद्योजकांना विविध स्वरूपाची कर्जे देऊन त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे.[५९]

- **आर्थिक सहकारी संस्था आणि शेती विकास–**

सहकारी चळवळीच्या माध्यमातून कृषि पतपुरवठा, शेती, पणन प्रक्रिया सूत गिरण्या, साखर कारखाने, दूग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम उदयोग, औद्योगिक प्रक्रिया इत्यादी

अनेक क्षेत्रात सहकारी संस्था पोहचल्या आहेत.सहकारी चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये इ.स.२०१२ पर्यंतविविध प्रकारच्या २,२४,००० सहकारी संस्था कार्यरत आहेत. राज्यातील निम्म्याहून अधिक लोक या चळवळीशी संबधित असून या संस्थांचे ५.५० कोटीहून जास्तीचे सभासद आहेत. या संस्थांच्या माध्यमातून २० लाखाहून जास्त लोकांना रोजगाराची संधी मिळाली आहे या सर्व सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल २.३७ लाख कोटी रूपयाहून जास्त आहे.[६०]

पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण भागात सहकार क्षेत्राने महत्त्वाचे कार्य केले आहे. सहकारी चळवळीमुळे उत्पन्नाची साधने निर्माण झाल्याने ग्रामीण भागातील सावकारशाही काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे. पंढरपूर तालुक्यात सहकारी क्षेत्राने वित्त पुरवठयात मक्तेदारी निर्माण केल्याचे दिसून येते. शेतीसाठी विविध सहकारी संस्थेद्वारा अल्पकालीन, मध्यम व दिर्घ मुदतीचे कर्ज दिले जाते. उदा. जिल्हा मध्यवर्ती बँक, अर्बन बँका, पतसंस्था, दूध संस्था, सहकारी साखर कारखाने इत्यादी अनेक सहकारी संस्थांनी पंढरपूर तालुक्यातील कृषि विकासाला चालना दिली आहे. तालुक्यातील शेतीच्या विकासासाठी अनेक सहकारी संस्थांनी हातभार लावलेला आहे. त्यातील शिखर सहकारी संस्था म्हणून सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा उल्लेख करावा लागेल. या बँकेने सहकारी पद्धतीने शहरी व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक विकासाकरिता अल्प मध्यम व दिर्घ मुदतीची कर्जे मोठया प्रमाणात दिली आहेत. त्याचबरोबर सुधारित बि–बियाणे शेतीच्या आधुनिक अवजारांसाठी कर्ज, पाईप लाइन व विहिरीसाठी कर्ज वाटप करण्यात आले आहे.[६१]

सहकारी बँकांनी शेतीच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या आहेत. पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती विषयक मार्गदर्शन करण्यासाठी विविध शिबिरे, व्याख्याने, यांच्या मदतीने मार्गदर्शन केलेले आहे. तसेच तालुक्यातील खरेदी विक्री संस्थाना मोठया प्रमाणात कर्जपुरवठा केलेला आहे. या खरेदी–विक्री संस्था शेतीच्या प्रगतीसाठी नेहमी कार्यतत्पर असतात. तालुक्यातील शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांना त्यांच्या खेळत्या भांडवलासाठी कर्जपुरवठा केलेला आहे. अनेक औद्योगिक संस्थानाही कर्जपुरवठा केलेला आहे. परिणामी त्यातून मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी हा उद्देश आहे. तसेच बिगरशेती संस्थांनाही त्यांच्या प्रगतीसाठी मदत केलेली आहे. दूध उत्पादक संस्था, पाणी पुरवठा संस्था,

यांनाही कर्जपुरवठा केलेला आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा पंढरपूर या संस्थेमार्फत पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळ प्रबळ, सुदृढ व निकोप वाढावी व तिच्यामार्फत समाजातील सर्व घटकांना त्यांच्या प्रगतीसाठी कर्ज पुरवठा करून अनेकविध विकासाची कार्ये केली आहेत. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी व शेती उत्पादनात वाढ व्हावी यासाठी शेतकऱ्यांना बैलजोडी, इलेक्ट्रीक मोटार, सबमर्सिबल पंप, पाईपलाईन, बोअरवेल व पंपीग सेट, ठिबक सिंचन, विहीर दुरूस्ती, वाहन खरेदी, साखर कारखाना शेअर्स खरेदी, जमीन सुधारणा यासाठी बँकेने मोठी मदत केली आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत बदल झाला आहे.[६२]

## ➢ सामाजिक बांधिलकी आणि सहकारी चळवळ –

पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीने सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातूनग्रामीण क्षेत्रात रस्त्यासारख्या मूलभूत सेवा निर्माण केलेल्या आहेत. तालुक्यातील अनेक उपसा जलसिंचन योजनांना कर्जपुरवठा केलेला आहे. सहकारी चळवळ ही एक सामाजिक व सार्वत्रिक चळवळ असून तिला नैतिक अधिष्ठान आहे. या चळवळीमुळे व्यक्तिमध्ये एकता, बंधुभाव, सहजीवनाची व सलोख्याची भावना वृध्दींगत होते. सहकार चळवळीमुळे व्यक्तिच्याआपापसातील मतभेदाचे समूळ उच्चाटन करून त्याचे जीवन सुखी व कल्याणकारी बनविण्यात मदत केली जाते. अनेकदा सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था आर्थिक विकासाचे काम सहकारी संस्थेकडे सोपवू इच्छितात व त्यांना हे काम करण्यास वेळोवेळी मदत करतात. पंढरपूर तालुक्यातील अनेक सहकारी संस्थांनी शैक्षणिक संस्था चालविणे, दवाखाने चालविणे, कुटुंब नियोजन तसेच महिला सक्षमीकरण यामध्ये साक्षरता, वसतिगृहे चालविणे, महिलांचे पुनर्वसन इत्यादी बाबींचा समावेश होतो. त्याचप्रमाणे पंढरपूर तालुक्यातील अनेक सहकारी संस्थांनी मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ निवारण निधीला मोठया प्रमाणात आर्थिक सहाय्य केले आहे.[६३]

श्री सुधाकर परिचारक यांनी तालुक्यातील सहकारी चळवळीला योगदान देत असताना तालुक्यातील विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून भूंकप, चक्रीवादळ, त्सुनामी, महापूर अशा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तसेच, कारगील युद्धामध्ये वीरगती प्राप्त झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना पंढरपूर तालुक्यातील व सर्व सहकारी संस्थांच्या माध्यमातून भरघोस आर्थिक मदत

दिली आहे. तसेच पंढरपूर येथे धन्वंतरी सहकारी रूग्णालयाची स्थापना करून गोरगरीब रूग्णांना अल्पदरात वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.[६४] प्रशांत परिचारक यांनाही अपंगत्व व शस्त्रक्रीया शिबिर, कर्करोग, रोगनिदान, नेत्रदान, रक्तदान अशा विविध मोफत शिबिरांचे आयोजन केलेले आहे. तसेच पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य वाटप, आर्थिक मदत, दुष्काळग्रस्त भागांना पाण्याच्या टाक्या, टॅकरद्वारे पाणी वाटप, गारपीट ग्रस्तांना नुकसान भरपाईसाठी शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत.[६५]

कल्याणराव काळे यांनाही पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीच्या माध्यमातून शेतकरी व कामगारांच्या हितासाठी अनेक योजना राबविल्या. अपघातकालीन तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी चारा छावणी पूरग्रस्तांसाठी अन्नवाटप, सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळे इत्यादी विधायक कार्ये तसेच कामगारांसाठी औषधोपचार, तालुक्यातील मुलांसाठी शैक्षणिक व्यवस्था, क्रिडामंडळे, वाचनालये, बागबगिचा इत्यादी सुविधा देण्यासाठी मोठे प्रयत्न केले. सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळयांच्या निमित्ताने त्यांनी आतापर्यंत ६५० च्या वर विवाह संपन्न केलेले आहेत. तसेच सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून गोर–गरीब जनतेला तातडीची व अल्पदरात वैद्यकीय सुविधा मिळावी म्हणून पंढरपूर येथे जनकल्याण हॉस्पिटलची सोय केलेली आहे. या हॉस्पिटलच्या माध्यमातून तालुक्यातील गोरगरीब रूग्णांना सवलतीच्या दरात रूग्णसेवा देण्यात येत आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी शेतकरी मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे.[६६] याशिवाय तालुक्यातील तात्यासाहेब गुर्जर, औदुंबर पाटील, पांडुरंग डिंगरे, प्रकाश पाटील, वसंतराव काळे, भारत भालके, तात्यासाहेब पाटील, यशवंतभाऊ पाटील, राजबापू पाटील, इत्यादी अनेक नेत्यांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून विविध स्वरूपाची कामे केलेली आहेत.

## ➢ ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय –

पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय आणि विकास करण्यात सर्वात मोठा हातभार सहकारी चळवळीने आणि यातील राजकीयकरणाने लावला. सहकारी चळवळीच्या यशाचा हा एक महत्त्वाचा मानबिंदू आहे. या चळवळीच्या अनुभवामुळेच ग्रामीण भागातील अनेक नेते व कार्यकर्ते आजजिल्ह्यात व राज्यातही अनेक क्षेत्रात आपल्या अनुभवी नेतृत्त्वाची साक्ष पटवून देत आहेत.[६७]

महाराष्ट्रात या चळवळीला अभ्यासू व ध्येयवादी नेतृत्त्व लाभले. यामध्ये वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, शंकरराव मोहिते–पाटील, शरदचंद्रजी पवार,औदुंबर पाटील गणपतराव देशमुख, सुधाकरपंत परिचारक इत्यादींचा समावेश होतो. या नेत्यांनी तळमळीने व ध्येयवादाने झपाटून राज्यात सहकारी चळवळ रूजविण्याचा व वृद्धिंगत करण्याचा नेटाने प्रयत्न केला. आर्थिक मंदीच्या काळातही या संस्था टिकून रहाव्यात या संस्थानी स्वतःच्या पायावर उभे राहावे, त्यांनी दुर्बल वर्गांना अधिकाधिक अर्थसहाय्य द्यावे, आपल्या कामाचे विविधीकरण करावे यासाठी प्रयत्नपूर्वक पावले उचलली आहेत. याचा कित्ता पंढरपूर तालुक्यातील नेतृत्त्वांनी गिरविला आहे.[६८]

## ➢ सहकारी चळवळ आणि दूग्ध व्यवसाय –

प्राचीन काळापासून भारतात दूध व्यवसाय सुपरिचित होता. मात्र या व्यवसायाला अवकळा आली होती. मात्र सध्या सहकाराच्या माध्यमातून हा व्यवसाय भरभराटीस आला आहे. ग्रामीण भागातील लहान शेतकरी, भूमिहिन मजूर यांना उदरनिर्वाहाचे साधन पुरविण्याचे कार्य या व्यवसायाने केले आहे.महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुधाचे उत्पादन वाढविणे, ग्रामीण भागातील छोटया शेतकऱ्यांना किफायतशीर जोडधंदा उपलब्ध करून देणे, खेडयातील भूमिहीन, शेतमजूर आणि अल्पउत्पन्न गटातील बेरोजगार यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे या दृष्टिने महाराष्ट्रातील सहकारी दूग्ध व्यवसायाने महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. सहकारी चळवळीने ग्रामीण भागात दूध उत्पादनाच्या आणि प्रक्रिया साधनांच्या बाबतीत संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ करून दूध उत्पादकांना खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे.[६९] सध्या दूध उत्पादन व्यवसाय हा मुख्य व्यवसाय झाला आहे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये या व्यवसायाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या व्यवसायामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात व राहणीमानात सुधारणा झालेली आहे. अल्प व अत्यल्प भूधारक आणि भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असते या लोकांना दूग्ध व्यवसायामुळे अधिक रोजगार व अधिक उत्पन्न मिळू लागल्यमुळे त्यांचे आर्थिक पुनर्वसन सहज शक्य झाले आहे. शेतीमधून मिळणारे उत्पन्न अपुरे असल्याने ग्रामीण भागातील लोकांची बचतशक्ती फारच मर्यादित असते मात्र सहकारी दूग्ध

व्यवसायामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन बचतीची सवयही लागलेली दिसते. विविध दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती, पूरक व्यवसाय व सुलभ तंत्रामुळे ग्रामीण भागात सुबत्ता निर्माण होण्यास मदत झाली आहे.[७०]

सध्या पंढरपूर तालुक्यात जिल्हा दूध संघ आणि चंद्रभागा दूध डेअरी या दोन तालुका पातळीवर कार्य करणाऱ्या संस्था कार्यरत आहेत. या दूध संघांनी आम्रखंड, श्रीखंड, लस्सी, बासुंदी, पनीर, पेढे, यासारख्या उपपदार्थाची निर्मिती सुरू केली आहे. परिणामी ग्रामीण व शहरी भागातील अनेक सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.[७१]सहकारी दूग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शेतीला जोडधंदा मिळालेला आहे. ग्रामीण भागातील दारिद्रय कमी होण्यास या व्यवसायामुळे मदत झाली आहे. फूड ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाच्या अहवालानुसार शेकऱ्यांच्याकडे एक गाय असेल तर १६ टक्के आणि एक म्हैस असेल तर २४ टक्के दारिद्रय कमी होते.[७२] सहकाराच्या माध्यमातून झालेल्या धवल क्रांतिचे फायदे संपूर्ण पंढरपूर तालुक्याला मिळालेले आहेत. सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ, मर्यादित सोलापूर शाखा पंढरपूर तसेच चंद्रभागा दूध डेअरी या पंढरपूर तालुक्यातील सहकारी दूध उत्पादक संस्थांनी शेतकऱ्यांना कृषि विकासासाठी, पशुधन वाचविण्यासाठी दुष्काळाच्या वेळी तसेच शेतकरी सभासद व संघाचे कर्मचारी यांना वेळोवेळी आर्थिक मदत केलेली आहे. शेतकरी सभासद व कर्मचारी यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत बदल घडवून आणण्यात हया दूध संस्थाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.[७३]एकंदरीत समाजाप्रती विधायक दृष्टीकोन ठेऊन पंढरपूर तालुक्यातील विविध सहकारी संस्थांनी सामाजिक बांधिलकीची जबाबदारी घेऊन त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध संस्था, महाविद्यालये, दवाखाने, सांस्कृतिक संस्था, सामाजिक संस्था, क्रीडा संस्था, वाचनालये इत्यादींना धर्मादाय निधीतून मदत केली आहे. पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीमुळे तालुक्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास झालेला आहे. येथील सहकारी चळवळीच्या विकासामुळे मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली अशा शहरांकडे होणारे ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर स्थानिक रोजगार मिळाल्यामुळे कमी झाले आहे. गेल्या ५० ते ६० वर्षात पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीची निःसंशय वाढ झाली असून तिचे लोण खेडोपाडी पसरले आहे. सहकाराने नवनवीन क्षेत्रात प्रवेश केला असून त्याच्या कक्षा रूंदावल्या आहेत.

## संदर्भ –


१) बावीसकर बी.एस.; महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळ,भोळे भा.ल., किशोर बेडकिहाळ (संपा.), बदलता महाराष्ट्र, डॉ.एन.डी.पाटील गौरव ग्रंथ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा,प्रथमावृत्ती, १६ जुलै २००३, पृ.७९.

२) कर्णिक मधु मंगेश (संपा.); सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१०, भाग–१, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, जानेवारी २०११ पृ.५०६

३) पारेकर दशरथ; सहकारी साखर उद्योग उत्कर्ष आणि वाताहत, तेजस पब्लिकेशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१५ पृ.२२,२३

४) रूपनवर वसंतराव; पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे सामाजिक योगदान, रोडे दीपक (संपा.) सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्रराज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे, पृ.२९

५) मुलाखत; लक्ष्मण नामदेव पवार, चिलाईवाडी, ता. पंढरपूर, दिनांक २० मे २०१५.

६) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, गुरसाळे, ता. पंढरपूर जि.सोलापूर, सातवा वार्षिक अहवाल, सन १९८०– ८१, पृ.१०, ११.

७) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, १९वा वार्षिक अहवाल, १ एप्रिल १९९३ ते ३१ मार्च १९९४, पृ.१२.

८) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, २५वा रौप्य महोत्सवी अहवाल, १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २०००, पृ.७.

९) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, २६वा वार्षिक अहवाल, २०००–२००१, पृ.७.

१०) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, २७ वा वार्षिक अहवाल, २००१ – २००२, पृ.९.

११) चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि. वसंतनगर, भाळवणी, ता. पंढरपूर जि.सोलापूर, ११ वा वार्षिक अहवाल, सन २००१– २००२, पृ.६.

१२) चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि. वसंतनगर, भाळवणी, ता. पंढरपूर जि.सोलापूर, १२ वा वार्षिक अहवाल, सन २००२– २००३, पृ.८.

१३)मुलाखत; सुनेत्रा विजयसिंह पवार,पंढरपूर, दिनांक २० मे २०१७.

१४)मुलाखत; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर,दिनांक१० मे २०१५.

१५)श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, १२ वा वार्षिक अहवाल, १९८५ – ८६, पृ.११.

१६)टाले (डॉ) पद्माकर ; महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान, जोगदंड (डॉ) आनंद (संपा.), सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे, ऑक्टोबर २०१६, पृ.२७

१७)पारेकर दशरथ ; सहकारी साखर उद्योग उत्कर्ष आणि वाताहत, उपरोक्त, पृ.२४

१८)बावीसकर बी.एस.; महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळ, भोळे भा.ल., किशोर बेडकिहाळ (संपा.),उपरोक्त पृ.७८.

१९)मुलाखत; भारत शिवाजी लाडे, पंढरपूर, दिनांक ५. एप्रिल २०१६

२०)श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, ता.पंढरपूर, ३० वा वार्षिक अहवाल, २००४ –२००५, पृ.८.

२१)श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, ता.पंढरपूर, २६ वा वार्षिक अहवाल, २००० –२००१, पृ.८.

२२)चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.वसंतनगर, भाळवणी, ता. पंढरपूर जि.सोलापूर, १३ वा वार्षिक अहवाल, सन २००३– २००४, पृ.१२.

२३)कवडे सुधाकर, 'झुंज', सहकार शिरोमणी वसंतराव काळे चरित्र, विठाई प्रकाशन, पंढरपूर, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१४, पृ.१५५.

२४)चंद्रभागा सहकारी साखर कारखाना लि.वेणुनगर, ता. पंढरपूर, १४ वा वार्षिक अहवाल, सन २००४– २००५, पृ.८.

२५)मुलाखत;भारत शिवाजी लाडे, पंढरपूर, दिनांक ५. एप्रिल २०१६

२६)श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर,ता. पंढरपूर, ७ वा वार्षिक अहवाल, १९८० –१९८१, पृ.१२.

२७)श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर,ता. पंढरपूर, ११ वा वार्षिक अहवाल,१९८४–८५पृ.१६

२८) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, १२ वा वार्षिक अहवाल, १९८५ – १९८६, पृ.१८.

२९) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, १३ वा वार्षिक अहवाल, १९८६ – १९८७, पृ.१२.

३०) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, २४ वा वार्षिक अहवाल, १९९८– ९९, पृ.८.

३१) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि.वेणुनगर,, २८ वा वार्षिक अहवाल, २००२ – ०३, पृ.१०,११.

३२) कित्ता, पृ.१२

३३) .मुलाखत; जालिंदर बागल, गादेगाव, ता. पंढरपूर,दिनांक २५ मे २०१७.

३४) श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर,, २९ वा वार्षिक अहवाल सन २००३–०४, पृ.१२

३५) मुलाखत; प्रशांत प्रभाकर परिचारक, पंढरपूर, दिनांक २० एप्रिल २०१६.

३६) कोरे तात्यासाहेब, महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी व ग्रामीण विकास, शिंदे(डॉ) आबासाहेब व इतर (संपा); दि कोल्हापूर अर्बन को–ऑप. बँक लि.कोल्हापूर, अमृत महोत्सवी स्मरणिका १९१३– १९८८, दि कोल्हापूर अर्बन– को–ऑप.बँक, लि. कोल्हापूर, पृ.१४४

३७) शितोळे(डॉ)अनिल विजय; ग्रामीण भागाच्या रोजगार निर्मितीमध्ये सहकारी साखर कारखान्यांचे महत्त्वपूर्ण योगदान, जोगदंड (डॉ) आनंद (संपा), सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे, सप्टेंबर २०१४ पृ.२४

३८) ताठे विद्याधर(संपा), शतार्थश्री, शताब्दी गौरव गाथा १९१२ ते २०१२, दि. पंढरपूर अर्बन को–ऑप.बँक लि.पंढरपूर, २९ डिसेंबर २०१२, पृ.६५

३९) कित्ता

४०) दैनिक संचार, सोलापूर आवृत्ती, दिनांक२० जून १९८६, पृ.३

४१) ताठे विद्याधर (संपा.) ; उपरोक्त, पृ.६६

४२) दि.पंढरपूर अर्बन को–ऑप.बँक लि.पंढरपूर, ८९ वा वार्षिक अहवाल सन २०००–

२००१, पृ.६
४३) दि.पंढरपूर अर्बन को–ऑप.बँक लि.पंढरपूर, ९१ वा वार्षिक अहवाल सन २००२–२००३, पृ.६
४४) दि.पंढरपूर अर्बन को–ऑप.बँक लि.पंढरपूर, ९३ वा वार्षिक अहवाल सन २००४–२००५, पृ.१०
४५) ताठे विद्याधर(संपा), उपरोक्त, पृ.६६
४६) दि.पंढरपूर मर्चन्टस को–ऑप.बँक लि.पंढरपूर, २७ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद सन १९८६–८७, पृ.७
४७) दि.पंढरपूर अर्बन को–ऑप.बँक लि.पंढरपूर, २७ वा वार्षिक अहवाल सन १९८६–८७, पृ.५,६
४८) दि.पंढरपूर मर्चन्टस को–ऑप.बँक लि.पंढरपूर, वार्षिक अहवाल व ताळेबंद १९८५–८६, पृ. ८
४९) दि.पंढरपूर मर्चन्टस को–ऑप.बँक लि.पंढरपूर, ३२ वा वार्षिक अहवाल,१९९२– ९३ पृ.६
५०) दि.पंढरपूर मर्चन्टस को–ऑप.बँक लि.पंढरपूर, ३९ वा वार्षिक अहवाल सन १९९९–२०००. पृ. ७
५१) गानमोटे सु.वि ; कथा ही बँकेच्या उत्कर्षाची, जाधव वा.शं. (संपा.), दि.पंढरपूर मर्चन्टस को–ऑप.बँक लि.पंढरपूर, रोप्य महोत्सव स्मरणिका, पंढरपूर, ३० मे १९८७, पृ.२,४
५२) मोटे किसन वि. व इतर (संपा.) ; सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शताब्दी महोत्सव स्मरणिका २०१८, सोलापूर, मार्च २०१८, पृ.६२,६३
५३) कित्ता, पृ.७०, ७१
५४) कित्ता, पृ.६७
५५) कित्ता, पृ.७४
५६) कित्ता, पृ.८२,८३
५७) मुलाखत ; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर,दिनांक१० मे २०१५.
५८) पंढरपूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित पंढरपूर, सहावा वार्षिक अहवाल, सन १९९४ –९५.पृ.१६

५९) यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, गुरसाळे ता.पंढरपूर, १९ वा वार्षिक अहवाल सन २००५–०६ पृ.१३

६०) नलावडे प्रमोद(संपा.), लोकराज्य मासिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, सप्टेंबर २०१२, पृ.१२

६१) मुलाखत ; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर,दिनांक१० मे २०१५.

६२) कित्ता

६३) घाणेकर(डॉ)वि.वि., सहकारी चळवळीचे शंभर वर्षाचे अवलोकन व नवी आव्हाने, इन्स्टिटयुत ऑफ डेव्हलपमेंट ॲण्ड एज्युकेशन, पुणे, २००४, पृ. ८८

६४) मुलाखत ; सुधाकर रामचंद्रपरिचारक, पंढरपूर,दिनांक१० मे २०१५.

६५) मुलाखत; प्रशांत प्रभाकर परिचारक, पंढरपूर, दिनांक २० एप्रिल २०१६.

६६) मुलाखत; कल्याणराव वसंतराव काळे, वाडीकुरोली ता.पंढरपूर, दि. १४ डिसेबंर २०१६.

६७) रत्नपारखी संजय भीमाशंकर, सहकार चळवळ, राजकीयकरणाचे मूल्यमापन, फाले कृ.ल., किशोर (डॉ) फाले, सहकार चळवळ १९०४–०५ शतक लेखसंग्रह, निर्माण प्रकाशन, वर्धा, २००५, पृ. २६९

६८) खांदवे(डॉ) एकनाथ, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, कर्जत, दुसरी आवृत्ती, १५ ऑगस्ट २००९, पृ. ३६

६९) वाबगावकर रमेश (संपा.), महाराष्ट्र दुग्धव्यवसाय अंतरंग १९९२, डेअरी पब्लिकेशन्स, मुंबई, द्वितीयावृत्ती, नोव्हेंबर २०१३, पृ.२६;

७०) निमसे शितल संपत, दूग्ध व्यवसाय–एक शेतीवर आधारित उद्योग, निकम अविनाश रामलाल(संपा.) त्रैमासिक अर्थसंवाद, खंड ३ रा मराठी अर्थशास्त्र परिषद, बार्शी, ऑक्टोबर–डिसेंबर २०१३, पृ.१४७

७१) दैनिक लोकमत, सोलापूर आवृत्ती, दिनांक. ०२ जुलै २००८,पृ. ४

७२) पाटील (डॉ) जे.एफ., भालबा विभुते(डॉ), उपरोक्त, पृ. ७८

73) मुलाखत; बाळासाहेब महादेव राऊत–माळी, शेवते ता.पंढरपूर, दि. २५मे २०१७

# प्रकरण सहावे

# सहकार चळवळीच्या विकासातील अडचणी किंवा उणिवा

## ➢ प्रस्तावना

सहकार हा आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचा उत्कृष्ट असा मार्ग आहे. सहकाराद्वारे शोषणरहित समाजव्यवस्था प्रस्थापित करणे शक्य होते. कारण सहकारामध्ये सहकारी भावना, समानता, प्रामाणिकपणा, स्वयंशिस्त, स्वयंस्फूर्ती, विकास याबरोबरच सरकारचा मर्यादित हस्तक्षेप व मार्गदर्शन हे सर्व अपेक्षित आहे. या सर्व बाबींचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, महाराष्ट्रात गेल्या ५० ते ६०वर्षात सहकारी चळवळीने संख्यात्मक मजल मोठया प्रमाणावर मारलेली आहे. त्यात विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात खूप मोठया प्रमाणात ही चळवळ विकास करताना दिसून येत आहे. पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीने इ.स.१९८० नंतरच्या कालखंडात मोठा विकास केलेला आहे. मात्र खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणामुळे तालुक्यातील या चळवळीला मोठया अडचणीचा सामना करावा लागत आहे. पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीच्या सकारात्मक व धोरणात्मक बाबींचा अभ्यास करता सहकारातील संख्यात्मक वाढ होण्याबरोबरच गुणात्मक वाढ होताना दिसत नाही. तर तिचा आलेखही खालावताना दिसतो. तसेच तिची इ.स. १९९० नंतरच्या कालखंडात उत्तरोत्तर ऱ्हासाकडे वाटचाल होताना दिसत आहे. प्रस्तुत प्रकरणात पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीच्या विकासातील अडचणी किंवा उणिवा यांचा आढावा घेतलेला आहे. या अडचणींचा अभ्यास करताना ज्या मूल्यांवर सहकार चळवळीचा पाया आधारित आहे. ती मूल्ये बदलत्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीत सुसंगत आहेत का? आणि सहकारामध्ये असलेल्या किंवा निर्माण झालेल्या व्यवस्थात्मक दोषांचासहकार चळवळीच्या ऱ्हासास कितपत फटका बसला आहे. याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

जून १९९१ मध्ये तत्कालीनपंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्रीडॉ.मनमोहनसिंग या दोघांनी देशात नव्या आर्थिक धोरणाचा प्रारंभ करण्याच्या दिशेने विचार सुरू केला आणि २४ जुलै १९९१ रोजी केंद्रीय अर्थसंकल्प मांडताना केलेल्या भाषणात अर्थमंत्रीमनमोहनसिंग यांनी आर्थिक उदारीकरणाची द्वाही पुकारली. त्यानंतर भारतामध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि

खाजगीकरण या धोरणाचा प्रारंभ झाला.[१]

इ.स. १९९१ नंतरच्या कालखंडात कृषि–ओद्योगिक विकास प्रक्रियेतील सहकारी संघटन पद्धतीचे महत्त्व घटत गेले. याचे मुख्य कारण म्हणजे राष्ट्रीय नियोजनामध्ये सहकारी चळवळीकडे बघण्याची दृष्टि बदलली. प्रभावी राजकीय नेत्यांचा दृष्टिकोन बदलला. नवे आर्थिक धोरण व विशेषत: जागतिकीकरण यांच्या प्रभावाखाली स्पर्धात्मक बाजारपेठ, शासनाचा निर्हस्तक्षेप यासारख्या विचारामुळे शासनाने सहकारातून अंग काढते घ्यावे, भांडवल परत घ्यावे व सहकारासाठी कोणत्याही सवलती देऊ नयेत; अशा प्रकारची विचारसरणी प्रभावी होत गेली. ज्या सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून प्रारंभी महाराष्ट्रातील कृषि औद्योगिक क्रांतिचे नेतृत्त्व झाले त्याच सहकारी साखर कारखान्यांच्यापैकी बहुसंख्य कारखाने आजारी पडलेत. परिणामी सहकार चळवळीच्या विकासात अडचणी निर्माण होत आहेत.[२]

इ.स.१९७० नंतरच्या काळात सहकारी चळवळीला राजकारणाची दृष्ट लागण्यास सुरूवात झाली त्याची मुख्य कारणे जिल्हा मध्यवर्ती बँक, जिल्हा भूविकास बँक, राज्य सहकारी बँक आणि सहकारी साखर कारखानदारी यांच्यामध्ये केंद्रीत होणारी आर्थिक सत्ता, मनुष्यबळ, साधनसामुग्री यांचा बेमालूम पद्धतीने राजकीय सत्ता प्राप्तीसाठी आणि मिळविलेली सत्ता टिकविण्यासाठी वापर करता येऊ शकतो हे महत्त्वाकांक्षी राजकीय कार्यकर्त्यांच्या लक्षात येत गेले. प्रत्येक आमदार, खासदाराच्या राजकीय सामर्थ्यासाठी सहकारी संस्था उभी करणे व सरकारी हमीवर प्रचंड प्रमाणात कर्जपुरवठा उभा करणे या गोष्टी अंगवळणी पडत गेल्या. सुरूवातीला अशा सहकारी संस्था झपाटयाने वाढल्या. त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिकच नव्हे तर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक व सांस्कृतिक विकास मोठया प्रमाणात झाला. सहकारी संस्थांच्या माध्यमातून आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबवत असताना या सहकारी संस्थांनी स्वत:चे भांडवल आणि कर्जाऊ भांडवल यांचा पर्याप्त समतोल न साधता कर्जाऊ भांडवलावर भर दिला. अतिरिक्त नोकर भरतीवर भर दिला. चैनीच्या उपभोग खर्चाची सवय लावून घेतली, खरेदी–विक्रीच्या व्यवहारात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला आणि दुर्दैवाने इ.स.१९९० नंतरच्या कालखंडात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या नव्या आर्थिक धोरणाच्या वादळी बदलात सहकारी संस्थांचे अस्तित्व आणि पर्यायाने आवश्यकता धोक्यात आली. सहकारी साखर कारखााने आणि सूतगिरण्या वाढत्या प्रमाणात खुल्या होणाऱ्या

आंतरराष्ट्रीय व्यापारात आतबट्ट्यात आल्या. इ.स.१९९० नंतरच्या कालखंडात सहकारी चळवळीच्या नशिबात प्रतिकूल राजकीय हालचाली वाढत गेल्या त्याचा फटका सहकारी चळवळीला बसला.[३]

बदललेल्या परिस्थितीशी सामना करताना पंढरपूर तालुक्यातील बहुतांशी सहकारी संस्था अपयशी ठरलेल्या दिसतात. इ.स.१९९० पूर्वीच्या काळात शेतमाल प्रक्रिया व दुग्धोत्पादन या क्षेत्रात सहकारी संस्थांचे जवळजवळ संपूर्ण वर्चस्व असल्यामुळे तेथील उद्योगांतर्गत लढाई ही सहकार विरूद्ध सहकार अशी होती. परिणामी इ.स.१९९० पूर्वीच्या काळात सहकारी चळवळीने आदर्शही निर्माण केले. परंतु इ.स.१९९१ नंतर मात्र सहकार विरूद्ध खाजगी अशी स्पर्धा सुरू झाली. पंढरपूर तालुक्यातील अनेक नेत्यांनी ग्रामीण भागात स्वतःच्या दूध संस्था स्थापन केल्या. खाजगी सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याच्या दिशेनेही वाटचाल सुरू केली. अगोदरच सहकारी चळवळीमध्ये राजकारण शिरल्यामुळे अनेक दोष निर्माण झाले होते. हे दोष खाजगी उद्योगधंद्यामध्ये मर्यादित प्रमाणात असतात. परिणामी खाजगी उद्योगधंद्याच्या उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्यासमोर सहकारी संस्थांच्या मर्यादा ठळकपणे दिसू लागल्या. इ.स.१९९१ नंतर उदारीकरणाच्या धोरणामुळे सामाजिक विकासाऐवजी वैयक्तिक नफा याला महत्त्व आले. परिणामी पंढरपूर तालुक्यातील युवक वर्ग सहकाराऐवजी खाजगी उद्योगांना व सेवांना महत्त्व देऊ लागला. सहकाराच्या राजकीयकरणामुळे, घराणेशाहीमुळे नवीन उच्चशिक्षित तरूणांना सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करण्याची संधी मिळाली नाही. तर दुसऱ्या बाजूला वशिलेबाजीमुळे हुशार, सृजनशिल तरूणांना सहकारी चळवळीपासून बाजुलाच रहावे लागले. परिणामी ही चळवळ कुशल मनुष्यबळापासून वंचित राहिली.[४]

पंढरपूर तालुक्याच्या सहकारी चळवळीमध्ये अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे अनेक सहकारी संस्थाच्यामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार दिसतात, सहकारी संस्थांच्या सत्ता संरचनेत विशिष्ट व्यक्तिची, गटांची प्रदीर्घकाळ मक्तेदारी व घराणेशाही निर्माण झालेली आहे, अनेक सहकारी संस्थांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त सभासदांना संस्थेचे सदस्यत्व देण्यात आले, सभासद भरती करताना प्रादेशिक असंतुलन निर्माण झालेले आहे, तालुक्यातील अनेक सहकारी संस्थांनी अतिरिक्त नोकर भरती केली, सहकारी संस्थेचा

राजकारणासाठी वापर करण्यात येऊ लागला, भ्रष्टाचार व वशिलेबाजी, शासनाची धोरणे, इत्यादी समस्यांचा सामना पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला करावा लागत आहे.[५]

इ.स.१९६० पूर्वी महाराष्ट्रात दूध व्यवसायात खाजगी क्षेत्राचे प्राबल्य होते. सहकाराच्या माध्यमातून दूध व्यवसाय विकसित करण्याच्या दृष्टिने इ.स.१९६४ नंतर खऱ्या अर्थाने प्रयत्न केले गेले. सहकारी दूध संस्थांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा कायापालट केला. सहकारी दूध संस्थांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. शेतकऱ्यांच्या दुधास योग्य किंमत मिळू लागली इत्यादी फायदे मिळाले असले तरी सहकारी दूध संस्थांची खाजगी दूध व्यावसायिकांशी स्पर्धा, कार्यक्षम सहकारी दूध संस्थांचे अल्पप्रमाण, सहकारी संस्थांचा झालेला असमान विकास, शीतग्रहांचा अभाव, भांडवलाची समस्या, व्यवस्थापनाचा वाढता खर्च, उत्तम प्रतीच्या दूध पुरवठयाची समस्या, दूधामध्ये भेसळ करण्याची वाढती प्रवृत्ती अशा काही समस्या महाराष्ट्राप्रमाणे पंढरपूर तालुक्यातही निर्माण झालेल्या आहेत.[६]

कोणताही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी स्पर्धात्मक कार्यक्षमता, नाविन्य, ग्राहक केंद्रित सेवा इत्यादी बाबी महत्त्वाच्या असतात. सहकारी क्षेत्राने या गोष्टींचा अवलंब केला असला तरी अदयाप त्याचा वेग लक्षात घेण्यासारखा नाही. दुसऱ्या बाजूला खाजगी क्षेत्र, परकीय कंपन्या आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी सहकार क्षेत्राची राखीव कुरणे ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. सहकाराच्या अस्तित्वाचा प्रश्न या दुहेरी आव्हानातून निर्माण झाला आहे.[७]

भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहाला आता नव्या तंत्राची जोड मिळाल्याने स्वत: कर्जे देण्यास मोठया कंपन्या, बँका स्पर्धा करीत आहेत. सहकारी पद्धती जर स्वस्त दराने कर्ज देण्यात असमर्थ ठरली तर पर्यायाने सहकारी पतव्यवस्थेचा कणा मोडल्याशिवाय राहणार नाही. सहकारावर लादलेल्या बहुस्तरीय व जाचक पद्धतीच्या नियंत्रणामुळे तिच्या विकासावर मर्यादा आल्या आहेत. त्या अडचणी वैज्ञानिक, राजकीय तसेच प्रशासकीय स्वरूपाच्या आहेत. वैद्यनाथ समितीने आपल्या अहवालात वित्तीय मदत देताना सहकार व्यवस्थेशी संबधित अडचणी दूर करण्याची बांधिलकी घेतली आहे. या सुधारणांचा परिणाम म्हणून सहकारी क्षेत्र स्पर्धात्मक होण्यास मदत होईल. सध्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्या आपला व्यवसाय वाढीसाठी सर्व मार्गाचा व सर्व शक्तींचा वापर करीत असल्याने सहकाराला 'अस्तित्वाची लढाई' म्हणूनच बदल करावे लागतील. रिलायन्ससारख्या खाजगी कंपनीने साखर उद्योगात

प्रवेश केला असून, शेती क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्या कंत्राटी शेतीच्या माध्यमातून प्रवेश करीत आहेत. हे सहकारी चळवळीसमोर मोठे आव्हान आहे.[८]

ज्या पार्श्वभूमीवर सहकारी चळवळीचा जन्म झाला. ज्यांच्या विकासासाठी या चळवळीचा आधार घेतला गेला त्याचाच या चळवलीला विसर पडला आहे. आज ही चळवळ म्हणजे संधीसाधू लोकांची चळवळ बनली आहे. कृषि औद्योगिक सहकारी समाजरचना काळाच्या ओघात महत्त्वाची वाटली याला योग्य दिशा देणारे विवेकी नेतृत्त्व निर्माण झाले. या विवेकी आणि त्यागी पिढीचा वारसा इ.स.१९८० नंतरच्या कालखंडात नव्या पिढीकडे आला आहे. उत्तरोत्तर काळात नव्या पिढीकडे सहकारापेक्षा स्वाहाकारच जास्त आहे. वारसा हक्काने मिळालेल्या सहकारी साम्राज्यावर घराणेशाहीचा कूळ कायदा लागू करून ही नवी पिढी राजकीय सत्ता उपभोगत आहे. सहकारी त्रिकोणातील शासन, सभासद आणि प्रस्थापित व्यवस्थापन मंडळ हा नवा वर्ग चळवळीच्या भवितव्याकडे तळमळीने पाहिल याची खात्री देता येत नाही. त्यांच्या वाटा वेगळया आणि डावपेचही वेगळे. अशा परिस्थितीत ही चळवळ टिकवणेसुद्धा आता अवघड ठरू लागले आहे.[९]

सहकारी चळवळ ही नेहमीच एका त्रिकोणात अडकलेली दिसून येते. शासन, सभासद आणि व्यवस्थापन मंडळ(सहकार सम्राट) यांच्या सोईनुसार सहकारला दिशा देण्याचे काम नेहमी घडत असते. महाराष्ट्रात इ.स. १९९५ पूर्वी म्हणजे शिवसेना भारतीय जनता पार्टीचे सरकार येण्यापूर्वी शासन व सहकार सम्राट हे एका गटाचे होते. इ.स. १९९५ नंतर मात्र शासन व सहकार सम्राट यांच्यात अंतर्गत यादवी निर्माण झाली. युतीच्या सरकारकडे अर्बन बँकांची मोठी सहकारी लॉबी होती तर विरोधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या गटाकडे सहकारातील उर्वरित क्षेत्र होते. गेल्या ६०-७० वर्षात सर्वसामान्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये अर्बन बँकांचे जसे मोठे योगदान आहे. तसेच उर्वरित सहकारी क्षेत्राचेही फार मोठे योगदान आहे.[१०] महाराष्ट्रातील तत्कालीन सहकार सम्राटांना शह देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अर्बन बँकांच्या शिखर बँकेला परवानगी दिल्यानंतर त्यास काँग्रेस गटाचा विरोध होऊ लागला. त्यामुळे राज्यातील सहकारी चळवळीवर अनिष्ट परिणाम होऊ लागला. राजकारणात स्थिरस्थावर होण्यासाठी सहकारी संघटन पद्धतीचा वापर केला जातो. हेच सहकारी चळवळीचे दुर्दैव आहे. पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीच्या इतिहासाचा अभ्यास करता येथेही सहकारी

संस्थांचा आधार घेऊन त्याचा वापर राजकारणासाठी केलेला आहे. या चळवळीत आणलेल्या राजकीयकरणामुळे तालुक्यातील या चळवळीच्या विकासात अडचण निर्माण झालेली आहे.

पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीत इ.स.१९९० पर्यतच्या कालखंडात जो जोश, गुणवत्ता आणि दूरदृष्टी होती. ती नंतरच्या काळात लोप पावल्याचे स्पष्टपणे दिसते. आज पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळ तिसऱ्या पिढीकडे आहे. सहजपणे मिळालेल्या संस्थांवर नेतृत्त्व गाजविण्यापलीकडे ही पिढी नवीन काही निर्माण करू शकत नाही. सहकार ही अखंड चालणारी चळवळ आहे. पंढरपूर तालुक्यात इ.स. १९११ पासून या चळवळीला सुरूवात झाली असली तरी या चळवळीने संख्यात्मक प्रगती केली मात्र गुणात्मक वाढ झाली नाही . काही मोजक्या ठिकाणी वेगळया पद्धतीचे आर्थिक व सामाजिक संबंध या चळवळीने निर्मांण केले पण त्या ठिकाणीसुद्धा या चळवळीचाराजकारणासाठी वापर होत असल्याने या चळवळीचीदशा फारच वाईट झाली आहे. पूर्वीच्या नेतृत्त्वाने उभ्या केलेल्या संस्था टिकविणे देखील आता अवघड झाले आहे.[११]

राजकीय नेतृत्त्वाच्या सहाय्याने हया चळवळीचा फायदा उठविण्याच्या विरूद्ध वेळोवेळी अनेक कायदे निर्माण केले गेले. वर्षानुवर्षे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक अशी पदे भोगणाऱ्यांनी सहकारी साम्राज्ये निर्माण केली. सहकारी संस्थेच्या कोणत्याही अध्यक्षाला सलगपणे दहा वर्षे अधिक काळ पदावर राहता येणार नाही असा कायदा झाल्यानंतर सहकारातील चाणाक्ष नेतृत्त्वाने कठपुतळी आणि आपल्या नात्यागोत्यातील अध्यक्ष शोधून स्वतःचे वर्चस्व टिकवून ठेवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. ज्या गटाकडे सहकारी संस्था आहेत त्या गटापुढे शेतकरी लाचारासारखा उभा राहतो, कौटुबिंक अडचणी भागविणाऱ्या संस्था ज्या गटाकडे आहेत त्या गटाकडे ग्रामपंचायतीचेही नेतृत्त्व आपोआपच येते.[१२] इ.स. १९९० नंतरच्या काळात सहकारी संस्थांच्या निवडणुकीतून टोकाचा संघर्ष झाला परिणामी सहकारातील 'सहकार' या तत्वाचा विसर पडला आणि संस्थेतील एक गट संस्थेपासून दुरावू लागला. संस्थेच्या विकासाकडे त्याचे दुर्लक्ष होऊ लागले. इ.स. १९९० पर्यतच्या कालखंडात सहकारी चळवळीविषयी जी आस्था होती ती इ.स. १९९० नंतरच्या कालखंडात राहिली नाही. चळवळीच्या नेतृत्त्वाने मात्र आपल्या राजकीय स्वार्थासाठी सहकारी चळवळीचा वापर करून घेतला. राजकीय शक्ती प्रदर्शनाच्या उद्देशाने मात्र साखर सम्राट, दूध सम्राट, सहकार सम्राट

अशा लॉब्या मात्र या चळवळीने जन्माला घातल्या काहीनी प्रामाणिकपणे या चळवळीची सेवा केली. प्रत्यक्ष राजकारण केले नसलेतरी इतरांच्या राजकारणाला पाठिंबा देण्याचे काम मात्र केले.[१३]

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा.श्रीनिवास खांदीवाले हे एका लेखात लिहितात, अनेकक्षेत्रातसहकाराच्या यशामागे न दिसणारे अपयशाचे वलयही असते. उदा. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या रूपात राजकारण्यांनी एकीकडे लाभार्थ्यांना मतदार म्हणून बांधून ठेवले आहे. गावातील सरपंच पदापासून ते राज्यातील मंत्रिपदापर्यंत विराजमान होण्यासाठी सहकाराचे नेतृत्त्व ही एक आवश्यक पायरी बनली आहे, तर दुसऱ्या बाजूला शासनाच्या अनुदानाचा मोठा भाग सहकारी संस्थांच्या सदस्यांकडे वळविला जातो. तो पैसा इतरांनी दिलेल्या कराचा एक भाग असल्यामुळे त्याग कुठे आणि लाभ कुठे हे ध्यानात येते. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याबाबत जागतिक बँकेच्या अहवालात असे म्हटले आहे की, जरी महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांनी ग्रामीण विकासात राजकीय, आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्टया बहुमोल कार्य केले आहे तरी या प्रगतीचा भारी भुर्दंड शासनाच्या तिजोरीवर पडला आहे हा सरळ सरळ सार्वजनिक खर्चातून खासगी लाभ मिळविण्याचा प्रकार आहे. बहुतेक अनुदाने श्रीमंत शेतकऱ्यांनाच मिळतात. गरीब शेतकऱ्यांना लाभ पुरविण्याचे उद्दिष्ट नाही आणि क्षमता प्रस्थापित होण्याचे उद्दिष्ट साध्य होत असण्याचा पुरावाही उपलब्ध नाही. एकंदरीत सहकारी चळवळीत राजकिय हस्तक्षेप मोठया प्रमाणात वाढल्याने कालांतराने त्याची ऱ्हासाकडे वाटचाल चालू होते. त्यामुळे या कारणाचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे आहे.

### ➢ राजकीय महत्त्वकांक्षा –

निवडणुकांच्या माध्यमातून सहकारात घुसलेले व्यक्तिकेंद्रीत, महत्त्वाकांक्षी राजकारण, गटबाजी, सत्तास्पर्धा, भ्रष्टाचार यामुळे सहकारात आदर्श ठरलेले साखर कारखाने राजकारणाचे अड्डे बनले. कारखान्यातून राजकारण, राजकारणातून सत्ताकारण आणि सत्ताकारणातून पुन्हा राजकारण असे वर्तुळच तयार झाले. सहकार क्षेत्र हे राजकारणाला पूरक ठरत असल्याचे भान नेत्यांना जसजसे येत गेले, तसतसे ते सहकार क्षेत्राकडे राजकीय अंगाने पाहू लागले. यातूनच संस्थेच्या हितापेक्षा राजकारणासाठी तिचा वापर करून घेण्याकडे त्यांचा कल वाढत राहिला. त्यातूनच वर्चस्ववाद आणि निवडणुकांचे राजकारण सुरू झाले. सहकार व राजकारण यांचा

संबंध जोडला गेल्यामुळे किंवा सहकारात राजकारणाची लागण झाल्यामुळे संबंधित संस्थेवरचा आर्थिक बोजा अकारण वाढत राहिला आणि मनुष्यबळाचाही गैरवापर सुरू झाला. ग्रामीण भागातील राजकारणाचे व स्थानिक गटबाजीचे परिणाम कळत न कळत परिसरातील संबंधित सर्वच सहकारी संस्थांवर होऊ लागले.[१४]

पंढरपूर तालुक्यातील श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने अनेक क्षेत्रात महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रात उच्चांक प्राप्त केले होते, उत्कृष्ट व्यवस्थापन, शेतकऱ्यांना दिला जाणारा भाव, कार्यक्षमता, इत्यादी घटकांमुळे पंढरपूर तालुक्याच्या सहकारी क्षेत्रात या कारखान्याने नावलौकिक मिळविला होता. मात्र इ.स.२००० नंतरच्या कालखंडात टोकाची गटबाजी, नेतृत्त्वावरून वाद, राजकारणासाठी या संस्थेचा वापर झाला, परिणामी हा कारखाना अधोगतीच्या दिशेने वाटचाल करू लागला तालुक्यातील अनेक सहकारी संस्थांना या अवस्थेतून जावे लागत असल्याने तालुक्याच्या सहकार चळवळीत एक मोठी समस्या निर्माण झालेली आहे.[१५]

सहकारावरती पूर्ण निष्ठा ठेवणारे, अत्यंत तळमळीने कार्य करणारे, सहकारच आपले जीवन मानणारे, सहकाराद्वारे आर्थिक व सामाजिक परिवर्तन साध्य करणारे नेतृत्त्व आज कमी होताना दिसत आहे. उलट सहकाराचा वापर आपल्या राजकीय महत्त्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी वापरणारे नेतेच अधिक प्रमाणात आढळतात. हे नेते त्यांच्या पदाचा व पक्षाचा वापर करून आपल्या ताब्यातील सहकारी संस्थांचा कारभार गतिशील बनविण्यापेक्षा ज्या संस्थेत ते पदावर आहेत त्यापेक्षा मोठया म्हणजे जिल्हा–राज्य–देश पातळीवर दुसऱ्या संस्थेत जाण्यासाठी आपल्या कार्यरत संस्थेस पायाखाली दाबताना दिसतात. तसेच भविष्यातील राजकारणाचा विचार करून विशिष्ट मतदार संघावर नजर ठेऊन तेथील युवकांना नोकरीचे अमिष दाखवून आपल्या पदाचा गैरवापर करून अतिरिक्त नोकरभरती संस्थेमधून केली जाते ही नोकरभरती करताना खरोखरच त्याची आवश्यकता आहे का? त्या कर्मचाऱ्यांचे शिक्षण, पात्रता, अनुभव याचा विचार केला जात नाही. परिणामी संस्थेवर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडतो.[१६]

सहकारी संस्थेचे पदाधिकारी, राजकारणी संस्थेच्या साधनांचा त्यामध्ये कर्मचारी, वाहन, इतर कार्यालयीन वस्तू, कार्यालये, संस्थेची जमीन यांचा वापर आपल्या वैयक्तिक वापराबरोबरच पक्षाच्या कामासाठीही करतात यामुळे हा अतिरिक्त खर्च संस्थेवर पडतो. तसेच

हे पदाधिकारी वेगवेगळया संस्थांचे पदे भूषवत असतात. त्यामुळे ते आपल्या संस्थेच्या विकासासाठी अतिशय कमी वेळ देतात. तसेच ते आपल्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात अभावानेच आढळतात. कारण ते सतत आपल्या राजकीय पक्षाच्या कामासाठी, वैयक्तिक कामासाठी कोर्टाच्या कामासाठी देश– परदेश दौरे काढतात त्याचा खर्च व त्या नेत्यांची गैरहजेरी यामुळे संस्थेच्या व्यवस्थापनावर परिणाम होऊन त्यात गैरशिस्त निर्माण होते. परिणामी संस्था आजारी पडून त्यांचा ऱ्हास होतो.[१७] परिणामी सहकारी संस्थांच्या आजारपणामुळे तिच्यावर अवलंबून असणारी हजारो कुटूंबे उद्ध्वस्त होतात, याचा काडीमात्र परिणाम राजकीय पदाधिकाऱ्यांवर होत नाही कारण सरकारी दरबारी त्यांचे व त्यांच्या राजकीय पक्षाचा दबाव टाकून ते सहीसलामत सुटतात. त्यामुळेच सहकारी संस्थेत अशा राजकारण्यांचा हस्तक्षेप धोकादायक आहे हे निश्चित. इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र सहकारी कायदा पास झाला तेव्हाचे सहकारमंत्री बाळासाहेब भारदे यांनी या कायदयाबाबत पंडित जवाहरलाल नेहरू यांना माहिती दिली तेव्हा या कायदयाबाबत नेहरू म्हणाले,“सहकारी संस्थामध्ये जर सरकारने भागिदारी केली तर काही वर्षानंतर या सहकारी संस्थांना मगरमिठीच पडेल.”[१८] एकूण सरकारची आपल्या पक्षातील पुढाऱ्यांना मदत व सहकारातील हस्तक्षेप ही बाब सहकाराच्या दृष्टिने अतिशय गंभीर व धोकादायक बाब आहे.

राजकारण्यांच्या हस्तक्षेपाचा विचार करता सहकारी संस्थामध्ये घराणेशाहीला महत्त्व प्राप्त झाले. राजकारणातील घराणेशाही सहकारात फोफावली व ती संस्था खाजगी मालकीची असल्यासारखे तिचे स्वरूप करून ठेवले. परिणामी सहकारातही घराणेशाहीला सर्वानुमते मान्य झालेली बाब म्हणून पाहिले जाऊ लागले.सहकारी बँका, पतसंस्था, दूधसंघ, सूतगिरण्या, साखर कारखाने यांच्या संचालक मंडळावरती आपल्याच नात्यातील मुलगा, पुतण्या, पत्नी, भाऊ, जावई इत्यादी.विविध नातलग यांची नियुक्ती सुरू होऊन ही परंपरा पिढयान पिढया संरजामदारी पद्धतीप्रमाणे सुरू झाली.[१९]

या राजकारणी लोकांनी स्वतःच्या फायद्यासाठी वँका, पतसंस्था, कारखाने यामधून पैशाची मोठया प्रमाणातील उधळपट्टी, नात्यागोत्यातील व्यक्तिंना रितसर छाननीशिवाय मंजुरी व त्यांच्या कर्जाची थकबाकी यामुळे अनेक चांगल्या बँका रसातळाला जात आहेत. उदा.महाराष्ट्रातील सहकारी अर्थव्यवस्थेचे अस्तित्वच शिखर बँकेतील संचालक मंडळाने

धोक्यात आणले आहे. नियमबाहय कर्ज प्रकरणे खास बाब म्हणून मंजूर केल्यामुळे नाबार्डकडून फेरकर्ज मिळण्यास अपात्र ठरली आहे. या बँकेच्या कर्ज व्यवहारातील अकार्यतेक्षमतेमुळे सरकारी लेखापरीक्षकाने या बँकेला 'ब' वर्ग दिला.बँकेतील गैरप्रकार, उधळपट्टी होऊनही सरकारने संचालक मंडळ बरखास्त केले नाही. कारण सत्ताधारी पक्ष या बँकेचा वापर राजकारणासाठी करत होते.[२०]

या बँकेप्रमाणेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतही राजकीय पक्ष व राज्यकर्ते यांच्या बेसुमार कर्ज वाटपाने बँक मोडकळीस आली.[२१] तर राज्यकर्त्यांच्या निराशावादी धोरणामुळे राज्याला कृषि व ग्रामीण विकासात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या भूविकास बँकांना कायमचे टाळे लावून बँकेची मालमत्ता सरकारजमा करावी लागली. एकूणच राजकारण टिकवण्यासाठी,स्वतःचा पक्ष वाढविण्यासाठी तथाकथित कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी, राजकारणी मंडळींच्यामध्ये सहकारी संस्था आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी मोठया प्रमाणात लढाई सुरू झालेली आहे.[२२] त्या संघर्षात मात्र सहकाराचा शेवट होण्याची वेळ आलेली आहे.

### ➢ भ्रष्टाचार –

सहकार जेव्हा स्वकारासाठी वापरण्यास सुरूवात झाली, तेव्हापासून सहकारात भ्रष्टाचार फोफावत गेला हे भ्रष्टाचार संस्थेतील नोकरभरती, पदनिश्चिती, कर्ज प्रकरणे, प्रवास खर्च इत्यादी ठिकाणी घडून आले. कर्ज वाटप करताना तारण, त्याची ऐपत आहे का नाही हे न पाहता स्वार्थापोटी कर्ज वाटप करण्यात आले. यामुळे पंढरपूर तालुक्यातील अनेक पतसंस्था रसातळाला गेल्या. अनेक सहकारी संस्था व बँकांचे लेखापरीक्षण करतानाही लेखापरीक्षका-कडून भ्रष्टाचार झाल्याने हे प्रमाण आणखी वाढत गेल्याचे दिसून येते.[२३]

वास्तविक पाहता सहकारी बँकांनी संचालकांच्या व पदाधिकाऱ्यांच्या नातलगांना कर्ज द्यावयाचे नाहीअसा नियम आहे. पण हल्ली खरेतर संचालकांच्या नातेवाईकांना सर्व कर्जे मिळतात, शासनाचे व नाबार्डचे आदेश धाब्यावर बसविले जातात. आर.बी.आय.च्या नियमांना डावलेले जाते. नियमबाहय कर्जवाटप केले जाते. पंढरपूर तालुक्यातील सहकारी संस्थांबाबतही अशा प्रकारची अनेक उदाहरणे घडून आलेली आहेत. सहकारी साखर कारखान्यातही राजकीयकरणाचा प्रवेश झाल्याने अनेक गरजू सभासदांना कर्ज नाकारले जाते. मात्र चेअरमन, संचालक व त्यांचे नातेवाईक यांना ऊस लागवडीच्या अगोदरच भरमसाठ प्रमाणात बिनव्याजी

कर्जे दिली जातात. दूध संघ व साखर कारखान्यांनी आपल्याच गटातील किंवा जवळच्या व्यक्तिची वाहने कारखान्यासाठी व दुधसंघासाठी भाडेतत्वावर मोठया प्रमाणात भाडे देऊन कराकरुन घेतली जातात. परिणामी त्या सहकारी संस्थेला मोठा आर्थिक फटका बसतो. पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील एक नामांकित सहकारी साखर कारखाना होता. सातत्याने या कारखान्याने जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात अनेक पारितोषिके मिळविली होती. सन २००० पर्यतच्या कालखंडात या कारखान्याने सततच प्रगती केली होती. मात्र इ.स.२००० नंतरच्या कालखंडात हा कारखाना हळूहळू कर्जबाजारी होऊ लागला. कारण याही कारखान्यात वरील विविध बाबींचा शिरकाव झाल्याने हा कारखाना कर्जबाजारी झाला. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याप्रमाणेच तालुक्यातील अनेक सहकारी साखर कारखान्यांना याची लागण झाली व त्यांचीही ऱ्हासाकडे वाटचाल होताना दिसून येत आहे.[२४]

## ➢ घराणेशाही बांडगूळ –

भ्रष्टाचारासोबत महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने आणि सहकारी संस्थांना घराणेशाहीचा रोग जडला. लोकशाही व्यवस्थापन हे सहकाराचे खास तत्त्व मानले जाते ; पण महाराष्ट्राच्या काही भागात सहकार क्षेत्रातील नेत्यांनी सत्तेची अशी काही मक्तेदारी निर्माण केली की, त्यामुळे सहकाराचे विकृत स्वरूप पुढे आले. महाराष्ट्र राज्यातील बहुतेक सर्व ज्येष्ठ नेते घराणेशाहीच्या मोहाला बळी पडलेले दिसतात. पंढरपूर तालुक्यातील सहकारी क्षेत्रावर सुधाकर परिचारक, वसंतराव काळे यांच्या घराण्यांनी आपली मक्तेदारी निर्माण केलेली आहे.[२५]

सहकार क्षेत्रातील इ.स.१९६० ते १९८० च्या दशकातील जुने नेते व आजचे नवे नेते यांच्यात महत्त्वाचा फरक जाणवतो. हल्लीची नेते सत्ता मिळविण्यासाठी सहकाराचा आधार घेतात. सहकारी चळवळ अधोगतीला नेण्यामध्ये नवे आणि विशेषत: खुजे नेतृत्त्वही तितकेचे कारणीभूत ठरले आहे. ज्या उद्देशाने सहकारी संस्था स्थापन झाल्या. त्यालाच मुठमाती देत निव्वळ ओरबडण्याची वृत्ती नव्या नेतृत्त्वाने ठेवली. आपल्या हाती सहकारी संस्थेची सूत्रे आल्यानंतर त्याचा वाढ विस्तार कसा होईल, कार्यक्षमता कशी वाढेल, भरभराट कशी होईल या दृष्टिने विचार करण्याचा नव्या नेतृत्त्वाने फारसा प्रयत्न केला नाही. घराणेशाहीमुळे किंवा राजकीय परिस्थितीत झालेल्या तडजोडीनुसार सहकारी संस्थेचे चेअरमनपद मिळाले तरी योग्य

प्रकारे नेतृत्त्व करण्याची त्यांची कुवत नव्हती. सुरूवातीच्या काळात सहकारी संस्थांच्या संस्थापकांना संस्थेविषयी जेवढी आपलुकी व आस्था वाटत होती. तेवढी नव्या पिढीतील नेत्यांना वाटण्याचे काही कारणही नव्हते साहजिकच सहकारी संस्थेच्या कारभारात रस घेण्यापेक्षा आणि सुधारणांकडे लक्ष देण्याऐवजी त्यांनी सत्ता आणि पदाचा लाभ कसा उठवता येईल याचाच अधिक विचार केला. कोणतीही सहकारी संस्था सभासदांच्या मालकीची असते, आपण फक्त चालक असतो हे ते विसरले. ज्या सहकारी संस्थांत निवडणुकीच्या मार्गाने सत्तातंर झाले. त्या सहकारी संस्थांतून तर शक्य तेवढे शोषण करण्याचेच मार्ग त्या–त्या काळातील सत्ताधाऱ्यांनी अवलंबिले सभासदांची मात्र मोठया प्रमाणात हानी झाली. सहकारी संस्थांतील या खुज्या व स्थितिशील नेतृत्त्वाने सभासदाचे नुकसान केलचे, पण सहकारी संस्थांचीही अवस्थाही बिकट करून ठेवली. एक प्रकारे सहकारी चळवळीची पीछेहाट होण्यास हे नेतेच सर्वस्वी कारणीभूत ठरले.[२६]

### ➢ योग्य नेतृत्त्वाचा अभाव –

नेतृत्त्व ही लोकांकडून अपेक्षित कार्य करून घेण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांना योग्य प्रकारे निर्देशित करणारी, त्यांना कार्यप्रवृत्त करणारी प्रक्रिया आहे. सहकार असो वा कोणतेही क्षेत्र त्याच्या विकासासाठी योग्य नेतृत्त्व असणे तितकेच महत्त्वाचे असते. सहकारी क्षेत्रातील नेत्यांच्या कृतींना, ध्येयवादाला आणि कार्यक्रमांना जास्तीत जास्त सभासदांचा पाठींबा असावा लागतो. त्यादृष्टिने नेत्याजवळ नीतिमत्ता, चारित्र्य, विद्वत्ता, समर्पणवृत्ती, सारासार विवेकबुद्धी, व्यवहारीपणा, आर्थिक शिस्त, धाडस, ज्ञान आणि समजुतदारपणा अशा प्रकारचे गुण नेत्याजवळ असणे आवश्यक असते. सुरूवातीच्या काळातील सहकारी चळवळीला योग्य नेतृत्त्व लाभल्याने या चळवळीचा विकास झाला. पंढरपूर तालुक्यातही इ.स.१९७० नंतरच्या कालखंडात औदुंबर पाटील, सुधाकर परिचारक, वसंतराव काळे यांनी मोठया प्रयत्नांती या चळवळीचा विकास केला. मात्र पुढे अनेक सहकारी संस्था योग्य नेतृत्त्वाच्या अभावी बंद पडत आहेत.[२७]

### ➢ जातीय वर्चस्व –

सहकाराची सुरूवात करताना प्रामुख्याने बहुजन समाजाचा विकास हेच उद्दिष्ट समोर होते. यामध्ये कोणताही धर्म, जात, पंत यांचा विचार केला जात नव्हता. मात्र कालांतराने

सहकारी संस्थेपेक्षा व्यक्तिला महत्व प्राप्त झाल्यानंतर एका विशिष्ट जातीचा प्रभाव वाढू लागल्याने संस्था स्थापनेमागील मुख्य उद्देश लोप पावून सहकाराचा ऱ्हास होण्यास सुरूवात झालेली दिसते.

## ➢ खाजगीकरणाचा विळखा –

सहकाराची निर्मितीच मुळात मानवाचे कल्याण करण्यासाठी झाली. ज्यामध्ये सर्व समाजाचा सर्वांगीण विकास अपेक्षित होता. मात्र इ.स.१९९० नंतरचे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे धोरण व सरकारचा सहकारातील वाढता राजकीय हस्तक्षेप, व्यक्तिपुजा यामुळे सहकारी संस्थांचे खाजगीकरण सुरू झाले. कधी काळी खाजगी संस्था सहकारी करण्याची प्रक्रिया सोलापूर जिल्ह्यात होती. त्यामध्ये पंढरपूर तालुक्याच्या सहकारी चळवळीचे नेते सुधाकर परिचारक यांनी अनेक खाजगी संस्था त्यामध्ये पंढरपूर तालुका व पंढरपूर तालुक्याच्या बाहेरील संस्थांचाही समावेश आहे. उदा.पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर या कारखान्याचे सहकारीकरण करण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. इ.स.२००० पर्यतच्या कालखंडात तालुक्यात अनेक संस्थांनी सहकाराच्या माध्यमातून तालुक्याचा चेहरा बदलला मात्र इ.स.२००० नंतरच्या कालखंडात सहकारातील दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील नेतृत्त्वानी सहकाराचे तत्व झुगारून देऊन खाजगीकरणाला जवळ केलेले आहे. सहकाराच्या शेतातच स्वाहाकाराचे पीक फोफावल्याने सहकाराची शंभरी भरत आली आहे. सहकारातून सधन झालेल्या अनेक साखर सम्राटांनी स्वतःचे खाजगी कारखाने उभारण्याचा सपाटा लावला आहे. यामध्ये पंढरपूर तालुक्यातील प्रशांत परिचारक, कल्याणराव काळे इत्यादी नेत्यांचा समावेश आहे.[२८]

इ.स.१९८० नंतरच्या दोन दशकांचा कालखंड हा साखर उद्योगाच्या भरभराटीचा काळ ठरला. मात्र सहकारात घुसलेल्या अपप्रवृत्ती, भ्रष्टाचाराची लागण, गैरव्यवस्थापन यामुळे पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीची वेगाने अधोगती झाली. यात सहकारी साखर कारखान्यांचे उदाहरण घेतल्यास हे कारखाने इ.स.२००० नंतर राजकीय अड्डे बनू लागले. सहकाराऐवजी स्वाहाकाराला राजमान्यता मिळाली. परिणामी अपवाद वगळता सहकारी साखर कारखानदारी चराऊ कुरणच बनले. राजकारणात आपला टिकाव लागण्यासाठी, कायमस्वरूपी राजकीय सत्ता आपल्याच ताब्यात रहावी यासाठी साखर कारखाने काढण्याची जणू स्पर्धाच निर्माण झाली.

सध्या पंढरपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखानदारी दिवंगत झाली आहे. मात्र सध्या सत्तेवर असलेल्या त्यांच्या वारसदारांना त्याचे सोयरसुतकही नाही. राजकीय बळाचा वापर करून राजकीय कारणासाठी या संस्थांना परवाने दिल्यामुळे शेजारच्या कारखान्यावर प्रतिकूल परिणाम झाला. या उद्योगाला भ्रष्टाचाराने ग्रासले आणि अनेक ठिकाणी घराणेशाहीचा अतिरेक झाला.[२९]

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता सर्व सहकारी संस्थांमध्ये सहकारी साखर कारखाने सर्वात जास्त महत्त्वाचे आहेत. त्यामुळेच प्रत्येक साखर कारखान्याच्या अध्यक्षाला आमदार, खासदार किंवा मंत्री व्हावयाचे असते किंवा प्रत्येक आमदार, खासदार व मंत्री आपला स्वतःचा असा कारखाना स्थापन करण्याची इच्छा बाळगून असतो. निवडणुकीत ज्या उमेदवाराच्या पाठीमागे साखर कारखान्याचे बळ असते तो विधानसभेत किंवा लोकसभेत सहज निवडून येतो. पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक महत्त्वकांक्षी राजकीय पुढारी साखर कारखाना काढण्याची उमेद बाळगतो कारण राजकारणात स्थिर होण्यासाठी व लोकांचा पाठिंबा सातत्याने मिळविण्यासाठी साखर कारखान्यासारखे दुसरे चांगले साधन नाही.[३०] पंढरपूर तालुक्याच्या राजकाराणातही औदुंबर पाटील,पांडुरंग डिंगरे,सुधाकर परिचारक, प्रशांत परिचरक यांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून विधानसभेची व विधानपरिषदेची आमदारकी मिळवली आहे. मात्र साखर कारखान्याचा राजकारणासाठी वापर करणे हे सभासदांच्या हिताच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा असते. पंढरपूर तालुक्यातील सहकारी संस्थांत राजकारणाने शिरकाव केल्याने या चळवळीच्या विकासातील ही एक मोठी अडचण निर्माण झालेली आहे.[३१]

राज्यातील आर्थिक व सामाजिक बदलाचे केंद्रस्थान ठरत असताना सहकारी साखर कारखाने व इतर सहकारी संस्था सत्ताकारणातील दबावगट बनले आहेत. स्थानिक पातळीवरील प्रभावी स्थान, साखर कारखान्याचे अध्यक्षपद, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्षपद, आमदारकी किंवा मंत्रीपद या सर्व गोष्टी एकाच व्यक्तिच्या किंवा कुटुंबाच्या हातात असणे हा केवळ योगायोग कसा असेल? राजकीय सत्तेच्या चढाओढीत व्यवस्थापनाच्या किमान निकषांकडे दुर्लक्ष केल्यामुळे वाढत गेलेली आजारी कारखान्यांची संख्या आपापसातील गळेकापू स्पर्धा या गोष्टी निश्चितच चिंतनीय आहेत. सरकार आणि सेवा ही तत्त्वे लोप पावून नफेखोरी व सत्ता यांच्यामागे धावणारा हा दबावगट बनला आहे. राज्यातील साखर उत्पादनाने बागायती

शेतीला उर्जितावस्था आणली. परंतु वाढत्या ऊस उत्पादनाने राज्यातील शेती उत्पादनातील समतोल बिघडला आहे. याचा गंभीर विचार करण्याची वेळ आली आहे. पंढरपूर तालुक्यातही याच परिस्थितीचा अनुभव येत आहे.[३२] सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत ऊसाच्या किंमतीची व ऊसपुरवठयाची समस्या, दोन साखर कारखान्यांमधील किमान अंतर व झोन पद्धती, जलद ऊस वाहतुकीची आवश्यकता, अतिरिक्त कामगार भरती, आर्थिक नियोजन व काटकसरीचा अभाव इत्यादी समस्या महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत दिसून येतात.[३३]

आज महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीच्या प्रगतीपथावरील घोड–दौडीमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत आज साखरेचे भाव कमी होत आहेत तर गाळपाचा खर्च वाढत आहे, परिणामी शेतकऱ्यांना ऊसाला चांगला भाव मिळत नाही, सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळ, आधुनिक व्यवस्थापनाच्या पद्धतीचा अवंलब करीत नाहीत. कारखान्याच्या उत्पादनावर व कारखाना चालवताना होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. अनेक कारखान्यांच्या व्यवस्थापनात बेहिशेबीपणा व त्यातून होणारी भ्रष्टाचाराची प्रकरणे यासारख्या गोष्टीवर योग्य ती कारवाई होत नाही. परिणाम सहकारी चळवळीची अधोगतीकडे वाटचाल सुरू होते.[३४] पंढरपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यांनाही वरील अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सहकार चळवळ खरे तर सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करीत असते. मात्र अलिकडच्या कालखंडात ऊसतोड मजूर जे काम करतात त्यांच्यावर अन्याय होताना दिसत आहे. त्यांना पुरेशी मजुरी दिली जात नाही. तेथे वेठबिगारी चालते अशा तक्रारी आहेत. असे प्रकार दूर व्हावेत व विशेष करून अनुसूचित जाती व जमातीतील लोकांना संरक्षण मिळावे यासाठी कडक कायदेही करण्यात आले आहेत. परंतु परिस्थितीत म्हणावी तितकी सुधारणा नाही. ही सहकारच्या विकासातील प्रमुख समस्या आहे.[३५]

- **पारदर्शी लेखापरीक्षणाचा अभाव –**

संस्थेचे लेखापरीक्षण करताना संस्थाचालक सरकारच्या ऑडिटरकडून लेखापरीक्षण करून घेण्याऐवजी खाजगी ऑडिटरकडून मन मानेल तसे लेखापरीक्षण करतात. तसेच सरकारी ऑडिटरकडून लेखापरीक्षण केल्यानंतरही ते प्रामाणिक माहिती न मांडता लपवालपवी करतात.

परिणामी कालांतराने अशा संस्था आतून पोखरल्या जातात व त्यांची ऱ्हासाकडे वाटचाल सुरू होते.[३६]

### ➢ सहकारी संस्थांची संख्यात्मक वाढ –

वास्तविक पाहता सहकारी संस्थांची संख्या जितकी मर्यादित तितका विकास जास्त होतो. मात्र इ.स.१९९० नंतरच्या काळात पंढरपूर तालुक्यात प्रत्येक क्षेत्रात सहकारी संस्थांची संख्यात्मक वाढ झाली मात्र गुणात्मक वाढ झाली नाही तालुक्याच्या ग्रामीण भागात प्रत्येक खेडयात अनेक सहकारी संस्था सुरू झाल्या त्यामध्ये दूध सोसायटया, पतसंस्था यांची संख्या मोठया प्रमाणात वाढली परिणामी कर्जे, व्याजदर यामध्ये संस्था संस्थांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन अनेक संस्थांची ऱ्हासाकडे वाटचाल सुरू झाली.[३७] सुरूवातीच्या कालखंडात एखादया गावात एखादी दूध संस्था असायची पुढे ही संस्था उत्तरोत्तर प्रगतीकडे वाटचाल करीत होती मात्र अलिकडच्या काळात एकाच गावात अनेक दूधसंस्था स्थापन झाल्याने दूध संघाला दूध गोळा करण्यास वेळ लागतो एकंदरीत आज दूध संघाला मोठया श्रमाला व वाहतूक खर्चाला तोंड दयावे लागत आहे. म्हणजेच पंढरपूर तालुक्यातील सहकारी संस्थांची गुणात्मक वाढ झाली नाही मात्र संख्यात्मक वाढ झाली ही सहकाराच्या विकासातील मोठी अडचण आहे.[३८]

### ➢ सहकारी संस्थांची उदासिनता –

सहकारी संस्थांमध्ये ठराविक वर्षानंतर सत्ता परिवर्तन होते. परिणामी व्यवस्थापन मंडळाच्या बदलानंतर नव्या पदाधिकाऱ्यांकडून आधीच्या पदाधिकाऱ्यांवर टिका करणे, त्यांच्यापेक्षा जास्त कर्ज वाटप करणे, व्याजदर कमी करणे, अतिरिक्त नोकरभरती करणे, नवनवीन टेंडर काढणे, संस्थेच्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त करणे यामुळे ती संस्था ऱ्हासाकडे वाटचाल करू लागते, पंढरपूर तालुक्यातील बऱ्याच सहकारी संस्थांनी मोठे कर्जवाटप केलेले आहे. मात्र त्यांनी आपल्या सभासदांकडून त्या कर्जाची त्यांनी वेळोवेळी वसुली केली नाही, तसेच अनेक संस्था स्वतःचे भागभांडवलही गोळा करताना दिसत नाहीत तर काही संस्था हया वरच्या पातळीवरील सहकारी बँकेकडून कर्ज मिळवून सदस्यांना वाटण्याचे काम करतात ते वसूल करण्याची जबाबदारी घेत नाहीत अशा प्रकारे व्यक्तिबरोबरच संस्थात्मक पातळीवरतीही उदासिनता दाखवल्याने सहकाराचा ऱ्हास होताना दिसून येत आहे.[३९]

## ➢ शासनाची भूमिका –

शासनाने सहकारी संस्थांच्या कारभारात अनावश्यक हस्तक्षेप करू नये असे म्हटले जाते मात्र सहकारी संस्थांना यात यश आले नाही. वेळोवेळी सत्तांतर झाल्यानंतर नवीन सरकारकडून आपल्या पक्षातील लोकांची सोय करण्यासाठी लोकशाही पद्धतीने निवडून आलेली संचालक मंडळे बरखास्त करून प्रशासक मंडळे नेमली जातात. या प्रशासक मंडळात सहकाराचा कसलाही गंध व अनुभव नसलेले लोक निवडले जातात. तसेच सहकारातील नेतेही आपल्या पक्षाची निष्ठा व स्वार्थासाठी संस्था आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी दबाव टाकतात. अशा कोणत्याही दबावाला शासकीय अधिकाऱ्यांनी बळी न पडता योग्य वेळी सहकारी संस्थेचे ऑडिट केल्यास, संस्था चालकांवर वव्यवस्थापनमंडळावर वचक ठेवल्यास निश्चितच सहकारी संस्था वाचण्यास मदत होते.[४०]

पंढरपूर तालुक्यातील अनेक सहकारी संस्था आर्थिक दृष्टया डबघाईस आलेल्या आहेत. व्यवस्थापन शास्त्राच्या तत्वाप्रमाणे सहकारी संस्था चालविण्यापेक्षा सामाजिक व राजकीय हिताची जोपासना केल्यामुळेसहकारी संस्था व्यावसायिक पातळीवर कमकुवत ठरत आहेत. अनेक सहकारी संस्थांचा आजारीपणा दिवसेंदिवस वाढत आहे व याकडे शासनाचेही दुर्लक्ष होत आहे. या चळवळीचीही शोकांतिका म्हणावी लागेल.[४१]

खरेतर इ.स.१९६० ते इ.स.१९८० हा कालखंड सहकारी चळवळीचे सुवर्णयुग होते. मात्र इ.स. १९९१ नंतर खाऊजा (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) धोरणामुळे महाराष्ट्राप्रमाणेच पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीला उतरती कळा लागली. देशाच्या आर्थिक नियोजनामध्ये सहकारी संघटनपद्धतीकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती सुरू झाली. खाऊजा धोरणामध्ये सहकारी चाळवळीचे अस्तित्वच जवळजवळ नाकारण्यात आले. सहकारी अर्थकारण अकार्यक्षम आहे, भ्रष्टाचाराने पोखरलेले आहे, आधुनिक साधनांच्या बाबतीत मागासलेले आहे व त्यामध्ये मोठया प्रमाणात राजकीय हितसंबध गुंतलेले आहेत असे एक चित्र या चळवळीबाबत निर्माण करण्यात आले सहकारी चळवळीच्या विरोधकांनी ही चळवळ शासनाच्या मदतीची अपेक्षा करू शकत नाहीत. अशी दुराव्याची भावना जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आली.[४२]

सहकारीकृषि प्रक्रिया उद्योग बदललेल्या परिस्थितीत तोटयात येऊ लागले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात पतपुरवठयाबरोबरच शेतीवर आधारीत मालाची प्रक्रिया करण्याचा उद्योग

